मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वाचनालय / संदर्भ / नौपाडा
(जिल्हा वाचनालय)
डाली. १६२ सन १८९६

प्राचीन मरत्न्नाम

लेखक : बाबू रोमेशचंद्र दत्त
भाषांतरकार. ग. ना. वि. वैद्य



म. ग्रं. सं. ठाणें
सन
लेखक बाबू रोमेशचंद्र दत्त
पुस्तकाचें नांव प्राचीन मराठी इतिहास
क्रमांक

प्राचीन भरतभूमि

अथवा

हिंदुस्थानचा अति प्राचीन इतिहास.

खि. श. पूर्वी २००० पासून इ. स. ८०० पर्यंत.

हा ग्रंथ

बाबु रोमेशचंद्र दत्त

ह्यांच्या मूळ इंग्रेजी ग्रंथावरून

गोविंद अमृत वैद्य

यांनीं भाषांतर करून तयार केला.

बडोदें.

शके १८१८—इ. स. १८९६.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व अधिकार भाषांतर कर्त्यानें आपणाकडेस ठेविले आहेत.

किंमत १॥ रुपया.

बडोदें.

"बडोदा वत्सल" प्रिंटिंग प्रेस.



श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड.

श्रीमंत सेनाखासखेल समशेर बहादूर

सयाजीराव महाराज

गायकवाड, बडोदें,

ह्यांस

त्यांची स्वदेश-प्रीति, खरें प्रजावात्सल्य

व विद्येच्या प्रसाराविषयीं कळकळ

ह्या गुणांच्या अभिनंदनार्थ

हा ग्रंथ

भाषांतर कर्त्यानें अत्यादरपूर्वक अर्पण

केला आहे.

प्रस्तावना.

कोऽन्यः कालमतिक्रांतं नेतुं प्रत्यक्षतां क्षमः ।
कविप्रजापतींस्त्यक्त्वा रम्यनिर्माणशालिनः ॥*

राजतरंगिणी.

इतिहास ह्या शब्दाची व्युत्पत्ति ध्यानांत आणिली असतां त्याचे घटकावयव तीन आहेत—'इति-ह-आस.' ह्यांचा अर्थ 'ह्या प्रमाणें झालें' असा आहे. ह्या शब्दाच्या मूळच्या आणि हल्लींच्या अर्थांत एक मोठा भेद झाला आहे. मूळचा अर्थ पुराणांतील उपकथा ह्मणजे अप्रधान गोष्टी असा होता. परंतु हल्लीं इतिहास हा शब्द 'बखर' ह्या अर्थीं योजितात. दोहोंत भेद असा आहे कीं, पहिल्यास प्रमाण केवळ ऋषींचे पुराणांतील लेखच काय ते होत; पण दुसऱ्यांस त्यांहून सबळ असे अनेक आधार लागतात.

ह्या अर्वाचीन अर्थीं 'इतिहास' हा शब्द ज्यास लागेल असे ग्रंथ आमच्या देशांत प्राचीनकाळीं नव्हते. ह्मणजे ग्रीक व रोमन लोकांत सप्रमाण व खरे इतिहास लिहिण्याची जशी पुढें प्रवृत्ति पडली, तशी इकडे कधींही

---

* रम्य आर्यसृष्टि बनवणारे प्रति ब्रह्मदेवच असे जे कवी त्यांवांचून पुरातन काळची स्थिति पुनः दृष्टिगोचर करविण्याचें कोणा इतराचें सामर्थ्य आहे?

पडली असेलशी दिसत नाहीं. प्राचीन हिंदुलोक त्यावेळच्या सर्व राष्ट्रांत सर्व प्रकारें अग्रगण्य असून त्यांच्यांत विद्या प्रत्येक रूपानें पूर्ण अवतरली असतां, त्यांच्या हातून येवढें हेंच एक अंग सुटावें ही आश्चर्याची गोष्ट आहे. त्याबद्दलचीं खरीं कारणें आतां कळतील असें वाटत नाहीं; परंतु आपल्या पूर्वजांच्या मनाचा एकंदर कल प्रवृत्तिमार्गापेक्षां निवृत्तिमार्गाकडेस विशेष होता, हें एक सबळ कारण असण्याचा संभव आहे.

कसेंही असो, ही गोष्ट खरी आहे कीं, इतिहास ह्मणून प्राचीन काळचे ग्रंथ आमच्यांत नाहींत व त्यामुळें लोकांची साधारण समजूत अशी आहे कीं, हिंदुस्थान देशाची पूर्वीची ऐतिहासिक माहिती आपणांस मुळींच मिळावयाची नाहीं. परंतु ही समजूत खोटी आहे अशी हा पुढील छोटेखानी ग्रंथ वाचून, वाचकांची खात्री होईल असें आह्मांस वाटतें. ही हकीकत अगदीं तारिखवार अथवा अगदीं क्रमवार मिळेल असें नाहीं, तथापि ती शतकवार मिळण्यास कांहीं हरकत नाहीं. ही माहिती सर्व जगांत पुरातन ग्रंथ जे वेद व दुसरे संस्कृत ग्रंथ ह्यांवरून मिळविलेली आहे व ती इतकी स्पष्ट आहे कीं, एखाद्या भूगर्भवेत्त्यास खडकांत दगडांचे निरनिराळे थर दिसतात, त्याप्रमाणें ह्या माहितीचे थर इतिहासकारास जुन्या ग्रंथसमूहांत दृग्गोचर होतात. हा ग्रंथसमूह आपल्या राष्ट्राची चार हजार वर्षांची

जशी काय सबंध आणि मनोहर कहाणीच सांगत आहे.

वेद ह्मणजे आमचीं धर्मपुस्तकेंच आहेत अशी हजारों वर्षांची व अगदीं अलीकडेपर्यंतची आमची समजूत आहे. परंतु आधुनिक विद्वानांनीं त्या विद्येच्या जुन्या भांडारास नवीन रीतीनें दोहनाची सुरुवात केल्यामुळें, फक्त जें धर्मशास्त्र होतें त्यांतच इतिहासाच्या अत्युत्तम माहितीचा झरा दिसूं लागला. ह्या वेदांत इंद्रादि देवांच्या स्तुत्या व दस्यूं वगैरे काळे लोकांचा नाश करणाऱ्या ज्या प्रार्थना आहेत, त्यांवरून आर्य लोक हिंदुस्थानांत आल्यावर त्यांच्या आणि येथील मूळच्या काळ्या लोकांच्या मधील युद्धाची जी हकीकत काढिली आहे, ती फारच सुंदर असून, दुसऱ्या तारिखवार ऐतिहासिक माहितीप्रमाणें अगदीं सप्रमाण आहे.

हा जो छोटेखानी इतिहास आह्मी आपल्या मराठी वाचकांस सादर करीत आहोंत, त्यासंबंधीं विशेष महत्वाची गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी ही आहे कीं, ह्या इतिहासांत लढाया, राजे वगैरेंच्या हकीकतीपेक्षां धर्म, रीतिरिवाज, सुधारणा, विद्या वगैरे गोष्टींची मुद्देसूद हकीकत विशेष दिलेली आहे. ह्यावरून युरोप खंडांतील लोकांस हल्लीं फलद्रुप झालेलीं जीं शास्त्रें व विद्या या बहुतेकांची जन्मभूमि हिंदुस्थान होती असें समजून एक प्रकारचा स्वाभिमान आपल्या मनांत उत्पन्न होतो. हिंदूंचा मूळचा धर्म कसा होता व त्यांत वेळोवेळीं व

विशेषतः बौद्धधर्मामुळें कसे फेरफार होत गेले, त्याविषयीं विवेचन फारच सुरेख केलेलें असून, त्यापासून धर्माचें खरें स्वरूप समजल्यामुळें धर्मवेडेपणा व खोट्या समजुती ज्या आपल्या लोकांत आहेत, त्या पुष्कळ अंशीं कमी होण्याचा संभव आहे.

बाबु **रोमेशचंद्र दत्त** यांनीं आपल्या संबंधानें इंग्रज लोकांचे दुराभिमान व दुराग्रह आहेत ते दूर करण्याच्या हेतूनें हा ग्रंथ मुख्यतः लिहिलेला आहे असें वाटतें. त्यामुळें त्यांनीं युरोपांत हल्लीं उत्तम मानलेला जो ग्रीस देशाचा इतिहास त्यांतील हकीकतींची आपल्या देशाच्या कित्येक हकीकतींशी ठिकठिकाणीं तुलना केलेली आहे. त्यामुळें सुधारलेल्या राष्ट्रांत सर्वांत नांवाजलेले जे ग्रीक लोक त्यांच्यापेक्षांही धर्म वगैरे बाबतींत आम्ही पूर्वी किती श्रेष्ट होतों तें चांगले प्रकारें ध्यानांत येतें. निरनिराळ्या राष्ट्रांच्या इतिहासाच्या अशा तुलनांनीं ऐतिहासिक दृष्टीचा कोतेपणा नाहींसा होऊन, तिचा पोंच वाढतो व त्यामुळें जगाच्या अगदीं निरनिराळ्या टोंकावर घडून येणाऱ्या गोष्टींच्या प्रगतीवर अति विस्तृत परंतु अदृश्य अशा एकच प्रकारच्या कारणांचा व शक्तींचा प्रादुर्भाव कसा चालतो तें समजतें.

ह्या ग्रंथांतील कित्येक अनुमानें व गोष्टींसंबंधानें मतभेद पडण्याचा संभव आहे. परंतु तीं अनुमानें व त्या गोष्टी मराठी वाचकांस ह्मणजे विशेष विस्तृत लोक-

समाज़ासं समजून त्याबद्दल चांगला उहापोह व्हावा व खरें काय आहे तें बाहेर यावें हें इष्ट आहे.

ह्या ग्रंथांतील शेवटील खंडांत आपलीं प्राचीन नाटकें, काव्यें, वगैरे ग्रंथांतून निवडक वेंचे ज्या त्या पुस्तकाच्या इंग्रजी भापांतरांवरून बाबु **रोमेशचंद्र** यांनीं दिलेले आहेत. ते वेंचे फक्त भापांतरानें दाखल करण्यापेक्षां मूळ संस्कृत ग्रंथांतील अवतरणें दिलीं असतां तीं आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस चांगलीं समजून त्यांतील मर्म लवकर ध्यानांत येईल व त्यांपासून त्यांस जास्ती आनंद होईल असें वाटल्यावरून ज्या त्या ठिकाणीं असे अस्सल संस्कृत उतारे आह्मीं टीपांच्या रूपानें दिले आहेत.

ह्या ग्रंथाचें भापांतर माझ्यापेक्षां संस्कृत भापेचें ज्ञान ज्यास विशेष आहे व ज्यास मराठी भाषा चांगल्या प्रकारें आवगत आहे, त्यानें केलें असतें तर तें समयास ह्यापेक्षां चांगलें वठून लोकांस विशेष प्रिय होण्याचा संभव होता. परंतु अशा विद्वानांस फुरसूद मिळून ह्या इंग्रजी ग्रंथाचें भापांतर करण्याचें त्यांच्या मनांत येईपर्यंत वाट पहात बसण्यापेक्षां आपल्या अल्प शक्तीप्रमाणें जी कांहीं देशबांधवांची सेवा घडेल ती करावी असा विचार करून हा लहानसा ग्रंथ त्यांजपुढें आणिला आहे. अथवा कविकुलगुरुक्तीप्रमाणें:—

जें काव्यें रचिती मनोज्ञ सुकवी, पावावया तद्यशा ।
आहे मंदमती तथापि करितों आतां प्रयत्ना अशा ॥
जीं कां उंच नरास लभ्य सुफळें, तीं तोडण्या ठेंगणा ।
बाहू ऊर्ध्व करी, तयास हंसती; तैसेंचि हेंही ह्मणा ॥

रघुवंश.

हा ग्रंथ वाचून आपल्या प्रिय देशाच्या प्राचीन इतिहासाकडेस आमच्या देशबांधवांचें लक्ष लागेल तर माझे सर्व श्रम सफळ झाले असें मी समजेन.

बडोदें, तारीख २०
माहे आगष्ट १८९६.

गोविंद अमृत वैद्य.

नं. ९९

अनुक्रमणिका.

खंड.	विषय.	पृष्ठ.
	प्रथमयुग–वैदिक काळ, ख्रि. श. पूर्वी २००० पासून १४०० पर्यंत.	
१ लें.	उपोद्घात	१
२ रें.	मूळच्या रहाणाऱ्या लोकांशीं युद्ध.	१९
३ रें.	रीतिरिवाज व सुधारणा	३३
४ थें.	धर्म.	४२
	द्वितीययुग–शौर्यकाळ, ख्रि. श. पूर्वी १४०० पासून १००० पर्यंत.	
१ लें.	कुरु व पांचाळ.	६१
२ रें.	कौशल, विदेह आणि काशीलोक....	७६
३ रें.	रीतिरिवाज आणि सुधारणा.	९२
४ थें.	धर्म.	१०७
	तृतीययुग–ज्ञानकाळ, ख्रि. श. पूर्वी १००० पासून ३२० पर्यंत.	
१ लें.	हिंदूंचा प्रसार.	१२२
२ रें.	रीतिरिवाज आणि सुधारणा.	१३६

खंड.	विषय.	पृष्ठ.
३ रें.	शास्त्र आणि तत्वज्ञान.	१५१
४ थें.	बौद्धधर्म	१६१

चतुर्थयुग–बौद्धकाळ, ख्रि. श. पू. ३२०
पासून इ. स. नंतर ४०० पर्यंत.

१ लें.	मागधी साम्राज्य....	१८३
२ रें.	शिल्पशास्त्र आणि कला....	१९९
३ रें.	रीतिरिवाज आणि कायदे.	२११
४ थें.	शास्त्रांचें प्रगमन	२२४

पंचमयुग–पौराणिक काळ, इ.
सं. ४०० पासून ८०० पर्यंत.

१ लें.	कनोज आणि उज्जयनी.	२३३
२ रें.	धर्म आणि रीतिरिवाज	२५३
३ रें.	शिल्पशास्त्र आणि कला....	२७०
४ थें.	शास्त्रें आणि ग्रंथ....	२७९

प्राचीन भारतभूमि

अथवा

हिंदुस्थानचा अति जुना इतिहास.

प्रथम युग—वैदिक काळ.

सिंधुनदाच्या तिरीं हिंदु लोकांच्या वसाहती.

ख्रिस्ती शकापूर्वी २००० पासून १४०० वर्षांपर्यंत.

खंड १ ला.

उपोद्घात.

अ सें झटलें आहे—आणि तें बहुतांशीं खरेंही आहे—कीं, मानवजातीची मूळ सुधारणा नैसर्गिक कारणांनीं झाली, ह्मणजे मोठमोठ्या नद्यांच्या सुपीकपणामुळें आणि उष्ण व अनुकूळ अशा हवेच्या योगानें ती घडून आली. ह्या दोन्ही गोष्टी धान्यें उत्पन्न करण्यास व मनुष्याच्या सुखास सारख्याच उपयोगीं आहेत. अलिकडे दुसरीं कित्येक कारणें प्रचारांत आल्यामुळें समशीतोष्ण आणि थंड

देशांत अर्वाचीन जोमदार सुधारणेस जागा मिळालेली पहाण्यांत येते, परंतु फार प्राचीनकाळीं विपुल आणि सुपीक पाण्याचे पूर व उष्ण आणि सुखकर हवा, ह्या साधनांनीं सृष्टीदेवीनें जेथें मानवीप्राण्यास हात दिला असेल अशा प्रासादिक ठिकाणांशिवाय इतर ठिकाणीं मानवीप्राण्याच्या सुधारणेची ओझरती झुळुकही पहाणें दुरापस्त होतें.

अर्वाचीन शोधांतीं असें दिसून आलें आहे कीं, सुमारें तीन आणि चार हजार वर्षांच्या दरम्यान सुधारणा ही सर्व मनुष्य जातीस प्राप्त झालेली नव्हती, परंतु ती जुन्या जगांतील फक्त चार प्रासादिक ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत असे. **नाईल** नदीचा प्रदेश हा एका प्रबल चक्रवर्ती राज्याचें व फार प्राचीन सुधारणेचें स्थान झालें होतें. त्याचप्रमाणें **युफ्रेटिस्** आणि **टायग्रिस्** ह्या नद्यांच्या काठावर **सेमिटिक, सिरीयन** आणि **आसिरीयन** ह्या प्रबल राष्ट्रांनीं आपली सुधारणा करून तिचीं किरणें आजूबाजूच्या प्रदेशांवर पाडिलीं होतीं. **ही-हांग-हो** आणि **यांग-से-क्यांग** ह्या नद्यांच्या तिरांवरही सदरहुप्रमाणें **तुराणी** लोकांनीं सुधारणा केली होती; ती हजारों वर्षं काळाच्या सपाट्यांतून वांचून अद्याप चमकत आहे. चौथें ठिकाण **सिंधुनद** व त्यास मिळणाऱ्या नद्यांच्या काठचा प्रदेश हा होय. ह्या पांच

नद्यांच्या प्रदेशांत, जे आर्य लोक हल्लीं सर्व पृथ्वीवर राज्य चालवीत आहेत, आणि जे भूगोलाच्या लांब-लांबच्या भागांतही सुधारणेचा प्रसार करीत आहेत, त्यांच्या एका शाखेनें अगदीं प्रथमतः सुधारणादेवीचा झेंडा रोविला. हल्लींच्या काळीं सुधारणा इतकी साधारण झाली आहे कीं, फक्त शंभर पिढीवर ह्या जगांत ती चार तुटक प्रदेशांत संचार करीत होती, ह्या चार प्रासादिक आणि आकुंचित् ठिकाणच्या दरम्यान शिकार करणाऱ्या धनगरांच्या जातीच्या लोकांनीं भरलेले अफाट प्रदेश असत, हे लोक नेहमीं एकमेकांशीं लढाई करीत व एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं आपले तंबू व गुरेढोरें घेऊन झुंडीच्या झुंडीनीं फिरत, आणि त्यांच्या स्थलांतराचा अथवा ऐतिहासिक राष्ट्रीय अस्तित्वाचा

---

१ नरस्थिती-संशोधक-मंडळ्यांच्या अर्वाचीन शोधांवरून असें सिद्ध झालें आहे कीं, **युरोप** व **आशिया** खंडांतील **आर्यां**च्या जाती **ट्यूटन, सेल्ट, स्ल्याव्ह, इटालियन, हिलेनीज, पार्शी** आणि **हिंदु** वगैरे लोक, एका पुरातन भाषेपासून निघालेल्या भाषा, ज्यांपैकीं संस्कृत ही अती जुनी भाषा आहे, बोलत असले तरी ते वस्तुतः एका खुंटाचे वंशज नाहींत. **मध्यएशिया** व पूर्वेकडील **युरोपां**त रहाणाऱ्या अव्वल **आर्यां**नीं चोहोंकडेस आपला विजयध्वज फडकाविला व अंकित केलेल्या लोकांत आपली भाषा सुरूं केली. ह्या पादाक्रांत केलेल्या लोकांचे वंशज त्या भाषेचें रूपांतर झालेल्या भाषा अद्याप बोलत आहेत. ह्या **आर्यभाषा** बोलणाऱ्या अर्वाचीन राष्ट्रांस **आर्य** लोक म्हणणें सायस्कर आहे. **हिंदु** लोक आपली उत्पत्ति खुद्द **आर्यां**पासून झाली असें म्हणतात.

मागमूस मागें ठेवीत नसत इतकेंच नाहीं, परंतु मानवी प्रगति, विद्या आणि शास्त्र ह्यांच्या इतिहासांत आपली कांहीं खूणही ठेवीत नसत, अशी कल्पनाही मनांत आणणें मुष्किलीचें काम आहे.

मनुष्य जातीच्या बाल्यसुधारणेचा इतिहास ह्मटला ह्मणजे ह्या चार देशांचा इतिहास हाच होय. **काल-गतीनें** हा सुधारणादीप प्रज्वलीत व विस्तृत होत गेला, परंतु ह्या अस्पष्ट सुधारणारूप अरुणोदयावर, ह्या प्रगति व ज्ञानाच्या लघु उगमावर, मनुष्य हा आपली दृष्टि नेहमीं कळकळीनें मागें फेकील, आणि ह्याच्या प्राप्तीबद्दल अर्वाचीन जगांतील ज्ञानवंत आणि शक्तिमान् राष्ट्रें **मिसर, बाबिलन, चीन** आणि **हिंदुस्थान**, ह्या देशांतील धनगर आणि शेतकरी लोकांचीं ऋणीं आहेत. ह्या पूर्वेकडील **दीपा**चें तेज आकर्षून त्याचें परावर्तन पश्चिमेकडील देशांवर दशगुणें पाडल्याचें श्रय **ग्रीस** व **रोम** ह्या देशांस आहे.

जगांतील अतिप्राचीन सुधारलेल्या राष्ट्रांच्या इतिहासांचें अध्ययन करीत असतां, अर्वाचीन अथवा **ग्रीस** व **रोम** ह्यांच्याही इतिहासाप्रमाणें, घडून आलेल्या गोष्टींच्या तारखा अथवा ओघ निश्चितपणें नक्की ठरवितां येणार नाहींत, परंतु ह्या अव्वल राष्ट्रांत घडून आलेल्या गोष्टींचा साधारण ओघ नक्की करण्यास, एका पिढीपासून दुसऱ्या पिढीच्या दरम्यान जे महत् परिणाम झाले

ते ध्यानांत ठेवण्यास आणि ज्यांच्या त्यांच्या राष्ट्रीय अस्तित्वाच्या निरनिराळ्या क्रमवार युगांमध्यें ज्ञान, विद्या आणि शास्त्र ह्यांची प्रगति लक्षांत आणण्यास आपल्याजवळ पूर्ण साधनें आहेत.

मिसर, बाबिलन आणि **चीन** ह्या देशांबद्दल जर हें विवेचन खरें आहे, तर **हिंदुस्थाना**संबंधानें ही गोष्ट होणें विशेष शक्य आहे. **मिसर** देशांतील सांकेतिक चित्रलेखांवरून त्या देशाचे प्राचीन राजे, **पिरमिद्** नामक इमारती बांधणारे, राजवंश, स्वाऱ्या आणि लढाया ह्या गोष्टी कळतात. **आसिरिया** आणि **बाबिलन** ह्या देशांतील अशीच माहिती त्या देशांतील परश्वाकार लिपीच्या शिलालेखांवरून मिळते. **चीन** देशांत देखील त्या देशच्या ग्रंथांवरून लोकांची सुधारणा आणि उन्नति ह्यांच्या ज्ञानापेक्षां राजे आणि त्यांचे वंश ह्याबद्दलची माहिती जास्त समजते.

हिंदु लोकांचे जुने ग्रंथ, जे **युरोपच्या** लोकांस गेले शतकांतच माहीत पडले, ते ह्यापेक्षां निराळ्या प्रकारचे आहेत. ह्या ग्रंथांत राजे व त्यांच्या वंशांची हकीकत क्वचित्च सांपडते, व जर कोठें एखादी यादी असलीच तर तींत फक्त नांवें असतात आणि इतिहासदृष्टीनें तीवर वजन ठेवण्यासारखी ती नसते. तथापि हा जो विपूल ग्रंथठेवा आपल्याजवळ आहे आणि जो हिंदूंच्या इतिहासाच्या निरनिराळ्या काळीं रचण्यांत आला

होता, तो हिंदु लोकांच्या नैसर्गिक अस्तित्वाच्या निरनिराळ्या क्रमवार युगांत हिंदूंची रहाणी आणि सुधारणा कशी होत गेली तिच्या वस्तुस्थितीचें हुबेहुब चित्र आहे. त्यामुळें हे प्राचीन ग्रंथ हिंदुराष्ट्राचा चार हजार वर्षांचा संगतवार आणि व्यापक इतिहासच होय, आणि तो इतका भरपूर व स्पष्ट आहे कीं, वरवर पहाणारासही तो ध्यानांत येईल.

शीलालेखांत आणि ताडपत्रांवर लिहिलेल्या ग्रंथांत दिलेली माहिती, ही ज्या त्या काळीं चालू गोष्टी घडून आल्या असतील त्यांचें स्मारक करण्याच्या हेतूनें लिहिलेली असते; परंतु कोणत्याही लोकांचीं गाणीं, कविता व धर्मग्रंथ हीं त्या लोकांच्या सुधारणेचीं व विचारसरणीचीं अकल्पित आणि खरीं द्योतकें आहेत. हिंदूंचे अव्वल विचारतरंग बाहेर पडले, ते प्रथमतः अक्षरांनीं ग्रंथांत लिहिले गेले नसल्यामुळें ते परिप्लुत व अबाधित होते, आणि त्यामुळें ते त्या राष्ट्राच्या विचारांचे आणि मनोवृत्तींचे स्वाभाविक आणि खरे उल्लेख होत. हे दगडांवर अथवा ताडपत्रांवर रक्षून ठेवलेले नव्हते, परंतु लोकांनीं ते आपल्या धर्मपरायण स्मृतींत ठेविले होते; हा पवित्र वारसा त्यांनीं, त्यांत यत्किंचितूही फेरफार न करण्याविषयीं मोठी काळजी घेऊन, एका शतकापासून दुसऱ्या शतकापर्यंत जसाचा तसाच चालविला. हें कृत्य हलीं अद्भुत चमत्कार अथवा अमानुषकर्म मान-

ण्यांत येईल. लेखनपद्धती सुरू होईपर्यंत शेंकडों वर्षें ही जुनी विद्या लोकांनीं आपल्या स्मरणशक्तींत जपून ठेविली होती, व ती लिपीमध्यें गोविल्या नंतरही शिक्षक व शिष्य, शिकविण्यास व शिकण्यास, घोकीव रीतीनें पसंत करीत, आणि धर्मसूत्रें पुस्तकावरून शिकणें हें एक पाप मानीत. पुढील काळांत दुसरी ग्रंथरचना झाली, व तिचे थरचे थर हिंदुस्थानच्या जुन्या विद्येवर इतक्या स्पष्ट रीतीनें चढले आहेत कीं, एखाद्या भूगर्भ तत्ववेत्त्यास खडकांत दगडाचे निरनिराळे थर जसे स्पष्ट दिसतात, त्याप्रमाणें हे ग्रंथरचनेचे थर इतिहासकर्त्यास दृग्गोचर होतात. युरोपांतील प्राग्विद्वद्वर्यांनीं गेले शतकांत ह्या मोठ्या ग्रंथसंग्रहाचें शोधन, परिशीलन, आणि वर्गीकरण केलें आहे व प्रत्येक ग्रंथाचा काळ कोणता तें ठरविलें आहे. ह्याप्रमाणें परिशीलन व वर्गीकरण झालेला हा ग्रंथसमूह चार हजार वर्षें ह्या राष्ट्राची रहाणी कशी होती व त्या लोकांची प्रगति कशी होत गेली त्याविषयीं सबध व मनोहर कहाणी सांगत आहे. ही गोष्ट जे लोक जगांतील इतर लोकांपासून देश व अनुसंगिक गोष्टींत प्रथम वेगळे पडले, ज्यांनीं आपल्या धार्मिक व लौकिकसंस्था उभारल्या आणि ज्यांनीं आपली विद्या, कायदे आणि शास्त्रें रचिलीं, अशा एका आर्य लोकांची होती. ही गोष्ट मनुष्य जातीच्या प्रगतीच्या व सुधारणेच्या वृत्तांतांतील एक अतीशय रम्य-णीय आणि उपदेशप्रद भाग आहे.

ह्या आश्चर्यकारक वृत्तांताचे, काळमानानें निर्दिष्टीत, असे व्यवस्थेशीर अनेक भाग होतात, परंतु त्यांपैकीं पांचच भागांचा प्राचीन इतिहासांत समावेश होतो. ह्या पांच काळांची त्रोटक हकीकत ह्या उपोद्घातांत देणें इष्ट आहे.

१ वैदिककाळ.

सिंधुनदावरील हिंदूंच्या वसाहती.

खिस्ती शकापूर्वी २००० पासून १४०० वर्षांपर्यंत.

हिंदु लोकांनीं पंजाबप्रांतांत वसाहती करून तो प्रांत मूळच्या कृष्णवर्ण लोकांपासून जिंकिला, तेव्हांपासून त्यांच्या इतिहासास प्रारंभ होतो. ही देश जिंकणें आणि वसाहती करण्याबद्दलची लढाई शतकेंच्या शतकें चालली होती. त्यामुळें बाणदार आणि शूर मूळच्या देशी पुत्रांस एक नदीहून दुसरी नदी आणि एक किल्लयाहून दुसरा किला, ह्याप्रमाणें हार घेऊन मागें हटावें लागलें. मोठमोठीं निबीड अरण्यें हळुहळू तोडण्यांत आलीं, सुपीक नदीनाल्यांच्या कांठीं आजूबाजूनें धान्यांच्या प्रफुल्लीत शेतांनीं व्याप्त अशीं सुंदर गांवें व खेडीं जन्मास आलीं, सृष्टींतील दैदीप्यमान देवांस हव्यकव्यांनीं पूजण्याचे हिंदुरिवाज स्थापण्यांत आले, आणि सरते-शेवटीं हिंदुसुधारणा सिंधुनदापासून सरस्वती नदीपर्यंत सप्त नद्यांच्या प्रांतांत पसरत गेली. मध्यंतरीं आर्य

लोकांमध्येंच मोठी दुही उत्पन्न झाली. त्यांच्या एका शाखेनें जीवाचा बळी देणें आणि सोमरस पिणें ह्या गोष्टींस असंमति दाखवून त्यांचा निषेध केला आणि ही शुक्लपक्षाची मंडळी पंजाबांतून निघून पश्चिमेस इराणांत गेली. हेच प्राचीन पारशी लोक होत व त्यांनीं पारशी धर्म स्थापिला.

ह्या ज्या गोष्टी घडून आल्या त्यांच्या तारखा यत्-किंचित्ही निश्चितपणानें नक्की करतां येत नाहींत. प्रोफेसर **म्याक्समुल्लर** साहेब असें ह्मणतात कीं, चार हजार वर्षांपूर्वीं अथवा त्यापेक्षां कांहीं कमी मुदतीवर, जे आर्य लोक पंजाबांतील नद्यांकडेस दक्षिणेस प्रवास करीत गेले, ते रोमन लोकांच्या जुपिटरप्रमाणें आपल्या मुख्य दैवतेस **द्यौष्पिता** (स्वर्गांतील बाप) असें ह्मणत असत. ह्या पंजाब जिंकणाऱ्या **आर्यांनीं** ह्या **द्यौष्पित्या**ची आणि दुसऱ्या दैदीप्यमान सृष्ट-देवांचीं जीं स्तोत्रें रचिलीं, त्यांचेंच एकीकरण **ऋग्वेदा**च्या रूपानें आपणास मिळत आहे. ह्या स्तो-त्रांचा साधारण अदमासी काळ आपण इ. स. पूर्वी २००० पासून १४०० पर्यंत धरला असतां कांहीं हर-कत नाहीं. हीं सहाशें वर्षें हें हिंदूंच्या इतिहासाचें पहिलें युग, ह्मणजे **सिंधुनद** आणि त्यास मिळणाऱ्या नद्यां-वरील हिंदूंच्या वसाहतींचा काळ असें साधारण अदमा-सानें आपण गणूं.

२ शौर्यकाळ.

गंगानदीवरील हिंदूंचीं राज्यें.

ख्रिस्ती शकापूर्वी १४०० पासून १००० पर्यंत.

पंजाबाकडून हिंदूंचा प्रवाह गंगानदीच्या प्रांताकडेस वळला आणि थोडे शतकांतच सर्व गंगथडी, उत्तरेस हिमालयापासून काशी आणि बहारप्रांतापर्यंत, शूर, लढवय्ये आणि सुधारलेल्या राष्ट्रांनीं भरून गेली. खरोखर ह्या जोमदार वसाहत्त्यांनीं (वसाहत करणारांनीं) आपली स्वदेशभूमि जी पंजाब, हीस अगदीं मागें टाकिलें. ह्यांचीं चकचकित राजमंदिरें व विद्यालयें, ह्यांचीं सादिक्रीडा युद्धें व पराक्रम, आणि ह्यांचे सामाजिक परिष्कृत निर्बंध व धर्मविधी, ह्यांचें जें चित्र आपल्यापुढें आहे तें, गंगथडीच्या सुसंस्कृत हिंदुलोकांची सुधारणा त्यांच्या पंजाबांतील वट्टयाकट्टया पूर्वजांच्या स्थितीपेक्षां फार पुढें होती, अशी साक्ष देत आहे. गंगथडीच्या हिंदूंमध्यें कुरु व पांचाळ हे होते. कुरु हे गंगेच्या वरच्या भागाला हल्लींच्या दिल्ली शहरच्या पूर्वेकडील प्रांतांत वसाहत करून राहिले होते, आणि त्यांचे प्रतिस्पर्धी पांचाळ ह्यांनीं कनोज शहराजवळच त्याच नदीच्या खालच्या बाजूला आपलें वास्तव्य केलें होतें. आणखी खालच्या बाजूस काशी शहराजवळ काशी जातीचे लोक राहिले होते. त्यांच्याही खालीं

आणि नदीच्या उत्तर दिशेस तिरहुत प्रांतांत विदेह लोक होते; कुरु आणि विदेह ह्यांच्यामध्यें ज्यास हल्ली अयोध्याप्रांत ह्मणतात तो प्रदेश पराक्रमी कोशल जातीच्या लोकांनीं व्यापिला होता. ह्या व दुसऱ्या जातींमध्यें आरसपरस स्पर्धा, फिरती मैत्री आणि अंतस्थ लढाया चालू असत; परंतु त्या सर्वांस सर्व साधारण भाषा, ग्रंथसंपत्ति, एक धर्म व सारखे सामाजिक व धार्मिक रीवाज ह्यांनीं एक ठिकाणीं बांधिले होते. ग्रीक लोकांच्या इतिहासाचें अध्ययन करणाराचें मन, ह्या गंगथडींतील भरभराटीस आलेल्या आणि सुधारलेल्या राज्यांची ग्रीस देशांतील शहरें तीं ऐन अमदानींत असतां त्यांच्याशीं, व कमी सुधारलेल्या परंतु राकट अशा सिंधुनदावर वसाहत करणाऱ्या हिंदुलोकांची ट्रोजन लोकांबरोबर लढणाऱ्या बळकट ग्रीक लोकांशीं, तुलना करण्यास धांवते. ह्या गंगथडीच्या राज्यांचें वर्चस्व आणि बळ चार पांच शतकें चाललें होतें.

२ ज्ञानकाळ.

सर्व भरतखंडांत हिंदुलोकांचा प्रसार.

ख्रिस्ती शकापूर्वी १००० पासून ३०० वर्षोपर्यंत.

उत्तर हिंदुस्थानांत काशी आणि उत्तर बहारप्रांतांत वस्ती झाल्यानंतर हिंदु लोकांच्या वसाहती लांबलांबच्या प्रदेशांत होऊं लागल्या आणि थोड्याच शतकांत

सर्व भरतखंड हिंदुमय होऊन गेलें. दक्षिणबहार अथवा मागध प्रांतांत सुधारणा लौकरच झाली होती; ह्या काळांत तत्वज्ञानाच्या शाखा वाढल्या, आणि हल्लीं एक तृतियांश मानवीजातींत चालत असलेला धर्म गौतम बुद्धानें इ. स. पूर्वीं सहाव्या शतकांत मागध प्रांतांत प्रसिद्ध केला. माळवा अथवा आवंति हें विद्या आणि सुधारणा ह्यांचें आदिपीट होऊन वसलें होतें. विंध्याद्रि पर्वताच्या पलीकडेस दक्षिणेंत थेट कृष्णानदीपर्यंत आंध्रांनीं मोठें व प्रबल राज्य स्थापन केलें होतें. आपली राजधानी मोठी आहे व आपल्या राज्यांत प्रसिद्ध विद्यालयें आहेत, अशी शेखी ते लोक मिरवीत. यमुना व गंगानदीवरील वसाहत्यांनीं गुजराथेंत जाऊन द्वारकेचें प्राचीन बंदर स्थापिलें. व ह्या बंदरांतून व्यापारी लोक जहाजांत बसून थेट हिंदुस्थानच्या दक्षिणेकडील शेवटच्या प्रदेशांत जाऊं लागल्यामुळें पांड्यांचें राज्य सुधारण्यास मदत झाली अशी कित्येकांची धारणा आहे. परंतु निर्विवाद गोष्ट ही आहे कीं, इ. स. पूर्वीं चौथे शतकांत पांड्य, चोल आणि चेर ह्या लोकांनीं आपआपलीं प्रबल राज्यें कृष्णानदीच्या दक्षिणेस स्थापिलीं होतीं. पूर्वेस अंग (पूर्वबहार), वंग (बंगाल), आणि कलिंग (ओरिसा) ह्या प्रांतांत हिंदुसुधारणा, धर्म आणि विद्या ह्यांचीं किरणें पडलीं व दूरचें लंका हें बेट जिंकून तें हिंदुमय करण्यांत आलें.

ह्याप्रमाणें आलेक्झ्यांडर धी ग्रेटच्या स्वारीच्या पूर्वी, जंगलें आणि ओसाड प्रदेश खेरीज करून बाकी सर्व हिंदुस्थान देशभर हिंदुसुधारणा, रीतिरिवाज, आणि धर्म हीं चालू झालीं होतीं. दक्षिणेकडील नवीं आणि उत्तरेकडील जुनीं राज्यें ह्यांच्यामध्यें जो भेद आहे त्याविषयीं खुलासा करणें जरूरीचें आहे. पंजाबांत आणि गंगथडींत आर्य लोक शिरले तेव्हां त्यांचा जमाव फार मोठा होता आणि त्या ठिकाणचे मूळचे लोक फार जंगली होते. त्यामुळें आर्यांनीं मूळच्या लोकांचें अगदीं निर्मूलन केलें अथवा त्या प्रांतांतून त्यांस हद्दपार केलें. उत्तर हिंदुस्थानचे लोक ह्या कारणामुळें कमीजास्ती संख्येनें निर्भेळ आर्य-उत्पत्तीचे आहेत. परंतु जे आर्य लोक दक्षिण हिंदुस्थान, बंगाल आणि बहार ह्या प्रांतांत वसाहत करावयास गेले त्यांची संख्या थोडी होती, व त्या विस्तीर्ण प्रदेशांतील मुळच्या लोकांत बरीवाईट परंतु एक प्रकारची सुधारणा वसत होती. ह्या मूळच्या असंख्य लोकांचें निर्मूल करणें ही गोष्ट अशक्य होती; त्यामुळें आर्य वसाहत्यांनीं ह्या मूळच्या लोकांत मिळून जाऊन आपली सुधारणा, भाषा आणि धर्म त्यांच्यांत सुरू केलीं. ह्या बनावामुळें दक्षिण आणि पूर्व हिंदुस्थानच्या बहुतेक लोकांची उत्पत्ति ह्या सुधारलेल्या अनार्य मुळापासून झालेली आहे.

ह्या तिसऱ्या युगांत ह्मणजे ख्रि. श. पूर्वी सहाव्या,

पांचव्या आणि चौथ्या शतकांत जेथें जेथें हिंदु लोकांची वस्ति होती त्या सर्व प्रदेशाचा नकाशा काढून आर्य-सुधारणेच्या मानानें रंग भरला, तर त्या नकाशांत सदर रंगाच्या निरनिराळ्या लकेच्या नजरेस पडतील. उत्तर **हिंदुस्थान** बहुतेक **आर्यमय** व दक्षिण आणि पूर्व **हिंदुस्थान** कमीजास्ती प्रमाणानें **अनार्य** असून त्यावर **आर्य-धर्म** व सुधारणा यांचीं पुटें चढविलीं होतीं असें दिसून येईल. ख्रि. श. पूर्वीं सहाव्या आणि पांचव्या शतकांतील ग्रंथकारांचें **हिंदुस्थाना**बद्दल असेंच मत होतें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ह्यापैकीं एका ग्रंथकारानें **हिंदू**-च्या उत्पत्तीची शुद्धता कशी आहे तें दाखविण्याकरितां **हिंदुस्थान**चे तीन विभाग केले आहेत. उत्तर **हिंदुस्थान**चा अनुक्रम पहिला आहे, त्याच्या खालोखाल दक्षिण व **पूर्वबहार, माळवा, गुजराथ** आणि दक्षिणेचा मुलूख हे येतात. आणि **वंग** (बंगाल), **ओरिसा** व कृष्णानदी-च्या दक्षिणेकडील प्रदेश हे शेवटले होत. ह्या तिसऱ्या युगांतील **हिंदुस्थान**च्या स्थितीची तुलना करण्याकरितां त्यासारखेंच उदाहरण पाहिजे असल्यास **अलेक्झां-डर**च्या मृत्युनंतर **ग्रीक** लोकांची स्थिति मनांत आ-णिली असतां पुरें आहे. ह्यावेळीं खुद्द **ग्रीस** देशाच्या बाहेर **मासिदन, मिसर** आणि बहुतेक पश्चिम **एशिया** ह्या प्रदेशांनीं **ग्रीक** सुधारणा, धर्म आणि विद्या ह्यांचा झगा पांघरला होता.

४ बौद्धकाळ.

मागधांचें वर्चस्व.

ख्रिस्ती शकापूर्वी ३२० पासून इ. स. ४०० वर्षांपर्यंत.

हिंदु इतिहासाच्या पहिल्या तीन युगांत हिंदु लोक प्रथम **पंजाबांत**, नंतर **गंगथडींत**, आणि त्या नंतर सर्व **हिंदुस्थानभर** पसरले. परंतु चौथे युगांत ह्या हिंदूंच्या निरनिराळ्या जातींचें एक मोठ्या आणि प्रबल राज्याच्या अमलाखालीं ऐक्य झालें. **हिंदुस्थानांतून आलेक्झ्यांडर धी ग्रेट** ह्याचें पाऊल माघारें पडतांच महान् **चंद्रगुप्त** यानें **मगध** देशांत एक नव्या राज्याची स्थापना केली आणि आपल्या जोमदार अमलाखालीं सर्व उत्तर **हिंदुस्थान** प्रथमतःच आणिलें. त्याचा नातु महान् **अशोक** ह्यानें, इ.स. च्या चौथ्या शतकांत **कॉन्स्टन्टाईन** ह्या रुमशाम्च्या बादशहानें ख्रिस्तीधर्म स्वीकारिला त्याप्रमाणें, ख्रि.श. पूर्वी तिसऱ्या शतकांत **बौद्धधर्म** स्वीकारून तो राजाश्रित धर्म केला. कालगतीनें **चंद्रगुप्त** आणि **अशोक** ह्यांच्या राजवंशाचा ऱ्हास झाला, परंतु ख्रिस्ती शकाच्या सुरुवातीस दक्षिणेकडील **आंध्रां**च्या प्रबल राष्ट्रानें **मगध** देश आपल्या हस्तगत करून घेऊन इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरपर्यंत उत्तर व दक्षिण **हिंदुस्थान** ह्या दोन्ही ठिकाणीं आपलें वर्चस्व चालविलें. चौथ्या

शतकानंतर आंध्र राष्ट्राचा ऱ्हास झाला आणि मागधि-सांम्राज्य लयास गेलें.

चौथ्या युगांत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांची तयारी प्रथमच्या तीन युगांत होत होती असें आपण मानलें असतां चालेल. प्रथमच्या तीन युगांत सर्व हिंदुस्थान सुधारून हिंदु होत होते आणि चौथ्यांत तें सर्व, त्याच-वेळीं युरोप आणि एशियांतील पश्चिमभाग रोमच्या बादशाही अमलाखालीं एकवटला होता त्याप्रमाणें, एक मुख्य सत्तेखालीं एकवटलें.

५ पौराणिककाळ.

कनोज आणि उज्जयीनीचें प्राबल्य.

इ. स. ४०० पासून ८०० पर्यंत.

हिंदुस्थानच्या आणि यूरोपच्या इतिहासांत सहा-जिक दिसतें त्यापेक्षां जास्ती साम्य आहे. पांचव्या आणि पुढील शतकांत सार्वभौम सत्ता मागधांच्या हातांतून कनोज आणि उज्जयीनीच्या सार्वभौम राजांच्या हातीं गेली, परंतु त्यांस, अलिकडील रोमच्या बाद-शहांप्रमाणें, स्वदेश आणि स्वसुधारणा यांचें संर-क्षण करण्याकरितां परदेशस्थ स्वारी करणाऱ्या लोकांच्या झुंडीवरोबर लढाया कराव्या लागल्या. ह्या लढाया शत-केच्या शतकें चालल्या; हे परदेशस्थ लोक पश्चिम व

दक्षिण हिंदुस्थानांत आपलें घर करून राहिले व त्यांनां हिंदूंचे रिवाज, धर्म व सुधारणा यांचा स्वीकार केला. परंतु शेवटीं प्रसंग आलाचें, आणि इ.स. च्या आठव्या शतकांत उत्तर हिंदुस्थानांतून हिंदूंचें राज्य नाहींसें झालें. व त्याबरोबरच हिंदूंच्या जुन्या इतिहासाचा पण शेवट झाला.

ह्या नंतर यूरोपाप्रमाणें हिंदुस्थानांत अंधःकार युग सुरू झालें आणि त्यामुळें इ.स. च्या नवव्या आणि दहाव्या शतकांत उत्तर हिंदुस्थानचा इतिहास शून्य आहे. दहावें शतकाचे अखेरीस युरोप आणि हिंदुस्थानामध्यें जुन्या सुधारणेंच्या घरट्यावर नवीन शक्ति उत्पन्न झाली. ही शक्ति युरोपांत जहागीरदार (फ्युडलव्यारन्स) व हिंदुस्थानांत रजपूत सरदार होते. यूरोपांतील मध्यकालीन राजांनीं व विजयी स्वाऱ्या करणारांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला, त्याप्रमाणें हिंस्थानांत जुन्या आणि सुधारलेल्या परंतु जर्जर झालेल्या राजहीन पदांवर रजपूत सरदारांनीं पाऊल टाकिलें, आणि हिंदुधर्म व सुधारणा ह्यांचा अंगिकार केला. हे जे ख्रिस्ती आणि हिंदु धर्मांचे नवे रक्षक त्यांस हिंदुस्थान आणि यूरोपमध्यें एकाच शत्रुबरोबर ह्मणजे मुसलमानांबरोबर लढाया कराव्या लागल्या. परंतु येथें दोहोंमधील साम्य पुरें होतें. शतकेच्या शतकें लढाई करून ख्रिस्ती सरदारांनीं मुसलमानांचा पराभव केला व फ्रान्स, स्पेन आणि आस्ट्रिया देशांतून त्यांस

पिटून लाविले. रजपूत राजांनीं त्याप्रमाणेंच मोठ्या शौर्यानें साम्ना केला होता; परंतु त्यांस खिस्ती लोकांप्रमाणें यश मिळालें नाहीं. त्या लोकांनीं पुष्कळ धडपड केली; हातपाय हालविले, परंतु शेवटीं ते चित झाले, आणि हिंदुस्थान देश मुसलमानांच्या ताब्यांत गेला. तेव्हांपासून हिंदूंच्या स्वतंत्रतेचा व राष्ट्रत्वाचा मोक्ष झाला !

ऐतिहासिक सारखेपणा, त्याच्या स्थूल रूपांत विलक्षण साम्य असलें तथापि त्यांतील तपशीलांचे मोठमोठे भेद आपण लक्षांत आणिले नाहीं तर, पुष्कळ वेळां भ्रांतिमूलक होतो. परंतु योग्य सावधगिरीनें तुलना केली असतां, त्यापासून फायदा आहे. पृथ्वीच्या अगदीं उलट टोकांस असणाऱ्या राष्ट्रांचीं प्राक्तनें आणि उत्कर्ष यांस एकच ऐतिहासिक नियम कसे चालक असतात व पूर्व आणि पश्चिम देशांत घडून येणाऱ्या गोष्टींच्या गतीस समयावच्छेदें करून एकच प्रकारचीं ऐतिहासिक कारणें साधकबाधक कशीं होतात, तें ह्या तुलनावरून आपणास कळतें.

खंड २ रें.

मूळच्या राहणाऱ्या लोकांशीं युद्ध.

पहिलें युग ज्यास आह्मीं वैदिककाळ असें ह्मटलें आहे त्याचा इतिहास ह्मटला ह्मणजे मूळच्या लोकांपासून **पंजाब** प्रांत जिंकून घेतला त्याबद्दलची हकीकत होय. कित्येक शतकेंपर्यंत चाललेल्या ह्या युद्धांतील मुख्य क्रमवार हकीकत आपणास उपलब्ध नाहीं. परंतु ह्या प्राथमिक काळांतील सूत्रांचा समुच्चय जो **ऋग्वेद**, त्यांत मनास स्फुरण देणारीं स्तोत्रें व शौर्योत्पादक गीतें आहेत, त्यांवरून **पंजाब** जिंकणाऱ्या व त्यांत वसाहात करून राहणाऱ्या **हिंदु** लोकांचा युद्धसंबंधीं उत्साह कसा होता, त्याची कल्पना आपण करूं शकतों. ह्या विजयी आर्य लोकांनीं मूळचीं अरण्यें तोडून प्रदेश खुल्ला केला, मूळचे राहणारे कृष्णवर्ण लोकांचें निर्मूलन केलें अथवा त्यांस हांकून लाविलें, शेतकी आणि सुधारणा यांची वृद्धि केली, आणि हिंदूंची सत्ता व धर्म हीं एक पिढीपासून दुसरे पिढीस, आणि एक शतकाचीं दुसऱ्या शतकास वाढविलीं. रानटी लोकांचा सुधारलेल्या लोकांनीं संहार केल्याबद्दलची हकीकत प्राचीन आणि आर्वाचीन वेळची सारखीच आहे. ख्रिस्ता नंतर १८०० वर्षांनीं

ज्याप्रमाणें मिसिसिपी नदीच्या किनाऱ्यावर अमेरिकेंतील मूळच्या अरण्यांत पारध करून राहणाऱ्या पूर्ण सत्ताधारी, शूर व रणोत्सुक अशा इंडियन लोकांचा समूळ नाश करण्यांत आला, त्याचप्रमाणें ख्रिस्ताचे पूर्वी १८०० वर्षांवर सिंधुनद व त्यास मिळणाऱ्या नद्या. ह्यांच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या मूळच्या लोकांचा फडशा उडाला. श्वेतवर्ण मनुष्याबरोबर सुधारणा व निर्मळ धर्म हीं आलीं खरीं, परंतु त्याबरोबरच राज्यलोभ हाही होता. ह्या गौरकायांनीं निर्गम व मार्गशून्य अरण्यें तोडिलीं, जेथें किल्ले व दलदल असे त्या ठिकाणीं सुरेख गांवें व शहरें वसविलीं, आणि जे अज्ञानांधकारानें युक्त व अशोधित खंड होतें तें सुधारलेल्यां लोकांच्या बैठकींची जागा आणि धर्म, समाज व राज्यपद्धति यांच्यां विशेष शुद्ध रूपांचें माहेरघर करून सोडिलें. अशा ह्यां रूपांतर झालेल्या जगांत राहण्यास कृष्णवर्ण मनुष्यांस जागा नाहींशी झाली, आणि त्यांमुळें त्यांनीं मोठ्या शौर्यानें आपल्या शेवटच्या गढीपर्यंत सामना केला तरी तो निर्फल होऊन त्यांचा अगदीं साफ़ नाश झाला. अथवा त्यांस आपला स्वदेश सोडून दूरच्या रानटी प्रदेशांत जेथें गौरवर्ण मनुष्यांचें पाऊल पडलें नव्हतें अशा ठिकाणीं पळून जावें लागलें.

इंद्र ह्मणजे पर्जन्य देणारी आकाश देवता ही देश जिंकणाऱ्या हिंदूंचीं रणदेवता असे. आणि ह्या देवतेचीं

जीं स्तोत्रें आहेत त्यांत रानटी लोकांप्रमाणें दुराग्रहानें परंतु चातुर्यानें लढणारे दस्यु अथवा दास लोकांच्या विरुद्ध मदत करण्याबद्दल पुष्कळ धांवे केलेले आढळतात. त्यापैकीं कित्येक वाक्यें येथें दिलीं असतां शेकडों वर्षें झपाट्यानें चाललेल्या ह्या लढाईची खरी कल्पना मनांत येईल.

"इंद्रानें पुष्कळ लोकांचा धांवा ऐकून चपळ सहचर बरोबर घेऊन इहलोकी रहाणाऱ्या दस्यूंचा आणि अंतरिक्षांतील दस्यूंचा आपल्या वज्रानें निःपात केला; शेतें वगैरे जमीन आपल्या गौरवर्ण भक्तांस वाटून दिली. हा मेघनाद सूर्यास उगविण्यास लावितो आणि पृथ्वीवर तोच पाऊस पाडितो."

ऋग्वेद १–१००–१८

"इंद्रानें फार उत्सुकतेनें आपल्या वज्रानें दस्यूंच्या शहरांचा नाश केला आणि तो मोकळेपणानें फिरत आहे. हे वज्रधारी इंद्रा! आह्मी तुझीं स्तोत्रें गातों तीं ऐक, तूं आपलें शस्त्र दस्यूंवर टाक, आणि आर्यांचें बल आणि कीर्ति वृद्धी पावेल असें कर."

ऋग्वेद १–१०३–३.

"इंद्र आपल्या आर्यभक्तांचें लढायांत रक्षण करितो व ह्याप्रमाणें त्यानें अगणित वेळां रक्षण केलें आहे. (आर्य) लोकांच्या कल्याणाकरितां यज्ञयाग न करणाऱ्या लोकांचा पराभव तो करितो. तो त्या शत्रूंचीं कृष्णवर्ण चामडीं काढितो, त्यांस ठार मारितो, आणि त्यांची

राख रांगोळी करितो, त्या दुष्ट आणि घातकी लोकांस जाळून भस्म करितो."

ऋग्वेद १.—१३०—८.

"हे शत्रुघ्ना ! ह्या लुटारू लोकांचीं मस्तकें गोळा करून तीं तुझ्या विस्तृत पावलानें चिरडून टाक!! तुझें पाऊल रुंद आहे."

"हे इंद्रा ! ह्या पेंढाऱ्यांच्या बलाचा नाश कर. त्यांस घाणेरड्या मोठ्या खाड्यांत टाक."

"हे इंद्रा ! अशा पन्नासपट लोकांचा तिनदां तूं नाश केला आहेस ! लोक तुझे हे पराक्रम वर्णितात; परंतु तुझ्या शक्तीच्या मानानें हें कांहींच नाहींत."

ऋग्वेद १.—१३३—२—४.

"हे इंद्रा ! तुझ्या प्राचीन पराक्रमाचें वर्णन ऋषी असें करितात कीं, लढाईचा अंत आणावा म्हणून तूं पुष्कळ लुटारू लोकांचा नाश केला आहेस; देवाची पूजा न करणाऱ्या शत्रूंचीं नगरें तूं हल्ले करून घेतलीं आहेस व त्यांचीं शस्त्रें नमविलीं आहेस."

ऋग्वेद १—१७४—७—८.

ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या स्तोत्रांवरून ध्यानांत येईल कीं, विनयी **आर्य** व जुने **दस्यु** लोक ह्यांच्या मधील मूळचें वैमनस्य भिन्न धर्म व भिन्न धर्मविधी यामुळें वृद्धिंगत पावलें. **आर्य** लोक आकाश, सूर्य, अग्नि, प्रचंड वात ह्या सृष्टींतील दिव्य देवतांस मानीत, त्यांस यज्ञ

करून दररोज आहुति देत, आणि जेथें जेथें त्यांनीं देश काबीज केला तेथें तेथें ही सृष्टदेवतांची आराधना व पाळत आलेले याज्ञिक विधि हीं आपल्या बरोबर नेलीं. **पंजाबांतील दस्यु** लोक ह्या अगर अशाच देवतांस मानीत नसत व यज्ञयागही त्यांच्यांत चालू नव्हते. ह्या धर्मानिष्ठेस व भ्रष्टाचारास, नाश व मृत्यु हीं शासनें योग्य होत असें यज्ञयाग करणारे **हिंदु** मानीत व त्यामुळें ते आपल्या रणदेवतेचें वारंवार स्मरण करून तीस ह्या अधर्मी व संस्कारहीन लोकांचा नाश करण्यास आळवीत असत. ह्या कावेबाज रानटी लोकांतील कित्येकांच्या नांवांचा उल्लेख कोठें कोठें येतो. त्यांनीं असम युद्ध मोठ्या निग्रहानें चालविलें होतें, व किल्लचांत आणि दलदलीच्या मुलुखांत लपून राहून त्यांस फावतें येई तेव्हां तेथून ते **हिंदु** वसाहात करणारांस लुटून हैराण करीत.

"**कुयवास** दुसऱ्याच्या संपत्तीचा गंध येतो व ती तो लुटतो, तो पाण्यांत राहतो व तें तो खराब करितो. त्याच्या बायका ओढ्यांत स्नान करितात. त्यांस **सिफा** नदीच्या डोहांत जलसमाधि मिळो."

"**आयु** हा पाण्यांत गुप्त किल्लचांत राहतो. जळाच्या भरतीवरोबर तो चमकतो. **अंजसी, कुलिसि** आणि **वीरपत्नी** ह्या नद्या जलप्रवाहानीं त्याचें रक्षण करितात."

ऋग्वेद १–१०४–३४.

"अनसुमती नदी किनारीं दहा हजार स्वारांसहीत चलाख कृष्ण रहात असे. त्या महा किंकाळी मारणाऱ्या नायकाची माहिती इंद्रास स्वत:च्या अंतर्ज्ञानानेंच झाली. त्यानें ह्या लुटारू लोकांचा नाश मानवांच्या (आर्यांच्या) मुखाकरितां केला."

"इंद्र ह्मणाला मीं चलाख कृष्णास पाहिलें आहे. तो अनसुमती नदीच्या आसपासच्या प्रदेशांत, सूय डगाच्या माघारीं लपतो त्याप्रमाणें, लपत आहे. हे मारुतांनो! तुह्मी त्यास लढाई करण्यास लावा आणि त्याचा नाश करा."

"चपल कृष्ण दैदिप्यमान होऊन अनसुमती नदीच्या किनाऱ्यावर आला. इंद्रानें बृहस्पतीची मदत घेऊन त्या चलाख आणि धर्मविन्मुख शत्रूचा नाश केला."

ऋग्वेद ८–९६–१३–१५.

ही संक्षिप्त परंतु अन्वर्थक वाक्यें पाठीमागें हटणाऱ्या रानटी लोकांनीं स्वारी करणाऱ्या आर्जिक्य लोकांवरोवर धांवपळीची ही जी लढाई चालविली होती, तिचें वर्णन किती स्पष्ट रीतीनें करीत आहेत! प्रख्यात कृष्णवर्ण-वीर आपलीं कुटुंबें व जातीचे लोक बरोवर घेऊन नदीच्या वाढत्या पाण्यामुळें दु:साध्य झालेल्या दलदली-च्या जागेंत रहात असत. ह्या अज्ञान प्रदेशांतून ते सुंदर गावांत रहाणाऱ्या गौरवर्ण लोकांची जिनगी. संपत्ति आणि गुरेंढोरें ह्यांची माहिती मिळवून त्यांवर

अकस्मात् छापा घालीत. त्यांच्या हेंगाड्या किंकाळ्यांनीं त्यांची धाड आली आहे असें लोकांस कळलें नाहीं तोंच एका क्षणांत उच्छेदनकृत्य पुरें होऊन जात असें. चपळ लुटारू लोक जितक्या झपाट्यानें येत तितक्याच वेगानें ते नाहींतसे होत. ह्या धाडी वसाहत करणारे निमूटपणें सहन करीत नसत. बहुत करून अशा लुटी झाल्याबरोबर गौरवर्ण वसाहत्ते जास्ती निश्चयात्मक व विशेष विघातक मोहिमा पाठवीत. त्यामुळें जंगलांचा शोध लागून तीं तोडण्यांत येत, दलदली आणि नद्यांचें उल्लंघन होई व बळकट किल्ले घेण्यांत येऊन सरते शेवटीं चीड आणणारा नायक व त्याची चपल व विधर्मी फौज ह्यांचा पाठलाग होऊन समूळ नाश होई. ह्या अशा प्रतिपीडणामुळें नवीं अरण्यें हुडकण्यांत येऊन त्यांत लागवड झाली, पुष्कळ नद्यांचें उल्लंघन झालें, जंगलें आणि जलप्रचुर ठिकाणें जेथें होतीं तेथें वसाहती झाल्या, आणि महान् **आर्यराष्ट्र** ह्याप्रमाणें सर्व **पंजाब**प्रांतभर बरीच वसाहत होईपर्यंत पूर्वेकडेस पुढें पाऊल टाकीत गेलें.

अमेरिकेंत स्प्यानियर्ड लोकांस जय मिळाला तो बहुतेक अंशीं त्यांच्या घोड्यांमुळें मिळाला. कारण हे प्राणी मूळच्या **अमेरिकन** लोकांस पूर्वीं माहीत नव्हते, आणि त्याविषयीं त्यांच्या मनांत विलक्षण प्रकारची भीति असे. ह्याचप्रमाणें हिंदूंच्या लढाऊ घोड्यांबद्दल

हिंदुस्थानच्या मूळच्या कृष्णवर्ण लोकांस भीति - वाटत असे. **दधिक्रा** अथवा देवतारूपीं मानलेला घोडा याच्या स्तोत्रांतील खालील वाक्यें वाचलीं असतां विशेष मनोरंजन होईल.

" चोर वस्त्रें चोरून पळाला असतां लोक बोंब ठोकून हाकाटी करितात, त्याचप्रमाणें **दधिक्रयास** पाहिलें असतां कृष्णवर्ण लोक किंकाळ्या मारून मोठमोठ्यानें ओरडूं लागतात. बुभुक्षित श्येन (ससाणे) पक्ष्याचें अवरोहण पाहून दुसरे पक्षी ज्याप्रमाणें किलकिलाट करतात, त्याचप्रमाणें लूट, भक्ष आणि गुरेंढोरें यांच्या शोधांत दौड करणारा **दधिक्रा** याची दृष्टादृष्ट झाली कीं शत्रूं किंकाळ्या फोडूं लागतात व दीर्घ ध्वनी करितात. "

" शत्रूंनो ! **दधिक्रयास** भ्या. तो ताम्रवर्ण असून वज्रासारिखा विघातक आहे. तो हजार मनुष्यांस मागें टाकितो, तेव्हां त्याचें बल क्षुब्ध होऊन अनावर होऊन जातें. "

ऋग्वेद ४–३८–५–८.

दधिक्रयाप्रमाणेंच हिंदूंच्या रणदुंदुभीची कृष्णवर्ण वीरांस भीति वाटत असे. त्या दुंदुभीचें वर्णन स्तोत्र ६–४७ ह्यांत आहे.

" लढाईची वेळ कोणती तें दाखविण्याकरितां दुंदुभीचा गंभीर नाद होतो. आमच्या विनीची मंडळी

आश्वारूढ होऊन क्रमानें उभीं आहेत. हे इंद्रा! आमच्या रथ्यांस जय मिळूं दे."

दुसऱ्या एका स्तोत्रांत तत्कालीन लढाईंत जीं शस्त्रास्त्रें हिंदु लोक वापरीत असत, त्यांचें वर्णन आहे. आणि त्यामुळें त्या लेखास इतिहासदृष्ट्या महत्व आलें आहे.

१ "लढाई समीप आली असतां चिलखत घालून वीर पुरुष पुढें सरकतो तेव्हां तो ढगाप्रमाणें काळा दिसतो. हे वीर पुरुषा, तुझें शरीर विद्ध होऊं देऊं नको. तूं विजयशाली हो. तुझें चिलखत तुझें रक्षण करो!"

२ "धनुष्याच्या योगानें आम्हीं गुरेंढोरें मिळवूं. धनुष्याच्या योगानें आम्हीं जय संपादूं. धनुष्यानें आम्हीं उग्र व मगरूर शत्रूंस जिंकू. धनुष्य हें आमच्या शत्रूंचे मनोदय निर्फल करो. धनुष्याच्या साह्यानें चारी दिशांस आम्हीं आपला विजयध्वज प्रसृत करूं."

३ "धनुष्याची प्रत्यंजा ओढिली असतां ती धनुर्धारीच्या कानापाशीं येते, आणि त्याच्या कानांत आश्वासनदायक शब्द गुजबुजतें. प्रीतिआसक्त बायको ज्याप्रमाणें आपल्या प्रियास आलिंगन देते त्याप्रमाणें ती प्रत्यंजा बाणास घट्ट धरिते."

४ "तूणीर हा शरांची मातुश्री होय व शर हें तूणीराचीं आपत्यें होत. तो वीरपुरुषांच्या पाठीवर शब्द करीतच उभा असतो, आणि लढाईंत त्यांस बाणांचा पुरवठा करून शत्रूंचा पराभव करतो."

५ "हुशार सारथी आपल्या रथावर उभा राहून आपल्या इच्छेस येईल तिकडे त्यास हांकितो आनिन माघारून घोड्यास आपल्या कबज्यांत ठेवितो. त्या आनिनीचा जयजयकार करा !"

६ "घोडे आपल्या खुरांनीं धूळ उडवितात व मोठ-मोठ्यानें खिंकाळत क्षेत्रें ओलांडित डौलानें रथ ओढीत नेतात. ते मागें हटत नाहींत; परंतु लुटारू शत्रूंस आपल्या खुरांखालीं रगडून टाकितात."

ऋग्वेद ६—७५.

ह्या अजिंक्य सुधारलेल्या लोकांच्या पुढें एतद्देशीय रानटी लोक मागे हटले हें साहजिकच झालें, कारण हें सुधारलेले लोक रथांत बसून युद्ध करीत, त्यांच्या बाणांस मृगशिंगाची अथवा लोहाची अणकुची असे, आणि त्यांचीं अंगें चिलखतांनीं रक्षिलेलीं असत. दुसऱ्या कित्येक वाक्यांवरून कळतें कीं, हिंदु-वीर डोक्यांत शिरस्त्राण घालीत, खांद्यावर ढाल धारण करीत व हातांत भाले, परशु, आणि तीक्ष्ण धारीच्या तरवारी घेत असत. अशा शस्त्रास्त्रांनीं सज्ज व अनुक्रमानें लढाईस जाणाऱ्या सैन्यांशीं रानटी लोकांच्यानीं सफल सामना करवेना. कधीं कधीं एकमेकांशीं प्रतिस्पर्धी करणाऱ्या निरनिराळ्या हिंदु जातींतच लढाया होत असत. अशा वेळीं रथ, घोडे, चिलखतें, भाले आणि बाण यांनीं युक्त अशा ह्या हिंदु सैन्यांचें युद्ध झटलें झणजे

ग्रीक आणि ट्रोजन लोकांमधील कित्येक दिवसपर्यंत दररोज चाललेली लढाईच, जिचें चित्तवेधक व मूर्तिमंत वर्णन होमर कवीनें आपल्या काव्यांत केलें आहे.

हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हिंदु जाती मूळच्या एतद्देशीय लोकांबरोबर नेहमीं लढाईंत गुंतलेल्या असत, तथापि त्यांच्यांतच आंतल्याआंत क्षुल्लक मत्सर आणि तंटे असत, व त्याचा परीणाम पुष्कळ वेळां लढाईवर जात असे. पंजाबांतील सर्व हिंदु जाती शूर व युद्धप्रीय राष्ट्रें होतीं, त्यांचे राजे हे स्वतः योद्धे असून मर्द लोकांचे नायक होते. प्रतिस्पर्धी जाती आणि प्रतिस्पर्धी नायक ह्यांत मत्सर व शत्रुत्वहीं अनिवार्य असतातच. मूळच्या लोकांस जिंकल्या नंतर अथवा त्यांस हांकून लावल्या नंतर लढण्यास सर्व साधारण शत्रु नाहींसा झाल्यामुळें अशा अंतस्थ लढाया जास्ती वाढत चालल्या. नेहमीं जात जातीच्या विरुद्ध आणि राज्य राज्याच्या विरुद्ध उठत असत. इतिहास दृष्ट्यां महत्वाच्या एका स्तोत्रांत असें वर्णिलें आहे कीं, ऋग्वेदांत ज्याच्या शौर्याचें वर्णन आहे त्या सूद नामक एका मोठ्या राजाच्या विरुद्ध दहापेक्षां कमी नाहींत इतके राजे एक वेळ एकत्र झाले होते, आणि त्या सर्वांवर सुदानें जय मिळविला होता. ज्या दिवशीं हा जय मिळाला त्या दिवसाबद्दल त्या राजाच्या दरबारांतील श्वेतवस्त्रें परिधान केलेले उपाध्ये, त्रित्सु अथवा वसिष्ठ, यांस मोठा आ-

भिमान असे. त्या दिवसाचें स्मारक म्हणून त्यांनीं एक कविता रचली आहे. तींतील पूर्ण मतलब खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

१ "हे इंद्र आणि वरुण नायकांनो, तुमचे भक्त तुम्हीं त्यांस साहाय्य कराल अशी पूर्ण आशा धरून गुरेंढोरें मिळविण्याच्या हेतूनें आपलीं शस्त्रें घेऊन पूर्व बाजूंकडेस चालून गेले आहेत. हे इंद्रा आणि वरुणा, तुमचे शत्रू ते दस्यु असोत अथवा आर्य असोत त्यांनां चिरडून टाका, आणि सूदाला तुमचा आश्रय देऊन त्याचें रक्षण करा."

२ " जेथें मनुष्यें आपलीं निशाणें फडकवून लढाई करण्यास पुढें सरकतात, जेथें आम्हास अनुकूल असें कांहींही चिन्ह दिसत नाहीं, जेथें मनुष्यें आकाशाकडे डोळे लावून थरथर कांपतात, अशा ठिकाणीं आणि अशा वेळीं, हे इंद्र आणि वरुणांनो, आम्हांस मदत करा आणि आमच्यांशीं बोला."

३ " हे इंद्र आणि वरुणा ! पृथ्वीचीं टोकें दिसत नाहींतशीं झालीं आहेत व ध्वनीनें आकाश दुमदुमलें आहे, शत्रूंचें सैन्य चालून जवळ जवळ येत आहे. हे इंद्र आणि वरुणा ! तुम्हीं जे आमच्या प्रार्थना नेहमीं ऐकितां ते आमच्या जवळ या आणि तुम्हीं आपला आश्रय आम्हांस द्या."

४ "हे इंद्र आणि वरुणा! आजपर्यंत कधींही

हल्ला केला नव्हता अशा **भेदांनां** भेदून तुह्मीं **सूदां**चें रक्षण केलेंत, व **त्रित्सां**च्या प्रार्थना तुह्मीं ऐकल्यात. हें त्यांच्या पुरोहितवृत्तीचें फल ऐन लढाईच्या वेळीं मिळालें."

५ "हे **इंद्र** आणि **वरुणा**! शत्रूंचीं शस्त्रें चारी बाजूंनीं माझ्यावर पडत आहेत, शत्रू लुटारूं लोकांमध्यें माझ्यावर हल्ला करीत आहेत; तुह्मी दोन्ही प्रकारच्या संपत्तीचे मालक आहांत. आह्मांस लढाईच्या दिवशीं रक्षा."

६ "लढाईच्या वेळीं दोन्ही पक्षांनीं संपत्ति मिळावी ह्मणून **इंद्र** आणि **वरुणां**ची प्रार्थना केली; परंतु ह्या लढाईंत ज्यांवर दहा राजे चढाई करून आले होते त्या **सूदां**चे **त्रित्सु** सहीत तुह्मीं रक्षण केलेत."

७ "हे **इंद्रा** आणि **वरुणा**! दहा राजे एक टिकाणीं झाले होते तथापि ते यज्ञ करीत नसल्यामुळें त्यांच्यानें **सूदां**चा पराभव झाला नाहीं."

८ "हे **इंद्र** आणि **वरुणा**! श्वेत वस्त्रें परिधान केलेल्या व जटांचे टोप घातलेल्या **त्रित्सु** ऋषींनीं स्तोत्रें ह्मणून व यज्ञ करून जेव्हां तुमची आराधना केली, तेव्हां तुह्मीं **सूदां**ना दहा राजांनीं घेरला असतां लढण्यास हिम्मत दिलीत."

९ "**इंद्र** लढाईंत शत्रूंचा नाश करितो व **वरुण** आमच्या परमार्थिक विधींचें रक्षण करितो. आह्मी तुमचीं

स्तोत्रें गाऊन तुह्मांस आळवीत आहोंत, हे इंद्र आणि वरुणा! आह्मांस सुख द्या."

१० "इंद्र, वरुण, मित्र आणि आर्यमान आह्मांस संपत्ति आणि विस्तृत घरें देवोत; आदितीची कांति आह्मांस सुखकारक होवो, आह्मी देवी सवितृदेवतेचें स्तोत्र गातों.

ऋग्वेद ७-८-३.

खंड ३ रें.

शातारवाज व सुधारणा.

जेथें जेथें हे विजयी लोक गेले तेथें तेथें त्यांनीं अरण्यें तोडिलीं व हलींच्या हिंदुप्रमाणें त्यांचा मुख्य धंदा जो कृषिकर्म त्याची सुरुवात केली. **आर्य** ह्या नांवानें ते विजयी लोक आपणांस ह्मणवून घेत असत. हा शब्दच, ज्याचा अर्थ नांगरणें असा आहे अशा धातूपासून निघाला आहे. शेतकीसंबंधीं एक सुंदर स्तोत्र आहे तें सर्व **आर्य** लोकांत अतिप्राचीन गाणें आहे. हें खालीं लिहिल्याप्रमाणें आहें:—

१ "शेतकीच्या देवावरोबर आह्मीं हें शेत नांगरूं, तो आमच्या घोड्यांचें पोषण करो आणि त्या योगानें आमचें कल्याण करो."

२ "हे **क्षेत्रपाल** देवते, गाई दूध देते त्याप्रमाणें मधूर, निर्मल नवनीतासारखा, मिष्ट व विपूल असा पाऊस आह्मांस दे. उदकाच्या **वरुण** देवते आह्मांस आशिर्वाद दे."

३ "धान्यें आह्मांस मधूर लागोत; आकाश आणि मेघ व नक्षत्रमंडल हीं माधुर्यानें पूर्ण भरलेलीं असोत; शेताचा देव आह्मांवर दया करो; त्याचे मागून शत्रूंनीं अबाधित असें आह्मीं चालूं."

४ "वृषभांस आनंदानें काम करूं द्या,. मनुष्यानों आनंदानें मेहनत करा, नांगर आनंदानें चालो, वाद्या आनंदानें वांधा, पराणी आनंदानें लावा."

५ "हे सुन आणि सीरा हें स्तोत्र मान्य कर. आकाशांत मेघ उत्पन्न केला आहेस, त्याच्या योगानें ही जमीन ओली कर."

६ "हे सुदैवी सीता (तासा) पुढें चाल, आह्मीं तुझी प्रार्थना करितों. तू आह्मांस संपत्ति आणि विपूल धान्यें दे."

७ "इंद्र ह्या सीतास मान्य करो; पुषन् त्यास पुढें नेवो. पाण्यानें भरून त्यापासून सालोसाल आह्मांस धान्य देवो."

८ "नांगर काळे मातीची ढेंकूळें आनंदानें उकरोत. मनुष्यें वैलांचे मागें आनंदानें चालोत, मेघराज मधुर पाण्यानें जमीन ओली करो. हे सुन आणि सीरा आह्मांस सुख दे."

ऋग्वेद ४–५७.

अतिशय जुन्या हिंदूंच्या उद्गारांत, जो मेहनतीच्या उद्योग धंद्यांतील साधेपणा आणि उल्हास आढळून येत असे तो ह्या जुन्या शेतकीच्या स्तोत्रांत दृग्गोचर होत आहे.

पंजाबांत विहिरी खणून अगर कालवे बांधून पाणी नेल्याशिवाय मोठ्या पायावर शेतकी करणें दुरापस्त

होतें, ह्मणून ऋग्वेदांतील स्तोत्रांत अशा प्रकारच्या युक्तीचा उल्लेख आहे, ह्यांत कांहीं चमत्कारिक नाहीं. त्यावेळीं कुरण अथवा गवतजमिनी विस्तीर्ण असत, नायक आणि लोकांचे पुढारी गुरांचे मोठमोठे कळप बाळगीत, आणि वीर पुरुष व कवी हे संपत्ति व गुरेंढोरें ह्यांची वृद्धी कर अशा देवांच्या प्रार्थना करीत. मानव जाती ही त्यावेळीं बाल्यावस्थेंत होती, आणि तींत उंचनीच पदवीचे वर्ग अद्यापपर्यंत कायम झाले नव्हते. ह्यामुळें शांततेच्या वेळीं ज्या नायकाजवळ विस्तीर्ण शेतें असत व जे ढोरांचे मोठमोठे कळप चारीत, तेच लढाईच्या वेळीं लोकांचे पुढारी होऊन आपलें नांव गाजवीत व जय मिळविल्या नंतर माघारे येऊन स्वत:च्या घरीं दारू, पोळी अथवा प्राण्यांचे बळी देऊन देवांचें यजन आपल्या घरीं करीत. अशी स्थिति होमरच्या कवितेंत आढळते, त्याप्रमाणें ऋग्वेदांतही नजरेस पडते. सर्व आर्यराष्ट्रांच्या अति जुन्या ग्रंथांवरून व दंतकथांवरून ही सुधारणा ह्या साध्या स्थितीपर्यंत येऊन टेपली होती असें समजतें. त्यावेळीं लोकसमाज शेतकी करून आणि गुरें चारून निर्वाह करीत असे. लोकांत वर्णभेद झाला नव्हता. सर्व सशक्त लोक लढवय्ये असत, आणि मोठमोठे नायक आणि पुढारी लढाई संपल्या नंतर आपल्या लोकांसहीत नांगराकडेस वळत. ह्याप्रमाणें आद्य-हिंदु-लोक समाज स्थितीचें चित्र ऋग्वेदांत दिलें आहे.

जव व गहू हीं शेतकीचीं मुख्य धान्यें होतीं व त्या वेळेपर्यंत तांदूळ माहीत नव्हता. मांसाहारही वराच चालत असे; वृषभ आणि मेंढे ह्यांचे वळी नेहमीं देत व घोड्यांचे मांसही प्रथमकाळचे हिंदु आवडीनें खात असत. परंतु पुढें **अश्वमेधा**सारख्या सार्वभौम उत्साहाचे वेळीं बलिप्रदान करण्याकरितां मात्र घोडा राखिलेला असे. सोमवल्लीचा रस हें लोकप्रीय पेय असे. बलिदानाच्या वेळीं त्याचा जास्त उपयोग करीत असत. ऋग्वेदाचे ऋषी ह्या उल्हासदायक पेयाच्या गुणाचें व प्रभावाचें वर्णन करीत असतांना आनंदानें वेडे होऊन जात. सरतेशेवटीं पुढच्या भागांत लिहिल्याप्रमाणें सोमाची एक देवताच बनून तिचें पूजन होऊं लागलें.

सुधारणेच्या अगदीं साध्या कलांचा पंजाबांतील हिंदूंत प्रसार होता. सुतारकी आणि वस्त्रें विणणें ह्या शिल्पकला चांगल्या माहीत होत्या, आणि सोनें, चांदी व लोखंड ह्या धातूंकामांत आणण्याबद्दल बरींच प्रगति झाली होती. युद्धाचीं शस्त्रें व सोन्याचें निरनिराळें दागीने ह्यांचे उल्लेख ग्रंथांत वारंवार आढळतात. त्यावरून ह्या कामांत किती गती झाली होती तें समजतें.

चिलखतें व मुगुट, भाले, तरवारी, आणि बाण ह्या-बद्दल वर लिहिलेंच आहे. एका प्रसिद्ध कवितेंत चिल-खतें घालून सज्ज झालेल्या तीन हजार वीरांबद्दल लि-हिलेलें आहे आणि दुसऱ्या ठिकाणीं (५–५३–५४

वगैरे) कंड्या, कडीं, तोडे, छातीचीं सुवर्णाचीं उरस्त्राणें व डोक्यावर घालण्याचे सुवर्ण मुगूट ह्यांचीं वर्णनें आहेत. ह्या सर्व उल्लेखांवरून असें समजतें कीं, **पंजाबांतील** हिंदूनीं धातूंचा उपयोग करण्यांत बरेंच प्रगमन केलें होतें. शिल्पकलेंत थोडीशी गति झालेली होती आणि "शंभर खांबांच्या वाड्यांचे" उल्लेख आढळतात परंतु खोदीव कामाचें नांव स्पष्ट आढळत नाहीं, व प्राथमिक हिंदूंचा धर्म मुर्तिपूजक नसल्यामुळें त्या कलेस त्यापासून पोषण मिळालेलें नव्हतें.

सामाजिक निबंध साधे असून कुलपति संस्थेस अनुलक्षून होते. बाप हा आपल्या कुटुंबाचा मुख्य असे; त्याचे पुत्र व पौत्र आपापल्या पत्न्यासहीत बहुतकरून एकाच घरांत राहत असत, आणि जमीन व गुरेंढोरें हीं सर्वसाधारण अविभक्त मिळकत असे. प्रत्येक धार्मिक हिंदूच्या घरीं **अग्निहोत्र** असे व त्यास लागणारा सोमरस व दुसरीं हवनद्रव्यें घरांतील बायका तयार करीत असत. ह्या होमाच्यावेळीं येऊन यजमानास संपत्ति, संतति व आरोग्य हीं देण्याकरितां आकाश, नक्षत्रमंडळ व **पृथ्वी** ह्या ठिकाणच्या देवतांस आवाहन करण्यांत येत असे. ह्या गृहयज्ञांत स्त्रिया आपल्या पतीबरोबर बाटेकरीणी होत असत. कित्येक सुंदर स्तोत्रें, जीं ह्या स्त्रीजन पूजकांनीं रचिलीं आहेत असें ह्मणतात, तीं अद्याप उपलब्ध आहेत.

त्या काळांत अहितकर निर्बंध हिंदू स्त्रियांस नव्हते, ह्मणजे लोक समाजांत त्यांचें जें वाजवी स्थान आहे त्यास आडकाठी आणणारे व त्यांस जनानखान्यांत कोंडून ठेवणारे नियम झालेले नव्हते. नवरी मुलगी आपला नवरा बहुतेक स्वत: पसंत करीत असे; परंतु आईबापांच्या इच्छेसही बहुधा नेहमीं मान मिळे. दक्ष आणि मेहनती पत्न्या आपल्या घरांतील व्यवस्थेवर देखरेख ठेवून, उष:कालाप्रमाणें, घरांतील मनुष्यांस उठवून प्रात:काळीं काम धंद्यास पाठवीत, अशाबद्दल वारंवार उल्लेख येतात. अविवाहीत मुलीस बापाच्या मिळकतींत वारसा मिळत असे व पतीच्या मरणानंतर विधवांस पुनर्लग्न करण्याची मोकळीक होती.

लग्नाचे विधी त्या समयास उचित असे होते, व नवरा आणि नवरी एकमेकांस जीं वचनें देत, तीं त्या समारंभास अगदीं योग्य अशीं असत. ह्याविषया संबंधीं एका सुप्रसिद्ध स्तोत्रांतील थोडे वेचे आह्मीं खालीं देत आहोंत.—

(नवरा मुलगा व नवरी मुलीस उपदेश) "ह्या लोकीं तुह्मीं एकत्र रहा, निराळीं होऊं नका. निरनिराळ्या प्रकारच्या अन्नाचा सुग्रास घ्या. स्वत:च्या घरांत रहा. मुलें नातवंडें ह्यांचें सुख भोगा."

(नवरा व नवरी ह्मणतात.) " **प्रजापति** आह्मांस संतति देवो, **आर्यमा** वृद्धावस्थेंपर्यंत एकत्र ठेवो."

(नवऱ्या मुलीस) "हे वधू तुझ्या पतीच्या गृहांत सुमुहूर्तावर प्रवेश कर, आमच्या गड्यांचें व मोलकरीणींचें आणि गुराढोरांचें कल्याण कर. क्रोधापासून तुझे डोळे अलिप्त असोत. तुझ्या पतीस सुख होईल अशी त्याची सुश्रुशा कर; आमच्या ढोरांचें चांगलें कर. तुझे मन प्रफुलीत व तुझें सौंदर्य अढळ राहो. वीर पुरुषांची जननी हो व देवांच्या ठिकाणीं भक्ति ठेव. आपल्या गड्यांचें, मोलकरीणींचें आणि गुराढोरांचें हित पहात जा."

"हे इंद्रा! ह्या सुशील स्त्रियेस दैवशाली कर आणि तिस सुपुत्र दे. तिला दहा पुत्र प्रसवूं दे. ह्मणजे तिच्या पतीसहीत घरांत अकरा पुरुष होतील."

(नवऱ्या मुलीस उपदेश) "तुझ्या सासऱ्यावर आणि सासूवर तुझें वजन पडो आणि राज्ञी सारखी तुझ्या नणंदांस व जावांस श्रेष्ट हो."

(नवरा व नवरी ह्मणतात) "सर्व देवता आमचीं मनें एक करोत; मातरिश्वन्, व धात्री आणि सरस्वति ही आमचें संलग्न करो."

ऋग्वेद १०-८५-४२ पासून ४७ पर्यंत.

ह्या थोड्याशा स्तोत्रांवरून प्राचीन काळीं कुलपति संस्था व कुटुंब व्यवस्था कशी होती त्याबद्दल स्पष्ट कल्पना आपणांस करितां येते. नवरी मुलगी ही आपल्या पतीच्या घरीं नवीनच येणारी असल्यामुळें तीस योग्य आज्ञा देण्यांत येत असत. दास व दासी, आणि गुरेंढोरें हीं कुटुंबांतलींच

असल्यामुळें त्यांचें योग्य पाळनपोषण करण्याबद्दल तीस सांगण्यांत येत असे. रागापासून दूर राहून उल्हासवृत्तीनें तिनें आपल्या नवऱ्यास सुख दिलें पाहिजे इतकेंच नाहीं, तर आपल्या कुलदेवतांची भक्ति केली पाहिजे; आणि आश्रीत जनांस ममताळुपणानें वागविलें पाहिजे. तिनें आपलें सौम्य वजन सासू सासऱ्यांवर पाडिलें पाहिजे; दीर व नणंदा यांस योग्य ताब्यांत ठेविलें पाहिजे; आणि जशी काय त्या घरांतील राज्ञीच बनलें पाहिजे. ह्याप्रमाणें, जुन्या काळीं हिंदु स्त्रियांस मान मिळत असे त्याप्रमाणें योग्य मान व प्रतिष्टा मिळालेली, मोठ्या व कुलपति संस्थायुक्त कुटुंबाची खरी मालकीण होऊन, वृद्धापकाळपर्यंत आपल्या पतीशीं संलग्न होत्साती तीस रहावें लागे.

पुष्कळ वायका करण्याची चाल दुसऱ्या सर्व जुन्या राष्ट्रांप्रमाणेंच प्राचीन **भरतखंडांत** होती. परंतु बहुतकरून मोठमोठे राजे आणि सरदार यांमध्येंच ती प्रचारांत असे. साधारण लोकसमूह एक पत्नीनेंच समाधान मानून रहात असत. बापाच्या मिळकतीचा वारसा पुत्राकडेस जात असे, परंतु पुत्र नसेल तर मुलीचा अथवा दुसरा एखादा मुलगा दत्तक घेण्याची सवड असे.

"प्राचीन हिंदूंत प्रथम मूठमाती देऊन प्रेत संस्कार करण्याची चाल होती; परंतु नंतर लौकरच अग्नि संस्काराचा रीवाज सुरू होऊन मयताची रक्षा जमीनींत पुरूं

लागले. · प्रेतसंस्कारासंबंधीं लहानशा कवनांतील उतारे येथें दिले असतां ते मनोवेधक होऊन त्यांवरून हल्लींच्या हिंदूप्रमाणें प्राचीन काळच्या हिंदूंसही आपल्या अंत-काळीं पुढील जगाच्या आशेपासून किती समाधान मिळत असे तें दिसून येईल."

"हे **मयता**, आपले पूर्वज ज्या ठिकाणीं व ज्या रस्त्यानें गेले असतील त्या ठिकाणीं व त्या मार्गानें जा. **यम** व **वरूण** ह्या देवांस होमांनीं आनंद होतो, जा त्यांस भेट."

" त्या सुखदायक स्वर्गाकडेस वळ आणि आपल्या पूर्वजांत जाऊन मीळ. **यमास** भेट आणि तुझ्या सत्कृ-त्यांचें फळ भोग; पापास मागें ठेव. तुझ्या गृहांत शीर."

" हे मयतांचे आत्म्यांनो हें ठिकाण सोडा, जा ह्या ठिकाणांहून निघा, कारण पूर्वजांनीं मयतांकरितां निरा-ळी जागा केली आहे. तें ठिकाण **सूर्य**, चकाकणारें पाणी आणि तेज यांनीं फार रमणीय आहे. **यमराज** ही जागा मयतास देतो."

ऋग्वेद १०–१४–७ ते ९ पर्यंत.

हें आश्चर्य आहे कीं, **नर्क** व त्यांत होणाऱ्या वेदना ह्यांचें नांवही **ऋग्वेदांत** नाहीं.

खंड ४ थें.

धर्म.

प्रथम युगांत ह्मणजे वैदिक काळांत हिंदु लोकांचा धर्म ह्मटला ह्मणजे प्रथम सृष्टीची पूजा होती व तिजपासूनच पुढें सृष्टीच्या देवाची पूजा उत्पन्न झाली. पंजाबप्रांत जिंकणारे बळकट व सहासी हिंदु हे युद्ध करणाऱ्या जातीचे होते, त्यांस उद्योगांत नेहमीं आनंद वाटत असे व ह्या जगामध्यें जें जें कांहीं आनंददायक व सौंदर्ययुक्त दिसे, त्यांचे ते गुणग्राही असत. त्यांनीं सुंदर आणि तेजस्वी आकाशाचें विचारपूर्वक मनन केलें आणि त्यास ते द्यौस् ह्या नांवाने पुजूं लागले. ग्रीक लोकांतील 'इयूस' व ल्याटिन मधील ज्युपितर ह्या नांवाचे पहिलें पद हें द्यौस् अर्थाचेंच आहे. दिवसाच्या आकाशास त्यांनीं 'मित्र' हें नांव दिलें, तें झेंदभाषेंतील 'मिथ्र' ह्या शब्दास मिळतें आहे. रात्रीच्या आकाशास त्यांनीं 'वरुण' असें ह्मटलें. ग्रीकभाषेंत यास मिळता शब्द 'औरनास' हा होय. अतिशय प्राचीन काळच्या निरनिराळ्या आर्य लोकांमध्यें ह्याप्रमाणें एकमेकांस मिळत्या नांवांनीं आकाश देवतेची पूजा करण्यांत येत असे, त्यावरून असें सिद्ध होतें कीं, मूळ आर्य हे

आपल्या मूळ ठिकाणींसुद्धां याच नांवानीं आकाशाची पूजा करीत असत. परंतु पंजाबांतील हिंदु आर्य पुरातन आकाश देवतेस 'द्यौस्' 'मित्र' आणि 'वरुण' ह्या नांवांनीं भजत असतां ते मेघ देणाऱ्या आकाशास विशेष मान देत असत. त्यास ते इंद्र ह्मणत; कारण हिंदुस्थानांत नद्यांचा पूर आणि भरपूर धान्यें हीं ह्या मेघ देणाऱ्या आकाशावर अवलंबून आहेत. या योगानें कालेंकरून हिंदुदेवतांमध्यें 'इंद्र' हा सर्वांत श्रेष्ठ देव होऊन बसला. ह्या देवाविषयींची अशी कल्पना आहे कीं, तो मोठा योद्धा असून मनुष्य जातीस जलाचें विपुल ओघ मिळावे ह्मणून 'वृत्र' नामक मेघमंडळाबरोबर आणि प्रातःकाळीं जगतास प्रकाशाची प्राप्ती व्हावी ह्मणून 'पानिस्' नामक अंधाररूप राक्षसाबरोबर युद्ध करितो.

'मारुत' अथवा प्रभंजनाच्या देवता—ह्या इंद्रास त्याची अनिच्छु मेघावरोवर जी झटापट चालते त्यांत विशेष मदत करितात अशी धारणा आहे, कारण हिंदुस्थानांत वर्षाकाळांतील पहिल्या मेघवृष्टी बरोवर नेहमीं वादळ आणि गडगडाटही साहाय्यकारी असतात. ह्याप्रमाणें इतका सौख्यदायक आणि तसाच रणधीर देव देऊनिंकणाऱ्या रणशूर हिंदूंची साहाजिकच आवडता देवता होऊन बसला. वर दाखविल्याप्रमाणें ते ह्या देवाची शत्रूवर आपणांस चालून नेण्यास, विजयी लोकांस नवीन जमिनी,

संपत्ति, व गुरेंढोरें आणि संतति देण्यास वारंवार प्रार्थना करीत असत. मेघावरोवर इंद्राचें युद्ध होत असे ह्या-विषयींच्या कित्येक कविता आपण वाचल्या असतां प्राचीनकाळच्या साध्या परंतु रणशूर हिंदुभक्तांची हिम्मत कोणत्या प्रकारची होती तें समजण्यास सुलभ साधन होईल.

१ " मेघगर्जना करविणाऱ्या इंद्रानें शौर्याचीं कृत्यें केलीं तीं आह्मी गातों. त्यानें अहिचा नाश केला आणि मेघास पृथ्वीवर पडण्यास लावून पर्वतांवरील ओढ्यांचे वाहण्याचे रस्ते मोकळे केले."

२ " पर्वत शिखरावर असणाऱ्या अहीस इंद्रानें मारिलें; त्याचें फार लांब पोंचणारें वज्र त्वत्स्त्रीनें केलें होतें. गाई आपल्या वासरांकडेस ज्याप्रमाणें मोठ्या उत्सुकतेनें जातात त्याप्रमाणें पाण्याचे पूर समुद्राकडे झपाट्यानें वाहत गेले."

३ " वृषभासारिखा वेगवान होऊन इंद्रानें सोमरसाचें घटाघट प्राशन केलें. तीन यज्ञांत ज्या सोमरसाच्या आहुत्या दिल्या होत्या त्या सर्व तो प्याला, नंतर त्यानें वज्र हातांत घेऊन अहींत वडील होता त्यास मारिलें."

४ " तुह्मी जेव्हां अहींतील वयोवृद्धांस मारिलें तेव्हांच कावेबाज व स्वार्थी योजकांच्या करामतीचा नाश केलात. तुह्मी सूर्य, प्रातःकाळ आणि आकाश ह्यांची सुटका केलीत व पाठी मागें कोणताही शत्रु राहूं दिला नाहींत."

५ "इंद्रानें आपल्या सर्व विध्वंसक वज्राच्या योगानें कृष्णवर्ण ढगाचा नाश केला आणि त्याचे अवयव विदारिलें. कुऱ्हाडीनें वृक्ष तोडिला असतां जसा तो खालीं पडतो तसा वज्र प्रहारानें अहि पृथ्वीवर पडला."

६ "दरड पडली असतां त्यावरून नद्या ज्याप्रमाणें वाहत जातात, त्याप्रमाणें त्याखालीं पडलेल्या प्रेतावरून जलें आनंदी होऊन उड्या मारीत जात आहेत. वृत्र जिवंत असतां त्यानें आपल्या शक्तीच्या योगानें पाण्यास अटकवून ठेविलें होतें; परंतु अहीचें शरीर हल्लीं पाण्यांत खालीं पडलें आहे."

ऋग्वेद १–३२.

ह्या वरील उताऱ्याबरोबर नीतिमत्तादर्शक आकाश देवता जी **वरुण** त्याचीं खालीं दिलेलीं सूत्रें हीं मिळवून पाहिलीं तर एकदा वादळ अथवा मेघाची अभिमती देवता तर दुसऱ्याप्रसंगीं दयालुत्वाची **वरुण** देवता अशा निरानिराळ्या नांवांनीं आकाशाच्या निरनिराळ्या रूपांत आकाशाचें पूजन प्राचीन हिंदु कसे करीत असत तें आपल्या ध्यानीं येईल.

३ "हे **वरुणा** चिंतायुक्त असा मी आपल्या पापाविषयीं तुला विचारितों. ही चौकशी करण्याकरितां मी विद्वान् लोकांकडेस गेलो होतों, तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं वरुण तुजवर असंतुष्ट झाला आहे."

४ "हे **वरुणा**! माझ्या कोणत्या कृत्यामुळें तुझा

भक्त जो मी त्याचा नाश करण्याची बुद्धि तुला झाली? हे अनिवार्य शक्तिधारक देवते, त्याचें कारण मला सुचीव ह्मणजे मी तावडतोब साष्टांग नमस्कार घालीत तुझ्या जवळ येतों."

५ "हे **वरुणा** ! आमच्या पूर्वजांच्या व आमच्या स्वतःच्या पापापासून सोडीव. हे राजकीय **वरुणा** ! वासरास चारणीच्या सईल दोरीपासून सोडवितात तसें अथवा चोरून आणलेल्या जनावरावर निर्वाह करणाऱ्या चोरासारखें, **वसिष्ठांस** सोडीव."

६ "हे **वरुणा** ! हे सर्व पाप आह्मीं जाणून बुजून केलेलें नाहीं. चूक अथवा द्राक्षरस, क्रोध अथवा द्युत व अविचार हीं पापाचीं कारणें होत. वडील बंधुसुद्धां आपल्या लहान भावास वाईट मार्गास नेतो, आमच्या स्वप्नांतही पाप उद्भवतें."

७ "पापापासून मुक्त झाल्यावर आमच्या इच्छा पुरवितो आणि आमचें पोषण करितो असा जो **वरुण**-**देव**, त्याचा दास बनून मी त्याची सेवा अहर्निश करीन.

आह्मी अज्ञान आहोंत, **आर्यां**चा **देव** आह्मांस ज्ञान देवो. शहाणा देव आमची प्रार्थना ऐको आणि आह्मांस संपत्ति देवो."

ऋग्वेद ७–८६.

प्राचीन हिंदु लोकांत **आकाशदेवते**च्या खालोखाल **सूर्यदेवता** समजत असत. **आदिति** हें आकाशांतील

अमर्याद तेज होय आणि तिचीं मुलें **आदित्य**, ह्मणजे वर्षांतील महिन्यांतील निरनिराळे **सूर्य** होत. **सूर्यास** ग्रीक लोक हे **लिओस, ल्याटिन सोल** आणि **ट्युटन टायर** ह्मणत असत आणि **सूर्य** ह्या फार प्रसिद्ध संज्ञेनें आर्य लोक तेजाच्या देवतेचें पूजन करीत असत. ह्याच देवतेचें दुसरें नांव **सवितृ** हें आहे, आणि पवित्र **गायत्री मंत्र** जो अद्याप सर्व **हिंदुस्थान**भर प्रत्येक धार्मिक द्विज दररोज सकाळीं स्नानानंतर आपल्या नित्य पूजेचें एक महत्वाचें कृत्य आहे असें समजून उच्चारितो तो ह्याच देवतेस अनुलक्षून स्तोत्र होय. त्याचें भापांतर केलें तर खालीं लिहिल्याप्रमाणें होतें. 'आमच्या ईश्वरपरायण विधीस प्रेरणा करणारी जी देवता **सवितृ** तिच्या इष्ट तेजाचें आह्मी ध्यान करितों.'

ऋग्वेद ३–६२–१०

दुसऱ्या दृष्टीनें पाहतां **सूर्या**चीं दुसरी नांवें असत. ह्या वेळेपर्यंत **पंजाबां**तील **हिंदु** गुरचारण हें एक आपल्या निर्वाहाचें साधन आहे असें समजून तो धंदा पुष्कळ लोक करीत असत. भोळे धनगर लोक त्यांच्या देशाटणांत **सूर्या**स आपला वाटाड्या व रक्षक समजत असत आणि त्यास **पूषन्** असें ह्मणत.

१ "हे **पूषणा**! आमचें मार्गक्रमण लवकर शेवटास जाईल अशी मदत कर आणि सर्व संकटें दूर कर. हे **मेघ तनया**! आमच्या पुढें तूं चाल."

२ "हे **पूषणा** ! जो कोणी आडवाटेनें नेतो, मारितो, लुटतो, आणि दुष्कृत्य करितो त्यास आमच्या मार्गांतून नाहींसा कर."

३ "जो कावेबाज लुटारु मार्ग बंद करितो त्यास तूं हांकून लाव."

४ "आमचा वाटाड्या तूं हो. ह्मणजे जे शत्रू रस्त्यांत येतील ते आह्मांस कांहीं इजा करूं शकणार नाहींत. आह्मांस सुगम व सुखकर रस्त्यानें ने. हे **पुषणा** ! ह्या प्रवासांत आमच्या संरक्षणाबद्दल तजवीज कर."

५ "आह्मांस हिरव्या गवतांनीं आच्छादलेल्या अशा सुंदर मार्गांनीं ने. रस्त्यांत अतिशय उन्ह होऊं देऊं नकोस. हे **पुषणा** ! ह्या प्रवासांत आमच्या संरक्षणाविषयीं तजवीज कर."

ऋग्वेद १–४२.

सूर्याचें आणखी एक नांव होतें तें सांगणें जरूर आहे. **विष्णु** हें नांव पुढें **हिंदुपुराणांत** सर्व वस्तूंचा रक्षक अशा परमेश्वरास लावण्यांत आलें आहे, तें वैदिककाळांत सूर्याचें नांव होतें. उदयाचलचा बालार्क, माध्यान्हीचा सूर्य, आणि संध्याकाळचा मावळणारा सूर्य हे तीन अमर्याद आकाशांत **विष्णू**चीं तीन पावलें आहेत असें समजत असत.

अग्नीचीही कित्येक लोक पूजा करीत असत. अग्नींत

हवन केल्याशिवाय कोणताही यज्ञ देवास पोंचत नसे, सबब **अग्नि** हा देवांचा पुरोहित आहे असें समजत असत. **ऋग्वेदांत** जो अग्नि लिहिला आहे तो फक्त ऐहिक अग्नि नव्हे, तो विद्युत् व सूर्य ह्यांचें तेज होय; त्याचें वसतिस्थान स्वर्गांत असे. प्राचीन **भृगु ऋषींस** तो स्वर्गांत भेटला, व प्रथमच यज्ञ करणारे **आथर्वण** आणि **अंगिरस** यांनीं मनुष्य जातीचा त्राता ह्मणून त्यास ह्या भूतलावर आणिलें.

वायु अथवा वारा ह्याचें नामोच्चारण कोठेंकोठें **ऋग्वेदांत** आहे. परंतु **मारुत** अथवा **वादळाची देवता** यांस पूर्वी सांगितल्याप्रमाणें पुष्कळ वेळां आवाहन केलेलें आढळतें. ही देवता मनुष्य जातीच्या कल्याणाकरिता मेघ वृष्टीच्या कृत्यांत **इंद्रास** मदत करिते अशी समज आहे. **रुद्र** हा **मारुतां**चा महाध्वनी करणारा **जनक** होय. यास अलिकडील हिंदूंनीं पुराणांत सर्व जीवित विध्वंसकाचें यथायोग्य पद दिलें आहे.

आह्मीं वर सांगितलें आहे कीं **अग्नी**ची सर्व **यज्ञां**त जरूर असल्यामुळें त्याची विशेष उपासना करण्यांत येत असे. **सोमरसा**चें हवनही त्याचप्रमाणें पवित्र मानलें जात असें आणि त्यामुळें **सोम** हा एक देवच आहे असें समजून त्याची पूजा होऊं लागली. अशाच रीतीनें हवन अथवा बलिप्रदानाच्या वेळीं जो मंत्र उच्चारण्यांत येत असे तो एक देवता झाली. तिचें नांव

"ब्राह्मणस्पति" हें होतें. अलिकडलि हिंदु पुराणांत हें नांव सर्व जीवजंतूस उत्पन्न करणाऱ्या देवाचें आहे.

वैदिक काळाच्या देवतामंडलांतील मुख्य देवाविषयीं वर्णन आह्मीं वर स्पष्टपणें केलें आहे परंतु ऋग्वेदांतील देवता **युगल**, प्रातःकाळ व सायंकाळ, याविषयीं दोन शब्द जास्ती लिहिणें जरूर आहे असें वाटतें. उजेड आणि काळोख यावरून प्रथम काळच्या **आर्यां**च्या मनांत साहजिकच देवता **युगलां**ची कल्पना उद्भवली. **विवस्वत** (आकाश) हा जनक व **सरण्यु** (प्रभात-काळ) ही जुळ्या **अश्विनी**ची माता होय. ह्यांच्या आख्यायिकेंत असें ह्मटलें आहे कीं, **शरण्युनें** आपल्या आर्भक **द्वंद्वांस** जन्म देण्यापूर्वी ती **वैवस्वता**पासून पळून गेली होती. ग्रीक पुराणांत हीच कथा आहे. **एरिनीस** हा शब्द व्युत्पत्तिशास्त्राप्रमाणें शरण्युचे उपनांव होय. आपल्या प्रियतमापासून पळून जाऊन तिनें **एरियन** व **डेस्पोईना**, ह्या अर्भकांस जन्म दिला. ह्यांत मूळ कल्पना अशी आहे कीं, पाहाट ही एक रक्तवर्ण देवी आहे, ती अन्तरधान पावते आणि उजेड आणि काळोख ह्यांस जन्म देते. प्रथमची ही कल्पना कशी-ही असो; परंतु **अश्विनी कुमारां**चे मूळ स्वरूप लोपून गेलें आहे आणि ऋग्वेदांत ते देवाचे वैद्य, आजारी आणि जखमी प्राण्यांस बरें करणारे व त्यांस कोमल अंतःकरणानें वागविणारे असे होऊन बसले आहेत.

ह्याचप्रमाणें दुसरे देवतायुगल **यम** आणि त्याची भगिनी **यमी**, (आकाश आणि पहाट ह्याच मातापित्यांची आपत्यें, व खरा अर्थ पहातां उजेड व काळोख ह्यांची द्योतक,) यांची मूळ रूपें जाऊन ऋग्वेदांत त्यांस निराळें स्वरूप आलें आहे. **यमी**चें नांव फारच थोडें आढळतें. परंतु **यम** हा परलोकचा नियंता व मयतांचा परोपकारी राजा होय. पुण्यवान प्राणी दैदिप्यमान शरिरें धारण करून स्वर्गांत जेथें सर्व उजेड आणि झकमकणारे पाणी हीं आहेत तेथें **यमा**च्या शेजारीं रहातात. **यम** आणि **सोम** ह्यांच्या स्तोत्रांचे दोन लहानसे उतारे दिले असतां त्यावरून वैदिक काळच्या हिंदूंचे **परलोक** व तेथील सुखाविषयीं कसे काय विचार होते तें स्पष्ट समजतें

१ " **विवस्वता**चा पुत्र **यम** त्याची पूजा हवन करून करा. सर्व माणसें त्याजपाशीं जातात. तो जेथें सुख असेल त्या प्रदेशांत पुण्यवानांस नेतो. पुष्कळांकरितां तो रस्ता सुलभ करून ठेवितो."

२ " यमानें मार्ग प्रथमतः आपणाकरितां शोधून काढिला. तो रस्ता आतां कधीं नाश पावणार नाहीं. सर्व सजीव प्राणी, त्यांचे पूर्वज ज्या मार्गानें गेले त्याच मार्गानें, ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें जातात."

ऋग्वेद १०–१४.

७ " प्रवाही **सोमा**! मला त्या अजरामर आणि अविनाशी स्थळीं ने, जेथें तेज शाश्वत राहतें व जें ठिकाण स्वर्गांत आहे. हे **सोमा**, **इंद्रा**करितां वाह."

८ " मला तेथें न्या; ज्या ठिकाणीं **यम** हा राजा आहे, जेथें स्वर्गाचें द्वार आहे, आणि जेथें मोठमोठ्या नद्यांचें प्रवाह आहेत तेथें मला न्या आणि अमर करा. हे **सोमा**, **इंद्रा**करितां वाह."

९ " मला त्या ठिकाणीं न्या; जेथें तिसरा स्वर्ग आहे, जेथें आकाशावर तेजाचें तिसरें स्थान आहे आणि जेथें लोक स्वेच्छाचारी आहेत तेथें मला न्या आणि अजरामर करा. हे **सोमा**, **इंद्रा**करितां वाह."

१० " मला त्या ठिकाणीं न्या; ज्या ठिकाणीं सर्व इच्छा परितृप्त होतात. जेथें **प्रधम्या**चें राहाण्याचें स्थान आहे. जेथें अन्न आणि तृप्ति हीं आहेत तेथें मला न्या आणि अमर करा. हे **सोमा**, **इंद्रा**करितां वाह."

" मला तेथें न्या; जेथें सर्व विषय, आनंद आणि उल्हास हीं आहेत, आणि जेथें प्रत्येक चिंतायुक्त मनाची इच्छा तृप्त होते तेथें मला न्या आणि अमर करा. हे **सोमा**, **इंद्रा**करितां वाह."

ऋग्वेद ११–१–१३.

वर दर्शित केलेल्या **ऋग्वेदां**तील मुख्य देवता होत. ज्यांचे कांहीं विशेष गुण अथवा व्यक्तित्व वर्णिलेलें आहे,

अशा देवी फक्त दोनच आहेत. **उषा** अथवा **पहाट** आणि **सरस्वती** अथवा नद्यांची देवता ह्या होत.

पहाटेविषयीं जी कल्पना आहे त्यापेक्षां दुसरी जास्ती मनोहर कल्पना **ऋग्वेदांत** नाहीं. उषेचीं जीं कित्येक स्तोत्रें आहेत त्यांपेक्षां जास्ती उल्हास देणारीं अथवा जास्ती सुंदर वाक्यें प्राचीन लोकांच्या वर्णनपर काव्यांत नाहींत. तिच्या वर्णनांत ती अतिविस्तृत, बहुरंगी, तेजस्वी आणि जिचें राहण्याचें ठिकाण माहीत नाहीं अशी **उषा** झटलें आहे. ती आपले घोडे फार लांबच्या प्रदेशांत जोडून तेजःपुंज व यशस्वी अशी येते. ती तरणी आणि आकाशाची श्वेतवस्त्र परिधान केलेली मुलगी व ह्या जगांतील रत्नांची **राणी** होय. कार्यदक्ष कुलपत्नी आपल्या घरांतील प्रत्येक मनुष्यास निद्रेंतून उठवून त्याचें काम करावयास पाठविते, तिच्याप्रमाणें ती आहे, तरी पण लग्नाच्या मंगलविधीकरितां मातेनें सजविलेल्या नववधुप्रमाणें सोज्वळ असून ती आपलें सौंदर्य प्रगट करीत आहे.* ह्याप्रमाणें आवडतीं विशेषणें आणि सुंदर उपमा देऊन हिंदु **आर्य** क्रांतिवृत्तांतील आकाशाच्या आल्हादकारक आणि रमणीय प्रातःकाळाचें अभिवंदन करीत असत. हें विलक्षण आहे कीं **होमर**च्या वेळचे **हिलेनीक आर्य**लोकही इतक्याच भक्तियुक्त मनोवृत्तीनें सुंदर

---

* ऋग्वेद १ ३०,२१; १ ४८,७; १ ११३,७; १ १२४,४; १ १२३, ११.

इयास हिला मानीत असत. परंतु इयास आणि उषा हीं एकच अर्थाचीं नांवें आहेत आणि ग्रीक भाषेंतील अरुणोदयाचीं दुसरीं नांवें त्याच देवतेच्या* हिंदु नावांस शब्दशास्त्रदृष्ट्या मिळतीं येतात, असें समजलें ह्मणजे हें गूढ नाहींसें होतें. ह्यावरून हिंदु व हिलेनिक आर्य ह्या दोघांनींही अरुणोदय देवतेविषयीं कल्पना आणि तिचीं नांवें मूळच्या आर्य लोकांपासून एकसारखींच घेतलीं असावींत असें मानण्यास मुळींच संशय रहात नाहीं.

हें अनुमान सरस्वतीविषयीं लागू पडत नाहीं. ती निवळ हिंदूंचीच देवता आहे. सरस्वती हें पंजाबांतील एका नदीचें† नांव आहे, ह्या नदी किनाऱ्यावर जे यज्ञयाग होत असत व जे मंत्र ह्मटले जात त्यांच्या योगानें ती नदी पवित्र आहे असें मानलें जात असें. सहजगत्या कल्पना विकासामुळें ही नदी त्या मंत्रांची अथवा वाचेची देवता मानली जाऊं लागली, आणि ह्याच स्वरूपांत आजपर्यंत हिंदुस्थानांत तिची पूजा करण्यांत येत आहे.

वरील वर्णनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल कीं वैदिक काळचे हिंदूंचे देव आणि होमरच्या वेळचे ग्रीक लोकांचे देव ह्याच्यामध्यें मोठाच भेद आहे. मूळ आर्यभाषेशीं ग्रीक भाषेपेक्षां जसें संस्कृत भाषेचें वि-

---

* आर्जिनोरिस ही वेदांतील अर्जुनि, दाफनि ही दहना अथेना ही अहना, एरिनिस ही शरण्यु वगैरे.

† कित्येक लोक हें नांव सिंधु नदीचेंच होतें असें ह्मणतात.

शेष सान्निध्य व साम्य आहे तसेंच हिंदूंच्या कल्पना मूळ आर्यांच्या सृष्ट्युपासनेस विशेष मिळत्या येतात. होमरच्या काळांतील ग्रीक लोकांत देव आणि देवी यांस बहुतेक व्यक्तित्व प्राप्त झालें होतें. त्यांचीं चरित्रें, त्यांचे पराक्रम ह्यांकडेस आपलें लक्ष जातें आणि सृष्टशक्तीशीं व तिच्या प्रादुर्भावांशीं त्या देवांचा जो संबंध तो डोळ्याआड होतो. ह्याच्या उलट वैदिककाळांतील हिंदु लोकांचे देव हे सृष्टशक्ति व तिचें प्रादुर्भाव आहेत असें स्पष्ट दिसून येतें इतकेंच नाहीं, परंतु त्या शिवाय दुसरें रूप त्यांस देतां येत नाहीं अगर दुसरे रीतीनें त्यांचें वर्णन करितां येत नाहीं. इयुसपेक्षां द्यूसचें आकाशाशीं तादात्म्य जास्ती स्पष्ट रितीनें दाखवितां येतें, आणि आथेना, दाफनि, ह्यांच्यापासून अरुणोदयाचा जो बोध होतो, त्यापेक्षां अहना आणि दहना यांजपासून जास्त स्पष्ट रीतीनें तो व्यक्त होतो. हिंदूंच्या कल्पना प्राचिनत्व आणि सत्यांश या संबंधानें ज्या मुळापासून त्या निघाल्या त्यांशी जास्त मिळत्या आहेत. ग्रीक लोकांच्या कल्पना जास्ती प्रगल्भ झाल्या आहेत, आणि त्यामुळें त्यांचें सृष्ट्युपासनेचें स्वरूप जाऊन त्यांस अनेक देवतांचें रूप आलें आहे.

ह्या भेदामुळेंच एक परमेश्वर आहे अशी कल्पना ग्रीक लोकांपेक्षां हिंदूमध्यें लौकर आली असावी असें वाटतें. सृष्टशक्तींची उपासना करीत असतां सृष्टीच्या प्रभूची

कल्पना मनांत येणें साहजिक आहे; परंतु ग्रीक लोकांनीं आपल्या देवास निरानिराळे गुण देऊन त्यांचीं निरनिराळीं चरित्रें मानिलीं असल्यामुळें ती योजना एकीकडेस ठेवून एक ईश्वराची कल्पना करणें हें त्या लोकांस सुलभ नव्हतें. ह्यामुळें होमरच्या काळचे ग्रीक लोक एका परमेश्वराची आराधना करण्याची कल्पना करूं शकले नाहींत, आणि तीच उपासना हिंदु लोक वेदकाळांतच करूं लागले होते.

ऋग्वेदांतील कित्येक अलिकडील स्तोत्रांवरून आपल्या ध्यानांत येतें कीं, निरानिराळ्या देवांची नांवेंहीं, सर्वांची माता व सर्वांस उत्पन्न करणारी जी एक महान् शक्ति आहे, तिचीच फक्त निरनिराळीं नावें होत, असा खरा अर्थ भाविक लोकांनीं त्या वेळींच केला होता.

१ "सर्व जाणणाऱ्या जनकानें स्पष्ट रीतीनें पाहिलें, आणि योग्य विचार केल्यानंतर आकाश व पृथ्वी यांस एकमेकांस संलग्न अशा जलरूपानें उत्पन्न केलें, त्यांच्या मर्यादा जेव्हां लांबवर पसरण्यांत आल्या तेव्हां तीं दोन्हीं निरनिराळीं झालीं."

२ "सर्वांचा उत्पन्न कर्ता हा परपुरुष आहे; तो सर्वांस उत्पन्न करितो आणि त्यांचें रक्षण करितो; तो सर्वांच्या वर आहे, तो सर्वांस पाहतो; तो सत्प ऋषींच्या स्थानांच्याही बाहेर आहे, असें सूज्ञ लोक बोलतात आणि शहाण्या लोकांच्या सर्व इच्छा तृप्त होतात."

३ "ज्यानें सर्वांस प्राण दिला आहे, जो उत्पन्न करणारा आहे, जो जगांतील सर्व स्थळें जाणणारा आहे, जो **अनेक देवांचीं नांवें धारण करणारा आहे तथापि एकच आहे** त्यास जाणण्यास प्राणी इच्छितात."

ऋग्वेद १०—८२.

"हें हिंदुंच्या अद्वैतमताचें अति प्राचीन निर्दर्शन होय. हें अद्वैत मत, पुराणें, दृष्टांत, कथा आणि निरनिराळ्या देवांचीं नांवें, यांच्या योगांनीं जनसमूहांचीं मनें पिढ्यांच्या पिढ्या रंजवीत असतांही, तीन हजार वर्षेंपर्यंत हिंदूंचा खरा धर्म होऊन राहिलें आहे. ह्या सर्व श्रेष्ठ परमेश्वराच्या उदात्त गीतांचा आणखी एक उतारा आम्ही येथें देतों, त्यावरून हिंदूंच्या अद्वैतमताचें अति प्राचीन स्वरूप कसें होतें तें आपल्यास चांगलें समजेल."

१ " प्रथमारंभीं सुवर्ण बालक विद्यमान होतें. तो सर्वांचा स्वामी मूळपासूनच होता. त्यानें हा भूगोल आणि आकाश हीं ज्या त्या ठिकाणीं स्थापिलीं. आम्हीं कोणास हवन करावें ?"

२ " **त्यास**, ज्यानें प्राण देऊन शक्ति दिली, ज्याची इच्छा सर्व देव मानितात, ज्याची छाया अमरत्व होय आणि ज्याचा गुलाम मृत्यु होय. आम्हीं कोणास हवन करावें ?"

३ " **त्यास**, जो आपल्या शक्तीच्या योगानें सर्व सजीव प्राण्यांचा, जे पाहूं शकतात व हाल चाल करि-

तात त्यांचा, सर्वस्वी अधिपति आहे; जो सर्व द्विपद व चतुष्पद प्राण्यांचा स्वामी आहे. आह्मीं कोणास हवन करून पूजावें?"

४ "**त्यास**, ज्याच्या सामर्थ्यानें हे छायायुक्त पर्वत उत्पन्न केले, ज्यानें ही भूमि व हे समुद्र उत्पन्न केले **त्यास**, ज्याचे कर आकाशांतील दिशा होय. आह्मीं कोणास हवन करून पूजावें?"

५ "**त्यास**, ज्यानें आकाश आणि पृथ्वी ह्यांस त्यांच्या त्यांच्या स्थळावर स्थापिलें. ज्यानें गगनमंडल आणि अत्युच्च स्वर्गहीं स्थापिलीं. ज्यानें आकाश मंडलाचें माप घेतलें आहे. आह्मीं कोणास हवन करून भजावें?"

६ "**त्यास**, ज्यानें ध्वनी करणाऱ्या आकाशांस आणि पृथ्वीस स्थीर करून प्रसृत केलीं, ज्यास दैदिप्यमान आकाश व पृथ्वी यांनीं सर्व शक्तिमान मानिला आहे; ज्याच्या अनुग्रहानें सूर्य उगवतो व त्यास तेज मिळतें. आह्मी कोणास हवन करून पूजावें?"

ऋग्वेद १०–१२१.

ह्याप्रमाणें आपल्या ध्यानीं येईल कीं, पंजाब कावीज करणाऱ्या धट्याकट्या लोकांचा धर्म अभिवृद्धि होणारा होता. सृष्ट्युपासनेपासून सृष्टीच्या परमेश्वराच्या आराधनेपर्यंत त्याची प्रगति झाली. ऋग्वेदांत मानवी मनाचें संपूर्ण क्रमण–रक्तवर्ण अरुणोदय व सोसाट्यानें

वाहणारे वादळ ह्याविषयीं वाटणारें बालोचित व साधे कुतुहल त्यापासून तो ह्या सृष्टींतील व तिच्या कर्त्याचीं रहस्यें आटोक्यांत आणण्याचा अत्युत्कृष्ट प्रयत्नापर्यंत दृष्टी गोचर होत आहे आणि त्यामुळें हा ग्रंथ जगांत अपूर्व आहे.

तत्कालीं कित्येक सुधारलेले लोक ह्याप्रमाणें उंच विचारपदास पोंचले होते; परंतु साधारण जनसमूह त्यांच्या प्रिय देवांचा धांवा करीत, त्यास होमामध्यें पेयें ओतून व अपूर्व दान करून प्रार्थनेनें आळवीत. त्या वेळीं देवळें नसत व वंशपरंपरेचे पुरोहित नव्हते. प्रत्येक धार्मिक गृहस्थ, प्रत्येक कुटुंबाचा यजमान, आपल्या घरांत होमाचा अग्नि प्रज्वलीत करून व त्यावर सोम रसाचें हवन करून, आरोग्यता, धान्यें, गुरेंढोरें आणि संतति देण्याविषयीं देवाची प्रार्थना करीत असे. तथापि मोठे राजे आणि नायक हे आपली धर्म संबंधीं यज्ञकर्में मोठा खर्च करून थाटमाटानें करीत असत, त्यामुळें अशा मोठ्या लोकांकडून ऋत्विजांचीं कुटुंबें पोशिलीं जात. हे याज्ञिक ह्या राजकीय विधींचे वेळेस आधिपत्य घेत असत. कांहीं काळानें ह्या कुटुंबांनीं पिढ्यांच्या पिढ्या हाच धंदा करून स्तोत्रें रचणें, तीं तोंडपाठ ह्मणणें आणि यज्ञयागांचे विधी करणें यामध्यें प्राविण्य मिळविलें व त्यामुळें कीर्ति संपादिली. ह्या कुटुंबांनीं स्तोत्रांच्या निरनिराळ्या संग्रहांचें रक्षणही केलें, तीं बापापासून मुलास

मिळत असत आणि अशा रीतीनें फक्त स्मरण शक्तीनेंच त्यांचें संरक्षण झालें. आर्यांच्या अति प्राचीन ग्रंथांपैकीं हल्लीं विद्यमान असणारा जो **ऋग्वेद** त्याचें रक्षण होऊन तो **आर्य** लोकांस हल्लीं उपलब्ध झाला आहे ह्याचें सर्व श्रेय ह्या धर्मनिष्ट संप्रदायास आहे.

कित्येक कुटुंबांत ह्याप्रमाणें बापापासून त्याचा मुलगा पुरोहिताचा धंदा घेत असे आणि त्यामुळें राजे लोक त्यास द्रव्य देत व सामान्य लोक त्यास पूज्य बुद्धीनें मानीत असत. परंतु तत्कालीं पुरोहित आणि इतर जनसमूह ह्यांच्या मधील वंशपरंपरा चालणारा भेद उत्पन्न झाला नव्हता; आणि त्यामुळें वैदिक काळांत वर्णव्यवस्था लोकांस माहीत नव्हती. त्या काळीं दुर्निवार्य भेद म्हटला म्हणजे जिंकणारे आणि जित–हिंदु व मूळचे राहणारे, अथवा ऋग्वेदांत म्हटल्याप्रमाणें **आर्य** आणि **दस्यु**–यांच्या मधील फरक हा होय. परंतु **आर्य** हिंदूंमध्येंच अशा प्रकारचा भिन्नभाव अद्यापि उत्पन्न झाला नव्हता, आणि त्यामुळें ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य असे जाती वर्ण होण्यापूर्वी **पंजाबांतील** हिंदूंचे **कुलपति** अथवा **धुरीण** ह्यांनींच आपलीं सूक्तें रचिलीं, आपल्या लढाया मारिल्या आणि आपलीं शेतेंही नांगरिलीं.

द्वितीययुग-शौर्यकाळ.

गंगा नदीच्या तिरावरील हिंदूंचीं राज्यें.

ख्रि. श. पूर्वी १४०० पासून १००० पर्यंत.

खंड १ लें.

कुरु व पांचाळ.

सिंधुनद व सतलज आणि सरस्वती नद्या ह्यांच्या मधील विस्तीर्ण प्रदेश हिंदु लोकांनीं काबीज करून तेथें वसाहती केल्यानंतर, आणखी पूर्वेस गंगा नदीकडेस आपल्या लोकशाखा पाठविण्यास त्यांनीं विलंब लाविला नाहीं. देशांतर करणारे आणि वसाहती करणारे ह्यांचे ओघ दर पिढीस वाढत गेले, आणि शेवटीं स्वदेशभूमि जी पंजाब त्या देशांतील गांवें आणि शहरें यांस संपति आणि सुधारणेंत मागें टाकणारीं अशीं शोभिवंत गांवें व शहरें यांनीं गंगातीर चमकूं लागलें. ऋग्वेदांत हिंदूंचें वसतिस्थान पंजाबदेश आहे, आणि दूरच्या गंगातीराविषयीं उल्लेख त्यांत क्वचितच आढळतो. त्यापुढिल काळ ज्यास आपण शौर्ययुग हें नांव देऊं, त्यांतील ग्रंथांत बहु कीर्तिमान आणि

सुधारलेल्या हिंदुराज्यांचें वसतिस्थान गंगथडीवर आहे; व त्यावेळीं मूळ स्वभूमि जो पंजाब देश तो मागें पडला होता.

पंजाब सोडून गंगथडीकडेस जे लोक गेले त्यांत कुरु आणि पांचाळ हे कमी विख्यात नव्हते. कुरु हे प्रथमतः भारत ह्या नांवानें प्रसिद्ध होते, आणि गेल्या भागांत ज्या सूदांविषयीं लिहिलें आहे, त्यांच्या लढाईंत हे पुढें आले होते. ह्यांच्यांतील पुष्कळ लोकांनीं स्वदेशभूमि सोडून पूर्वेकडेस गमन केलें; व ख्रिस्ती शकापूर्वीं १४ वे शतकांत वरील गंगप्रदेशांत एक संपन्न राज्य स्थापिलें. ह्यावेळीं ते लोक भारत, व त्यांच्या राजाच्या नांवावरून त्यास मागाऊन प्राप्त झालेलें कुरु, ह्या दोन्हीं नांवांनीं प्रसिद्ध होतें. त्यांची राजधानी त्यांनीं गंगा नदीच्या वरील तिरावर हस्तनापूर येथें स्थापिली.

पांचाळ हेही पंजाबांतूनच आले. ऋग्वेदांत पंजाबांतील लोकांस अथवा कित्येक जातींस पंचजन किंवा पंचकृशि, ह्मणजे पांच जाति किंवा शेतकी करणारांचीं पांच कुळें, असें ह्मटलें आहे; व ह्याच जातींच्या वंशजांनीं पांचाळ नांवानें गंगातीरावर वसाहती केल्या हें संभवनीय आहे; त्यांनीं भारत अथवा कुरु ह्यांच्या दक्षणेकडील देशांत वसाहत केली, आणि ख्रिस्ता पूर्वीं चौदावें शतकांत एक प्रबल राज्य स्थापून, त्याची राजधानी कांपिल्य शहरीं केली.

ह्या शिवाय पंजाबांतून दुसऱ्या जाती निघून त्यांनीं गंगा व यमुना ह्या नद्यांच्या कांठीं वसाहती केल्या. त्यांच्यांतील प्रमुख, यादव, मच्छ आणि शूरशेन हे होत. पुढें ज्या महायुद्धाबद्दल आम्ही लिहिणार आहोंत त्यांत ह्यांनीं भाग घेतला होता, त्यामुळें त्यांची माहिती आपणांस मिळते.

कुरु व पांचाळ हे पुष्कळ काळपर्यंत एकमेकांशीं सलुख्यानें व योग्य प्रतिस्पर्धेनें राहिले व त्यांनीं आपल्या सशक्त व आडदांड पंजाबांतील पूर्वजांवर चढ करून सुधारणा वाढविली. ह्यांच्यापाशीं सभ्यतासंपन्न दरबार मंडळ असे, व तत्कालीन शहाणे आणि विद्वान् लोकांच्या सभा करण्याची त्यांस हौस असे.

ह्या सभांत नीति, धर्म व तत्वज्ञान ह्या विषयांवर वाद होत असे. राजे लोकांच्या सन्मार्गनिष्ठेची वृद्धि व्हावी ह्मणून कित्येक दिवस, कित्येक महिनें अथवा कित्येक वर्षं चालणारे यज्ञ करण्यामध्यें पुरोहितलोक उत्साह ठेवीत आणि त्या पुरोहितांची विद्वत्ता व गुण असेल त्याप्रमाणें त्यांस पारितोषिक मिळत असे. विद्वान् लोक विद्या शिकविण्याकरितां विद्यार्थ्यांस आपल्या घरीं ठेवीत आणि सर्व आर्यलोक आपलीं मुलें लहान असतांनाच अशा शिक्षकांच्या अथवा गुरूंच्या ताब्यांत देत. प्रत्येक मुलास गुरूच्या घरीं कित्येक वर्षं राहून त्याची सेवा

करावी लागे. गुरुच्या जीविनार्थ भिक्षा मागणें, त्याची ढोरें चारणें, घर झाडणें इत्यादि कामें करून वेद व दुसरीं शास्त्रें, जीं आपलें अभिलाषीत वतनच आहे असें प्राचीन हिंदु मानीत असत, त्यांचें ज्ञान दररोज वर्षेंच्या वर्षे तो विद्यार्थी मिळवी. विद्याभ्यास पुरा झाल्यावर, गुरूस भरपूर दक्षणा देऊन त्याचे पासून गेल्या नंतर हल्लींच्या विश्वपाठशाळाप्रमाणें जेथें निरनिराळें विषय निरनिराळे शिक्षक शिकवीत असत अशा परिषेध नामक संस्था असत, तेथें कित्येक विद्यार्थी जास्ती अभ्यास करीत आणि हा अभ्यास क्रम पुरा झाल्यावर घरीं येऊन ते लग्नें करीत व गृहस्थाश्रम पत्करीत.

लग्नाचे समयीं होमाचा अग्नि प्रदीप्त करीत, तो प्रत्येक धार्मिक हिंदु आपल्या घरांत राखून ठेवी व धर्मांत सांगितल्या प्रमाणें त्यांत पेय व दुसरीं हव्यें टाकून तो होम करीत असे. ऋग्वेदांतिल मंत्र अध्यापह्या होमाच्या वेळीं म्हणण्यांत येत असत आणि तीन हजार वर्षांवर गंगा व यमुना ह्या नद्यांच्या कांठीं भरभराटींस आलेल्या हिंदूंच्या निरनिराळ्या जातींत एकच धर्म, एकच प्रकारचे रीतिरिवाज, व एकच सर्व साधारण भाषाही हीं चालू होतीं.

खरोखर, ह्या युगांतील प्रत्येक हिंदुजात ही निराळा समाज असून तिचे स्वतःचें निराळें राज्य असें. परंतु सर्व जातीस एकच भाषा, एकच धर्म, आणि एकच

साधारणं आणि रीतिरिवाज अल्हादवीत असत. अशा परिस्थितीचा विचार करीत असतां, **पिलॉपानीशियन** लढाई होण्यापूर्वीं जीं ग्रीक शहरें एकमेकांच्या शेजारीं भरभराटींत होतीं त्यांची स्थिति आपल्या दृष्टी समोर स्पष्ट रीतिनें उभी रहाते. ग्रीक शहरांप्रमाणें हिंदु जातींत स्पर्धा व वैमनस्यें सारखींच प्रचारांत होतीं, परंतु त्यांच्या आरसपरस संबंधांत एक प्रकारचा विशेष मित्रभाव दिसून येत असे. निरानिराळ्या जातींच्या पाठशाळांत एकमेकांवर चढ करण्याची इर्षा असे, आणि **कुरु** व **पांचाळ** ह्यांच्या परिषदेंत दुसऱ्या जातींची पुष्कळ मुलें विद्या शिकण्यास जात असत. ही सर्व मित्रभावाची इर्षा चालू असतां ते लोक लढाईच्या तयारींत ढिलाई करीत नसत. राजपुत्र आणि क्षत्रीय जातींतील मुलांस लहानपणींच जसे शिल्पशास्त्र शिखवीत त्याजप्रमाणें त्यांस शस्त्रास्त्रांत तरवेज करीत आणि धनुष्यबाण, तलवार, भाला व चक्र यांविषयीं तीं मुलें निपूण असत. निरनिराळ्या जातींतिल मत्सरामुळें अनेक वेळां लढाया झाल्याशिवाय रहात नसत; आणि, जसें काय **हिंदु** राज्यें आणि **ग्रीक** शहरें यांमधील साम्य पूर्ण व्हावें म्हणूनच, **ग्रीस** देशांतिल **पिलॉपॉनीशियन** लढाईप्रमाणें हिंदुस्थानांत ख्रिस्तापूर्वीं तेरावें शतकांत ज्यांत फार रक्तपात झाला असें एक महा युद्ध झालें. ह्या युद्धांत उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध जातींनीं

भाग घेतला होता आणि ह्यांत अति कत्तल होऊन व रक्ताचा पूर वाहून त्याचा शेवट झाला.

ही लढाई हिंदूंचा प्रसिद्ध वीररस प्राधान्य ग्रंथ जो **महाभारत** त्यांत वर्णलेली आहे; आणि ह्या लढाईची खरीं कारणें व तींत वडून आलेल्या खऱ्या गोष्टी एकीकडेस राहून त्यांचे ऐवजीं कल्पित कथा आणि पुराणवृत्तें आलीं आहेत. ही लढाई प्रसिद्ध राष्ट्रें जीं **कुरु** अथवा **भारत** आणि **पांचाळ** ह्यांच्यामध्यें झाली आणि त्याविषयींच्या ग्रंथाचें नांवच **महा** ह्मणजे मोठ्या भारतांची ती कथा आहे असें दर्शवीत आहे.

हा ग्रंथ हल्लीं आपणास उपलब्ध आहे त्यांत त्याचे नायक **कुरु** नाहींत अथवा **पांचाळ**ही नाहींत. परंतु त्यांत **पंडू**चे पांच पुत्र जे **पांडव** हे नायक आणि त्या पांचांची एकच पत्नी जी **पांचाळ**च्या राजाची मुलगी ती नाईका होय. हे पांच **पांडव** आणि त्या पांचांची एक स्त्री ह्यांचें बद्दलची कल्पित कथा, जी ह्या वीररस ग्रंथाचें मुख्य कथानक होऊन बसलें आहे. ती कशी उत्पन्न झाली त्याविषयीं बरीच भवतिनभवति झाली आहे. त्यांत आपणास शिरण्याची जरूर नाहीं तथापि हें खरें आहे कीं हें कथानक कल्पित गोष्ट आहे.

ह्या संबंधांत संभवनीय तर्क असा आहे कीं, **पांडव** ही एक निराळीच जात होती. त्यांतील लोकांनीं **पांचाळां**स मदत केली अथवा **पांचाळां**चे ते सेनाधिपति

होते. ह्यां जातीस ह्या ग्रंथांत लाक्षणिक रीतीनें पांच पांडव असें ह्मटलें आहे, आणि त्या जातीचा पांचाळां-शीं जो संबंध जोडला गेला त्यांचे रूपक पांडवांनीं पांचाळ घराण्यांतील मुलीशीं लग्न लाविलें हें होय. हल्लींच्या हिंदुप्रमाणेंच बहु भर्तृत्वाची ह्मणजे अनेक वर करण्याची चाल प्राचीन हिंदु लोकांतही नव्हती.

दुसरा असाही तर्क आहे कीं, ही लढाई झाल्यानंतर कांहीं वेळानें पांडव जातीचे राजे प्रबळ असतांना, ह्या लढाई संबंधीं जे कांहीं पोवाडे, दंतकथा आणि आठ-वणींतील गोष्टी यांवरून हा ग्रंथ रचला गेला असावा. आणि त्यामुळें साहजिकच, तत्काळीं प्रबळ असणाऱ्या राजघराण्याचे पूर्वज ह्या महारणांतील धूरीण वीर पुरुष होते असें मानले गेले; आणि ते निराळ्या जातीचे होते तथापि, नंतरच्या लोकांनीं त्यांस राज्यापहारी ह्मणूं नये ह्मणून, ते कुरु राजपुत्रांचें भाऊबंद होते असें दाखवि-ण्यांत आलें.

वर जें कांहीं लिहिलें आहे त्यावरून स्पष्ट होत आहे कीं, ह्या लढाईंत खऱ्या गोष्टी कोणकोणत्या घडून आल्या, त्याविषयीं माहिती ह्या काव्यांत पाहूं गेलें अ-सतां तो प्रयत्न व्यर्थ होय. परंतु त्या ग्रंथांत ज्या का-ळाबद्दल मी लिहीत आहें त्या काळाची बरीच माहिती मिळते ह्मणून ह्या काव्यांत अन्यरूपानें ही लढाई वर्णिलेली आहे तथापि तिच्या थोडीशी तरी हकिकत

दिल्याशिवाय कोणताही हिंदुस्थानचा इतिहास पूर्ण गणला जाणार नाहीं.

कुरूंच्या एका राजास दोन मुलगे होते. मोठा मुलगा **धृतराष्ट्र** हा आंधळा होता, ह्मणून धाकटा मुलगा **पंडु** हा हस्तिनापूरच्या गादीवर बसला. **पंडु** मरण पावला त्यावेळीं त्यास पांच मुलगे होते. त्याच्या आणि **धृतराष्ट्राच्या** शंभर पुत्रांमध्यें मत्सर आणि वैमनस्यें उत्पन्न झालीं.

पंडूच्या पांच पुत्रांस त्यांचा गुरु **द्रोण** यानें धनुर्विद्या शिकविली होती. सर्वांत वडील पुत्र **युधिष्ठर** हा चांगलासा योद्धा नव्हता; परंतु तत्कालिन धर्मविद्येंत तो फार प्रवीण होता आणि ह्या काव्यांतील अतिशय नीतिमान पात्र तो आहे. दुसरा पुत्र **भीम** हा त्याचें धिप्पाड शरीर व राक्षसी शक्ति याविषयीं प्रसिद्ध होता. हा **भीम** ह्या काव्यांतील हरक्युलिज् होय. तिसरा पुत्र **अर्जुन** हा ह्या काव्यांतला खरा नायक होय, तो सर्व प्रकारच्या युद्धकलेंत अति निपूण होता. चौथा मुलगा **नकुळ**, हा अश्वविद्येंत तरवेज झाला, आणि पांचवा मुलगा **सहदेव** हा मोठा जोतिषी होता. ह्या बंधूपंचमाविषयीं त्यांच्या चुलत भावांच्या मनांत लहानपणापासून मत्सर व द्वेष भाव उत्पन्न झाला होता.

सरतेशेवटीं ह्या कुरु वंशांतील राजपुत्रांनीं युद्धकलेंत जें कांहीं नैपुण्य मिळविलें होतें त्याचें जगजाहीर प्रदर्शी-

न करण्याचा दिवस येऊन ठेपला. एक विस्तीर्ण जागा कठडा घालून तयार करण्यांत आली व मोठमोठे लोक आणि सभ्य स्त्रिया सादियुद्ध पाहण्या करितां सभोंवार बसल्या. अंधराज धृतराष्ट्र यास त्याचे जागेवर नेऊन बसविलें. स्त्रियांत त्याची राणी व पंडुची विधवा स्त्री ह्या अग्रभागीं बसल्या, आणि कुरु देशाचा जनसमूह आपल्या आवडत्या राजपुत्रांचें कौशल्य पाहून आनंद वाटण्याकरितां जमा झाला.

तरवार आणि गदा यांचीं द्वंद्व युद्धें झालीं आणि धनुर्विद्येंतील प्राविण्य प्रखर कसोटीस लावून पाहण्यांत आलें. सर्व राजपुत्रांत अर्जुनानें कमाल केली आणि त्याबद्दल जमलेले लोकांचा जयघोष चालूं असतां आपला पूज्य गुरु जो द्रोणाचार्य त्यांस अर्जुनानें नमस्कार करून आश्चर्य उत्पन्न करणारें आपले पराक्रम-कृत्य पुरें केलें.

धृतराष्ट्राच्या पुत्रांच्या मनांत मत्सर शिरून ते पांडवाकडेस कपाळास आठ्या घालून पाहूं लागले आणि जेव्हां राज्याधिकार देण्याची वेळ आली तेव्हां त्यांनीं पंडूच्या वडील पुत्रास त्याच्या बापाच्या गादीवर न बसूं देण्याचा घाट केला. वयोवृद्ध व नीति-मान धृतराष्ट्रास आपल्या मुलांच्या बेतास सम्मति देणें भाग पडलें. सरतेशेवटीं धृतराष्ट्राच्या मुलांच्या हातीं राज्यसत्ता जाऊन पांडवांस देशत्याग करावा लागला.

ह्यावेळीं पांचाळ देशांतून बाहेरच्या निरनिराळ्या हिंदु राजांकडेस हेर पाठविण्यांत येऊन कळविण्यांत आलें होतें कीं, पांचाळ राजाची कन्या जुन्या स्वयंवराच्या विधीनें ह्मणजे त्या वेळच्या नामांकित योद्ध्यांपैकीं तिला योग्य वाटेल तो वर पसंत करणार आहे. एक मोठें वजनदार धनुष्य सभा मंडपांत ठेविलें होतें त्यास बाण लावून त्याच्या योगानें काठीवर उंच सोन्याचा एक मत्स्य बसविला होता त्याचा उजवा डोळा गरगर फिरणाऱ्या चक्रामधून जो उडवील त्या दैवशाली शूर पुरुपास ती कन्या वरील असा पण करण्यांत आला होता.

ठिकठिकाणाहून राजपुत्र आणि शूर पुरुप पांचाळ देशाची राजधानी जें कांपिल्य शहर तेथें जमा झाले. त्या दिवशीं जो विजयी होईल त्याच्या गळ्यांत घालण्याकरितां हातांत माळ घेऊन आपल्या भावावरोबर राजकन्या जमलेल्या राजमंडळांत येऊन उभी राहिली. पुष्कळ वीरांनीं धनुष्यास बाण लावण्याचा प्रयत्न केला परंतु तो निर्फळ झाला. नंतर एक अपरिचित वीरपुरुप पुढें आला, आणि त्यानें धनुष्यास बाण लावून त्या सुवर्ण मत्स्याचे डोळ्यांत नेमका मारिला. याप्रमाणें या अपरिचित पुरुपास यश मिळतांच पाण्यास प्रतिबंध झाला असता जसा खळखळ आवाज होतो त्याप्रमाणें त्या जमलेल्या योद्ध्यांमध्यें असंतोपरूपी

कुरकुर सुरू झाली. परंतु इतक्यांत त्या अपरिचित योद्ध्यानें आपला छद्मवेष टाकून मोठा अभिमानी व ज्यास देशापार केले होते असा जो अर्जुन तो मी असें जाहीर केलें.

ह्या नंतर विचित्र कल्पनेची गोष्ट येते. ते पांच भाऊ आपल्या आईजवळ जाऊन तीस त्यांनीं सांगितलें कीं आह्मांस एक मोठें पारितोषिक मिळालें आहे. तें पारितोषिक कोणत्या प्रकारचें होतें तें न जाणून त्या आईनें तें तुह्मीं सर्वजण वांटून घ्या ह्मणून उत्तर दिलें. आईची आज्ञा अनुलंघनीय असल्यामुळें पांचही **पांडवांनीं** त्या राजपुत्री बरोबर लग्न लावून ती पांचांची स्त्री केली! ह्याप्रमाणें **पांचाळांशीं पांडवांचा** संबंध झाल्यामुळें राज्यावर **पांडवांचा** जो हक्क होता तो कौरवांस टाळितां येईना; परंतु लढाई टाळली जावी ह्मणून कौरवांनीं राज्याचे विभाग करून एक विभाग त्यास दिला. हे विभाग असम होते. **हस्तिनापुर** आणि **कुरु** देशाचा जो उत्तम भाग होता तो **धृतराष्ट्राच्या** पुत्रांनीं आपण घेतला आणि यमुना नदीच्या कांठीं जंगलयुक्त प्रदेश **पांडवांस** दिला. त्यांनीं जंगल तोडून हलीं ज्या ठिकाणीं दिली शहर आहे तेथें आपली राजधानी **इंद्रप्रस्थ** नगर हें बांधिलें.

ह्या राजधानीपासून पुष्कळ लांबपर्यंत **पांडवांनीं** देश जिंकून घेतले आणि युधिष्ठिरानें राज्याभिषेक समा-

रंभ मोठ्या थाटानें केला. त्या वेळीं आजूं बाजूंच्या देशच्या राजांस व आपल्या **हस्तनापुर**वाले नातेवाईकांस त्यानें आमंत्रण केलें होतें. सभेंत **चैद्य** लोकांचा राजा **शिशुपाळ** आणि **यादवां**चा राजा **कृष्ण** यांचा तंटा होऊन **कृष्णा**नें **शिशुपाळा**स ठार मारिलें. त्या नंतर **कृष्ण** हा **पाडवां**चा पक्का साहाय्यकारी वनला. व हल्लीं भारत ग्रंथ उपलब्ध आहे त्यांत **कृष्ण** हा देव असून त्यानें **पांडवां**चा हक्क त्यांस मिळवून देण्याकरितां मनुष्याचा अवतार घेतला होता असें लिहिलें आहे.

परंतु ह्या नवीन राज्याभिषेक झालेल्या राजाचे नशीबीं तें राज्य फार दिवस भोगावयाचें नव्हतें. **धर्म** इतका धार्मिक असताहीं त्यास द्यूत खेळण्याचा नाद होता; **धृतराष्ट्रा**च्या वडील मुलानें द्यूत खेळण्यास त्यास बोलाविलें. त्या द्यूतांत **युधिष्ठिरा**नें आपलें राज्य, संपत्ति, स्वत: आपण, आपले भाऊ व स्त्री, ह्या सर्वांस पणास लावून हरविलें. त्याचा परिणाम ते सर्व बंधु स्त्रीसहीत आपल्या प्रतिस्पर्ध्यांचे दास बनले! त्या प्रतिस्पर्ध्यांनीं त्यांनीं त्या अभिमानी राज्ञीस केश धरून सभेंत ओढीत आणिली आणि तिचा फार उपमर्द केला. त्या वेळीं रक्तपात होण्याची वेळ आली होती, परंतु वेळेवर वृद्ध **धृतराष्ट्रा**स त्या सभेंत ने[illegible]न्यामुळें ती बंडाळी बंद झाली. सरतेशेवटीं असें ठरलें कीं, **पांडवां**चें राज्य त्यांहीं घालविलें परंतु त्यांस दास बनवूं नये. त्यांनीं बारा वर्षें

अरण्यवास .आणि त्या नंतर एक वर्ष अज्ञातवास करण्याचें कबूल केलें. ह्या अज्ञातवासांत असतां धृतराष्ट्राच्या पुत्रांनीं त्यांस शोधून काढिलें नाहीं तर त्यांचें राज्य त्यांस परत मिळावयाचें होतें.

ह्याप्रमाणें **पांडवांनीं** हा दुसऱ्यानदां देशत्याग केला. त्यांनीं बारा वर्षें अरण्यांत काढून तेरावें वर्षीं ते वेष पालटून **विराट** राजाचे येथें नोकरीस राहिले. त्यांची बायकोही त्याच राजाच्या राणीजवळ दासी होऊन राहिली. थोडे दिवसांनीं एक संकट उभें राहिलें. राणीचा भाऊ त्या दासीवर मोहीत झाला व त्यानें तिचा उपमर्द केला. **भीमा**नें गुप्तरीतीनें मध्यें पडून त्या कामांधाचा वध केला.

गुरें पळवून नेणें ही गोष्ट त्या वेळच्या राजे लोकांत अपरिचित नव्हती. **हस्तिनापूर**च्या राजपुत्रांनीं **विराटा**च्या कित्येक धेनू हरण केल्या. त्यावेळीं **अर्जुन विराटा**चा नोकर होता, त्यास हें सहन झालें नाहीं. तो चिलखत घालून गेला आणि त्यानें त्या गाईंस सोडवून परत आणिलें, परंतु ह्या युद्धांत **अर्जुन** ओळखला गेला. ह्यावेळीं अज्ञातवासाचें वर्ष सर्व पुरें झालें होतें किंवा नाहीं, त्याचा निश्चय कधींच केला गेला नाहीं; आणि त्यामुळें ह्या नंतर जी लढाई झाली ती वाजवी न्यायास अनुसरून होती किंवा कसें हा मुद्दा ह्या ग्रंथांत ग्रंथकारानें अनिर्णीत ठेविला आहे.

पांडवांनीं आपलें खरें रूप प्रगट केलें आणि त्यांनीं आपलें राज्य परत मागितलें. ही मागणी कौरवांनीं नाकबूल केल्यामुळें दोन्ही बाजूंनीं हिंदुस्थानांत कधींही पाहण्यांत आलें नव्हतें असें महायुद्ध करण्याची तयारी केली. त्यावेळची सर्व हिंदुराष्ट्रें हा दोहोंपैकीं कोणत्या तरी एक पक्षास मिळालीं होतीं व त्यांच्यामध्यें दिल्ली-च्या उत्तर दिशेस कुरुक्षेत्राच्या मैदानांत फार मोठें युद्ध झालें. हें युद्ध अठरा दिवस चाललें होतें त्याची संगतवार हकीकत व त्यांतील असंख्य उपकथा, यांचें वर्णन करण्याचे मरीस आह्मीं पडत नाहीं. ह्या लढाईंत कुरु देशांतील सर्व राजपुत्र आणि वीरपुरुष मारले गेले आणि युधिष्ठिरास रक्तांतून चालून जाऊनच कुरु देशाची प्राचीन गादी मिळाली.

ह्याप्रमाणें भारत ग्रंथांतील मुख्य मुख्य गोष्टी आहेत. ह्या गोष्टींवरून त्या काळच्या हिंदु लोकांच्या रीतिभाती कशा होत्या त्याविषयीं बरीच माहिती मिळते. तसेंच तरुण राजपुत्रांस लहानपणापासूनच कशी युद्धकला शिकवीत असत, त्यांस प्रासक्रीडा, सादिक्रीडा, वगैरे युद्धें करण्याची कशी हौस असे, व आपले पुत्र, बंधु व पति ह्यांचे पराक्रम पहाण्यास सभ्य स्त्रिया लोकसमाजांत खुल्या रीतीनें कशा येत असत तें आपणास कळतें. मुलींचीं लग्नें त्या योग्य वयांत आल्यावर करीत असत, तरुण राज-कन्या ज्या सौंदर्याविषयीं प्रसिद्ध असत, त्या बहुत करून

जमलेल्या शूर पुरुषांमधून आपणास पसंत पडेल तो पति करीत. राजे व राष्ट्रें यांच्यामध्यें मत्सर वारंवार उत्पन्न होऊन, त्याचा परिणाम घनघोर युद्धांत होत असे; परंतु कलहाच्या कटुत्वास धर्म नियमांनीं आळा घातला होता.

ह्या ग्रंथापासून आपणास आणखी असें कळतें कीं, गंगथडीचे हिंदु हे त्यांच्या पंजाबांतील वट्टचाकट्टचा पूर्वजांपेक्षां जास्ती सुधारलेले होते. राजांच्या ताब्यांत जास्ती मोठीं राज्यें होतीं. रीतिरिवाज जास्ती सभ्य असत आणि ज्ञानाची मर्यादा जास्ती विस्तृत झाली होती. धर्मविधीही जास्ती परिष्कृत झालेले, सामाजिक नियम जास्ती प्रगल्भदशेस पावलेले आणि युद्धशास्त्र जास्ती पूर्णतेस आलेलें असें होतें. वैदिककाळच्या वीरांचें न ढळणारें धैर्य आणि निश्चय हीं शौर्य-काळांतील जास्ती सुधारलेल्या सभ्य रीतीरिवाजांस न जुमानतां अस्तित्वांत राहिलीं, आणि त्यामुळें गंगानदीच्या किनाऱ्यावर वसाहत करून राहिलेल्या जातींतून, त्यांच्या विशेष जंगली पूर्वजांचे अंगीं जी राष्ट्रीयत्वाची धमक प्रोत्साहन देत होती ती नाहींशी झाली नव्हती.

खंड २ रें.

कोशल, विदेह आणि काशी लोक.

कुरु, पांचाळ आणि दुसऱ्या कमी प्रसिद्ध जातीचे लोक **गंगानदी**च्या वरच्या प्रदेशांत राहिले असतां, आर्यांच्या दुसऱ्या जाती अधिक पूर्वेकडील प्रांतांत शिरून त्याच नदीच्या खालच्या प्रदेशांत त्यांनीं वसाहती केल्या. ह्या वसाहत्त्यांत कोशल लोक हे फार प्रख्यात होते. त्यांचे पूर्वज **पंजाबांत सूदां**च्या लढायांत होते असें झटलें आहे. त्यांनीं आपले पुरोहित **त्रितस्यु** अथवा **वसिष्ठ** यांस बरोबर घेऊन पूर्वेकडेस ते ह्या कालांत चालते झाले आणि त्यांनीं **गंगानदी**च्या किनाऱ्यापासून तों पूर्वेस थेट **गंडकी**-**नदी**पर्यंत एक प्रबल आणि विस्तृत राज्य स्थापन केलें. त्यांनीं आपल्या बरोबर, सर्व आर्यांचा जणूं काय वारसाच असा साधारण धर्म, संस्था, भाषा, विद्या आणि कला हीं आणिलीं. **अयोध्या** हें शहर त्यांची राजधानी होती.

कोशलांच्यापेक्षां किंचित् प्रसिद्ध **विदेह** लोक हे अधिक पूर्वेकडेस **गंडकी** नदी उतरून गेले आणि हल्लीं ज्यास तिरहुत अशी संज्ञा आहे, त्या प्रदेशांत गंगा-

नदीच्या उत्तर दिशेस वस्ती करून राहिले. त्यांच्या अतिशय जुन्या दंतकथा आहेत त्यावरून असें समजतें कीं, त्यांचा पूर्वज **माधव विदेह** हा, **पंजाबांतील सरस्वती**-**नदी**च्या किनाऱ्यावरून निघून पुष्कळ प्रदेश आणि अनेक नद्या ओलांडून आपला पुरोहित जो **गौतम** त्या सहीत, **तिरहुत** देशांत आला. त्यावेळेस त्या वीर पुरुषानें विचारिलें कीं "मी कोठें रहावें?" अग्नीनें उत्तर दिलें कीं, "ह्या **गंडकीनदी**च्या पूर्वेस" त्यावरून तो **विदेह तिरहुत** देशांत राहिला. तो प्रदेश त्यावेळीं दल-दलीचा आणि ओसाड होता, परंतु त्या उद्योगी आणि मेहनती वसाहत्त्यांनीं त्यांतील पाणी काढून टाकिलें, रानें जाळून फस्त केलीं व लागवडीची वृद्धि केली आणि त्यांची राजधानी जी **मिथील** नगरी तिची स्थापना केली.

तिसरें प्रसिद्ध राष्ट्र **काशी** लोकांचें होय. ह्यांनीं पश्चिमेकडून येऊन **गंगा** नदीवर वसाहत केली व आपली राजधानी अद्यापही प्रसिद्ध असलेले आणि सर्व हिंदुस्थानांतील फार पवित्र असें जे **काशी** शहर तें स्थापिलें.

ह्या वसाहत करणाऱ्या राष्ट्रांनीं आपल्या पूर्वजांचा धर्म आणि धर्मविधी ह्यांची उपेक्षा केली नसेल अशी कल्पना सहज करितां येईल. खरोखर, हा जगांतील कोणत्याही भागांत वसाहत करणारे असोत त्यांच्या मनांत स्वदेश

भूमींतील संस्थांविषयीं बहुतेक धर्मश्रद्धे इतकी कळकळ असते, त्याप्रमाणेंच हिंदुधर्म आणि त्यांतलि विधींविषयीं पंजाबांतील पूर्वजांपेक्षां गंगानदीवर वसाहत करणाऱ्या हिंदूंच्या मनांत फार महत्व वागत असे. ह्या विधींमुळेंच बाहेरच्या दुसऱ्या रानटी लोकांपासून त्यांस निराळेपणा आला होता, आणि त्यांच्या योगानेंच मूळ हिंदुस्थानांत शिरून कितीमान विजय मिळविले त्या वेळच्या प्राथमिक काळाशीं त्यांचा संबंध जोडला गेला होता. हिंदु लोक ह्यावेळीं नव्या प्रदेशांत गेले होते व त्यांच्या आजूबाजूंस नवीन रानटी मूळचे लोक होते; तथापि त्यांनीं आपले मूळचे धर्म संस्कार आणि संस्था, ज्या त्यांच्या आर्यपणाच्या व्यंजक होत्या व ज्या आपला एक पवित्र ठेवाच आहे असे ते लोक मानीत असत, त्या मोठ्या निश्चयानें व जशाच्या तशा पुढें पाळिल्या. प्रत्येक नवीक देश कावीज करण्यानें जसजसें पंजाब आणि त्याच्या नवीन वसाहती ह्यामधील अंतर वृद्धिंगत होत गेलें, व मूळचा धर्म आणि सुधारणा हीं जसजशीं कालशतकांनीं दूरदूर होत गेली, तसतसे ते लोक त्या धर्माच्या आणि सुधारणेच्या बाह्य स्वरूपास विशेष लक्ष लावून आदरपूर्वक मानूं लागले, आणि शेवटीं ह्या संस्कारांत आणि विधींमध्यें त्यांच्या धर्माचीं आणि सुधारणेचें खरें रूप लपून जाऊन हे संस्कार आणि विधि त्यांचा नवा धर्म होऊन बसला.

ह्या काळांत त्यांच्या रीतिभातींत जो फेरफार झाला तो समजण्याकरितां प्राचीन हिंदूंच्या इतिहासांतील वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टींचें ज्ञान स्पष्ट असणें जरूर आहे. पंजाबांतील हिंदु ज्या देवतांचें पूजन करीत असत व जे वेदांचे मंत्र ह्मणत असत, त्याच देवांस गंगानदीवरील हिंदु भजत व तेच वेदमंत्र ते ह्मणत, परंतु होमहवनांचें सोपें स्वरूप होतें तें जाऊन, त्याच्या ठिकाणीं ह्या काळीं विशेष संस्कारयुक्त व अवजड असें रूप आलें होतें; प्रत्येक लहानसहान विधीस कांहीं गुप्त अर्थ लावूं लागले, पूजेसंबंधीं प्रत्येक अगत्याच्या कृत्यास पवित्रपणा समजूं लागले आणि अशा रीतीनें वैदिक धर्माचें खरें स्वरूप जाऊन, त्याचें ठिकाणीं कित्येक वर्षें, महिने आणि दिवसच्या दिवसपर्यंत चालणारे आणि अनेक संस्कारयुक्त असे यज्ञयाग आले. पंजाबांतील शूर सरदारांपेक्षां ह्या वेळच्या राजांच्या ताब्यांत जास्ती विस्तृत, संपन्न आणि दाट वस्तीचीं अशीं राज्यें होतीं. आणि त्यामुळें त्यांस विशेष मपकेदार असें स्वरूप यज्ञयागास देण्याची शक्ति आली असून तसें करण्यास मनाचा कलही होत असे. पुरोहितांनीं ह्यावेळीं आपली निराळीच जात अगर वर्ग केला, आणि त्यामुळें जास्ती कठीण व दुरच्या लोकांस अशक्य असें यज्ञाचें स्वरूप करणें, ह्यांत त्यांचे हित होतें. गंगेच्या खालच्या तिरावरील प्रदेशांत राह-

णारे लोक सुखदायक, परंतु निर्बलत्व आणणाऱ्या हवेंत राहूं लागल्यामुळें, त्यांच्या पूर्वजांच्या अंगीं जो दांडगेपणा असे तो कांहींसा त्यांच्यातून कमी होऊन ते लोक विशेष हुकुमबंदे, चैनी, भपकेदार, दिमाख व संस्कारयुक्तविधी दाखविण्याविषयीं आसक्त असे झाले. ह्याप्रमाणें हिंदुधर्माच्या खऱ्या रूपांत हळूंच न समजतां मोठा फेरफार झाला. वैदिककाळांत सृष्टीदेवीच्या महत् व हितकारी प्रादुर्भावांचें आणि शक्तींचें आश्चर्ययुक्त अंतःकरणानें आणि कृतज्ञतापूर्वक लोक पूजन करीत असत, आणि देवाविषयीं आपलें प्रेम व भक्ति अग्नीची प्रार्थना करून व त्यांत अन्न व पेयें होमून व्यक्त करीत. पुढें शौर्य काळांत पूजेचा हा खरा उद्देश क्रमाक्रमानें लोपून जाऊन पुरोहीत व साधारण लोक ह्यांचें सर्व लक्ष यज्ञांतील निव्वळ क्रिया व संस्कार, प्रत्येक लहानसहान विधी योग्य रीतीनें आणि योग्यवेळीं करणें, प्रत्येक शब्दाचा उच्चार ठरलेल्या स्वराप्रमाणें करणें, इत्यादि गोष्टींकडेस जाऊन हे विधीच धर्म होऊन बसले.

ह्या काळच्या लोकांनीं त्यांच्या स्थितीप्रमाणें पाहिजे होतें त्या रीतीनें वेदांच्या सूत्रांचें वर्गीकरण करून पद्धतवार व्यवस्था केली. एकंदर सूत्रांच्या समुदायास ऋग्वेद हें नांव होतें. ह्या किंवा कांहीं सूत्रें चालत आलेल्या प्राचीन वहिवाटीप्रमाणें कित्येक यज्ञयागांत ह्मणत

असत. ह्या निवडक सूत्रांच्या संग्रहास छंदाचें रूप देऊन त्यास **सामवेद** ह्मणूं लागले. दुसरें असें कीं, यज्ञ-यागाचें काम चालविणारे जे पुरोहीत त्यांच्याकरितां याज्ञिकी संबंधाची एक निराळीच विधानमाला पाहिजे होती; ह्या विधानमालेचा जो स्वतंत्र संग्रह त्यास **यजुर्वेद** ही संज्ञा मिळाली. **गंगथडी**चे हिंदु ह्या तीन वेदांसच मानीत असत, परंतु त्या नंतरचा एक ग्रंथ ज्याचें नांव **आथर्वण** आहे, त्यासही चौथा वेद मानूं लागले. ह्याप्रमाणें ह्या शौर्यकाळाच्या प्रथमारंभींच कुरु पांचाळांच्या लढाईच्या पूर्वीं वेदांचा निरनिराळा संग्रह करण्यांत आला होता.

ह्या वेळच्या धर्मसंबंधीं ग्रंथसंग्रहांत फक्त वेदच होते असें नाहीं. दुसरे देश आणि दुसऱ्या काळाप्रमाणें येथेंही मताभिमानी व्याख्या आणि भाष्यें उत्पन्न होऊन थोडे काळांत मूळ ग्रंथांपेक्षां त्यांस जास्ती महत्व प्राप्त झालें. प्रत्येक वेदाचीं अशीं भाष्यें आहेत व त्यास **ब्राह्मणें** असें ह्मणतात. ह्या काळांतील ग्रंथसंग्रहांत ह्यांचाच भरणा फार मोठा आहे. हीं बहुतेक निरस आहेत.

परंतु हितकर प्रतिक्रियेचा काळ नजीकच होता. असें दिसतें कीं, ह्या काळच्या सत्यप्रीय आणि विचारी राजांस ह्या पुरोहितांचें पांडित्य व विद्येचें स्तोम हें न आवडून त्यांनीं, पुरोहितांनीं लावून दिलेले यज्ञाचे विधी न सोडतां, मनुष्याच्या आत्म्याचें नियुक्तस्थान कोणतें

व परमेश्वराचें स्वरूप कशा प्रकारचें आहे, त्याविषयीं श्रेयस्कर विचारतरंग सुरू केले. हे राजे आणि पुरोहीत ह्यांच्यामध्यें इतक्या जुन्या काळीं जी ही स्पर्धा चालू झाली, त्या सारखी विशेष चमत्कारिक गोष्ट हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत घडलेली नाहीं; आणि ह्या स्पर्धे-पासून पुढें जे उपनिषद् नांवानें प्रसिद्ध असणारे तर्क निघाले त्या सारिखा रसरसीत व औत्सुक्यदायक ग्रंथ दुसरा कोणताही नाहीं.

ही धार्मिक विचारपूस सुरू करण्यास विदेहांचे आणि काशी लोकांचे राजे यांनीं पुढाकार घेतला होता. विदेहांचा राजा **जनक** हा त्यावेळीं मोठा साधु पुरुष असून, तत्कालीन धर्मविद्येंत फार निपूण होता. त्याच्या दरबारांत विद्वान् आणि शहाण्या लोकांचा मोठा भरणा असे, त्याचा मुख्य पुरोहित **याज्ञवल्क्य** यानें यजुर्वेदाची नवी आवृत्ती काढली. तिचें नांव शुक्ल यजुर्वेद आहे. त्या-शिवाय त्यानें त्याच वेदावर भली मोठी टीका, जीस ब्रा-ह्मण ह्मणतात ती तयार केली. परंतु याज्ञवल्क्य हा जनकाचे दरबारांत एकटाच प्रतिष्ठित विद्वान् नव्हता. गंगथडींतल्या निरनिराळ्या राज्यांतील सर्व विद्वान् विदे-हांच्या राजाच्या औदार्याचा लाभ घेत असत आणि त्यांची याचना कधींही निष्फळ होत नसे. काशी लोकांचा राजा अजातशत्रु जो स्वत: विद्वानांचा प्रसिद्ध आश्रय-

दाता होता, त्यास देखील निराळेनें म्हणावें लागलें कीं, "खरोखर, सर्व लोक **जनक** आमचा पोशिंदा आहे असें म्हणून ते त्याजकडेस धांव घेत आहेत."

हे श्रेयस्कर तर्क आणि ही धार्मिक विचारपूस सुरू करण्याच्या संबंधांत **जनक** आणि **अजातशत्रु** यांनीं जो भाग घेतला होता, त्यामुळें त्यांचीं नांवें उपनिषदांत आहेत. आम्ही उपनिषदांविषयीं पुढील भागांत लिहिणार आहोंत. परंतु हे साधुकृति राजे तत्कालीन स्वाभिमानी उपाध्यांस धर्माचें खरें धोरण आणि उद्देश काय आहेत ते कशा रीतीनें समजावून सांगत असत, त्याविषयींच्या एक दोन अख्यायिका येथें सांगणें जरूर आहे.

असें सांगतात कीं, विदेहांचा राजा **जनक** यांस एकवेळीं तीन ब्राह्मण भेटले. त्यांतच त्याचा उपाध्या **याज्ञवल्क्य**ही होता. त्यांच्यामध्यें वादविवाद झाला आणि तिन्ही भटांचा अभिमान खंडन होऊन ते दीन झाले. शेवटीं **याज्ञवल्क्य** रथांत बसून राजा गेला त्याचे मागें जाऊन त्यापासून खरें तत्व शिकला.

अशाच रीतीनें एकवेळीं काशी लोकांचा राजा **अजातशत्रु** यास एका फुशारकी मारणाऱ्या बालाकी नांवाच्या ब्राह्मणानें वाग्युद्धास आमंत्रण केलें. त्या वादांत त्या भटाचा पराभव होऊन तो निरुत्तर आणि खिन्न झाला. नंतर **अजातशत्रु** म्हणाला "हे बालाकी,

इतकेंच तुला माहीत आहे काय?" बालाकीनें उत्तर दिलें. " इतकेंच मला माहीत आहे." नंतर त्या राजयो-ग्यानें बालाकीस समजून सांगितलें कीं "जो सर्वांचा कर्ता आहे व ज्याचें हें सर्व कृत्य आहे त्या एकट्या परमेश्वरासच आपण समजून घ्यावें."

ह्याच प्रमाणें **श्वेतकेतु** नामक ब्राह्मणानें **पांचाळां**-च्या सभेस जाऊन **जैवली** ह्मणून राजा अथवा क्षत्रीय होता, त्याच्याशीं वादविवाद केला. त्यांत ब्राह्मणाचा पराजय झाला. तो मोठा कष्टी आणि दुःखी होऊन खरें काय आहे तें शिकण्याकरितां त्या क्षत्रियाजवळ गेला. राजानें खरें तत्व काय आहे तें त्यास समजावून सांगून ह्मटलें कीं " हें ज्ञान आजपर्यंत कोणत्याही ब्राह्मणास दिलेलें नव्हतें ह्मणून तें सर्व जगतांत फक्त क्षत्रियांकडे-सच होतें."

ह्याप्रमाणें आपणास ज्या अख्यायिका मिळाल्या आहेत त्यापैकीं कित्येक आहेत. त्यांवरून तत्कालीं उपाध्ये आणि लष्करी वर्ग ह्यांच्या जाती निराळ्या होऊं लागल्या असतां, ह्या दोन्ही वर्गांत जी स्पर्धा होती ती अस्पष्ट परंतु अचूक रीतीनें समजते; आणि त्या वरूनच, जे तर्क उपनिषदांत रक्षण करून ठेविले आहेत आणि जे हिंदूंच्या एकेश्वरमताचा पाया आजपर्यंत होऊन राहिले आहेत, ते सुरू करण्यांत आणि त्यांची वृद्धि करण्यांत राजवर्गानें जो भाग घेतला होता तो आप-

णास कळतो. **जनक** हा ह्यापैकीं खरा आणि काळजीपूर्वक तर्क करणारा होता आणि त्यामुळें त्याचें नांव आदरास पात्र आहे.

परंतु **जनक, विदेह** लोक आणि **कोशल**ही, ह्यांचें स्मरण हल्लींच्या हिंदुजनसमुहास असण्याचें कारण, त्यांचीं नांवें हिंदूंच्या एका राष्ट्रीय वीरोपाख्यानांत गोंवलीं गेलीं आहेत. **रामायण** हें काव्य **भारता** इतकेंच लोकप्रिय आहे आणि तें लाखो हिंदु वाचतात. त्याच्या योगानें प्राचीन हिंदूंनीं गंगथडीच्या राज्यांत जी सुधारणा केली होती तिचें स्मरण त्यांच्या अर्वाचीन वंशजांच्या हृदयपटावर कोरलें आहे. **रामायणां**त जें कथानक आहे त्यांतील कोणकोणते भाग प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी आहेत हें सांगणें फार कठीण आहे, परंतु त्या ग्रंथांत त्यावेळच्या रीतिरिवाजांचें प्रतिविंब असल्यामुळें तें कथानक संक्षेपरूपानें तरी इतिहासग्रंथांत सांगितलें पाहिजे.

कोशल लोकांचा राजा **दशरथ** ह्याच्या राणीवशांत तीन राण्या श्रेष्ठ होत्या. त्यांपैकीं **कौसल्ये**ला **राम** हा मुलगा झाला, **कैकयी** हिला **भरत** जन्मला आणि **सुमित्रे**ला **लक्ष्मण** आणि **शत्रुघ्न** हे दोन मुलगे झाले. त्यावेळच्या रिवाजाप्रमाणें हे राजपुत्र युद्धकलेंत व तत्कालीन दुसऱ्या शास्त्रांत मोठे निपूण झाले होते आणि त्यांपैकीं वडील मुलगा जो **राम**

तो युद्धकलेंत जितका श्रेष्ठ होता तितकाच तो धार्मिक आणि सत्यप्रिय होता. **दशरथास** वार्धक्य आलें होतें, ह्मणून त्यानें **रामास** युवराज करून राज्याचा अधिकार देण्याचें मनांत आणिलें, परंतु लावण्यरूप स्त्री **कैकयी** हिनें आपल्या मुलास युवराजाचा अधिकार मिळावा असा आग्रह धरिला. शेवटीं त्या वृद्ध आणि दुर्बल राजानें **कैकयी**च्या निर्धारी संकल्पास मान्य केलें.

ह्यापूर्वी विदेहांचा राजा **जनक** ह्याची कन्या मोळ्या समेंत **रामानें** जिंकिली होती. एक जड धनुष्य होतें तें जो सज्य करील त्याच्याशीं ती मुलगी लग्न लावील अशी अट होती. हें महत्कृत्य करण्यास पुष्कळ राजे व योद्धे एक ठिकाणीं जमले होते, परंतु त्यांपैकीं कोणाच्यानेंही तें काम झालें नाहीं. येकट्या **रामानें** तें धनुष्य उचलिलें आणि तो तें वांकवीत असतां, त्यानें त्याचीं दोन शकलें केलीं. **राम** व त्याची नवीन वधु ह्यांस राज्याभिषेक होणार ह्या आनंदांत **अयोध्या** नगरी निमग्न झाली असतां, इकडे **कैकयी**च्या महालांत **भरतास** युवराजा करावा आणि **रामानें** चौदा वर्षेंपर्यंत देशत्याग करावा असें ठरलें.

पितृआज्ञा पाळणाऱ्या **रामानें** आपल्या पित्याच्या इच्छेप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. त्याचा विश्वासु सावत्रबंधु **लक्ष्मण** त्याजबरोबर गेला आणि कोमल **सीता** आपल्या पतीपासून दूर राहीना. **अयोध्येचे**

जन आश्रु ढाळीत व आक्रोश करीत असतां **राम, सीता** आणि **लक्ष्मण** तें नगर सोडून गेले.

आपल्या प्रीय आणि शूर पुत्रानें देशत्याग केल्यानंतर वृद्ध राजा **दशरथ** फार वेळ वांचला नाहीं. त्याच्या तरुणपणची एक हृदयद्रावक गोष्ट सांगतात. तो एके दिवशीं शिकारीस गेला असतां, चुकून त्यानें आपल्या बाणानें एका मुलास मारिलें आणि त्यामुळें त्या मुलाच्या वृद्ध आणि भग्नहृदय बापाचा मृत्यु त्याच्या हातून घडला. त्या बापानें दिलेल्या शापाचा परिणाम ह्यावेळीं **दशरथा**वर अति भयंकर रीतीनें घडला, आणि कोशलाचा राजा देशत्याग केलेल्या मुलाच्या दुःखानें मेला.

भरत रामाजवळ वनांत गेला आणि **रामा**नें **अयोध्ये**स परत येऊन राजा व्हावें अशी विनंती त्यानें केली. परंतु सत्यप्रीय **रामा**स वाटलें कीं, आपण बापास जें वचन दिलें आहे तें बापाच्या मृत्यूनें कमी होत नाहीं ह्मणून त्यानें **भरतास अयोध्ये**स परत जाऊन राज्य करावें अशी आज्ञा देऊन तो अरण्यांत पुढें चालता झाला.

तेरा वर्षेंपर्यंत तो देशापार केलेला राजपुत्र आपली पत्नी आणि दृढभक्त बंधु यासहीत दंडकारण्यांत आणि **गोदावरी**च्या उगमाजवळच्या प्रदेशांत भटकत फिरला. त्यावेळीं सर्व दक्षिण **हिंदुस्थानां**त मूळच्या अनार्य लोकांची वस्ति होती. कवीनें त्यांस माकडें आणि

आश्वलांचीं रूपें दिलीं आहेत आणि लंकेच्या अनार्यांस राक्षस असें ह्मटलें आहे.

लंकेचा दैत्यराजा **रावण** ह्यानें अरण्यांत रहाणाऱ्या **सीते**च्या सौंदर्याविषयीं वार्ता ऐकिली आणि **राम** घरीं नसतां त्याच्या पर्णकुटीकेंतून तिचें हरण करून तीस त्यानें लंकेस नेलें. पुष्कळ तपास केल्यानंतर **रामा**नें तिचा थांग लाविला; व दक्षिण **हिंदुस्थान**च्या रानटी जातींबरोबर त्यानें स्नेह संबंध जोडून समुद्र ओलांडून लंकेस जाण्याची व आपली बायको जिंकून आणण्याची तयारी केली.

हिंदुस्थान आणि **लंके**मधील सामुद्रधुनींत बहुतेक अकृत्रीम बांधाचा रस्ता आहे. हा रस्ता रामाच्या सैन्यानें महाद्वीपांतील पहाड आणि मोठमोठे दगड खडक आणून केला आहे अशी कल्पना कवीनें केली आहे.

हें सैन्य समुद्र उल्लंघून गेलें आणि त्यानें लंका शहरास वेढा दिला. वेढा फोडण्यास व शत्रूच्या सैन्याची दाणादाण करण्यास एका पाठीमागून एक सरदार रावणानें पाठविले, परंतु ते सर्व लढाईंत पडले. सरते शेवटीं **रावण** स्वतः चालून आला परंतु त्यास **रामा**नें मारिलें. **सीता** परत आणिली आणि पेटविलेल्या चितेंत तीनें उडी टाकून केसासही धक्का न लागतां अक्षत त्यांतून

परत निघून आपल्या पातिव्रत्यास बिलकूल धक्का लागला नाहीं असें सिद्ध केलें.

ह्यावेळीं देशत्यागाचें चौदावें वर्ष पुरें झालें असल्यामुळें **राम** आणि **सीता** यांनीं **अयोध्येस** परत येऊन तीं राज्यारूढ झालीं. परंतु **रावणा**च्या घरून **सीता** अकलंक कशी येऊं शकेल असें लोकांच्या मनांत येऊन तिच्या शुद्धतेविषयीं लोकांस संशय आला आणि जनापवादास मान देऊन **रामानें** गरीब बिचाऱ्या **सीतेस** ती गर्भयुक्त असतां वनांत पाठविली!

वाल्मिकी, जो ह्या काव्याचा प्रसिद्ध कर्त्ता होय, त्यानें तीस आपल्या आश्रमांत आणिली आणि तेथें तिचे **लव** आणि **कुश** हे पुत्रद्वय जन्मले. कित्येक वर्षें निघून गेलीं; तीं मुलें मर्द आणि रणधीर निघालीं व युद्धकलेंत निपूण झालीं, आणि **वाल्मिकी**नें रामायण काव्य रचून तें त्या मुलांस गावयास शिकविलें.

रामानें आपलें सार्वभौमत्व दाखविण्याकरितां **अश्वमेध** यज्ञ करण्याचा निश्चय केला. एक घोडा मोकळा सोडिला आणि त्यास जो कोणी धरील त्याबरोबर **अयोध्ये**च्या महाराजाचें शत्रुत्व होईल असें होतें. तो घोडा **वाल्मिकी**च्या आश्रमाजवळ गेला तेव्हां त्या धीट आणि खिलाडू मुलांनीं तो धरिला आणि आपले घरीं बांधून ठेविला. **रामा**च्या अश्वरक्षकांनीं त्या चिमुकल्या रणवीरांपासून त्या घोड्यास सोड-

विण्याचा प्रयत्न केला परंतु तो व्यर्थ गेला. सरतेशेवटीं **राम** स्वतः तेथें आला. त्यानें तीं राजपुत्रा-सारखीं मुलें पाहिलीं परंतु तीं कोण आहेत हें त्यास कळलें नव्हतें. त्यानें त्या मुलांच्या तोंडून स्वतःच्या पराक्रमाचें वर्णन ऐकिलें आणि तो दुःख आणि अनुतापानें व्याकूळ झाला असतां, त्या आपल्या मुलांस त्यानें ओळखिलें आणि आलिंगन दिलें.

परंतु **सीते**च्या नशिबीं पुढेंही सुख नव्हतें. लोकांचा संशय दूर होईना. शेवटीं जिनें विचाऱ्या सीतेस जन्म दिला होता त्या पृथ्वीनें द्विधा होऊन फार दिवस कष्टानें गांजिलेल्या आपल्या पुत्रीस आपल्या पोटांत परत घेतलें. **ऋग्वेदांत सीता** ह्या शब्दाचा अर्थ शेतांतील नांगराचा तास हा होय आणि त्यावरून शेतकीच्या देवतेचें तें नांव पडलें. वाचकांच्या ध्यानांत येईल कीं, ही जी मूळची कल्पना ती रामायणांत कायम राहिली म्हणून **सीता** पृथ्वीपासून जन्मून तिच्या पोटांत परत गेली असें वर्णन आहे. परंतु हे शब्दलाघव हल्लींचे हिंदु विसरले आहेत आणि त्यांस **सीता** ही कोणी खरोखर अतिशय दुःखी, भक्तिमान आणि साधुवृत्ती एक स्त्री होती असें वाटतें. अद्यापपर्यंत हिंदु लोक आपल्या मुलीचें नांव **सीता** ठेवण्यास मागेंपुढें करितात कारण तिची सौम्य वृत्ति, तिचे सद्गुण, तिची आनंदी निष्ठा आणि तिचे पतिविषयीं अढळ प्रेम हीं जशीं अमानुषीय

होतीं, त्याचप्रमाणें तिचीं संकटें आणि दुःखें हीं साधारण रीतीनें बायकोच्या वाट्यास येणाऱ्यापेक्षां जास्ती होतीं. ह्या सर्व हिंदुस्थानांत एकही स्त्री अशी नाहीं कीं, जीस दुःखांनीं पीडलेल्या सीतेची गोष्ट माहीत नाहीं. तिचे गुण सर्व स्त्रियांस एक कित्ता अथवा नमुनाच होऊन बसले आहेत. त्याचप्रमाणें राम हा त्याचा प्रामाणिकपणा, आज्ञानुसरण आणि भक्ति ह्या गुणां-विषयीं पुरुषवर्गास अनुकरणीय झाला आहे. महाभारत हें वीररस प्रधानकाव्य आहे; रामायण उपदेशात्मक ग्रंथ आहे. दोन्हीं मिळून हिंदुस्थानांतील लाखों लो-कांस नीति शिक्षणाचें मोठें साधन झालें आहे, आणि त्याचा परिणाम ख्रिश्चीयन राष्ट्रांत बायबलाच्या ग्रंथाचा जो परिणाम झाला आहे त्यापेक्षां कमी नाहीं.

खंड ३ रें.

रीतिरिवाज आणि सुधारणा.

आह्मीं मागील दोन खंडांत **गंगानदी**च्या प्रदेशांतील **हिंदु** राष्ट्रांच्या स्थितीचें वर्णन केलें आहे. त्यांत **पंजाबां**तल्या त्यांच्या पूर्वजांच्या अशिक्षित व कमी निश्चीत झालेल्या रहाणीशीं त्यांचीं भरभराट पावणारीं आणि संपन्न राज्यें, त्यांचीं विद्यामंदीरें, त्यांचे संस्कारयुक्त धर्मविधी व आचार आणि त्यांची जास्तीं स्थीर आणि सुधारलेलीं रहाणी ह्यांचें वैलक्षण्य दाखविलें आहे. ह्या वेळीं मूळच्या लोकांशीं लढाया बंद झाल्या होत्या; कोणत्याही परकी राष्ट्रानें हिंदुस्थानावर स्वारी केली नव्हती अथवा हिंदूंच्या रीतिरिवाजावर आपला पगडा बसविला नव्हता; सारांश हिंदूंच्या सुधारणेची एकसारखी वाढ होण्यास कोणत्याही विदेशी कारणाची आडकाठी आली नव्हती. यमुना नदीच्या तिरापासून गंडकी नदीपर्यंतचा जो हिंदु जातींचा मोठा गट तो स्वतंत्र रीतीनें निखालस होता. बाहेरील जगाची त्यास दरकार नव्हती. उत्तरेकडेस ह्यांच्या आणि दुसऱ्या लोकांमध्यें उंच हिमालय पर्वत पडला होता; दक्षिणच्या प्रांतापासून अगम्य रानें

आणि विंध्याद्रि पर्वत यांनीं त्यास निराळें केलें होतें; पूर्वेस **बंगाल प्रांत** दलदलींनीं व्याप्त व रानटी असून त्याचा शोध अद्याप लागला नव्हता; आणि पश्चिमेस **पंजाबांतील** त्यांच्या धट्टया कट्टया नातलगांनीं परकीय शत्रूंस बाहेरच टेविलें होतें. ह्या हद्दीच्या आंत शौर्ययुगांत हिंदुलोक बाहेरील जगापासून प्राचीन अथवा आर्वाचीन काळांत अप्रतिम अशा पूर्ण अलग रीतीनें राहिले. **कुरु** आणि **पांचाळ**, **कोशल** आणि **विदेह** आणि गंगानदीवरील दुसऱ्या जाती ह्या जसें काय त्यांचें निराळेंच जग आहे अशा रीतीनें वागत असत. जगतांत आपलाच सुधारलेला धर्म आहे असें त्यांस वाटत असे, व आपल्या भाषेशिवाय दुसरी सुधारलेली भाषा असेल असें त्यांच्या मनांतही येत नसे. ते हिंदु हीच मानवजात आणि हिंदूंचे रीतिरिवाज हेच सुधारलेले सामाजिक कायदे समजत असत. ह्यावरून सहज कल्पना करितां येईल कीं, अशा निखालस आणि पूर्ण अलगपणामुळें हिंदूंचे रीतिरिवाज, कायदे आणि सामाजिक निबंध यांस, प्राचीन अथवा आर्वाचिन जगतांतील कोणत्याही राष्ट्रांत आढळून न येणारा असा ताठपणा आणि स्थैर्य हीं प्राप्त झालीं.

वैदिककाळांत हिंदु लोक मूळच्या लोकांशीं लढाया करण्यांत नेहमीं गुंतलेले असत; आणि मूळच्या रहिवाशांस पादाक्रांत केल्यावरही विजयी आणि पराजीत यांचे मधील

भिन्नपणा पुष्कळ वेळपर्यंत कायम होता. हलके मानलेल्या दस्यूंचा पराभव होऊन त्यांनीं विजयी लोकांच्या सुधारलेल्या रहाणीचें अनुकरण केलें, व त्यांत ते सुखानें राहूं लागले; तो पण आर्य हिंदु त्यांच्याशीं सामाजिक व्यवहारांत मिसळत नसत; आणि ह्या कारणानें जमीन लागवड करणें अथवा दुसरे स्वस्थतेचे एकाच प्रकारचे धंदे करणाऱ्या खेड्यापाड्यांत व शहरांत एकमेकांच्या शेजारी रहाणाऱ्या मनुष्यांमध्येंही सामाजिकरीत्या उंच नीचपणा प्रथम उत्पन्न झाला.

ह्या आर्य आणि दस्यूमधील भिन्नत्वामुळें पुढें शौर्यकाळांत साहाजिक रीतीनें आर्यांमध्येंच निरनिराळे भेद होण्याची कल्पना उत्पन्न होऊन ती अमलांत आली. ह्या शौर्यकाळांत धर्मकृत्यें जास्ती संस्कारयुक्त झालीं, व मोठमोठे यज्ञयाग अनंत विधींसहीत करण्यांत गंगथडीच्या मोठमोठ्या राजे लोकांस भूषण वाटूं लागलें. त्यामुळें पुरोहीत वर्गास, जो फक्त अशा प्रकारचीं कार्यें करूं शके त्यास, जनलोक विशेष मान देऊं लागले, आणि शेवटीं त्यांचा वर्ग लोकसमुहाहून स्वतंत्र आहे ह्मणजे त्यांची जात निराळी आहे असें लोक मानूं लागले. हे पुरोहीत लोक असले विधी शिकण्यांत आपलें सर्व आयुष्य घालवीत, आणि तेच लोक हे विधी सविस्तर करूं शकत, त्यामुळें ते धर्मकृत्यें करण्यास योग्य आहेत अशी लोकांच्या मनाची समजूत झाली.

ह्याप्रमाणें कल्पित पवित्रता व संस्कारयुक्त विधी करण्याचें खरें ज्ञान ह्या गोष्टींच्या योगानें सामान्य लोकांपासून पुरोहित वर्ग वंशापरंपरेनें वेगळा पडला. तेव्हां आपल्या पवित्र दर्ज्या बाहेरच्या हलक्या लोकांस मुली देऊन संबंध जोडणें वाजवी नाहीं असें तो वर्ग मानूं लागला; परंतु अद्याप ह्या वर्गांतील लोक दुसऱ्या जातीच्या मुलीं करीत असत. फक्त त्यांच्या कुमारिका आपल्या वर्गाबाहेर संबंध करीत नसत. ही चाल दिवसेंदिवस दृढतर होऊन तिचा अम्मल इतका सख्त झाला कीं, शेवटीं हा वर्ग निराळा पडून हिंदुस्थानची ब्राम्हण ही जात उत्पन्न झाली.

अशाच कारणांनीं राजे लोकांची निराळी जात झाली. वैदिककाळांत सूदांसारखे मोठे राजे देखील फक्त प्रसिद्ध योद्धे आणि सेनानायक असत, त्यांच्यापाशीं दुसऱ्या लोकांप्रमाणें शेत, जमीन आणि गुरांढोरांचे कळप असत; आणि साधारण लोकांपैकींच ते असत. परंतु शौर्यकाळांत जास्त विस्तीर्ण राज्यें राजे लोकांच्या ताब्यांत आलीं आणि त्यांचे दरबार विशेष भव्य आणि डामडौलाचे झाले; ह्यावेळीं जनसमूह बहुतेक नम्र आणि स्वस्थताप्रिय असा असून ते लोक राजे लोकांस फार मान देऊं लागले. ह्याप्रमाणें राजे लोक जसजसे ऐश्वर्यवान झाले व राज–वैभवास चटावले, जसजसा लोकसमाज जास्ती हुकूमबंदा, निर्बल आणि राजभक्त

बनला, तसतसे राजाचे पुत्र अथवा लष्करी वर्गाचे मुलगे हलक्या जातींतून मुली आणीत असत तो पण त्या राजवर्गांच्या मुलींनीं हलक्या वर्गाच्या मुलांशीं लग्नें लावणें अशिष्ट आहे असें ते समजूं लागले. अशा रीतीनें शौर्यकाळांत लढवय्ये लोकांचा निराळा वर्ग होऊन हिंदुस्थानची **क्षत्रिय** ही जात उत्पन्न झाली.

आर्यांतील बाकीचे साधारण लोक अद्याप आपलें जुनें नांव **विश** अथवा **वैश्य** हें चालवीत असत. त्यामुळें त्यांची हिंदूंची वैश्य ही निराळी जात झाली. मूळचे अंकित केलेल्या लोकांनीं आपल्या राज्यकर्त्यांची सुधारलेली रहाणी आणि भाषा ही जरी घेतली होती तथापि त्या लोकांस दूर ठेवण्यांत येत असे. ह्यांची सर्वांत कनिष्ट जात **शूद्र** ही झाली.

दुसऱ्या राष्ट्रांत अशाच प्रकारचे भेद वेळोवेळीं शिरले आहेत, परंतु हिंदुस्थानांतील जातीच्या संस्थेसारीखे अढळ काठिण्य दुसरें कोठेंही दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. उदाहरणार्थ, मध्ययुगांत युरोप खंडात, प्राचीन काळच्या ब्राह्मण, क्षत्रीय आणि वैश्य ह्यासारखेच पुरोहित, सरदार आणि साधारण जनसमूह असे तीन वर्ग होते; परंतु त्यावेळचे पुरोहित ब्रह्मचारी रहात आणि लोक समूहांतील अतीशय हुशार आणि चतुर लोक पुरोहित होत. सरदार लोक देखील लोकसमाजांतील अति शूर योद्धयांस, तो कोणत्याही दर्ज्याचा असला

तथापि, आपल्या पंक्तींत बसविण्यास खुष असत, जन-समूहही दांडगा असून आपल्या स्वातंत्र्याकरितां आणि सनदी हक्कांकरितां रणभूमीवर आणि मंत्रीसभेंत भांडे, त्यामुळें त्यांची शक्ति, वजन आणि संपत्ति हळुहळू वाढत जाऊन, शेवटीं मध्ययुगांतील वर्गभेद समूळ नाहींसा झाला. अर्वाचीन सुधारणेच्या योगानें युरोपांत निरनिराळे वर्ग एकवटले आहेत इतकेंच नाहीं परंतु भिन्न जाती आणि उपजाती एक होऊन त्यांचीं राष्ट्रें बनलीं आहेत. परंतु ह्या सुधारणेचा उगम हिंदुस्थानांत अलीकडे गेल्या शंभर वर्षांतच झाला असल्यामुळें तिचा परिणाम युरोपा इतका येथें झालेला नाहीं, आणि प्राचीन जातीभेद, त्यांत बरेंच रूपांतर व वृद्धि होऊन, अद्यापपर्यंत अर्वाचीन हिंदुस्थानांत विद्यमान आहे, व त्याबद्दल सर्व परकीय लोकांस आश्चर्य व गूढ वाटतें.

शौर्यकाळांत ह्याप्रमाणें हिंदूंच्या तीन जाती होऊन निराळे विभाग झाले होते, तथापि आर्यांचा जो साधारण हक्क, धर्मसंबंधीं विद्या शिकणें आणि धर्मविधी पाळणें, तो त्या सर्वांस सारखाच लागू होता. आम्ही वर सांगितलें आहे कीं, हिंदूंचीं मुलें लहान असतांच वेदांचें व दुसरीं जीं शास्त्रें त्यावेळीं गम्य होतीं त्यांचें अध्ययन करण्याकरितां गुरूंच्या अथवा शिक्षकांच्या घरीं वर्षेंचेंवर्षें रहात असत. कुशाग्र बुद्धीचीं मुलें तेथून परिषदेंत अथवा दुसऱ्या विद्यालयांत जात, आणि

वारंवार असें घडून येत असें कीं, कुरु अथवा पांचाळांचीं मुलें विदेह अथवा काशी लोकांच्या प्रसिद्ध विद्यालयांत, त्यावेळीं जितकीं शिकण्यासारखीं असेल ती विद्या जास्त शिकण्याकरितां जात असत. खरोखर, गंगथडींतील विद्यासंपन्न जातींमध्यें ह्या संबंधांत एक प्रकारची स्नेहयुक्त चढाओढ सुरू होती; आणि त्यांच्यांत आपआपसांत लढाया सुरू असतांनासुद्धां, विद्यालयें, धर्माश्रम आणि प्रसिद्ध साधु व शिक्षक यांस, ते कोणत्याही पक्षाचे असले तथापि, कोणीही हात लावीत नसत. वैदिककाळचे पुरातन ऋषी वासिष्ट, विश्वामित्र आणि गौतम यांच्या वंशजांनीं आपल्या घराण्यांची धर्म व दुसऱ्या विद्येविषयीं जी कीर्ति होती ती कायम ठेविली. ह्या घराण्यांतील मोठमोठ्या विद्याविभूषीत ऋषींस सर्व राजदरबारांत निमंत्रण करीत व सर्व विद्वान् राजे त्यांस बक्षिसें देत. विद्येचा आदर विदेहाचा राजा जनक यास फार असे. त्याच्या दरबारच्या एका मोठ्या सभेच्या हकिकतीचें वर्णन बृहदारण्यक उपनिषदांत दिलेलें आहे. त्यावरून तत्कालीन रीतिरिवाज चांगले कळतात.

" विदेहाचा राजा जनक यानें यज्ञ केला, त्यावेळीं ब्राह्मणास दान देण्याकरितां अनेक जिनसा तयार केल्या होत्या. तेथें कुरु आणि पांचाळ देशचे ब्राह्मण आले होते. त्यांपैकीं अति विद्वान् ब्राह्मण कोण आहे

तें समजण्याची जनकाची इच्छा होती, ह्मणून त्यानें प्रत्येक गाईच्या शिंगास सोन्याचीं दहा पदें बांधून दहा हजार गाई उभ्या केल्या; आणि तो ब्राह्मणांस ह्मणाला कीं, हे पूज्यमान ब्राह्मणांनो, तुमच्यांत जो कोणी उत्तम विद्वान् असेल त्यानें ह्या गाई घ्याव्यात. हें ऐकून ते ब्राह्मण तटस्थ झाले; परंतु याज्ञवल्क्य आपल्या शिष्यास बोलला कीं, हे प्रीय शिष्या, ह्यांस हाकलून ने. 'शामनासारख्या तेजस्वी गुरो, बरें आहे' असें त्या शिष्यानें उत्तर देऊन त्या गाई हांकून नेल्या."

ही याज्ञवल्क्याची अभिमानी वर्तणूक पाहून तेथें जमलेल्या ब्राह्मणांस राग आला आणि त्यांनीं दुर्बोध प्रश्नांचा त्यावर मारा केला. परंतु याज्ञवल्क्य त्या सर्वांस पुरा पडला. त्या मोठ्या सभेंत एक स्त्री विदुषि होती. ती स्त्रीजातीची तथापि तत्कालीन शास्त्रांत कमी निष्णात नव्हती. ही स्त्री त्या सभेंत आली होती, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे; कारण त्यावरून त्यावेळीं प्राचीन हिंदूंचे रीतिरिवाज कसे होते तें समजतें. ती त्या सभेंत खुल्या रीतीनें उठून बोलली:—

"हे याज्ञवल्क्य! काशी अथवा विदेह लोकांतील वीर पुरुषांचा मुलगा जसा असज्ज धनुष्यास प्रत्यंजा लावितो, व शत्रूस छेदणारे दुटोकी बाण आपल्या हातांत घेऊन युद्धांस उठतो, त्याप्रमाणें तुझ्याशीं वाग्-युद्ध करण्याकरितां उभी राहिलें आहे, तरी मी विचारितें त्या प्रश्नांचीं उत्तरें दे."

तिच्या प्रश्नांचीं उत्तरें याज्ञवल्क्यानें दिलीं तेव्हां ती विदुषी मुकाट्यानें खालीं बसली, आणि त्याचें श्रेष्ठ विद्वत्व त्या सभेनें कबूल केलें.

अशा प्रकारच्या वाक्यांपासून प्राचीन हिंदूंचे रीतिरिवाज आणि लोकसमाजांत स्त्रियांची स्थिति कशी होती त्याचा बराच उल्लेख होतो. स्त्री जातीच्या हालचालीवर ह्या शौर्यकालापर्यंत असमाधानकारक दाब ठेवण्यांत आला नव्हता, त्या विद्याव्यासंगांत भाग घेत असत, **यज्ञयाग व धर्मविधी** यांत त्यांचा हात असे, त्या मोठमोव्या सभेंत जात, आणि लोक समूहांत त्यांचें योग्य वजन असे. इतिहासाचें अध्ययन करणारे निःपक्षपाती लोक कबूल करतील कीं, प्राचीन **ग्रीक** आणि **रोमन** लोकांतील स्त्रियांस जो मान देण्यांत येत असे, त्यापेक्षां जुन्या हिंदूमध्यें स्त्रियांची स्थिती जास्ती सन्माननीय होती.

तरुण पुरुषांस त्यांचा विद्याभ्यास पुरा झाल्यावर लग्न करण्याची व गृहस्थाश्रम चालविण्याची मोकळीक असे. पति व पत्नि हीं दोघें मिळून होमाचा अग्नी घरीं प्रदीप्त करीत व दररोज त्यांत हवन करीत. हा अग्नी सर्व धार्मिक हिंदु आपल्या घरांत नेहमीं ठेवित असत. दररोजच्या हवनाशिवाय शेंकडो धर्मविधि, वर्षांतील निरनिराळ्या ऋतूंत अथवा कुटुंबांत कित्येक गोष्टी घडून आल्या असतां, करण्यास सांगितलेले

आहेत, त्यांपैकीं कित्येकांचें वर्णन पुढील खंडांत देण्यांत येईल. येथें इतकेंच सांगणें पुरें आहे कीं, राजे आणि धनवान् लोक मोठमोठे संस्कारयुक्त यज्ञ करण्यांत आनंद मानीत, आणि सर्व धर्मशील हिंदु, मग ते श्रीमंत असोत अगर निर्धन असोत, आपआपले लहान होम आपल्या घरच्या अग्नींत करीत असत. ह्यावेळीं मूर्तींची पूजा करण्यांत येत नसे व देऊळ हें माहीत नव्हतें. वैदिककाळच्या हिंदूंचें वंशाज ह्यावेळपर्यंत आपआपल्या घरींच सर्व धर्मसंस्कार करीत, ह्मणजे हवन करणें व स्तोत्रें ह्मणणें हीं सर्व कृत्यें सर्व जुन्या नियमांप्रमाणें तें स्वतः घरीं करीत.

परकीयांस पाहुणोपचार करणें हें एक धर्मबंधनच सांगितलें असून हिंदूंच्या कर्तव्याचें सार खालीं दर्शविल्या वाक्यांसारख्या सूक्तांत लिहून त्याचा बोध करण्यांत आला आहे.

" खरें बोल. तुझें कर्तव्य कर. वेदाचें अध्ययन करण्यांत हयगय करूं नकोस. तुझ्या गुरूस योग्य गुरुदक्षणा दिल्यानंतर लग्न कर आणि पुत्रोत्पत्ति कर. सत्यापासून ढळूं नकोस. कर्तव्य टाळूं नकोस. जें उपयोगीं असेल त्याची हयगय करूं नकोस. मोठेपणाविषयीं निःकाळजी राहूं नकोस. वेदांत जें कांहीं सांगितलें आहे तें करण्यास टाळाटाळ करूं नकोस.

देव व पितृयज्ञ करणें असतील ते टाळूं नकोस;

आई ही देवताच आहे असें समज. पिताही त्याचप्रमाणें तुझा देव आहे असें मान. शुद्ध कृत्यांवर नजर दे, दुसरीकडेस पाहूं नकोस. आम्ही जीं सत्कृत्यें केलीं आहेत तींच तूं ध्यानांत ठेव."

तैतिरीय उपनिषद्.

सोनें, रुपें, रत्नें, गाड्या, घोडीं, गाई, खेंचरें, दासदासी, घरें, सुपीक जमिनी आणि गुरांचें कळप, हीं सधन लोकांची संपत्ति असे. सोनें, रुपें, जस्त, शिसें आणि लोखंड ह्या धातूंचा उपयोग कसा करावा तें चांगलें माहीत होतें. हत्तीस माणसाळवीत असत. सुरेख भूषणांनीं शृंगारलेले हत्ती व दासी यांचे किंमतवान नजराणे देण्यांत आल्याविषयीं आपल्यास पुष्कळ ठिकाणीं वर्णनें सांपडतात. तांदूळ, गहु, जव, आणि इतर प्रकारचीं धान्यें हें लोकांचें भक्ष्य असें. दुधाचे निरनिराळ्या प्रकारचे पदार्थ तयार करून लोक आवडीनें खात. गोमांस हा खाण्याचा पदार्थ असे आणि यज्ञयागांत कांहीं मद्य पण पीत असत.

आम्ही वर सांगितलेंच आहे कीं, ह्या प्राचीनकाळीं हिंदु स्त्रियांचें योग्य वजन लोक समाजांत होतें. हल्लीं हिंदुस्थानांत प्रचारांत असलेले बाललग्न त्यावेळीं मुळींच माहीत नव्हतें. वर वर्णिलेल्या भारताच्या आणि रामायणाच्या कथांवरून स्त्रियांचीं लग्नें त्या वयांत आल्यावर करीत असत असें स्पष्ट होतें. विधवा स्त्रियां-

चा पुनर्विवाह जो हल्लीं बंद आहे तो प्राचीनकाळीं करीत असत. विवाहीत स्थितींत शिरण्याच्या पूर्वीं विधवा स्त्रीनें काय काय विधी केले पाहिजेत ते स्पष्टपणें वर्णिलेले आहेत. गोत्रजांत तीन अथवा चार पिढ्यांपर्यंत लग्नें करण्याची मनाई असे.

वेदाध्ययन हें अति महत् कर्तव्य आहे असें मानीत आणि तो आपला मोठा इष्ट वारसाच आहे असें सर्व हिंदु समजत असत. मानवजातीस शिकण्यासारखें ह्मणून जितकें ज्ञान ईश्वरानें दिलें आहे तें सर्व वेदांत भरलें आहे अशी समजूत असे. परंतु जसजशीं निरनिराळीं शास्त्रें उदयास येऊं लागलीं तसतशीं तीं वेदांची पुरवणी व वेदांत सांगितलेले विधी करण्याची उपांगेंच आहेच असें लोक मानूं मानले. ही चमत्कारिक गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. खरोखर, धर्मविधी पाळणें आणि धर्माचारानें रहाणें ह्यांपासूनच हिंदुस्थानांत ज्ञानाची वृद्धि आणि शास्त्राची उत्पत्ति झाली असें ह्मटलें असतां ती अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदुंग्रथांचें अध्ययन करणाऱ्या एका विचारी ग्रंथका. रानें वाजवी ह्मटलें आहे कीं, "यज्ञ करण्याची अगदीं नेमकी वेळ ठरविण्याच्या नियमाचा अभाव हाच ज्योतीषशास्त्र संबंधीं वेधास वेग देण्यास कारण झाला. ह्या अभावापासून अडचण पडूं लागल्यामुळेंच पुरोहित लोक नक्षत्र मंडळांतून चंद्राची गती रात्रीच्यारात्रीं लक्ष लावून

पहात व त्याचप्रमाणें सूर्याच्या दक्षिणोत्तर आक्रमणावर दररोज नजर ठेवीत. यज्ञाच्या मंत्रांतील एखादें अक्षर उच्चारण्यांत चूक झाली तर देवतांचा क्षोभ होतो, अशी समजूत झाल्यामुळें, ध्वनीशास्त्राच्या नियमांचा शोध लावण्यांत आला. व्याकरण आणि शब्दव्युत्पत्ति ह्यांचा मुख्य उद्देश धर्मग्रंथांचा खरा अर्थ समजावा हाच होता. तत्वज्ञान आणि वेदांत यांचा संबंध इतका जवळचा आहे कीं त्यांतील एक कोठें पुरें होतें आणि दुसरें कोठें सुरूं होतें तें सांगणें अशक्य आहे, हें सर्वांस माहीत आहेच आणि ह्मणून त्याविषयीं विशेष लिहिण्याची जरूर नाहीं."

हींच शास्त्रें गंगथडीच्या राज्यांतील विद्यालयांत शिकवीत असत. हिंदूंच्या इतिहासांत ही गोष्ट महत्वाची आहे कीं, हीं सर्व शास्त्रें त्यांच्या धर्मविधींच्या आचरणापासून उत्पन्न झालीं आहेत. ज्या ग्रंथकाराचा अभिप्राय आह्मीं वर दिला आहे, त्यानें असा सिद्धांत नक्की केला आहे आणि तो हिंदुस्थानचे सर्व इतिहासकार कबूल करतात कीं, "ज्या ज्या शास्त्राचा हिंदूंच्या प्राचीन धर्माशीं फार संबंध आहे तें तें हिंदु लोकांतच उत्पन्न झालें आहे असें समजलें पाहिजे."

खगोलविद्येच्या मूलतत्वांचें ज्ञान हिंदु लोकांनीं वैदिककाळांत मिळविलें होतें; परंतु शौर्ययुगांत त्याची बरीच वृद्धि झाली. वर्षाचे बारा भाग करून त्याचे बारा

चांद्रमास गणण्यांत आले आणि ह्या चांद्रमानाचा सूर्य-काळाशीं मेळ घालण्याकरितां प्रत्येक पांचव्या वर्षीं तेरावा माहिना त्यास जोडला. दर महिन्यास ज्या तारा मंडळां-तून चंद्र जातो तीं अट्ठावीस नक्षत्रें पाहून, त्यांस नांवें दिलीं, व विषुववृत्ताच्या दक्षिणोत्तर बाजूस सूर्य किती जातो तें लक्षांत आणून दक्षिणायन व उत्तरायणाचे काल नक्की करण्यांत आले. वेदांच्या एकिकरणांचें काम पुरें झालें तेव्हां सूर्य विषुववृतांत कोणते ठिकाणीं होता तें लिहिलें आहे, आणि त्यावरून कित्येक गणितशास्त्रज्ञ लोकांनीं असें अनुमान काढिलें आहे कीं, ही गोष्ट ख्रिस्ती शकापूर्वी ११८१ वें वर्षीं घडली.

दुसऱ्या शास्त्रांचा अभ्यास **शौर्ययुगांत** करण्यांत आला. **व्याकरण, शब्दव्यूत्पत्तिशास्त्र, ध्वनिशास्त्र** आणि **छंदशास्त्र** ह्यांचा अभ्यास फार काळजीपूर्वक करण्यांत येत असे; कारण जसें आकाशांतील ग्रहांच्या स्थितीवरून यज्ञ करण्याची सुवेळ कोणती तें नक्की कर-ण्यांत सोय पडे, तसें ह्या शास्त्रांच्या मुळें मंत्रोच्चार बिनचूक होत असे. **नीतिशास्त्र** आणि **तर्कविद्या** यांकडेसही लक्ष देण्यांत आलें होतें. **गणित** हें तर हिंदु लोकांनीं शोधून काढिलेलें शास्त्र आहे व शौर्ययुगा इतक्या प्राचीनकाळीं तें प्रौढ दशेस आलें होतें, आणि पुढील भागांत दाखविल्याप्रमाणें निरनिराळ्या आकाराच्या स्थंडिलाविषयीं सूक्ष्म नियमापासून भूमितीच्या मूल-तत्वांचा शोध लागला.

न्याय करण्याची पद्धत अद्यापि अडाणी रीतीची होती आणि दुसऱ्या प्राचीन राष्ट्रांप्रमाणें येथेंही अग्नि-पावन होण्याची चाल प्रचारांत होती. सत्य शोधून काढणें हाच कायद्याचा परिणाम आणि उद्देश होता; त्यामुळें कायदा हें सत्यरूप आहे असें वर्णन आहे. "जर कोणी मनुष्य सत्य काय आहे हें सांगत असला तर तो कायदाच सांगत आहे असें ते ह्मणत आणि कायदा काय आहे हें तो सांगत असला तर तो सत्य काय आहे तें सांगत आहे असें ह्मणत. सारांश दोन्ही एकच आहेत."

बृहदारण्यक उपनिषद्.

खंड ४ थें.

धर्म.

शौर्ययुगांत हिंदूंच्या धर्मामध्यें जो उत्तरोत्तर फेरफार होत गेला तो वर दाखविलाच आहे. संपत्तीची व सुधारणेची वृद्धि आणि लोकांची विशेषें करून निश्चीत व सुखकर रहाणी, ह्यांपासून मोठमोठे आणि मपकेदार यज्ञ करण्याची हौस उत्पन्न झाली. ह्या यज्ञांतील संस्कारांस व कृत्यांस वंशपरंपरा पुरोहितांचा धंदा करणाऱ्या जातीनें सहाजीकच मोठें महत्व दिलें. ह्या संस्कारयुक्त यज्ञांतील खऱ्या भक्तीचा विषय ज्या देवता, त्यांच्यावर भक्तांचें लक्ष बरेंच अंशीं न रहातां व तें स्थंडील तयार करणें, अग्नि प्रज्वलीत करण्याची ज्योतीषशास्त्ररीत्या बरोबर वेळ ठरविणें, मंत्रांचा बिनचूक उच्चार करणें आणि ह्या शिवाय यागास लागणारीं अनेक जरूरी कृत्यें ह्यासारख्या सूक्ष्म गोष्टींकडेस लागलें.

राष्ट्राचे ग्रंथ हे त्या राष्ट्राच्या मताचें प्रतिबिंब आहे; आणि जेव्हां विधी आणि संस्कार हेच एखाद्या राष्ट्रीय धर्माचें स्वरूप होऊन जातात तेव्हां त्या राष्ट्राचे धर्मग्रंथ कांहीं अंशीं पोकळ आणि निःसत्व

असतात. वैदिकयुगांतील मंत्रांत जो उत्साह आणि आस्थेवाईकपणा आपल्या पाहण्यांत येतो तो शौर्य युगांतील ब्राह्मणांत दिसत नाहीं. परंतु त्यांच्या बदल्यांत प्रत्येक सूक्ष्म बारीक क्रियेचीं विलक्षण कारणें, मूळ वाक्यांचे हटवादी उपन्यास, प्रत्येक क्रियेचें आणि नियमांचें अनुलंघन झालें असतां त्याबद्दल प्रायश्चित्त आणि भक्तांचें प्रत्येक कृत्य आणि हालचाल याविषयीं लांबलचक अनुज्ञा हीं पाहण्यांत येतात. ह्या ग्रंथांत लोकसमाजाची श्रद्धा आणि परतंत्रता व पुरोहितांची अबाधित शक्ति हीं नजरेस पडतात व त्यावरून युरोपांतील मध्यकाळाची आठवण होते.

हा विषय आतां खुशीनें सोडून ब्राह्मणांत ज्या कित्येक मनोरंजक दंतकथा आहेत, त्याकडेस आतां वळतों. ह्यांपैकीं एक अख्यायिका युरोपांत फार प्रसिद्ध आहे आणि ती जुन्या बायबलांतील जलप्रलयाच्या वर्णनाशीं मिळती येते. ती अशी कीं, पुराणांतला मनुष्यजातीचा मूळ पुरुष **मनु** हा आपले हात धूत असतां एक मासा येऊन त्यास ह्मणाला, "माझें तूं पोषण कर ह्मणजे मी तुझें संरक्षण करीन." **मनुनें** त्याचें पालनपोषण केलें तेव्हां त्यानें मनूस सांगितलें कीं, "अमुक वर्षीं जलप्रलय होणार आहे, तेव्हां तूं एक तारूं तयार करून माझेजवळ ये" त्याप्रमाणें जलप्रलय झाला. तेव्हां योग्यवेळीं तयार केलेल्या तारवांत **मनु** ब-

सला आणि त्या मत्स्यानें तेथें पोहत येऊन तें गलबत उत्तर पर्वताच्या पलिकडेस नेलें. तेथें झाडाला तें गलबत बांधून ठेविलें होतें आणि पूर हटला तेव्हां त्यांतून मनु खालीं उतरला. "जलपुरानें ह्याप्रमाणें सर्व प्राणी यमसदनास नेलें परंतु मनु एकटा वांचला."

शतपथ ब्राह्मण.

ऋग्वेदांत कवींनीं जे दृष्टांत योजिले आहेत, त्यांचें रूपांतर होऊन त्यांच्या पौराणिक गोष्टी कशा झाल्या तें कित्येक ब्राह्मणांत आपल्या नजरेस पडतें. सूर्य पहाटेचा पाठलाग करितो ह्मणून रूपक आहे. त्याची पौराणिक गोष्ट अशी झाली कीं, प्रजापतीनें आपले कन्येस फुसलावून जग उत्पन्न केलें आणि त्यांत वस्ति करविली. हिंदुभाष्यकारांस हा फेरफार कसा झाला आहे तें माहीत होतें; आणि त्या संबंधानें विद्वान् कुमारिल जो ख्रिस्ती शकाच्या पांचवें शकांत होऊन गेला त्यानें असें स्पष्टीकरण केलें आहे कीं:—

"प्रजापति, ह्मणजे उत्पन्न करणाऱ्या सृष्टीचा नायक, हें नांव सूर्याचें आहे. त्यास असें नांव देण्याचें कारण असें आहे कीं, तो सर्व प्राण्यांचें संरक्षण करितो. त्याची कन्या उषा ही प्रातःकाळ होय. प्रजापति ह्या कन्येवर मोहीत झाला असें ह्मटलें आहे, त्याचा अर्थ असा कीं सूर्योदय झाल्यानंतर सूर्य अरुणोदयाच्या पाठीमागें धांवत आहे."

निरनिराळ्या ब्राह्मणांत सृष्टयुत्पत्तीविषयीं अनेक कथा दिल्या आहेत. तैतिरिय ब्राह्मणांत लिहिलें आहे कीं, जगाच्या प्रारंभीं फक्त पाणी अस्तित्वांत होतें. त्यांत एक कमळ उत्पन्न झालें. प्रजापतीनें वराहाचें रूप घेऊन पाण्यांत बुडी मारून माती वर आणिली आणि त्यांत गारगोटे घालून ती घट्ट केली; ही पृथ्वी झाली.

शतपथ ब्राम्हणांत सांगितलें आहे कीं, देव आणि असूर हे प्रजापतीचीं आपत्यें होत आणि ते दोघे पृथ्वीच्या स्वामित्वाकरितां भांडू लागले, तेव्हां ती कमळाच्या पानासारखीं थरथर कांपलीं. त्याच ब्राह्मणांत दुसरे ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, खरोखर, प्रथमारंभीं प्रजापति एकटाच अस्तित्वांत होता. त्यानें सजीव प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी व सर्प हे उत्पन्न केले; परंतु ते सर्व भक्ष न मिळाल्यामुळें नाश पावूं लागलें. तेव्हां त्यानें स्तनांत दुध उत्पन्न केलें आणि त्यामुळें सर्व सजीव प्राणी जिवंत राहिले.

हीं उदाहरणें पुरीं आहेत. आपणांस माहीत झालें आहे कीं, वैदिककाळांतील हिंदु सृष्टीची पूजा करतां करतां एक पायरी चढून सृष्टीच्या देवाची पूजा करूं लागले, आणि प्रथमारंभीं परमेश्वराशिवाय दुसरें कांहींही अस्तित्वांत नव्हतें व हें सर्व जग त्याचें कृत्य होय अशी उदात्त कल्पना त्यांनीं मनांत आणिली. शौर्ययुगांतील ज्यास्ती काल्पनिक हिंदूंनीं ह्याच कल्पनेची

पुनरावृत्ति केली आणि ईश्वरानें ही सृष्टि कोणत्या रीतीनें उत्पन्न केली, ह्याविषयीं त्यांचे जे तर्क ते सृष्ट्युत्पत्तीच्या रहस्यांविषयीं मानवी प्राण्यानें जीं अनुमानें केलीं आहेत त्यांपैकीं आदि होत. परंतु ह्या शार्यैकाळांत अज्ञात ईश्वरास जाणण्याविषयीं ह्यापेक्षां उदार आणि कळकळीचे प्रयत्न करण्यांत आले. हिंदूंचे हे मनोविचार **उपनिषद्**नामक ग्रंथांत साठवून ठेविले आहेत. ह्या **उपनिषदां**विषयीं पूर्वी उल्लेख झाला आहे आणि तीं जगांतील ग्रंथसमुहांत फारच महत्वाचे ग्रंथ आहेत.

विश्वव्यापी आत्मा अथवा सर्वांतरगत प्राण याविषयीं कल्पना ही उपनिषदांतील तत्वज्ञानाचें सार अथवा विचाराची गुरुकिल्ली होय. ही कल्पना दुसऱ्या राष्ट्रांत एकेश्वरमताचे जे विचार प्रचलीत आहेत त्यापासून भिन्न आहे. दुसऱ्या लोकांच्या एकेश्वरमतांत ईश्वर ह्मणजे जगत्कर्ता, हा उत्पन्न केलेल्या प्राण्याहून भिन्न आहे असें मानितात, परंतु उपनिषदांतील एकेश्वरमत, जें हिंदूंमध्यें आजपर्यंत चालूं आहे तें, ईश्वर ह्मणजे सर्व व्यापी प्राण होय—सर्व वस्तु त्याजपासून झाल्या आहेत, त्याच्या स्वरूपाचे भाग आहेत, आणि त्या सर्व त्याच्यांत पुनः मिळून जाणाऱ्या आहेत—असें मानितें.

हें तत्व सृष्टीरूपीं पुस्तकावरून गरीब व पितृहीन मुलगा **सत्यकाम** हा शिकला. तो बिचारा एका निर्धन दासीचा पोरका मुलगा होता व त्याचा बाप कोण

हें त्यास माहीत नव्हतें. तो त्या वेळच्या रिवाजाप्रमाणें विद्या शिकण्याकरितां गुरुकडेस गेला; तेव्हां गुरूनें त्याचें गोत्र कोणतें ह्मणून त्यास विचारिलें. त्या सत्यवादी मुलानें सांगितलें कीं, " महाराज, माझें कुळ कोणतें तें मला माहीत नाहीं. मीं आपल्या आईस ह्याविषयीं विचारिलें होतें परंतु तिनें उत्तर दिलें कीं, 'माझें पूर्व वयांत मी दासी असतां मला फार फिरावें लागत असें तेव्हां तुझा गर्भ राहिला, परंतु तूं कोणते कुळाचा आहेस तें मला माहीत नाहीं." हें त्या सत्यवादी मुलाचें उत्तर ऐकून गुरूस हर्ष झाला आणि त्यानें त्यास आपल्या घरीं ठेविलें.

त्यावेळच्या चालीप्रमाणें त्या मुलानें आपल्या गुरूची सेवा केली, तो गुरूची ढोरें चारावयास जात असे; आणि कांहीं काळानें सृष्टीपासून व मनुष्ये तर प्राण्यापासून जें ज्ञान मुमुक्षूंस मिळतें तें त्या मुलास प्राप्त झालें. जीं ढोरें तो चारीत असे त्याजपासून, जो अग्नि तो पेटवीत असे त्यापासून, आणि संध्याकाळीं ढोरें कोंडवाड्यांत घालून त्यानें सांजच्या शेगोटीवर लांकडे घातलीं असतां त्याचे सभोंवती उडणारे हंसक आणि पाणबुडे पक्षी यांजपासून तें महातत्व तो शिकला. त्याचा गुरु चकित झाला आणि त्यानें त्यास प्रश्न केला कीं " हे मित्रा, ज्यास ईश्वराचें ज्ञान झालें आहे त्या सारखा तूं तेजस्वी दिसत आहेस, तर तें

ज्ञान तुला कोणी दिलें ? " त्या लहान विद्यार्थ्यानें उत्तर केलें कीं, " मानवी प्राण्यानें नव्हें." महातत्वज्ञान तो शिकला तें हें कीं, दिगंतर आणि पृथ्वी, आकाश, वरील स्वर्ग आणि महासागर, सूर्य, चंद्र, विद्युत् आणि अग्नि, सजीव प्राण्यांचीं इंद्रियें आणि मनें, सारांश सर्व जग हीं सर्व ईश्वररूप आहेत.

छांदोग्य उपनिषद्.

हेंच तत्व **याज्ञवल्क्य** ऋषीनें आपली प्रीयपत्नी **मैत्रेयी** हीस, तिनें पतीनें दिलेलीं संपत्ति आव्हेरून आपण ज्यापासून अमर होऊं अशी वस्तु दे असें मागणें केलें असतां, समजावून सांगितलें. आपल्या अर्धांगीची प्रगल्भ इच्छा पाहून त्या ऋषीस फार आनंद झाला आणि त्यानें तीस समजावून सांगितलें कीं, सर्वव्यापी आत्मा, पतीमध्यें, पत्नीमध्यें, पुत्रांत, ब्राह्मणांत, क्षत्रियांत आणि सर्व सजीव प्राण्यांत, व स्वर्गांत रहाणाऱ्या देवांत आणि खालीं मृत्युलोकीं रहाणाऱ्या जीवजंतूत, सारांश सर्व विश्वांत आहे.

बृहदारण्यक्य उपनिषद्.

हें तत्व, सोप्या, उत्कंठींत आणि गंभीर भाषेंत व मनांत बिंबेल अशा रीतीनें उपनिषदांच्या अनेक वाक्यांत सांगितलें आहे. तशी भाषा अर्वाचीन हिंदूंनीं कधीं ही लिहिली नाहीं.

' तो ज्ञानी आहे, ज्याचें शरीर छायारूप आहे, ज्याची

आकृति तेजस्वी आहे, ज्याचे विचार खरे आहेत, ज्याचें रूप प्रवहाप्रमाणें सर्वव्यापी आणि अदृश्य आहे, ज्यापासून सर्व कार्यें, सर्व इच्छा, सर्व सुगंध आणि भिन्न रुची हीं उत्पन्न झालीं आहेत; तो, जो ह्या सर्वांत आहे, जो कधींही बोलत नाहीं व ज्यास कधींही आश्चर्य वाटत नाहीं.

" तो माझ्या अंत:करणाच्या अंतरंगांतील आत्मा आहे, तो तांदळाच्या दाण्याहून लहान आहे, जवापेक्षां कमी आहे, व राईच्या दाण्यापेक्षां अथवा चिमणीच्या भात्याच्या (नाम विशेष गवत) बिया मधील गीरापेक्षां सूक्ष्म आहे. तोच माझ्या अंतरगांतील आत्मा, पृथ्वीपेक्षां मोठा, आकाशापेक्षां विस्तीर्ण, वरील स्वर्गापेक्षां उंच, आणि सर्व गोलांपेक्षां मोठा आहे.

"तो, ज्यापासून शेकडों कार्यें, सर्व इच्छा, सर्व सुगंध आणि सर्व रुची उत्पन्न होतात, जो ह्या सर्वांत आहे, जो कधींही बोलत नाहीं, जा विस्मय पावत नाहीं, तो माझा अंतरगत आत्मा ईश्वर आहे. मी हा लोक सोडून जाईन तेव्हां मी त्यांत मिळून जाईन. "

छांदोग्य उपनिषद्.

हेंच तत्व शेकडों उपमा देऊन समजावून सांगितलें आहे. विश्वात्मा हा मधमाशांनीं निरनिराळ्या वृक्षांवरून आणलेले मधबिंदु मिसळून ज्यांत एक रूप होऊन जातात त्या मधासारखा आहे. तो समुद्रासारखा आहे, ज्यांत निरनिराळ्या प्रदेशांतून नद्या वाहत

येऊन एकरूप होऊन जातात; तो मिठाच्या पाण्या-सारखा आहे, ज्यांत मिठाचे कण निराळे दिसूं शकत नाहींत.

शिष्य प्रश्न करितो—" मन हें कोणाच्या आज्ञेनें विचार करूं लागतें ? कोणाच्या आज्ञेनें श्वासोच्छ्वास प्रथम सुरू होतो ? कोणाच्या आज्ञेनें आपण हें भाषण करितों ? कोणता देव आपणास पाहण्याची अथवा ऐकण्याची शक्ति देतो ?"

गुरु उत्तर देतो—"तो कानाचा कान, मनाचें मन, भाषणाचें भाषण, श्वासोच्छ्वासाचा श्वास, नेत्राचा नेत्र.... आहे. जो शब्दानें सांगतां येत नाहीं, परंतु ज्याच्या योगानें आपण शब्द बोलतों....जो मनानें विचार करीत नाहीं, परंतु ज्याच्यामुळें मनाविषयीं विचार येतो,.... जो नेत्रानें पाहत नाहीं, परंतु ज्याच्या योगानें आपण पाहूं शकतों....जो कानानें ऐकत नाहीं, परंतु ज्याच्यामुळें आपण ऐकूं शकतों....जो श्वासोच्छ्वासानें श्वास करीत नाहीं, परंतु ज्याच्यामुळें श्वासोच्छ्वास सुरू होतो, तोच खरा परमेश्वर आहे; इहलोकीं जो लोक पूजतात तो नव्हे."

केनोपनिषद्.

ह्या वाक्यावरून हें सहज लक्षांत येईल कीं, पुरातन काळीं अर्थरहित क्रिया आणि " इहलोकीं लोक पूजितात " तें मनःकल्पीत देव यांच्या पाशापासून आपली

सुटका करून घेण्याचा व विचारसृष्टींतील उंच प्रदेशांत उड्डाण करण्याचा, अज्ञेयास, श्वासोच्छ्वासाच्या श्वासास, आणि मनाचे मनास, समजण्याचा प्रयत्न ऋषींनीं आणि विचारी जनांनीं केला होता. तीन हजार वर्षांवर अज्ञात ईश्वरज्ञान मिळविण्याचा हा जो प्रयत्न हिंदु-लोकांनीं केला तो खरोखर दिलदार आणि मनःपूर्वक होता. ह्या साहसी परंतु धार्मिक विचार करणाऱ्या लोकांनीं ज्या परमेश्वराचें ज्ञान मिळविण्याविषयीं प्रयत्न केला, त्याचें वर्णन त्यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे:-

" तो आत्मा तेजानें संपूर्ण वेष्टिलेला, अदेही, निर्दोष, स्नायु विरहीत, निर्मल, पापास्पर्श, दूरदर्शी, ज्ञानी, सर्वव्यापी आणि स्वयंभू असा आहे. तो अनादिकाळपर्यंत वस्तूंची योग्य योजना करितो. "

इशोपनिषद्.

ह्याप्रमाणें अज्ञात देवाचे गुण आणि धर्म समजण्याची प्रथम खटपट हिंदूंनीं केली होती. मानवी प्राण्यांनीं आपल्यास उत्पन्न करणाऱ्या परमेश्वरास समजून घेण्याचे जे प्रयत्न केले त्यांपैकीं हे फार प्राचीन होत आणि त्यांचा उल्लेख हिंदूंचे अक्षय कीर्तिग्रंथ जीं उपनिषदें त्यांत आहे.

दुसरी एक नवीन आणि अजब कल्पना ह्या ग्रंथांत आढळते. दुसरी राष्ट्रें मृताचें पुनरुत्थान होणार

आहे असें मानितात; परंतु हिंदुलोक मागील व पुढील जन्म मनुष्यास आहे असें समजतात, आणि ही पुनर्जन्माची कल्पना उपनिषदांतच प्रथमतः प्रतिपादिली व उपदेशिली आहे.

ही कल्पना अशी आहे कीं, एकच आत्मा सर्व दोषमुक्त होऊन परमेश्वराशीं मिळून जाण्यापूर्वीं आपल्या कर्मा-प्रमाणें निरनिराळीं शरीरें धारण करितो. "त्याच्या कृति-प्रमाणें आणि त्याच्या ज्ञानाप्रमाणें पुनर्जन्म किटकांमध्यें अथवा मस्त्यांमध्यें अथवा पक्षांमध्यें अथवा सिंहांमध्यें अथवा वराहांमध्यें अथवा सर्पांमध्यें अथवा व्याघ्रांमध्यें अथवा मानवांमध्यें अथवा दुसऱ्या कोणत्या तरी ठिकाणीं, कोणत्या तरी एखाद्या योनींत होतो." आणि निरनिराळ्या योनींत जन्मून तो आत्मा पूनीत होत होत ईश्वर रूपास पावतो.

कौशितकी उपनिषद्.

हें पुनर्जन्माचें मत जें हिंदुस्थानांत प्रथम प्रतिपादिलें गेलें आणि जें दुसऱ्या लोकांस हिंदूंपासून मिळालें तें पुष्कळ सुरेख उपमा देऊन समाजावून सांगितलें आहे. एका शरीरांतून दुसऱ्या शरीरांत आत्मा जातो त्यास एका पानावरून दुसऱ्या पानावर सुरवंट जातो त्याची अगर सोनार एकाच सुवर्णाचे निरानिराळे नवे व सुंदर दागिने करितो त्या रूपांतराची उपमा देण्यांत आली आहे. आणि असें करतां करतां आत्मा सर्व दोषांपासून

मुक्त होऊन पूनीत होतो तेव्हां तो आपलें शरीर सोडून ईश्वर रूपांत मिळून जातो. "जशी सर्पानें आपली मेंग टाकिली असतां ती क्रिमिशैलांवर निःसत्व पडलेली असते तसें हें शरीर येथें राहतें परंतु त्यांतून निघून गेलेला अमर आत्मा ईश्वर होय, तें तेज आहे.

बृहदारण्यक उपनिषद्.

उपनिषदें रचणाऱ्या ऋषींचीं मनें जगाची उत्पत्ति कशी झाली त्या विषयीं घोटाळ्यांत पडलीं होतीं. छांदोग्यांत म्हटलें आहे कीं, स्वयंभु सत्व आंड्याच्या आकारांत बाहेर पडलें आणि त्या आंड्याचीं दोन शकलें स्वर्ग आणि पृथ्वी हीं झालीं. ह्याच ग्रंथांत दुसरे ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, स्वतः सिद्ध तत्वानें प्रथम अग्नि उत्पन्न केला आणि अग्नीपासून पाणी झालें आणि पाण्यापासून पृथ्वी झाली.

ऐतरेय अरण्यकांत कोणच्या तत्वापासून हें विश्व प्रथमतः उत्पन्न झालें त्याविषयीं विवेचन केलें आहे, आणि ऋग्वेद व ज्यू लोकांच्या मताप्रमाणें ह्यांतही पाण्यापासूनच पृथ्वी झाली असें लिहिलें आहे,

बृहदारण्यक उपनिषदांत सांगितलें आहे कीं स्वतः सिद्ध तत्वच पुरुष आणि स्त्री बनलें आणि त्यांच्यापासून सर्व जगाची उत्पत्ति होऊं लागली.

ह्या पुरातन ऋषींस जगाच्या उत्पत्तीच्या रहस्यापेक्षां मृत्यूचें रहस्य कमी अजब वाटलें नव्हतें आणि

नचिकेतस ऋषीनें मृत्यूस आपलें मर्म प्रसिद्ध करण्यास सांगितलें त्याविषयीं एक मनोहर गोष्ट आहे. मृत्यु आपलें रहस्य बाहेर पाडण्यास नाखूष होता ह्मणून तो ह्मणाला:—

"तूं शंभर वर्षें वांचतील असे पुत्र आणि पौत्र, गुरांचे कळप, हत्ति, घोडे, सुवर्ण हे पाहिजे तें माग. पाहिजे तेवढी भूमि माग व तुला वाटेल तितक्या वर्षेंपर्यंत वांच. ह्याच्या इतक्या महत्वाची दुसरी एखादी देणगी तुला वाटत असेल तर ती माग, संपत्ति आणि दीर्घायुष्य घे. **नचिकेतस**, सर्व पृथ्वीचा सार्वभौम राजा हो. मी तुझी जी जी इच्छा असेल ती ती पुरी करितों."

"ह्या मर्त्य लोकांत दुर्लभ अशा तुझ्या इच्छा असल्या तरी त्या व दुसरे कोणतें जें कांहीं तुला पाहिजे तें तूं माग. मनुष्यांस न मिळणाऱ्या सुंदर स्त्रिया, रथ आणि गानवाद्यें, हीं सर्व तुला मी देतों तीं घे परंतु मृत्युविषयीं मला विचारूं नकोस."

परंतु **नचिकेतस** ह्मणला—"हे मृत्यो, ह्या सर्व वस्तु एक दिवसच राहणाऱ्या आहेत, कारण इंद्रियांचें बल त्या नाहींसें करतात. हें सर्व आयुष्यही क्षणभंगूर आहे. तुझे घोडे तुझ्या पाशींच असूं दे, हा नाच आणि गायन तूं आपल्यालाच ठेव."

त्या धार्मिक शोधकानें फारच आग्रह केल्यामुळें

मृत्यूनें आपलें रहस्य त्यास प्रसिद्ध केलें आणि तेंच हिंदूंच्या एकेश्वर मताचें मुख्य बीज आहे.

" जो प्राज्ञ आपल्या आत्म्याचें चिंतन करून तो आत्मा....ईश्वर आहे असें ओळखितो, तो मनुष्य खरोखर सुख दुःख ह्या दोहींपासून अगदीं मुक्त होतो."

" जो मनुष्य हें ऐकून तें समजतो, जो हें तत्व दुसऱ्या गुणांपासून निराळें काढितो व जो त्या सत्वास मिळतो, तो मनुष्य आनंदी असतो कारण आनंद मानण्यास त्यास कारण होतें. हे **नचिकेतस** परमेश्वराचें स्थान खुलें आहे असें मला वाटतें."

कठोपनिषद्.

परमेश्वर आणि आत्मा, विश्वउत्पत्ति आणि मृत्यु ह्यांचीं खरीं रुपें समजण्याविषयीं ह्या प्रकारचे प्रयत्न शौर्ययुगांतील हिंदूंचे चालले होते. आणि जरी ह्या पुरातन कल्पनांत मनःकल्पित असें बरेंच आहे, आणि जरी त्या चमत्कारिक् उपमा आणि आख्यायिका यांनीं आच्छादित आहेत, तथापि सत्याविषयीं कळवळा दाखविणारे जे हे विचार त्यांत नवेपणा, आस्था आणि उत्साह हीं आपल्या लक्षांत आल्याशिवाय रहात नाहींत. **शोपेनहोर** ह्या जर्मन तत्ववेत्त्यानें उपनिषदांविषयीं आपलें कौतुहल चमत्कारिक् शब्दांनीं व्यक्त केलें आहे. तो ह्मणतो "प्रत्येक वाक्यांपासून गहन, अस्सल आणि प्रौढ विचार उद्भवतात आणि प्रगल्भ, पवित्र

आणि उत्कंठ वृत्तीनें अंत:करण भरून जातें. हिंदुस्थानांतील हवेंत आपण आहोंत कीं काय असें वाटूं लागतें आणि तदनुसार अस्सल विचारांनीं मन भरून जातें.....आजन्म मला तें आनंदाचें स्थान झालें आहे आणि मरणसमयीं तें मला समाधान देईल."

तिसरें युग—ज्ञानकाळ.

हिंदुस्थानांत हिंदु लोकांचा प्रसार.

ख्रि. श. पूर्वी १००० पासून ३२० पर्यंत.

खंड १ लें.

हिंदूंचा प्रसार.

वैदिककाळांत हिंदू आर्यांनीं पंजाबांतील मूळच्या लोकांस जिंकिलें आणि आपल्या वसाहती सिंधुनद व त्यास मिळणाऱ्या नद्यांच्या तिरावर वसविल्या. शौर्य-काळांत गंगथडी प्रदेशांत बहार देशापर्यंत त्यांनीं प्रबल राष्ट्रें स्थापिलीं. तिसरें युग ह्मणजे ज्याविषयीं आह्मीं आतां लिहिणार आहोंत आणि ज्यास त्या वेळच्या ग्रंथाच्या वळणावरून तत्व अथवा ज्ञानकाळ असें ह्मणतां येईल, त्यांत हिंदु लोक सर्व देशभर; हिमालयपर्वतापासून समुद्रापर्यंत पसरले; आणि मरत-खंडांत हिंदु सुधारणा, विद्या आणि धर्म हीं चालू झालीं.

शौर्यकाळांत विदेह लोकांनीं तिरहुत प्रदेशांत अथवा उत्तर बहार प्रांतांत आपलें राज्य स्थापिलें होतें आणि त्यावेळीं तें हिंदूंच्या वसाहतीचें शेवटचें ठिकाण होतें;

परंतु थोड्याच काळांत **मगध** अथवा दक्षिण बहार प्रांतांत वसाहती झाल्या, त्या प्रांतांतील रणशूर लोकांस बाहेरील विद्या मिळतांच ते मोठ्या झपाट्यानें प्रबल होत गेले आणि कांहीं कालानें **मगध** देश हा हिंदुस्थान देशांत सर्वांत प्रबल राज्य होऊन बसला. भारती युद्ध झालें तेव्हां म्हणजे ख्रि. श. पूर्वी १३०० वें शतकांत **मगध** देशांत **जरासंध** नामक एक अशिक्षित आणि दांडगा राजा राज्य करीत होता. **जरासंधानंतर मगध** देशावर राज्य करणाऱ्या २८ राज्यांची नामावळी हिंदुग्रंथांत उपलब्ध आहे, परंतु ती खात्रीलायक नाहीं. त्या राजांविषयीं त्यांच्या नांवाशिवाय दुसरा कांहीं इतिहास समजत नाहीं.

ख्रि. श. पूर्वी ६०० चें सुमारास **शिशुनाग** नामक राजानें आपल्या नांवाच्या घराण्याचें राज्य स्थापन केलें आणि त्यानें **मगध** देशास सर्व हिंदुस्थानांत सार्वभौमत्वास पोचविलें. **शिशुनागा**पासून चौथा राजा **बिंबिसार** हा चतुर आणि परोपकारी होता. त्यानें ख्रि. श. पूर्वी ५३७ पासून ४८५ पर्यंत पन्नासपेक्षां जास्ती वर्षें राज्य केलें. ह्याची कारकीर्द हिंदुस्थानच्या आणि जगाच्याही इतिहासांत नेहमीं स्मरणीय राहील, कारण त्याच्यावेळीं हल्लीं सर्व मानवीप्राण्यांपैकीं एक तृतियांश लोक जो उदात्त धर्म पाळीत आहेत तो सांख्य शाखेचा महान साधु **गौतम बुद्ध** यानें प्रसिद्ध केला.

असें समजतें कीं, **बिंबिसार** यास त्याचा पुत्र अजातशत्रु यानें मारिलें. ह्या अजातशत्रूनें खि. श. पूर्वी ४८९ पासून ४५३ पर्यंत तीसापेक्षां जास्ती वर्षें राज्य केलें आणि त्यानें आपलें राज्य पुष्कळ वाढविलें. **अंग**देश हा **मागधां**चे ताब्यांत त्यावेळीं होता आणि **अजातशत्रू**नें **कोशल** व दुसरे लोकांस जिंकून आपल्या राज्याच्या सिमा पश्चिमेस व उत्तरेस पसारिल्या. **तुराणी** लोकांचीं **वाज्जी** नामक जात हिमालयांतून बाहेर पडून उत्तरबहार प्रांतांत वसाहत करून राहिली होती. तीस मागें हटविण्याकरितां **अजातशत्रू**नें **पाटलीपुत्र** अथवा **पाटणा** हें शहर बांधिलें.

अजातशत्रूनंतर **शिशुनाग** घराण्यांतील चार राजांनीं राज्य केलें आणि खि. श. पूर्वी ३७० वें वर्षीं ह्या घराण्याचा शेवट झाला.

त्यानंतर **नंद** आणि त्याच्या आठ मुलांनीं सुमारें पन्नास वर्षं राज्य केलें. ह्या **नंद** घराण्यांतील शेवटच्या राजाच्या कारकिर्दींत **आलेक्झांडर धी ग्रेट** (शिकंदर) बादशहानें **पंजाबा**वर स्वारी केली. **चंद्रगुप्त**, ज्यानें बंड केलें होतें आणि ज्यास **नंदा**नें हाकून दिलें होते, तो **शिकंदरा**जवळ जाऊन राहिला परंतु त्याच्या गर्विष्ट आणि हट्टी स्वभावामुळें **शिकंदरा**सही त्याचा कंटाळा आला. त्यामुळें आपला जीव वांचवि-

ण्यासाठीं चंद्रगुप्तास तेथून पळून जावें लागलें. शिकंदर परत गेल्यावर चंद्रगुप्तानें पंजाबचे धट्टे कट्टे लोक गोळा केले आणि मगध देश जिंकून तेथें ख्रि. श. पूर्वी ३२० वें वर्षीं नवीन घराण्याचें राज्य स्थापन केलें. ह्याचे वेळीं उत्तर हिंदुस्थान देश प्रथमच एकछत्री अमलाखालीं आला ह्मणून ह्या सार्वभौम राजापासून हिंदुस्थानच्या इतिहासास नवीन स्वरूप आलें. ह्यावेळीं ह्मणजे शिकंदराच्या मृत्यूच्या सुमारास ज्ञानयुगाचा काळ संपला.

मगध देशांत ह्याप्रमाणें शेकडों वर्षेपर्यंत राजसत्ता आणि सुधारणा वास करीत असतां आजुबाजूचे प्रदेश अज्ञांधकारांत राहिले नव्हते. अंगदेश तर मागधांचे ताब्यांतच होता; वंग (पूर्व बंगाल) आणि कलिंग (दक्षिण बंगाल) ह्या प्रदेशांत ही सुधारणेंचीं किरणें ह्याच युगांत प्रथम पडूं लागलीं. चवथ्या युगाचे अखेरीस हे देश प्रबल हिंदुराजांचीं मुख्य ठिकाणें होऊन राहिलीं होतीं.

गुजराथेंत तर लौकरच हिंदूंची वसाहत झाली होती; आणि महाभारतांतील कृष्णाच्या कथेवरून असें दिसतें कीं त्या महायुद्धांत ज्या लोकांनीं भाग घेतला होता त्यांपैकीं कित्येक लोकांनीं यमुना नदीच्या किनाऱ्यावरून निघून गुजराथेंत वसाहत केली असावी व ख्रि. श. पूर्वीं चौथ्या शतकांत गुजराथेंतील सौराष्ट्र

प्रांत एक प्रबळ राज्य बनला होता. माळव्यांतही लौकरच वसाहत झाली होती आणि **उज्जयनी**चे राजे ज्ञानयुगांतील फार सुधारलेल्या नृपपंक्तींत गणले जात असत.

देश कावीज करणें आणि सुधारणा ह्यांची लाट ज्यास्ती ज्यास्ती वाढत जाऊन तिची मर्यादा **विंध्या**द्रीचे पलीकडेस गेली. **नर्मदा** आणि **कृष्णा** ह्या नद्यांच्या मधील प्रदेशांत महान आणि प्रबल **आंध्रां**चें राज्य स्थापन झालें; ह्या दक्षिण साम्राज्याची राजधानी अलिकडील **उमरावती** नगराजवळ होती. ह्या राज्यांत हिंदूंची सुधारणा इतकी फैलावली होती कीं, आंध्रांनीं हिंदु विद्यापिठें ठिकठिकाणीं स्थापिलीं होतीं, आणि उत्तर हिंदुस्थानांतील **गौतम** अथवा **वशिष्ठा**चें नांव जसें प्रसिद्ध होतें, तसेंच दक्षिणेंत ह्या काळांत जन्मलेला **आपस्तंभ** हा प्रसिद्धीस आला.

आर्य सुधारणेच्या वर्चस्वाची लाट ह्याही पुढें गेली आणि कृष्णानदीच्या पलीकडील प्रदेशांत आर्य सुधारणा आणि आर्य धर्म हीं वास करूं लागलीं. ख्रि. शकास प्रारंभ होण्यापूर्वीं कित्येक शतकें **चोल**, **चेर** आणि **पांड्य** हीं तीन राज्यें हिंदुस्थानाच्या अगदीं दक्षिणेकडील भागांत स्थापन होऊन तीं पुष्कळ शतकेंपर्यंत एकमेकांसन्निद्ध अस्थित्वांत राहिलीं होतीं.

शेवटीं हस्तिदंत व मोतीं ह्या जिनसाकरितां हिंदूंचे

व्यापारी सिंहलद्वीपांत गेले आणि त्यामुळें तें बेट आपणास माहीत झालें. ख्रि. श. पूर्वीं पांचव्या शतकांत **मागधांच्या सिंहबाहु** नामक राजाच्या **विजय** ह्या नांवाच्या मुलानें कपट आणि जुलूम केल्यामुळें त्यास त्याच्या बापानें हद्दपार केलें. तो गलबतांत बसून ह्या बेटांत गेला आणि त्यानें तें जिंकून तेथें हिंदुराज्य स्थापन केलें असें ह्मणतात.

ह्याप्रमाणें ख्रि. श. पूर्वीं चौथे शतकांत रानें आणि जंगली प्रदेश खेरीज करून बाकीच्या सर्व हिंदुस्थानांत हिंदूंची अथवा ज्यांत हिंदूंची विद्या आणि धर्म ह्यांचा प्रसार झाला आहे अशीं प्रबल राज्यें स्थापन झालीं होतीं.

वर आह्मीं लिहिलें आहे कीं, **चंद्रगुप्त** हा ख्रि. श. पूर्वीं ३२० वें वर्षीं राज्यावर बसला. ह्याचे दरबारीं ब्याक्ट्रियाच्या **सेल्यूकस्** राजाचा वकील, **मेगास्थनीस** नामक एक बुद्धिमान ग्रीक ख्रि. श. पूर्वीं ३१७ पासून ३१२ पर्यंत पांच वर्षें राहिला होता. चौथे शतकापूर्वीं हिंदुस्थानभर हिंदूंचा प्रसार झाला होता अशाविषयीं जी माहिती आपल्या हिंदुग्रंथांवरून निघते ती ह्या लक्षपूर्वक निरीक्षण करणाऱ्या ग्रीकाच्या लेखावरूनही खरी ठरते. **मेगास्थनीस** हिंदुस्थानांत आला तेव्हां उत्तर हिंदुस्थानांत **मागधांचें** राज्य होते व त्या राज्याचा विस्तार **पंजाबा**पासून बहार प्रांतापर्यंत होता; **मागधांचा**

राजा चंद्रगुप्त याजपाशीं नेहमीचें सैन्य ६,००,००० पायदळ, ३०,००० घोडेस्वार आणि ९,००० हत्ती होते. ह्या वरून तो ग्रीक ग्रंथकार ह्मणतो, "त्याच्या प्रबल शक्तीचें कांहींसें अनुमान करितां येतें." पूर्वेस बंगाल आणि ओरिसा ह्या प्रांतांत निरनिराळीं लहान राज्यें होतीं आणि कलिंगाच्या राजा जवळ ६०,००० पायदळ, १,००० घोडेस्वार आणि ७०० हत्ती हें सैन्य होतें. दक्षिणेकडेस आंध्रांच्या विस्तृत राज्यांत तीस तटबंदी केलेलीं शहरें होतीं. आणि त्यांजपाशीं १,००,००० पायदळ, २,००० घोडेस्वार व १,००० हत्ती हें सैन्य होतें. प्रश्चिमेस सौराष्ट्रीयांची मोठी बळकट जात होती. त्यांजपाशीं १,५०,००० पायदळ, ५,००० घोडेस्वार आणि १६०० हत्ती होते आणि त्यांची राजधानी समुद्र किनाऱ्यावर असून तेथें व्यापाराचें मोठें बंदर होतें. सिंहलद्वीपाविषयींही मेगास्थनीस याला माहिती होती. तें त्यावेळीं सुवर्ण, मोतीं, मासे धरण्याचे कारखाने आणि मोठमोठ्या हत्तींच्या जातीं बद्दल प्रसिद्ध होतें.

ख्रि. श. पूर्वीं अकरावें शतकांत हिंदु लोक फक्त सिंधु व गंगानद्यांच्या किनाऱ्याजवळील प्रदेशांतच पसरलेले असतां त्यांची स्थिती ख्रि. श. पूर्वीं चौथे शतकांत ते लोक सर्व हिंदुस्थानभर पसरले असतांनां त्यांच्या स्थितीशीं आपण जर ताडून पाहिली तर

ह्या सात शतकांचा ह्मणजे ज्यास ज्ञानयुग असें आपण ह्मटलें आहे, त्या काळाचा त्यांचा राजकीय इतिहास आपल्या ध्यानांत चांगला येईल.

ह्या वसाहत करणाऱ्या आणि देश जिंकणाऱ्या हिंदूंत साहस आणि अवसान हे गुण विलक्षण होते. कारण ज्ञानयुगाचे आरंभी हिंदुस्थान देश अफाट आणि अज्ञात असें मोठें खंडच होता. हिंदुस्थानाच्या दहालक्ष चौरस मैल वसाहत लायक जमिनीपैकीं वैदिक आणि शौर्यकाळांत एक लाखापेक्षां जास्ती भूमीचा शोध लावून वसाहत करण्यांत आली नव्हती. पंजाबां-तील मूळच्या लोकांशीं शतकेंच्या शतकें युद्धें केलीं अशा धट्या कट्या हिंदु योद्धचांनीं व गंगथडी प्रांतांत थवेच्या थवे उतरून कित्येक शतकेंपर्यंत संपन्न आणि सुधारलेलीं राज्यें चालविलीं. अशा त्यांच्या साहसी वंशजांनीं त्यांच्या त्यांच्या वेळीं बरेंच काम केलें होतें, परंतु त्यावेळीं ह्या विस्तीर्ण खंडाच्या एका कडेसच त्यांनीं हात लाविला होता असें ह्मटलें पाहिजे. ही गोष्ट खरी आहे कीं, ते लोक ज्या प्रदेशांत वसाहती करून राहिले होते, तो देश त्या खंडांतील उत्तम भाग होता, परंतु त्या प्रदेशा प-लिकडेस बहुतेक हिंदुस्थान अज्ञात आणि अशोधित असें पडलें होतें, आणि त्यांत आर्यविद्या अथवा आर्य-धर्म हीं ज्यांस माहीतही नव्हती अशा चमत्कारिक जाती रहात असत. शौर्यकाळांतील कवींनीं जेव्हां ह्या

अज्ञात जातीं विषयाचें वर्णन करण्याचा प्रयत्न केला तेव्हां त्यांनीं आपल्या कल्पनाशक्तीचा उपयोग करून त्या जातींस माकडें, रीस आणि राक्षस अशी स्वरूपें दिलीं आहेत.

सरते शेवटीं तृतीय युगांतील हिंदूंनीं त्या जातींस जिंकिलें अथवा त्यांच्याशीं साक्षात् संबंध केला, त्यांची सुधारणा केली, त्यांस हिंदु केले आणि त्यांच्या देशाचा हिंदुभूमींत समावेश केला. फक्त देश जिंकिणें हें काम सोपें आहे; आणि अर्वाचीन काळांत हून्स आणि मोंगल लोकांच्या प्रचंड टोळ्यांच्या टोळ्या जुन्या जगाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत—बहुतेक एका महासागरापासून दुसऱ्या महासागरापर्यंत—सपाट्यानें गेल्या आहेत, परंतु ज्ञानयुगांतील हिंदूंत देश जिंकणें ह्या गुणापेक्षां देशाची सुधारणा करणें हा गुण जास्ती प्रमाणानें वास करीत होता. जेथें जेथें त्यांनीं देश काबीज केला तेथें तेथें त्यांनीं जमिनीची लागवड, शिल्प आणि शांततेच्या कला, हीं सुरू केलीं. जेथें जेथें ते गेले तेथें तेथें त्यांनीं संस्कृत भाषा, वैदिकविधि आणि हिंदु धर्म, ह्यांचा प्रसार केला. जेथें जेथें ते राहिले त्या त्या ठिकाणीं त्यांनीं कायदे, धर्म आणि शास्त्रें ह्यांच्या पाठशाळा स्थापिल्या, जेथें जेथें त्यांनीं वसाहती केल्या तेथील रहाणाऱ्या लोकांस हिंदु केले आणि तेथें हिंदु राज्यें स्थापन केलीं. ख्रि. श. पूर्वी चौथे

शतकांत बंगाल आणि ओरिसा येथें हिंदु राज्यें होतीं. सौराष्ट्र हें समुद्रतीरस्थ एक प्रबल हिंदूंचें राष्ट्र होतें. आंध्रांनीं प्रसिद्ध हिंदु विद्यापीठें स्थापिलीं, आणि पांड्य, चेर, चोल यांनींही कांचीं व दुसऱ्या पुराण प्रसिद्ध शहरांमध्यें हिंदु विद्येचा प्रसार केला आणि ते हिंदुराष्ट्रांच्या अफाट जथ्यांपैकीं कांहीं भाग होऊन राहिले. ह्याप्रमाणें सर्व हिंदुस्थान देश जिंकून सेनांकित करून टाकिला होता, इतकेंच नाहीं परंतु हिंदुधर्म आणि सुधारणा यांचें तेज त्यावर पडलें होतें; व हेंच ज्ञानयुगांत झालेल्या कृत्यांचें विशेष स्वरूप होय.

पंजाब व गंगथडींतील आदि हिंदूंनीं त्या त्या प्रांतांतील मूळचे रहाणाऱ्या लोकांचें निर्मूलन केलें होतें, अगर त्यांस त्या प्रांतांतून अगदीं हाकलून लाविलें होतें. त्यामुळें आजपर्यंत उत्तर हिंदुस्थानांतील हिंदु शुद्ध आर्य आहेत. परंतु हिंदुस्थानासारख्या खंडा इतक्या मोठ्या देशांत सर्व ठिकाणीं हें उच्छेदनाचें व देश बहिष्करणाचें काम अशक्य होतें. ज्ञानयुगांतील हिंदु वसाहत्यांनीं मूळचे लोकांस देशपार न करितां, त्यांस हिंदूंच केलें. ह्यामुळें बंगाल्यांतील व दक्षिण हिंदुस्थानांतील जनसमूह ज्ञानयुगामध्यें जसा होता तसाच आहे, ह्मणजे तो धर्म, भाषा आणि सुधारणा यांनीं हिंदु आहे, परंतु कुलानें तो बहुतेक अनार्य आहे.

कैवर्त आणि चांडाल जातीप्रमाणें, दलदलीयुक्त

बंगाल प्रांतांतील मत्स्य धरणाऱ्या आणि पारध करणाऱ्या लोकांनीं हिंदूंच्या शिल्पकला, हिंदूंची भाषा आणि हिंदुधर्म, ह्यांचा स्विकार झटकन करून तें देशांतर करून आलेल्या आर्यांच्या ताब्यांत मोठ्या सुखानें राहिले. बंगालयांत आजपर्यंत ज्या उच्च जाती आहेत, त्या ह्या आर्यांच्या वंशज होत. दक्षिणेकडेस ह्या आर्य देशांतर करणारांचीं संख्या कमी होती आणि त्यामुळें मूळच्या लोकांनीं आर्यांचा धर्म स्विकारला, त्या बरोबरच त्यांनीं आपल्या जातींतील लोक आपले उपाध्ये केले. गंगथडीपासून जसजसें आपण दूर जाऊं तसतसें आर्यकुलाविषयीं कमी कमी निर्भेळपणा दृष्टोत्पत्तीस येईल.

हा भेद हिंदु ग्रंथकारांच्या लक्षांत आला होता आणि त्यांनीं आपल्या रीतिप्रमाणें तो आपल्या ग्रंथांत व्यक्त केला आहे. ही गोष्ट इतकी चमत्कारिक् आहे कीं, **बौध्यायनाच्या** ग्रंथांतून एक उतारा घेऊन तिचें दिग्दर्शन आम्ही करूं इच्छितों. हा **बौध्यायन** ख्रि. श. पूर्वीं सहावें शतकांत भरभराटीस आला होता.

" कित्येक लोक असें सांगतात कीं **यमुना** आणि **गंगा** या नद्यांच्यामधील प्रदेश ही आर्यांची भूमि होय."

" आवंती (माळवा), अंग (पूर्वबहार), मगध (दक्षिणबहार), सौराष्ट्र (गुजराथ), दक्षिण, उपाव्रित, सिंध, आणि साविरास (दक्षिणपंजाब) ह्या ठिकाणचे लोक मिश्र जातीचे आहेत."

"आरत्त (पंजाबांतील), कारष्कर (दक्षिण हिंदुस्थानांतील), पुंड्र (उत्तरबंगाल्यांतील), साँवीर, (दक्षिणपंजाबांतील), वंग (पूर्वबंगाल्यांतील), कालिंग (दक्षिण बंगाल आणि ओरिसा या प्रांतांतील) अथवा प्राणून या लोकांस जो कोणी भेटेल त्यानें हवन केलें पाहिजे."

ह्या पुरातन ग्रंथकारानें हिंदुस्थानाचे तीन निरनिराळे भाग, त्यांत रहाणारे लोकांच्या आर्य उत्पत्तीच्या शुद्धतेवरून त्यांस कमीज्यास्ती मान मिळत असे त्या प्रमाणानें, केले आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

गंगथडी प्रदेशांतिल शुद्ध आर्यलोक यांस अत्युत्तम मान असे. दक्षिणबहार, पूर्वबहार, दक्षिणपंजाब, सिंध आणि गुजराथ, माळवा आणि दक्षिण देश हे दुसऱ्या प्रतीचे होत. कारण ह्या प्रांतांत ज्ञानयुगांत वसाहत होऊन तेथील लोकांत शुद्ध आर्य लोकांचें बरेंच मिश्रण झालेलें होतें. बंगाला आणि ओरिसा व दक्षिण हिंदुस्थान हे प्रदेश त्याकाळीं हिंदु बनलेले नव्हते आणि तेथील जनसमुहांत आर्य उत्पत्तीचे लोक बहुतेक नव्हतेच; ह्यामुळें हे देश इतके अपवित्र मानिले असत कीं, त्यांत जे लोक प्रवास करून येत त्यांस प्रायश्चित्त घ्यावें लागे.

ह्याप्रमाणें **मागध, अंग, बंगाली, सौराष्ट्र,** दक्षिणेंतील **आंध्र** आणि **कृष्णानदी**च्या दक्षिणेकडील जाती हे लोक पुरातन अनार्य राष्ट्रें होत. ह्या लोकांस हिंदु आर्यलोकांनीं जिंकिलें, किंवा ते त्यांच्यांत येऊन

राहिले, व त्यांच्याशीं मिळून जाऊन, विशेष सुधारलेलें राष्ट्र आपल्या शेजारच्या कमी सुधारलेल्या राष्ट्रास जें जें कांहीं शिकवितें तें तें त्यांस त्यांनीं शिकविलें. ह्या हिंदुआर्यांपासून मूळच्या अनार्य लोकांनीं हिंदुधर्म व हिंदु सुधारणा हीं घेतलीं. जे मंत्र संस्कृत भाषेंत **सरस्व-ती नदी**च्या तीरावर रचिले गेले आणि ज्यांचा घोष **हस्तिनापूर** आणि **मिथिल** ह्या नगरांत होत असे, त्यांचें पाठांतर आतां **अमरावती** व **कांची** येथें होऊं लागलें; जे वैदिकविधि **यमुना** आणि **शरयु** नद्यांच्या किनारीं होत असत ते ह्यावेळीं **गोदावरी** आणि **कृष्णा** ह्या नद्यांच्या तीरांवर होऊं लागले; आणि नवी राष्ट्रें हिंदुपणाच्या टप्प्यांत आलीं, व त्यांजवर हिंदुधर्म आणि हिंदुसुधारणा ह्यांची पूर्ण छाया पडली. सारांश सर्व हिंदुस्थान देश हा हिंदुजगच बनला आणि हिंदु-स्थानांतिल पादाक्रांत केलेल्या असंख्य जाती हिंदु भाषेचा अभ्यास करूं लागल्या, हिंदु धर्मविधि आ-चरूं लागल्या आणि सर्व प्रकारें हिंदु बनल्या.

शिकंदराच्या पूर्वीच्या हिंदुजगाची स्थिति त्या बा-दशहाच्या मरणानंतरच्या ग्रीक जगाच्या स्थितीशीं ताडून पाहिली असतां, ती तुलना मनःकल्पित होणार नाहीं. **ग्रीस**देश हा **गंगथडी** प्रदेशाप्रमाणें विद्या आणि धर्म यांचें मूळस्थान होता, तेथून तीं दूरवर पसरलीं. **मा-सिद्न** येथील लोकांनीं, **मागधां**प्रमाणें ज्या लोकांस त्यांनीं

जिंकिलें त्यांजपासून त्यांची विद्या घेतली आणि तेंच ज्ञान हिंदु जगाप्रमाणें ग्रीक दुनियेंत दूरदूरच्या राष्ट्रांनीं घेतलें. इतालीमध्यें, सिसिलींत, इजिप्त देशांत, इराणांत आणि ब्याक्ट्रिया प्रांतांत ग्रीक धर्म फडकूं लागला, ग्रीक कोरीव कामाचें अनुकरण होऊं लागलें, आणि ग्रीक भाषा बोलण्यांत व लिहिण्यांत येऊं लागली. ग्रीक देशाचें बुद्धिवैभव दूरदूरच्या देशास मार्ग दाखविणारा दीपच होऊन बसलें आणि इतली, इजिप्त व एशिया खंडांतील पश्चिमेकडील भाग ह्यांनीं, हिंदुस्थानांतील राष्ट्रांनीं हिंदुधर्म आणि हिंदुविद्या ह्यांचा झगा पेहरला होता त्याप्रमाणेंच ग्रीक सुधारणेचा पेहराव घातला.

हें साम्य इतक्यानेंच पुरें होत नाहीं. ग्रीक लोकांच्या सुधारणेस एशिया व आफ्रिका खंडांतून हांकून लावण्यांत आलें आहे, तथापि, गंगथडींतील हिंदूंची सुधारणा दोन हजार वर्षांपेक्षां जास्ती काळ पसरत चालली आहे त्याप्रमाणें, ग्रीक सुधारणा युरोपांतील राष्ट्रांत टिकली आहे व वृद्धिंगत पावली आहे. आणि ग्रीक भाषेचा अभ्यास ऑक्सफर्ड, पारिस आणि बर्लिन या शहरांतील विद्यासंपन्न विश्वविद्यालयांत काळजीपूर्वक होत आहे, त्याचप्रमाणें जी पवित्र भाषा पूर्वी कांपिल्य आणि अयोध्या या शहरांत बोलत असत, तीच हल्लीं मुंबई आणि बंगाल येथें लक्षपूर्वक शिकविली जात आहे.

खंड २ रें.

रीतिरिवाज आणि सुधारणा.

हिंदुवसाहत करणारे सर्व हिंदुस्थानभर पसरले आणि त्यांनीं आपले रिवाज व धर्मविधि दुसऱ्या लोकांत सुरू केले. त्यामुळें अशा विधीचे व कायद्यांचे संक्षिप्त ग्रंथ रचण्याची जरूर पडली. अद्यापपर्यंत विद्याही तोंडपाट करून शिकवीत असत, आणि हिंदु झालेल्या हिंदुस्थानांतील राष्ट्रांनीं ग्रंथरचना अशा पद्धतींत आणिली कीं त्यामुळें शिक्षकांस शिकवितांना आणि विद्यार्थ्यांस शिकतांना घोकंपट्टीचा आश्रय करितां येई. खरोखर त्या वेळेचे ग्रंथकारांनीं एक प्रकारचा अतिशयच केला. शौर्यकाळांत शब्दपाल्हाळिक **ब्राह्मणग्रंथ** होते, तों ज्ञानयुगांत सूत्रें अथवा लहान वाक्यें आलीं. ही ग्रंथरचना इतकी संक्षिप्त आणि संकुचीत आहे कीं, भाष्यांशिवाय त्यांचा अर्थ समजणें पुष्कळ वेळां कठिण पडते. वाक्यें लहान करण्यांत अथवा त्यांस संक्षेप देण्यांत त्यावेळचे ग्रंथकार फारच श्रम घेत असत आणि त्यामुळें ह्मणच पडून गेली होती कीं, " पुत्र जन्मला असतां जितका आनंद होतो तितकाच आनंद ग्रंथकारास अर्ध्या ह्रस्व स्वराची काटकसर करण्यांत होतो. "

वैदिक यज्ञसंबंधी क्रिया सविस्तर वर्णिलेल्या आहेत. त्यांचे व्यवहारोपयोगीं लहान लहान संक्षिप्त ग्रंथ तयार करण्यांत आले, त्यांस श्रौत सूत्रें असें ह्मणतात. गृहसंबंधी कृत्यें अथवा योग्यऋतुकाळचे उत्सव ह्यासंबंधांचेही अशेच लहान ग्रंथ रचण्यांत आले. त्यांचें नांव **गृह्यसूत्रें** आहे. शेवटीं हिंदूंचे दिवाणी, फौजदारी आणि सामाजिक नियमांचे **धर्मसूत्रे** ह्मणून ग्रंथ करण्यांत आले. ह्या तिन्ही सूत्र ग्रंथांवरून त्या काळच्या रीतिरिवाजांविषयीं पुष्कळ माहिती मिळते.

श्रौतसुत्रांत जे वैदिकविधि सांगितले आहेत ते अनेक आहेत. परंतु त्यावेळचा **गौतम** ह्मणून एक ग्रंथकार होता त्यानें त्यांचे मुख्य वर्ग चौदा केले आहेत. ते येथें सांगण्याची जरूरी नाहीं. त्यांपैकीं एक दोन पूर्वी सांगण्यांत आले आहेत, जसें विद्यार्थ्यानें आपला अभ्यासक्रम पुरा केल्यावर लग्न करून गृहस्थाश्रमी होते वेळीं त्याचें पहिलें कर्तव्य होमाग्नि प्रज्वलीत करणें हें होय. ह्या पुरातन क्रियेस 'अग्न्याधान' असें ह्मणतात. हा अग्नि घर्षणानें प्रज्वलीत करीत असत आणि नवीन लग्न झालेलें जोडपें निरनिराळ्या क्रिया करून व सर्व रात्र जागून हा अग्नि प्रज्वलीत ठेवी. धार्मिक गृहस्थाश्रमी हिंदु हा अग्नि आपल्या आयुष्यभर सिद्ध ठेवीत आणि होम करितेवेळीं त्यांस आहुती देत. सकाळीं आणि संध्याकाळीं नुसतें दुधाचेंच हवन करीत. ह्या

विधीस अग्निहोत्र ह्मणतात. सर्व वैदिक यज्ञक्रियेंत हा विधि फारच साधा आहे.

गृह्यसूत्रांत सांगितलेल्या लहान लहान घरगुती यज्ञांची-ही संख्या फार आहे. परंतु गौतमानें त्यांचे मुख्य भाग सात केले आहेत. ह्यांपैकीं **श्राद्ध** अथवा मयत पूर्वजांस वेळोवेळीं बळी देण्याचा विधि हा होय. होता ह्मणजे यज्ञ करणारा "पित्या हा तुला अर्घ्य देतो, आजोबा हा तुमचा अर्घ्य घ्या, पणजोबा हा तुमचा अर्घ्य," असे योग्य मंत्र उच्चारून पाण्यानें पितरास अर्घ्य देतो. विद्यासंपन्न, सद्गुणी आणि निर्मल आचाराचे ब्राह्मण मयत पितरांचे जागीं समजून त्यांस मेजवानीस बोला-वीत आणि धूप, दीप, पुष्पमाला आणि वस्त्रें देत. दुसरे गृहयज्ञ कमी महत्वाचे असून ते बहुतेक ऋतुसंबंधीं आहेत. पौर्णिमेचे आणि चंद्रदर्शनाचे विधि, वर्षा-काळांत सर्पास पूजण्याचे विधि, पावसाळ्याचीं धान्यें तयार झालीं ह्मणजे तीं कापण्याचे वेळचे विधि, व विशेष प्रीय असे हिंवाळ्यांतील धान्यांची फसल गोळा करण्याच्या वेळचे विधि, ह्याप्रमाणें सप्त यज्ञ आहेत. ह्यावळीं सुघ्रण हिंदु स्त्रिया आणि कुमारिका निरनिराळी मेवा मिठाई आणि पोळ्या तयार करून लोकांस वाटीत.

ह्या सात गृहयज्ञांशिवाय निव्वळ घरगुतीसंबंधाचें दुसरे कुलाचार आहेत, ते योग्यवेळीं साजरे करून पुरातन हिंदु आनंद करीत असत. आपल्यास वारस

होणार अशाबद्दल आपल्या पत्नीच्या ठिकाणीं सुचिन्हें दिसूं लागलीं ह्मणजे आनंदीत झालेला पति निरनिराळ्यावेळीं तीन संस्कार करीत असे, आणि मुलाच्या जन्मकाळीं आणि तें अन्न खाऊं लागतें तेव्हां आणखी तीन संस्कार त्यास करावे लागत. जसजसें तें मूल वाढत जातें आणि अभ्यास करण्यास योग्य होतें तसतसें चौल संस्कारानंतर **उपनयन** संस्कार करण्यांत येत असे. मुंज झाल्यावर त्या मुलास गुरुकडे विद्याभ्यास करण्याकरितां पाठवीत. गुरूच्या घरीं पुष्कळ वर्षें राहून धर्मज्ञान, जें शिकणें हें प्रत्येक हिंदूचें कर्तव्यच असे, तें तो मुलगा शिके. पवित्र वेदाध्ययन करीत असतां निरनिराळे चार विधि करण्यांत येत असत. विद्याभ्यास संपूर्ण झाल्यावर **अवभृत्स्नान** आणि **विवाह** करण्यांत येत असे, व हे विधि झाल्यावर तो मनुष्य गृहस्थ होण्यास पात्र होत असे. ह्या वेळेपासून गृहस्थाश्रमांतील विशेष जोखमाचीं कृत्यें करण्यास प्रारंभ होत असे. गृहस्थास दररोज पांच विधि करावे लागत. देवयज्ञ, पितृयज्ञ, अथितिपूजन, पिशाचयज्ञ आणि शेवटीं ब्रह्मयज्ञ. हीं कृत्यें धार्मिक गृहस्थास दररोज अन्न तोंडास लावण्यापूर्वीं करावी लागत असत.

चौदा वैदिकयज्ञ, सात गृह्यकर्में आणि एकोणीस घरगुती विधि हे चाळीस हिंदूंचे संस्कार होत. ह्या विधींचा उद्देश स्पष्ट आहे. प्रत्येक हिंदु, तो हिमालयापा-

सून थेट कुमारिका भूपिरापर्यंतच्या मधील विस्तीर्ण देशांत कोठेंही रहात असो, तो एकसारखे विधि आचरीत असे, सारख्या रीतिभाती पाळी व भक्ति, पवित्रता आणि निर्लोभ बुद्धि हे गुण आपणामध्यें जागृत आहेत असें आपल्या आचरणानें दाखवी. आणि खरोखर पूज्य **गौतम**ऋषीनें, संस्काराचें वर्णन केल्यानंतर, फक्त संस्कारांच्या आचरणापासून स्वर्ग मिळत नाहीं, परंतु खच्या गुणांपासून त्याची प्राप्ती होते अशी उदात्त कल्पना मनांत आणिली आहे. तो ह्मणतोः—

" जो ह्या चाळीस संस्कारांनीं पूनीत झाला आहे, परंतु ज्याच्या मनांत आठ मोठे गुण वास करीत नाहींत, त्यास **ईश** प्राप्ती नाहीं व त्या **परमेश्वराचें** ठिकाण जो **स्वर्ग** तेथेंही तो पोंचणार नाहीं.

" परंतु ज्यास ह्यांपैकीं कांहीं संस्कार झाले आहेत आणि ज्याचें मन मोठ्या गुणांनीं परिपूर्ण भरलेलें आहे तो निःसंशय ईश्वररूपांत मिळतो आणि त्यास स्वर्गांत जागा मिळते."

ह्या वेळचा दुसरा ग्रंथकार **वसिष्ठ**ऋषी असेंच ह्मणतो.

" ज्याचें आचरण चांगलें नाहीं, त्यानें सर्व वेद व त्याचीं सहा अंगें हीं जरी पठण केलीं असलीं तथापि त्यास वेद पूनीत करीत नाहींत. पक्ष्यांस पूर्ण पंख आले असतां ते जशीं आपलीं घरटीं सोडून जातात त्याप्रमाणें अशा मनुष्यापासून ते पवित्र ग्रंथ पळून जातात.

" जसें स्त्रीचें सौंदर्य अंध मनुष्यास आनंद देण्यास कारणीभूत होत नाहीं, त्याप्रमाणें सर्व वेद, सहा अंगें आणि यज्ञ हीं, जो चांगल्या आचरणापासून दूर असतो, त्याचें कल्याण करूं शकत नाहींत.

"जो लबाड मनुष्य लुच्चेगिरीनें वागतो त्यास पापापासून मुक्त करण्यास हे अनेक ग्रंथ समर्थ नाहींत. परंतु 'वेद' हीं दोन अक्षरेंच, त्यांचें अध्ययन गुणांचें आणि नियमांचें योग्य पालन करून केलें, तर आश्वीन महिन्यांतील ढगांप्रमाणें, त्यास निर्मळ करूं शकतात."

ह्या मतापासून बौद्ध धर्मांत जाण्यास अंतर फारच थोडें होतें. त्या धर्मावर आह्मी पुढील एका खंडांत लिहिणार आहोंत. त्या धर्मानें धर्मग्रंथ आणि धर्मविधि एक बाजूस ठेवून निष्पाप **रहाणी** हाच धर्म होय असें प्रतिपादिलें. श्रौतसूत्रें आणि गृह्यसूत्रें ह्यांत जे विधि सांगितले आहेत त्यांविषयीं आह्मी वर दर्शविलें आहेच; धर्मसूत्रांत मुलकी आणि फौजदारी निबंध आहेत. त्यावरून त्यावेळीं समाजाची स्थिति कशी होती त्याचें बरेंच ज्ञान होतें. ह्यावेळीं ज्ञातिव्यवस्थेपासून फौजदारी कायद्याच्या अम्मल बजावणीवर परिणाम झालेला दृष्टोत्पत्तीस येतो, आणि निरनिराळ्या जातींच्या अपराध्यांस निरनिराळ्या शिक्षा सांगितल्या आहेत त्या पाहून शिक्षेचें असमानत्व लक्षांत आल्याशिवाय रहात नाहीं.

चार अथवा पांच प्रकारचे अपराध भयंकर मानिले जात असत, आणि त्यांस मृत्यूची शिक्षा असे. ब्राह्मणाचा खून करणें, गुरुपत्नीशीं व्यभिचार करणें, दारू पिणें, अथवा ब्राह्मणाचें सोनें हरण करणें हीं कृत्यें घोर अपराधांत गणलीं जात. ब्राह्मणाचे हातून हे अपराध घडले तर त्याचे कपाळावर डाग देऊन त्यास देश निकाल करीत असत. कारण, कांहीं झालें तरी ब्राम्हणास फांशी देतां येत नसे. दुसऱ्या जातीच्या मनुष्यानें ह्यांपैकीं एखादा अपराध केला असतां त्यास देहांत शासन मिळत असे.

ह्याप्रमाणें हलक्या अपराधांच्या शिक्षेंतही पक्षपात आढळून येतो. शूद्रानें त्याच्यापेक्षां वरच्या जातीच्या मनुष्यावर हल्ला केला असतां, त्यानें आपल्या ज्या अवयवानें हल्ला केला असेल तो अवयव हरवण्यास तो पात्र होत असे. असे पक्षपाती कायदे फक्त हिंदुस्थानांतच असत असें नाहीं. जिंकणारे आणि जिंकलेले, स्वतंत्र लोक आणि दास, उंच्च आणि नीच वर्णाचे लोक, जहागीरदार आणि त्यांचे बंदे नोकर, गौरकाय लोक आाणि गुलाम, या दोघांस प्राचीन आणि अर्वाचीन काळांत एकच कायदे नाहींत. सर्व मनुष्यांचा सारखेपणा कांहीं अंशीं चालू शतकांतच मानूं लागले आहेत. ह्मणून प्राचीन हिंदु लोकांनीं पादाक्रांत केलेल्या शूद्रांस अमर्याद कडकपणानें वागविलें आणि त्यांविषयीं

उंच नीचपणाचे कायदे जाति निबंधाच्या रूपानें प्रचारांत आले ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

गुन्हेगार चोरी करीत असतां पकडला गेला तर त्यास देहांत शासन असे, परंतु राजास क्षमा करण्याचा जो अधिकार आहे तो तो वापरूं शके. शेतकरी आणि शिल्पकार यांचें संरक्षण करण्याकडे फार काळजी घेण्यांत येई. शेतकऱ्यांच्या जमिनीविरुद्ध व कारागिरांच्या धंद्याविरुद्धचे अपराधांस अति कडक शासन सांगितलें आहे. त्या वेळच्या दिवाणी–मुलकी कायद्यांत जमीन लागवड करण्यास कौलानें देणें, जनावरांनीं पिकास नुकसान केल्यास त्याबद्दल पैसे देणें, मिळकत संपादन करणें आणि व्याजाचा दर, ह्यांविषयीं नियम सांगितले आहेत. मालमत्ता आठ प्रकारांनीं मिळवितां येत असे. ते प्रकार असे, दायाच्या हक्कानें अथवा विकत, नवऱ्याच्या अथवा दुसऱ्या साधारण देणगीनें, तारण, यज्ञयाग करण्याचे मोबदल्यांत, भागीदारीनें अथवा अंगमेहनतीबद्दल मजूरीनें जामीन घेऊन कर्ज दिलें असेल, त्या वरील व्याजाचा दर साधारण रीतीनें १५ टक्के असे आणि दाम दुप्पट झाली असतां व्याज बंद होई. जामीन घेतला नसेल तर व्याजाचा दर बराच जास्त होऊं शकत असे आणि मुद्दल दाम दुपटीहून सात आठ पटीपर्यंत वाढूं शके.

अशा ह्या सूक्ष्म आणि तपशीलवार नियमांवरून त-

त्कालीन रीतिरिवाज किती मन:पूर्वक काळजीनें ठरविले होते अथवा नक्की झाले होतें तें समजतें. दायभागावर तर हिंदु कायदे पंडितांनीं अतिशय लक्ष दिलें आहे. पुत्रजन्म हा एक आपणास लाभ झाला आहे, इतकेंच समजत नसत, परंतु तें एक धर्मकृत्य आणि मुक्तीचा एक मार्ग आहे अशी समजूत असे; कारण ज्यास वारस नाहीं त्यास मरणानंतर पिंड देण्यास कोणी नाहीं. ह्या कारणामुळें आपणास वारस असावा अशाबद्दल प्राचीन हिंदु लोक विशेष काळजी घेत असत, आणि त्यामुळें लग्नाच्या पत्नीपासूनच्या वारसावरच अवलंबून न रहातां दुसरे प्रकारचे वारस ते मानूं लागले.

पुत्र नसल्यामुळें वारस नसेल तर दुसऱ्याचा मुलगा दत्तक घेतां येत असे; आणि असा औरस अथवा दत्तक पुत्र नसतां कोणीं मनुष्य मरण पावला तर त्याच्या विधवेस मृतास वारस उत्पन्न करण्याची मोकळीक असे. मुलीस लग्नाचे पूर्वी झालेला पुत्र लग्नानंतर तिचा नवरा कधीं कधीं आपला पुत्र मानीत असे, व कोणास मुलगा नसल्यास आपल्या मुलीचा मुलगा आपल्या दत्तक पुत्राच्या जागीं मानतां येत असे.

असे आणि अशा प्रकारचे वारस प्राचीन हिंदु कायदे करणारांनीं मानिले आहेत; परंतु लवकरच ह्या नियमांच्या विरुद्ध उलट प्रवृत्ति झाली. आपस्तंब हा धर्मसूत्रें लिहिणारांपैकीं अगदीं अलिकडील आहे.

आपल्या पूर्वजांनीं लिहिलेल्या ह्या नियमांचें विवरण करीत असतां त्यांनें लिहिलें आहे कीं, धर्मपत्नीपासून झालेला मुलगाच काय तो खरा वारस मानतां येईल. अर्वाचीन हिंदु लोक फक्त औरस मुलास आणि तो नसेल तर दत्तक पुत्रासच आपला वारस मानितात.

अनेक बायका करण्याचा प्रघात प्राचीन हिंदूंमध्यें होता; परंतु त्यास उत्तेजन देण्यांत येत नसे. ही चाल चालू ठेवण्याचें मुख्य कारण पुत्रोत्पत्ति खास व्हावी हें होय. आपस्तंबानें लिहिलें आहे कीं, " धर्मसंबंधीं कृत्यें जीं बायकोस करावयाचीं आहेत तीं ती करूं शकत असेल आणि तीस पुत्र होत असतील तर तिच्या नवऱ्यास दुसरी बायको करता येणार नाहीं." दुसऱ्या रितीनें पाहतां स्त्रीस, तिचा नवरा वेडा अथवा षंढ असेल, तो ज्ञातभ्रष्ट असेल अथवा तो मरेल, तर पुन्हा लग्न करण्याची मोकळीक असे.

लग्नाचेवेळीं बाप आपले मुलीस दागिन्यांनीं भूषीत करून बहुल्यावर नेत असे. त्याठिकाणीं पुरोहित तिजपासून होमांत हवन करवी आणि दुसरे कित्येक विधि करण्यांत आल्यानंतर नवऱ्यामुलाशीं तिचें लग्न लागत असे. लग्नाचा हा प्रकार साधारण प्रचलीत असे, परंतु त्यावेळीं दुसरे प्रकार चालू असत, ते हिंदू कायदेकारांनीं ध्यानांत घेऊन ते आपले ग्रंथांत कायदेशीर केले आहेत. निव्वळ प्रीति विवाह, ज्यांत

प्रीति करणारा पुरुष आपणावर जीचें प्रेम जडलें आहे अशा युवतीस आपली पत्नी करितो, तो कायद्यांत मान्य केलेला आहे. व त्याचप्रमाणें हलके लोकांत प्रचलीत असलेली चाल, जी प्रमाणें गुरें अथवा पैसे घेऊन आपली मुलगी लग्नांत देत असत, ती ही कायदेशीर मानली आहे. क्षत्रीयवीर बहुतकरून लढाईंत जय मिळविल्या नंतर नवऱ्यामुलीस नेत असत आणि हिंदू झालेले मूळचे लोक जबरदस्तीनें अथवा चोरून आपणास बायका मिळवीत. ह्या सर्व प्रकारांपैकीं विशेष शुद्ध प्रकार वर जो प्रथम सांगितला आहे तो आर्यहिंदूंनीं घेण्यासारखा आहे असा शेरा मारून लग्नाच्या बाकीच्या प्रकारांचें गौणत्व त्यांनीं दाखविलें आहे. तथापि ते सर्व प्रकार आपल्या ग्रंथांत लिहून ते मान्य केले, ही गोष्ट खरोखर हिंदुकायदे करणारांच्या उदार मनास भूषणावहच होय.

सापिंड्यांमधील लग्नें—ह्मणजे जीं स्त्री पुरुषें वापाकडून अथवा आईच्या बाजूनें चार सहा पिढ्यांपर्यंत एकमेकांशीं नातलग होत असतील त्यांच्या मधील लग्नें—हीं करण्याची बिलकूल मनाई असें. हिंदु कुमारिका चांगल्या वयांत आल्यावर त्यांचीं लग्नें होत असत. वसिष्ठानें लिहिलें आहे कीं, कुमारिकेस ऋतुप्राप्त झाल्यावर तीन वर्षेंपर्यंत तिनें लग्नाची वाट पाहावी. सती, ह्मणजे नवऱ्याच्या चितेवर त्याच्या विधवेनें मनास वाटेल तर

आपल्यास जाळून घेण्याचा जो क्रूर प्रकार, तो ह्या काळच्या हिंदु लोकांत सर्व प्रचलीत नव्हता, परंतु त्यानंतर अर्वाचीन काळीं गुणव्हास झाला तेव्हां तो शिष्टसंप्रदाय होऊन बसला. विस्तवानें जाळून घेणें हा एक आत्मघाताचा दांभिक प्रकार आहे;हा हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून माहीत होता, आणि मानसिक दु:ख, शारीरभोग अथवा अप्रतिष्टा, हीं असह्य झालीं अथवा जग दु:खदायक भासूं लागलें तर कित्येक वेळां मनुष्यें आत्मघात करीत असत; आणि अनार्यांच्या कित्येक जातींत स्त्रिया आपल्या नवऱ्याच्या चितेवर जाळून घेत असत. परंतु ही चाल बहुतेक हिंदुलोकांस माहीत नव्हती आणि त्यांच्या जुन्या धर्मशास्त्राची तीस संमत्ति नव्हती इतकेंच नाहीं, परंतु अलीकडील ह्मणजे खिस्ताच्या जन्मानंतर कित्येक शतकें गेल्यावरही जे शास्त्रग्रंथ लिहिण्यांत आले आहेत, त्यांतही तिचा उल्लेख नाहीं.

ज्या धर्म सूत्रांत समाजाचे कायदे आणि निर्बंध ह्यांची इतकी विपूल माहिती आहे, त्यांत ज्ञाती-संबंधीं उल्लेख असणें साहजिक आहे. आर्यलोकांचा प्रसार हिंदुस्थानांतील सर्व भागांत होत गेला तसा आर्यलोकांच्या रीतिभाती चोख आणि निर्मल रहाव्या ह्मणून हीं धर्मपुस्तकें रचण्याची कल्पना सुचली. ह्याच प्रसारामुळें आर्यलोकांचा संबंध, त्यांच्या चार जातींत

समावेश होत नसे अशा नव्या नव्या आणि निरनिराळ्या अनार्य लोकांच्या जातींशीं, येऊं लागला; त्यामुळें ह्या नव्या जातींची उत्पत्ति कशी झाली त्याविषयींचा उलगडा करण्याचा प्रयत्न सूत्रकारांनीं ज्ञातीसंबंधीं त्यांची जी समजूत असें तीस अनुसरून केला आहे. ही ज्ञातीची कल्पना लवचिक आणि व्यापक असे आणि त्यामुळें जसजसे अनार्य लोक हिंदु झाले तसतशा त्यांच्या नव्या जाती बनून त्यांचा हिंदूच्या वर्णसंस्थेमध्यें समावेश झाला.

आंबस्थ, **उग्र** आणि **निषाध**, **मागध** आणि **वैदेह**, **कुक्कुटक** आणि **चांडाळ** ह्या हिंदुस्थानांतील मूळ रहिवाशांच्या सर्व मोठमोठ्या जाती व उपजाती हिंदु सुधारणेच्या छायेखालीं आणि आश्रयाखालीं आल्या, आणि ते लोक जसजसे हिंदु झाले, तसतसे त्यांची हिंदूंमध्यें गणना करून, त्यांच्या निराळ्या हिंदु जाती बनल्या. ह्या सर्व जातींच्या लोकांचे मुख्य धंदे आणि रीतिरिवाज अवलोकनांत घेऊन धर्मसूत्रांत सर्व जातींची व्यापक याद दिली आहे आणि प्रत्येक जातीचीं कोणकोणतीं कामें असत तें लिहिलें आहे.

सूत्रें लिहिणारे ह्याहीपेक्षां पुढें गेले आहेत, त्यांची अशी समजूत असे कीं, प्रथमपासूनच सर्व मनुष्य जातीचे चार विभाग झालेले आहेत; ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शूद्र ह्या चार ज्ञाती मिळून मनुष्य जात झाली आहे. अशी त्यांची समजूत

असल्यामुळें सर्व हिंदुस्थानभर जे लोक त्यांच्या नजरेस पडत आणि जे ह्या चार ज्ञातीपैकीं नव्हत त्यांची उत्पत्ति कशी झाली ह्याविषयीं त्यांस मोठा विचार पडला. ह्या गूढाचा निकाल लावण्याकरितां त्यांनीं चमत्कारिक कल्पना लढविली ती अशी कीं, मुख्य चार जातींचा एकमेकांशीं लग्न संबंध होऊन त्यापासून ह्या मूळ लोकांच्या नव्या जाती उत्पन्न झाल्या आहेत. आपण अशी कल्पना करूं कीं, पांचव्या शतकांतील एखाद्या ग्रीक हटवादी पाद्र्‍यानें असें प्रसिद्ध केले कीं, **रोमन** लोकांच्या एका सरदाराचें **पारथियन** लोकांच्या कुमारिकेशीं लग्न होऊन त्या जोडप्यापासून **हन्स** लोकांची उत्पत्ति झाली, अथवा तेराव्या शतकांतील एक जोग्यानें सांगितलें कीं, **जर्मन** लोकांतील एक सरदार **अरबस्थानांत** जाऊन राहिला आणि मक्का शहरांतील एका मुलीशीं त्यानें लग्न लाविलें होतें. ह्या दंपत्यापासून **मोंगल** लोक उत्पन्न झाले. असे बेताल तर्क अज्ञान काळांत लोक खरे मानितील, परंतु ज्ञानाचा जसजसा प्रसार होत जाईल, तसतसा ह्या तर्कांवरील लोकांचा भरंवसा उठेल. हिंदुस्थानांत कालांतरानें ज्ञानाचा प्रसार अधिक अधिक आकुंचित होत गेला, त्यामुळें ह्या ज्ञानयुगांतील उपहासार्ह तर्कांवर शेंकडो वर्षें लोकांचा भरंवसा राहिला.

ह्याप्रमाणें धर्म सूत्रांत, **आंबस्थ** हा ब्राह्मण पुरुष आणि वैश्य स्त्री ह्यांपासून, **उग्र** हा क्षत्रीय पुरुष

आणि शूद्र स्त्री यांजपासून, मागध हा शूद्र पुरुष आणि वैश्य स्त्री यांजपासून, चांडाळ हा शूद्र पुरुष आणि ब्राह्मण स्त्री यांपासून झाला, वगैरे लिहिलें आहे. बंगाल्यांत लाखो चांडाळ आहेत, त्यांची ज्यांस माहिती आहे त्यांस ठाऊक आहे कीं, ते मूळ राहणाऱ्या लोकांची एक उद्योगी जात, मासे मारण्याच्या, होडी हांकण्याच्या आणि शेतकीच्या कामांत मोठी तरबेज अशी आहे. ते लोक हिंदु सुधारणेच्या सपाट्यांत आले तसे ते हिंदु झाले. ह्याप्रमाणें हिंदूंतील हलक्या जाती उत्पन्न झाल्या आहेत. मूळच्या रहिवाशांचा प्रत्येक लोकसमुदाय हिंदुसुधारणेच्या आटोक्यांत जसजसा आला तसतशी त्याची एक निराळीच जात झाली.

ही एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, ह्या ज्ञानयुगापर्यंत धंद्यावरून होणाऱ्या जाती निरनिराळ्या झाल्या नव्हत्या. कुंभार आणि कोष्टी लव्हार आणि सोनार, सोन्याचे व्यापारी आणि गांधी ह्या ज्या अर्वाचीन काळांत निरनिराळ्या जाती आहेत त्या त्यावेळीं वैश्य ह्या एकच जातींत मोडत असत. परवशता आणि तिजपासून होणारा गुणऱ्हास यामुळें मुख्य एक जातीच्या लोकांत भेद व तूट उत्पन्न झालीं आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, अर्वाचीन हिंदुस्थानांत प्रत्येक धंदा करणाऱ्यांची एक निराळीच जात झाली. प्राचीनकाळीं हा भेद व ही फाटाफूट हिंदु लोकांस माहीत नव्हती.

खंड ३ रें.

शास्त्र आणि तत्वज्ञान.

ह्या काळच्या साहसी हिंदूंनीं आपले कायदे आणि समाजनिर्बंध ह्यांचें एकिकरण मोठ्या काळजीनें केलें इतकेंच नाहीं, परंतु त्यांनीं शास्त्र आणि तत्वज्ञान ह्यांचा प्रसार करण्यांत सोज्वल यश इतकें संपादिलें होतें कीं, त्याविषयीं पुष्कळ आश्चर्य वाटतें. ज्या साहसी स्वभावामुळें त्यांनीं पर्वत आणि रानें ओलांडिलीं व आपल्या गंगथडीच्या मूळ प्रदेशापासून हजारों कोसां-वर रहाणाऱ्या गैरमाहिती चमत्कारिक लोकांस जिंकून हिंदु केले, त्याच धाडसी स्वभावानें त्यांस शास्त्र आणि मानसिक विचारतरंग ह्या विषयांत प्रशस्तपणें शोध करण्यास लाविलें. दुसऱ्या राष्ट्रांनीं अर्वाचीन आणि प्राचीनकाळीं सुद्धां शास्त्रमीमांसा विशेष पूर्ण दशेस आणिली आहे. परंतु ज्ञानयुगांतील हिंदूंनीं पुढील लोकांच्या उपयोगास येणारे असे जे प्राथमिक शोध लाविले आहेत, अथवा जी शोधक बुद्धि दाखविली आहे, त्यापेक्षां कोणत्याही राष्ट्रानें कोणत्याही काळीं जास्ती शोध केले असतील अथवा जास्ती शोधक बुद्धि दाखविली असेल याविषयीं मोठा संशय आहे.

यज्ञक्रिया यथासांग होण्यास शब्दांचे शुद्ध उच्चार आणि विनचूक वाक्यरचना हीं अवश्य मानलीं जात, आणि ह्या विषयावर जें एकसारखें लक्ष देण्यांत आलें, त्यामुळें व्याकरणशास्त्राचा शोध लागला. हा शोध बहुतकरून हिंदुस्थानांत दुसऱ्या देशापेक्षां प्रथम झाला असावा असें वाटतें. हिंदुस्थानांतील अतिशय प्रख्यात वैयाकरणी जो **पाणिनी**, त्याच्या काळाविषयीं विद्वान् लोकांत बराच वादविवाद झाला आहे. व तो काळ ख्रिस्ताचे पूर्वीं सात आठ शतकें मागें होता असे मानिलें तर ती गोष्ट असंभवनीय होईल असें वाटत नाहीं. **पाणिनी**च्या पूर्वीही कित्येक वैयाक़रणी होऊन गेले होते, परंतु **पाणिनी**चा ग्रंथ इतका मोठा आणि पूर्ण आहे कीं, त्या विषयावरील पूर्वीच्या ग्रंथांस त्यानें अगदीं मागें टाकिलें आहे. चालू शतकांत युरोपांत महत्वाचा असा शोध लावण्यांत आला आहे कीं, आर्यांच्या भाषेंत जे लाखो शब्द आहेत. त्यांचें मूळ शोधिलें असतां ते थोड्याच मूळ शब्दांपासून निघाले आहेत असें सिद्ध करतां येतें. संस्कृत भाषेच्या संबंधानें हा शोध **पाणिनी** आणि त्याचे पूर्व वैयाकरणी यांनीं हिंदुस्थानांत पूर्वीच केला आहे. व्युत्पत्ति आणि पदरचना ह्यांविषयीं त्यानें केलेले नियम इतके पूर्ण आहेत कीं, त्यामुळें हिंदुस्थानच्या पवित्र भाषेस ठामपणा आला आहे.

स्थंडील करण्याकडेसही प्रथमच्या हिंदूंचें लक्ष वेधलें होतें, आणि त्यामुळें भूमितीच्या मूलतत्वांचा शोध लागला. तत्संबंधीं अगदीं प्रथमचे नियम शौर्ययुगांतील असावेत ह्यांत संशय नाहीं, परंतु ते प्रथमच पद्धतशीर एक ठिकाणीं केलेले असे ज्ञानयुगांतच सुल्वसूत्रांत आढळतात. स्थंडीलाचे अति प्राचीन माप $७\frac{1}{2}$ पुरुष समचौरस अथवा $७\frac{1}{2}$ चौरस चौकोन होय, ह्मणजे एका चौकोनाच्या प्रत्येक बाजूची लांबी हात उभा केलेल्या मनुष्याच्या उंची इतकी असे, दुसऱ्या आकृतीचे ह्मणजे, गोल अथवा त्रिकोनाकृती स्थंडील, एकंदर $७\frac{1}{2}$ **पुरुष मापाचें क्षेत्रफळ** कायम ठेवून, करावे लागत. ह्यानंतर स्थंडीलाचें मापांत फरक झाला तेव्हां एक समचौरस पुरुष माप, आकृतींत फेरफार न करतां वाढविण्यांत आलें व तिसरे वेळीं फेरफार झाला तेव्हां आणखी दोन पुरुष माप जास्ती वाढलें, वेळोवेळीं आणखी फेरफार झाले, तेव्हां दिलेल्या दोन अथवा अधिक चौकोनावरोबर एक समचतुष्कोन करावा लागे, अथवा दिलेल्या दोन समचौरस चौकोनांमधील अंतराचा एक समचौरस चतुष्कोन करावा लागे, अथवा दीर्घ चतुरस्त्राचे समचौरस चतुष्कोन आणि समचतुष्कोनाचे चतुरस्त्र करावे लागत, किंवा दिलेल्या समचतुष्कोनाचा अथवा चतुरस्त्रा इतक्या मापाचेच त्रिकोन तयार करावे लागत, आणि शेवटीं दिलेल्या समचतुष्कोनाच्या

क्षेत्रफळाबरोबर गोल काढावा लागला. हीं कृत्यें करण्यास भूमितीचें बरेंच चांगलें ज्ञान असलें पाहिजे हें सांगण्यास नको. ह्याप्रमाणें धर्मविधि यथासांग करण्याच्या संबंधांत भूमितीचा अभ्यास हिंदुस्थानांत सुरू झाला.

भूमितीच्या शास्त्राचा शोध ग्रीक लोकांत प्रथम निघाला असा लोकांचा साधारण समज आहे, आणि ह्या शास्त्रांचीं मूलतत्वें पिथागोरास यानें सहावें शतकांत शोधून काढिलीं असें ह्मणतात. परंतु सुल्वसूत्रें पिथ्यागोरासपेक्षां जुनीं आहेत, आणि शौर्यकाळांत केलेले नियम सुल्वसूत्रांपेक्षांही फार जुने आहेत. ह्या प्रमाणें व्हॉन् स्क्रयांडर आणि दुसरे विद्वान् गृहस्थ यांनीं जी माहिती आधारभूत मिळविली आहे, त्यावरून भूमितीचें ज्ञान दुसऱ्या कित्येक गोष्टींप्रमाणेंच पिथ्यागोरास यानें हिंदुस्थानापासून मिळविलें होतें ह्या गोष्टीविषयीं संशय रहात नाहीं असें होतें.

गणिताचें शास्त्र हिंदूंनीं शोधून काढिलें असें बऱ्याच लोकांनीं कबूल केलें आहे. दशांशरीति ग्रीक अथवा रोमन लोकांत नव्हती; त्यामुळें सर्व लोकांस दशांशाची रीत हिंदु लोकांपासूनच मिळाली. आरब लोकांनीं ती हिंदु लोकांपासून घेतली आणि त्यांच्याकडून ती युरोपांत गेली.

ज्ञानयुगांत ज्योतिष शास्त्राची काय प्रगति झाली तें आपणास समजत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे,

क़ारण त्या काळच्या ग्रंथांच्या ऐवजीं त्यानंतरच्या काळचे विशेष परिपूर्ण ग्रंथ राहिले आहेत. **पराशर** आणि **गर्ग** ऋषी, हे हिंदुस्थानांतील अतिप्राचीन प्रख्यात ज्योतिषी होत. **पराशर** हा शौर्यकाळांत होता; परंतु जे ग्रंथ ह्या ऋषींच्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत ते फक्त ख्रिस्ताच्या पूर्वीं एक किंवा दोन शतकें रचण्यांत आले आहेत.

वैद्यशास्त्रांत फार प्राचीनकाळीं हिंदु लोकांनीं चांगलें प्राविण्य मिळविलें होतें. आणि डाक्टर **वाइझ्** साहेबानें असें सिद्ध केलें आहे कीं, **हिपॉक्रेटिज**, जो युरोपांतील वैद्यशास्त्राचा उत्पादक, त्यानें औषधांचीं यादी हिंदूपासून घेतली. **ग्रीक** लोक हिंदुस्थानांत चौथ्या शतकांत आले तेव्हां हिंदु लोक रोग बरा करण्याचे कामांत कुशल आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें, आणि **ग्रीक** तकीवाच्यांनीं जे रोग बरे होत नसत त्यांवर औषध देण्यास हिंदु वैद्य आपल्या फौजेंत शिकंदरानें ठेविले होते. हें शास्त्र हिंदु लोकांस **आयुर्वेद** या नांवानें माहीत आहे; परंतु त्या विषयावरचे अति जुने ग्रंथ हल्लीं उपलब्ध नाहींत. फार जुने ह्मणून जे दोन ग्रंथ **चरक** आणि **सुश्रुत** हे उपलब्ध आहेत ते बहुतकरून ख्रिस्ती शकाच्या पूर्वीचे नसावेत.

ह्या युगांतील हिंदूंनीं मानसिक तत्वशास्त्र आणि तर्कशास्त्र ह्यांत अतिशय प्राविण्य मिळविलें. **कपिल**

मुनीचें सांख्यशास्त्र जें ख्रिस्ताचे पूर्वी सात शतकें रचिलें असावें, त्या विषयीं ड्याव्हिस साहेब ह्मणतो कीं, तत्वज्ञानावर तो अति प्राचीन ग्रंथ आहे. अलिकडील शोपेनहोर आणि हार्टमन ह्यांचें जर्मन तत्वशास्त्र हें, ह्या ड्याव्हिस साहेबाच्या मतें, "देहात्मवादासंबंधानें कपिलमुनीच्या तत्वशास्त्राची पुनरावृत्ति होय. व मुख्य मूलधोरण एकच असून तें ह्यांत फक्त परिष्कृत रूपानें दाखविलेलें आहे." खरोखर, ह्या अडीच हजार वर्षांत मानसिक तत्वशास्त्रांत मनुष्य जातीनें नवीन शोध मुळींच लाविला नाहीं.

कपिलमुनीच्या तत्वशास्त्राविषयीं माहिती ह्या लहानशा ग्रंथांत देणें दुरापस्त आहे. परंतु इंद्रियांच्या आणि मनाच्या व्यापारांचें वर्णन त्यानें केलें आहे, तें इतकें मार्मिक आणि शास्त्रीय तत्वज्ञानानें भरलेलें आहे कीं, त्याचें दिग्दर्शन येथें केलें पाहिजे. इंद्रियांवर फक्त भासनांचा ठसा होतो, मनास तो ठसा झाला अशी भावना होते. आपलें मन जर जागृत नसेल तर आपल्या अगदीं जवळ नाद होत असला तरी तो आपल्यास ऐकूं येणार नाहीं. अहंकारामुळें त्या भासंना "माझ्या" आहेत असें वाटूं लागतें आणि बुद्धि त्यांस निराळेपणा देतें व त्यांस कल्पनेचें स्वरूप आणतें. ह्या कल्पना आत्म्याकरितां आहेत. युरोपांतील तत्वज्ञानी ह्यांचें वर्णन असें करतात:—मनांत भासना

उत्पन्न होतात आणि तेथें त्यांस भावनांचें रूप येतें. अहंकार त्यांस 'ममत्व' देतो. बुद्धि त्यांस विचाराचें स्वरूप आणिते आणि सद्विवेक त्यांस आत्म्याकडेस पोंचवितो. एक हिंदु टीकाकार हेंच वर्णन अलंकारिक रीतीनें करितो, तें असें कीं, "गांवचा पाटील गांवकरी लोकांपासून कर वसूल करून प्रांताच्या अधिकाऱ्यास देतो, प्रांताचा अधिकारी तो पैसा घेऊन दिवाणाकडेस पाठवितो आणि दिवाण तो पैसा राजाच्या उपयोगाकरितां घेतो. तसें बाह्येंद्रियांपासून अंतरेंद्रियांवर भासना होतात, त्या तीं इंद्रियें मनाकडेस भावना रूपानें पाठवितात, तेथून त्या बुद्धिकडेस जातात, व ही बुद्धि जशी काय तीं चौकसनीस आहे आणि आत्मा हा कोणी राजा आहे, त्या राजाकरितां त्या भावना आपल्याकडेस घेते."

वाकी **कपील** मुनीचें मत असें आहे कीं, द्रव्य आणि आत्मा हीं दोन्हीं अविनाशी आहेत; आणि आत्म्यास पूर्ण ज्ञान होऊन मोक्ष मिळेपर्यंत तो पंचभूतात्मक पदार्थांशीं ह्मणजे स्थूल शरीराशीं गुंतलेला असतो. शेवटीं उपनिषदकारांप्रमाणेंच आत्म्यास योनिक्रमण अथवा पुनर्जन्म आहे असें **कपील** मुनीही मानीत असे, परंतु त्याचें शास्त्र अज्ञेयवादी आहे, कारण त्यानें असें मानिलें आहे कीं, तात्विकप्रमाणांनीं ईश्वराचें ज्ञान होण्यासारिखें नाहीं.

अज्ञेयवादी तत्व ज्ञानानें हिंदूंचें समाधान झालें नाहीं, आणि कपिलाच्या मागाहून शेकडों वर्षांनीं पातंजली यानें आपली योगविद्या प्रसिद्ध केली. योग विद्येंत मानसिक शास्त्रांतिल अस्सल असे विचार कांहींच नाहींत, परंतु त्यांत मनाचें पूर्ण आकर्षण करून तें सर्व परमेश्वराचें ज्ञान मिळविण्यांत लावणें हें मोक्ष मिळविण्याचें साधन होय असें सांगितलें आहे. पुढील काळांत ह्या योगविद्येचा ऱ्हास होऊन तींत अज्ञान, पोरकट आणि बहूत वेळा क्रूर अशा विधींचा समावेश झाला आहे.

गौतम, न्याय अथवा तर्कशास्त्राचा स्थापनकर्ता, हा बहुतकरून कपिल नंतर एक अथवा दोन शतकांनीं झाला असावा. प्रमाण व प्रमेय, कारण व कार्य हीं दोन्हीं घेऊन तो तर्क करण्यास सुरू करतो. त्यानें कारणांचे अथवा प्रमाणांचे चार प्रकार केले आहेत; ते प्रत्यक्ष, अनुमानिक, उपमान, आणि शाब्द ह्या पद्धतींत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, अवयवघटित वाक्यांची रचना करून अनुमान प्रमाण सिद्ध होतें. हिंदू लोकांच्या अवयव-घटित वाक्याचें उदाहरण खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

१ डोंगरास अग्नि लागला आहे,
१ कारण तेथून धूर निघतो,

१ जेथून धूर निघतो तेथें अग्नि असतो, जसें स्वयंपाक घर,
१ डोंगरावरून धूर निघत आहे,
१ ह्मणून तेथें अग्नि आहे.

ह्याप्रमाणें हिंदू लोकांच्या अवयवघटित वाक्यांचे पांच भाग असतात. ह्यांपैकीं प्रथमचे अथवा शेवटील दोन काढून टाकिले तर **आरिस्टॉटल** ह्याचे अवयवघटित वाक्य बरोबर रहातें. ही तर्कपृथ्थक्करण रीति ग्रीस देशांत व हिंदुस्थानांत एकमेकाशीं संबंध न ठेवितां स्वतंत्रपणें उद्भवली असेल असें मानणें कठीण आहे. आणि आह्मांस निःसंशय वाटतें कीं, ह्या शास्त्राची कल्पना प्रथम हिंदुस्थानांत उत्पन्न झाली आणि तें दुसऱ्या पुष्कळ शास्त्रांप्रमाणें, ग्रीक लोकांनीं आह्मांपासून घेऊन पूर्णतेस आणिलें.

गौतमा मागून **कणाद** झाला. त्यानें परमाणु तत्वज्ञान, ज्यास **वैशेषिक** ह्मणतात, तें सुरू केलें. ह्या शास्त्राचें मुख्य तत्व हें आहे कीं, सर्व द्रव्यमय पदार्थ परमाणु एकत्र होऊन उत्पन्न झाले आहेत. परमाणु हे नित्य आहेत. परंतु एकत्र झालेले परमाणु निरनिराळे झाले ह्मणजे त्यांनीं बनलेला जो पदार्थ तो नाश पावतो.

तत्व विचारांच्या ह्या शाखांनीं जुन्या मतांच्या हिंदूंस बावरविले, आणि ते आपली जुनी श्रद्धा व संप्रदाय कायम कसे राहतात त्याविषयीं चिंतातूर

झाले. त्यांनीं ह्या नव्या विचारांचा प्रतिबंध करण्यास आपल्या जुन्या श्रद्धा व संप्रदायास अनुसरून तत्व-ज्ञानांच्या नव्या दोन पद्धती सुरू केल्या. **मीमांसा** पद्धतीप्रमाणें जुन्या वदप्रतिपादित क्रिया करण्याची जरूर असे आणि **वेदांत** पद्धतींत प्रथम उपनिषदांत सांगितल्याप्रमाणें विश्वव्यापी परमात्म्याविषयीं अ-स्तित्व बुद्धि ठेवण्यास सांगितलें आहे. आजपर्यंत **कपिल, गौतम** आणि **कणाद** यांचे मतांचा अभ्यास थोडेच विद्वान् लोक करीत आले आहेत, परंतु बाकी सर्व हिंदुराष्ट्र असें मानितें कीं, सर्व जग हें विश्वात्म्यापासून झालें आहे, आणि तें सर्व परत त्याच्यांतच लय पावेल.

खंड ४ थें.

बौद्धधर्म.

हिंदुस्थानचें तत्वशास्त्र आणि विद्या ह्यांमुळेंच ह्या देशाचें वजन जगांतील इतर देशांवर पडलें होतें असें नाहीं. बुद्धिज्ञानविशिष्ट शोध हिंदुस्थानच्या लोकांनीं लाविले, ते ग्रीक लोकांनीं घेऊन त्या गुणी राष्ट्रानें पूर्णदशेस आणिले; व तो मौल्यवान् ठेवा युरोपांतील अर्वाचीन राष्ट्रांस मिळाला. परंतु **गौतम बुद्धाचा*** अत्युत्कृष्ट धर्म जो हिंदुस्थानांत ख्रिस्तापूर्वी सहावें शतकांत प्रसिद्ध झाला होता, त्यानें आशियांतील राष्ट्रें आपण एकधर्मी आहोंत अशा बुद्धीनें एकवटिलीं, असें खरोखर पाहतां ह्मटलें पाहिजे. हल्लीं बौद्ध धर्माचे पन्नास कोटी भक्त आहेत, ह्मणजे पृथ्वींत जी लोकवस्ति आहे त्यांपैकीं तृतीयांश लोक हा धर्म पाळणारे आहेत.

मागधांच्या संपन्न राज्याच्या वायव्य दिशेस **शाक्य** नांवाचे अप्रसिद्ध लोक रहात असत. हे लोक स्वतः बळवान नव्हते, परंतु त्यांच्या दोन्ही बाजूस रहाणारे

---

* **टीप**:—ह्या काळच्या पुष्कळ प्रसिद्ध पुरुषांचें आडनांव **गौतम** हें असे. धर्मसूत्रांचा लिहिणारा **गौतम**, तर्कशास्त्र रचणारा **गौतम** आणि **बौद्धधर्म** स्थापणारा **गौतम** हे निरानिराळे पुरुष होते, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेविली पाहिजे.

मागध आणि कौशल लोक ह्यांच्यांत एकमेकांविषयीं प्रतिस्पर्धा असल्यामुळें ह्यांस अनिश्चित स्वातंत्र्य भोगण्यास मिळत असे. ह्या लोकांच्या राजघराण्याचें आडनांव गौतम हें होतें, व त्यांचा राजा सिद्धार्थ यास गौतम अथवा त्याच्या लोकांच्या नांवावरून शाक्य ही ह्मणत असत. धर्म संस्थापक ह्मणून त्यास बुद्ध ह्मणजे " ज्ञाता " असें ह्मणत.

पूर्व वयांतच राजपुत्र गौतम यानें आपला राजवाडा, पत्नी आणि नवीन जन्मलेलें अर्भक यांस सोडून मनुष्य जातीस मुक्ति मिळण्याचा मार्ग कोणता तो शोधून काढण्याकरितां तो भटकणारा योगी बनला. गरीब प्राण्यांचे बळी द्यावे लागत, असे जे कित्येक हिंदुधर्म विधि त्यांचा त्यास तिटकारा आला. हिंदु तत्वशास्त्रांत त्यास पाहिजे होता तो उपाय मिळाला नाहीं. हिंदु प्रायाश्चित्तें आणि हिंदु इंद्रियदमन हीं पुष्कळ वर्षें त्यानें आचरल्यानंतर त्यास निरर्थकशीं वाटूं लागलीं. शेवटीं अनुद्विग्न चित्तानें ध्यान केल्यावर फार दिवस अभिलाषित असलेलें सत्य त्यास सांपडलें. शुद्ध आणि शांत आचरण व सर्व सजीव प्राण्यांविषयीं परोपकारबुद्धि आणि प्रेम हें धर्माचें रहस्य होय असें त्यास वाटूं लागलें. स्वोन्नति आणि भूतदया हा शोध त्यानें केला आणि हेंच बौद्ध धर्माचें सार आहे.

गौतम बुद्ध हा ख्रिस्तापूर्वी ५५७ वें वर्षीं

जन्मला आणि त्यानें आपला धर्म काशीमध्यें ख्रि. श. पवीं ५२२ ह्या वर्षीं प्रसिद्ध केला. तेथें त्यानें कित्येक लोक आपले अनुयायी केले, आणि नंतर तो मगध देशांत गेला. तेथें त्या वेळचा राजा बिंबिसार यानें त्याचा चांगला सत्कार केला. त्या पवित्रात्मा धर्मोपदेशकाच्या परोपकारी आणि शुद्ध आचरणानें आणि त्याच्या प्रगल्भ नीतिशास्त्रानें, जसजसा तो आपला निर्वाह दारोदार भिक्षा मागून करूं लागला तसतसे दररोज लोक त्याचे नवीन शिष्य होऊं लागले. डाक्टर ओल्डनबर्ज यानें हा पवित्र धर्मोपदेशक, त्याचे शिष्य आणि त्यांची दररोजचीं कृत्यें ह्यांचें हुबेहुब वर्णन केलें आहे. "तो आपल्या शिष्यांसहीत अरुणोदयाचें तेज आकाशांत चमकूं लागलें ह्मणजे लागलाच उठतो, अगदीं सकाळचा वेळ अध्यात्मिक अभ्यासांत अथवा आपल्या शिष्यांशीं संभाषण करण्यांत घालवितो आणि नंतर आपला शिष्यमेळा बरोबर घेऊन शहराकडेस जातो. त्याची कीर्ति ज्यावेळीं शिखरास पोहोंचली होती आणि त्याचें नांव हिंदुस्थानांतील अति प्रसिद्ध गृहस्थांत मोडत होतें, तेव्हां हा साधु पुरुष, ज्याच्यापुढें राजे लोक आपलीं मस्तकें नमवीत असत, दररोज तुंबा हातीं घेऊन एक शब्दही न बोलतां त्याच्या तुंब्यांत मूठभर भिक्षा पडेपर्यंत खालीं नजर करून दारोदार स्तब्ध उभा राहिलेला सर्व लोकांच्या नजरेस पडे."

हजारों लोकांनीं घरेंदारें सोडून ह्या धर्मपंथाचा स्वीकार केला, ज्ञातीभेदाचें लफडें झुगारून दिलें आणि फक्त शरीर रक्षणाकरितांच जे पदार्थ पाहिजे होते त्याशिवाय बाकीच्या सर्व ऐहिक वस्तूंचा त्याग केला. हे जे अवश्य लागणारे पदार्थ ते घेत असत ते सर्वांची सर्वसाधारण मालमत्ता ते समजत व सर्वजण मिळून त्यांचा उपभोग करीत. कांहीं काळानंतर बायका ह्या पंथांत मिळाल्या आणि त्या जोगिणी झाल्या. पुढें ह्या लोकांनीं बागबगीचे व अमराया मिळविल्या आणि आपल्या सोईकरितां विहार (मठ) बांधिले. गोसाव्यांचे निरनिराळे पंथ हिंदुस्थानांत फार जुन्या काळापासून अस्तित्वांत होते, परंतु मठवासी पंथाचा धर्म, हिंदुस्थानांत व सर्व जगांतही, हा बौद्ध धर्मच पहिला होय. ह्या धर्मपंथाप्रमाणें जोगी व जोगिणी एक संयुक्त मंडळीच आहे असे रीतीनें रहात, त्या सर्वांची त्यांच्या मालमत्तेवर सारखीच मालकी असे आणि त्या सर्वांस रहाण्याचे नियम व शासन हीं सारखींच असत.

हा मठपंथ ज्यांनीं स्वीकारला त्या शिवाय हजारो लोक गृहस्थाश्रमांत राहूनच बुद्धाचे शिष्य झाले. त्यांनीं आपलीं घरें अथवा मालमत्ता सोडिली नाहीं, व ते ज्या जातींत जन्मले तींतच राहिले; परंतु ह्या महान् धर्मोपदेशकाचीं धर्मतत्वें ते पाळीत व त्याचें थोर नीतिशास्त्र ते मानीत. बौद्ध धर्मी लोकांचा बहुतेक

भाग अशाच गृहस्थाश्रमी अनुयायांचा होता; ज्यांनीं ऐहिक जगाचा त्याग करून मठाश्रमाचा स्वीकार केला होता अशांची संख्या साहजिकच फार थोडी होती.

गौतम बुद्धानें आपला धर्म काशीमध्यें प्रथम प्रसिद्ध केल्यानंतर तो पंचेचाळीस वर्षेपर्यंत दरसाल आपल्या धर्मास नवीन अनुयायी मिळवीत देशोदेशी हिंडत होता व त्यानें मठाश्रमी अनुयायांकरितां व गृहस्थाश्रमी बौद्धांकरितां निरनिराळे नियम केले. **बिंबिसार** राजा मरण पावला आणि त्याच्या मागें **मागधां**च्या गादीवर प्रतापी **अजातशत्रु** हा बसला. हा नवा राजा मोठा शहाणा होता आणि त्यामुळें त्यास **गौतमा**सारख्या बहुसन्मान्य धर्मोपदेशकास राग आणणें अथवा त्याचा छल करणें ही गोष्ट बरोबर नाहीं असें वाटे. **गौतम बुद्ध** म्हातारा होऊन आपला अंत जवळ येत आहे असें त्यास वाटूं लागले तेव्हां आपला विश्वासू मित्र जो **आनंद** त्यास तो म्हणाला "मी आतां फार म्हातारा झालों आहे. माझा प्रवास संपत येत आहे. माझ्या आयुष्याची दोरी संपत आली आहे. माझें वयाचें ८० वें वर्ष पुरे होत आहे. म्हणून हे आनदा तूं स्वतः आपल्यास **ज्ञान**दीप हो, स्वतःस आश्रयदाता हो, बाहेरच्या वस्तूंचा आश्रय करूं नकोस, दीपासारखा सत्यास घट्ट धरून रहा, शरणागत त्रात्यास धरून रहातो त्याप्रमाणें सत्यास घट्ट धरून रहा."

एका लोहारानें आपल्या घरीं गौतमास बोलाविलें होतें त्याच्या तेथें जाऊन त्यानें त्याचा पाहुणचार घेतला. हें कृत्य त्याचें शेवटचें होतें. ह्या नंतर लागलाच तो आजारी पडला आणि मरण पावला. ह्याचें देहावसान होण्याचे वेळीं ऋतु नसतां झाडांवर मोहोर आला, त्याच्यावर स्वर्गांतून पुष्पवृष्टि झाली आणि आकाशांतून गानवाद्यांचा नाद ऐकूं आला. परंतु तो महान् धर्मोपदेशक आपल्या मित्राकडेस वळून ह्मणाला हे आनंदा, तथागताचा (बुद्धाचा) सन्मान करणें, त्यास पूज्य मानणें, त्याची उपासना करणें अथवा त्यास पवित्र समजणें हें अशा रीतींनीं होत नाहीं. परंतु जो धर्मबंधु अथवा जी धर्मभगिनी, जो धर्मशील गृहस्थ अथवा स्त्री, आपलीं लहान मोठीं कर्तव्यें नेहमीं करतो, ज्याचें आचरण शुद्ध आहे, जो ठरलेल्या नियमांप्रमाणें वागतो, त्याचीं अथवा तिचीं हीं कृत्येंच तथागताचा (बुद्धाचा) अति योग्य मान होय, त्याची खरी पूजा होय, त्याची उपासना होय व त्यास खरें पवित्र समजणें होय. हाचा बोध त्यानें जिवंत असतां केला आणि तोच त्यानें मरणसमयीं सांगितला. तो ख्रि. श. पूर्वी ४७७ वें वर्षीं मरण पावला.

गौतमानें जो बोध केला तो त्रिपिटकांत दाखल केला आहे. हें बौद्धलोकांचें धर्मपुस्तक होय.

ह्या तीन पिटकांपैकीं सुत्त पिटकांत गौतम बुद्धाचीं

स्वत:चीं कृत्यें आणि त्यानें स्वत: जो उपदेश केला तो सर्व लिहिला आहे. ह्या पुस्तकांत तो स्वत:च बोलत आहे व कोठें कोठें त्याचा शिष्य बोध करितो असें दाखविलें आहे. ह्या शिष्याच्या बोधांत बुद्धाचीं तत्वें गोविलीं आहेत व तीं बुद्धाच्या शब्दांनींच सांगितलीं आहेत असें म्हणतात.

विनयपिटकांत मठाश्रमाचे म्हणजे जोगी आणि जोगिणी ह्यांच्या आचरणाचे नियम सांगितले आहेत. आपला धर्म बाहेर पाडल्यानंतर पंचेचाळीस वर्षं पर्यंत **गौतम** जिवंत होता, तेव्हां ह्या पिटकांतील बहुतेक नियम त्यानें स्वत: घालून दिले असतील असें नि:संशय वाटतें. तसेंच बरेच किरकोळ नियम त्याच्या मरणानंतर झाले व ते ह्या पिटकांत दाखल झालेले आढळतात.

अभिधम्म पिटकांत निरनिराळ्या जगतांतील प्राण्यांची स्थिति, पंचतत्वें, प्राणअस्तित्वाचीं कारणें वगैरे निरनिराळ्या विषयांवर विवेचन आहे. हें बहुतेक **गौतमा**च्या मृत्यु नंतरचें आहे, परंतु तें त्याचीं मतें आणि मूळतत्वें जीं त्यानें घालून दिलीं होतीं त्यांस धरून आहे.

असें सांगतात कीं, **गौतम** मेला त्यावर्षीं त्याचे पांचशें शिष्य **मागधां**ची राजधानी राजगृह नगरी येथें जमले आणि **गौतमा**नें जो उपदेश केला होता तो आपल्या स्मृतींत ठसावा म्हणून त्यांनीं गाईला. ह्याच रीतीनें छापण्याची कला निघण्यापूर्वीं अथवा प्रसिद्ध

केलेले ग्रंथ लोकांस समजण्यापूर्वी धर्म पुस्तकाचे संरक्षण करण्यांत आलें आहे.

ह्या गोष्टीस शंभर वर्षें झाल्यावर ह्मणजे ख्रि. श. पूर्वी ३७७ वें वर्षी बौद्ध लोकांत तट पडले व दहा गोष्टींवद्दल मतभेद झाला. ह्मणून बौद्धांची दुसरी सभा भरली व वादग्रस्त गोष्टींचा निर्णय ठरला. हा निर्णय ज्यांस कबूल नव्हता अशा लोकांचा भरणा वराच होता. हा मतभेद मिटला नाहीं इतकेंच नाहीं, परंतु तो दिवसेंदिवस जास्ती होत गेला. उत्तरेकडील ह्मणजे **नेपाळ, तिबेट, चीन** आणि **जपान** येथील बौद्ध-धर्मी लोक हे ह्या विभक्त झालेल्या मंडळीचे वंशज होत, आणि दक्षिणेकडील ह्मणजे **सिलोन** (**लंकाबेट**) **ब्रह्मदेश** आणि **सियाम** येथील बौद्ध दुसऱ्या बाजूस अनुसरणारे आहेत.

ह्या गोष्टीस सुमारें एक शतक लोटल्यावर महान् **अशोक**, जो त्या वेळीं **मागधां**चा व उत्तर हिंदुस्थानचा चक्रवर्ती राजा होता, त्यानें बौद्ध लोकांची तिसरी सभा ख्रि. श. पूर्वी २४२ चे सुमारास भरविली. त्यावेळीं एक हजार जोग्यांनीं पुन्हां एक वेळ धर्मसूत्रें गाइलीं. त्यानंतर **अशोक** राजाचा मुलगा किंवा पुतण्या लंका बेटांत गेला आणि त्यानें तेथें बौद्धधर्माची सुरुवात केली. पुढें ख्रि. श. पूर्वी ८८ ह्या वर्षीं बौद्धधर्माचीं सूत्रें जीं त्या वेळेपर्यंत तोंडपाठच ह्मणत असत तीं लिहिण्यांत

आलीं. लंका येथील त्रिपिटक म्हणून हल्लीं जे ग्रंथ विद्यमान आहेत तेच ह्यावेळीं लिहिलेलीं लिखित पुस्तकें होत.

ह्या संक्षिप्त हकीकतीवरून ध्यानीं येईल कीं, लंका येथील त्रिपिटक ज्यावरून गौतम बुद्धाच्या उपदेशाची माहिती आपणास मिळतें, त्यांत लिहिलेलीं त्याचीं खरीं मतें व सूत्रें होत. हिंदु लोकांनीं आपली विद्या आणि पवित्र सूत्रें हीं शेंकडोच्या शेंकडो वर्षें फक्त स्मृती प्रदेशांत कशी संरक्षिलीं, वेदासारख्या अति जुन्या काव्याचा प्रत्येक शब्द, प्रत्येक पद आणि प्रत्येक मात्रा ह्यांत यत्किंचित फेरफार होऊं न देतां तीं, आपलीं सर्व आयुष्यें ज्यांनीं प्राचीन सूत्रें परंपरागतीनें चालविण्याच्या धंद्यांत खर्च केलीं अशा लोकांनीं कसे रीतीनें रक्षिलीं, आणि हल्लींही छापण्याची कला माहीत असून छापलेलीं पुस्तकें अल्प मुल्यानें मिळत असतां हिंदु लोक आपली पवित्र सूत्रें पिढ्यान पिढ्या अद्याप तोंडपाठ करून शिकतात, ह्या गोष्टी ज्यांस चांगल्या माहीत आहेत त्यांस गौतम बुद्धाचा उपदेश, त्याच्या मरणानंतर ख्रि. श. पूर्वीं २४२ वें वर्षीं मोठ्या समेंत नक्की होऊन ख्रि. श. पूर्वीं ८८ वें वर्षीं लंका येथें पालीभाषेंत लिहिला जाईपर्यंत, थोडीं शतकें लोकांनीं गाऊन व स्मृतींत ठसवून जसाचा तसाच रक्षिला, ह्या गोष्टीचें आश्चर्य वाटणार नाहीं. आणि म्हणून दक्षिणे-

कडील धर्म पुस्तकांत बुद्धाचा धर्मोपदेश बरोबर रीतीनें लिहिला आहे असें संशायरहीत मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

उत्तरेकडील ग्रंथ अर्वाचीन आहेत व गौतमाच्या मूळ उपदेशापासून त्यांत फेरफार झाल आहेत असे स्पष्ट दिसतें. हिंद्वेतर राष्ट्रांनीं हे ग्रंथ रक्षून ठेविले आहेत. लंका येथील लोकांपेक्षां ह्या लोकांत बौद्ध धर्म उशिरानें पसरला. चीन देशांत इ. सनाच्या दुसऱ्या पासून चौथ्या शतकापर्यंत आणि जपानांत सहाव्या शतकांत हा धर्म सुरू झाला. ह्यावरून गौतमाचा मूळ उपदेश कोणता हें पाहणें असेल तर तो लंका येथील बौद्ध लोकांच्या पुस्तकांत पाहवा हें जास्ती बिनधोक आहे. हिंदु लोकांनीं फार वर्षांवर बौद्धधर्म सोडून हिंदुधर्म पुन्हा स्वीकारला असल्यामुळें बौद्धधर्माचीं पुस्तकें त्यांच्याजवळ राहिलीं नाहींत.

आह्मीं वर सांगितलें आहे कीं, गौतम यास वेदांतील बलिदानविधि नापसंत होता, कारण त्यांत जनावरांची हत्त्या करावी लागे. त्याचप्रमाणें प्रायश्चित्ताचा प्रकार त्यास अमान्य होता, कारण तो निरुपयोगी आहे अशी त्याची समजूत होती. ह्यावरून त्या माहात्म्याची इच्छा हिंदुधर्म सर्वस्वी नाकारून त्याच्या ऐवजीं आपला नवा धर्म स्थापन करण्याची होती असें मानणें ही चूक आहे. आपल्या देशाचा आणि राष्ट्राचा धर्म प्रथम

शुद्ध होता तसा तो पुन्हा करावा अशी त्याची उलट समजूत होती. तो ज्यावेळीं आपला बौद्धधर्म शिकवीत असे, तेव्हां त्याची अशी कल्पना होती कीं आर्य धर्माचें अस्सल आणि शुद्ध असें जें स्वरूप आहे तें मी लोकांस शिकवीत आहें.

त्याच्या मुख्यमुख्य मतांचें जर निरीक्षण केलें तर बौद्धधर्म हा हिंदूचा अति प्राचीन जो धर्म होता त्यां-तून निघाला आहें असें त्यावरून दिसतें. हिंदुधर्मानें कबूल केलेले व मान दिलेले जे योगी व वैरागी ह्यांच्या रहाणीवरून बौद्ध लोकांच्या मठाश्रमाची संस्था निघाली, व हा क्रम स्थापन झाल्यानंतरही शेकडों वर्षेपर्यंत मठाश्रमवासी जोगी व जोगिणी ह्यांस, बैरागी लोकांचें शेंकडों पंथ हिंदुस्थानांत चालत होते, त्यांतील एका नवीन पंथांतील होत असें हिंदुलोक मानीत असत. बौद्ध लोकांचें **कर्ममत** ह्मणजे ह्या जन्मांतील प्रत्येक कृत्याचें फळ पुढील जन्मांत मिळतें असें मानणें हें, जन्मांतराबद्दल हिंदु लोकांच्या ज्या कल्पनेचा प्रथमतः उपनिषदांत उल्लेख आहे व जी हिंदु तत्वशास्त्रानें मान्य केली आहे, त्या कल्पनेचें रूपांतर होय. **निर्वाण** अथवा निष्पाप अस्तित्वाची प्राप्ती हें, उपनिपदांत सांगितलेली **मुक्ति** ह्मणजे प्रत्येकाचा आत्मा परमेश्वर रूपांत मिळून जाणें ह्मणून हिंदु लोकांची जी कल्पना आहे, तीवरून निघाले आहे. आणि शेवटीं हिंदूंच्या ब्रह्मा,

इंद्र, वगैरे देवांसही साधारण बौद्ध लोकांच्या धर्मांत जागा मिळाली. बौद्धांच्या साधारण लोकसमूहाची अशी समजूत आहे कीं, देव आणि मनुष्य हे दोघेही सुखस्थिति जें **निर्वाण** तें मिळविण्याच्या प्रयत्नांत आहेत, व निष्पाप रहाणी हाच बौद्ध लोकांचा स्वर्ग व मुक्ति होय.

ह्याप्रमाणें बौद्धधर्माचा पाया हिंदुधर्मावर रचला असून तो धर्म मोठ्या धर्मांपैकीं एक होऊन राहिला आहे. त्या धर्मास कोट्यानकोटी लोक मिळाले त्याचें कारण त्यांतील एक विलक्षण गुणविशेष होय. हें विशेष लक्षण असें आहे कीं, ह्या धर्मांत निष्पाप आचरण ही गोष्ट सर्वांपेक्षां श्रेष्ठ गणली आहे. ही निष्पाप रहाणी-हें निर्वाण-मिळविण्याकरितां अनेक जन्मांत देव, देवदूत आणि मानव हे जबरदस्त प्रयत्न करीत आहेत, आणि ती रहाणी देव व देवदूत ह्यांच्यापेक्षां श्रेष्ठ आहे. ह्मणूनच **गौतम** बुद्ध, ज्यास ह्या निर्वाणाची प्राप्ती ह्या जन्मांत झाली होती, तो देव व मनुष्य ह्या दोघांसही सारखाच पूज्य होता आणि ह्मणूनच तो सर्व सन्मानाचा आणि उपासनेचाही केंद्र होता. सर्व सजीव प्राणी वर्ग, निरनिराळ्या जगामध्यें, निरनिराळ्या प्राणीकोटींत आणि निरनिराळ्या स्थितींत, **गौतमानें** जीवंत असतां जें प्राप्त करून घेतलें तें मिळविण्याकरितां प्रयत्न करीत आहे. याकरितां आचारांत आणि धर्मांत जें जें कांहीं उत्तम तें तें बुद्ध

होय असें बौद्धांचा धर्म ह्मणतो. बौद्धधर्मी मनुष्य हा मानव बंधुवर प्रीति करितो, तो देव हे आपल्यां सारखेच एकच इष्ट हेतु साधण्याच्या खटपटींत आहेत असें समजतो, **बोधिसत्व** ह्मणजे ज्यांनीं अनेक जन्मानंतर बुद्धाचे खालोखालची स्थिति संपादन केली असे साधु त्यांस तो भजतो, परंतु त्याची अखेरची मुख्य कल्पना बुद्धाची ह्मणजे निष्पाप आणि पवित्र अशी स्थिति होय. हिच्यापेक्षां अधिक उंच, अधिक श्रेष्ठ अथवा विशेष पवित्र असें कांहींही नाहीं आणि हिच्याकडे सर्व प्राणीवर्गाचा ओघ आहे. मानवप्राणी आपल्या प्रयत्नांनीं इहलोकींच मिळवूं शकतो अशी निष्पाप रहाणी सर्व सृष्टींतील शक्तींपेक्षां व प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ आहे असें मानणें, ही जी उदात्त आणि मानस-चकीत करणारी कल्पना तीच, शुद्धता व पवित्रता ह्यांविषयींच्या **गौतमा**च्या धर्माच्या श्रेष्टत्वाची साक्ष देत आहे.

बौद्ध धर्म हाही अस्थित्वाची निष्पाप स्थिति प्रयत्नांनीं मिळविण्याच्या क्रमाची पद्धत आहे. ह्या धर्माचीं मुख्य तत्वें चार आहेत. १ हें जीवित दुःख-दायक आहे. २ जीविताची अपेक्षा ठेवणें हें दुःखाचे कारण आहे. ३ ह्याची निवृत्ति हेंच दुःखाचें निर्मूलन होय. ४ **मोक्ष** स्वकर्तव्य करून मिळतो. ह्या मो-क्ष्याच्या मार्गास अष्टपदी ह्मटलें आहे त्याचें कारण असें

आहे कीं, त्यांत खरी श्रद्धा व योग्य आशा ठेवण्यास, सुभाषण बोलण्यास आणि चांगली वर्तणूक राखण्यास सांगितलें आहे; तसेंच त्यांत चोख रहाणी, वाजवी उद्योग, चांगले विचार आणि निजध्यास करण्यास उपदेश केला आहे. ह्या मार्गास मध्यम मार्गही ह्मटलें आहे, कारण त्यानें एक तर विषयाचा त्याग आणि दुसरें निष्प्रयोजक प्रायश्चित्तें व देहदंड टाळण्यास सांगितलें आहे. स्वोन्नती विषयींचे नियम फार सूक्ष्म विचारानें आणि परिश्रमानें केलेले आहेत; परंतु येथें बौद्धधर्माच्या मुख्य तत्वांचेंच विवेचन करणें आहे सबब त्या नियमांचा विचार करण्याकडेस आपणास वळण्याची जरूर नाहीं.

ह्याप्रमाणें फार दिवस प्रयत्नांनीं स्वोन्नत्ति करून घेऊनच निर्वाण मिळूं शकतें व हें निर्वाण ह्मणजे निष्पाप रहाणी हाच बौद्ध लोकांचा स्वर्ग होय.

" ज्यानें आपला प्रवास पुरा केला आहे, ज्यानें शोक सोडून दिला आहे, व सर्व बंध झुगारून देऊन जो सर्वतोपरी मोकळा झाला आहे त्यास दुःख होत नाहीं."

" त्यांचे विचार निश्चित होऊन नंतर ते जातात, त्यांच्या रहाण्याच्या ठिकाणाविषयीं त्यांस मोह वाटत नाहीं. राजहंसपक्षी सरोवर सोडून जातात, त्याप्रमाणें ते आपलें ठिकाण व घर यांचा त्याग करितात."

"जो मनुष्य खऱ्या ज्ञानानें मुक्त झाला आहे, जो शांत आहे, त्याचे विचार स्थिर असतात, त्याचा शब्द व त्याचीं कृत्यें अक्षुब्ध असतात."

हें ध्यानांत येईल कीं, बौद्ध लोकांचें **निर्वाण** ह्मणजे ह्याच जन्मांतील पवित्र आणि सुख संपन्न स्थिति होय. परलोकांतील ह्मणजे स्वर्गांतील आनंदी व सुखी स्थिति नव्हे. **निर्वाण** प्राप्त झाल्यानंतर पुढील स्थितीच्या आशेबद्दल बौद्धधर्मपुस्तकांत कांहीं लिहिलेलें नाहीं. बौद्ध मनुष्य निर्वाणाच्यापुढें दृष्टी फेकीत नाहीं. स्वर्गांतील आनंद व विषयसुख ह्याबद्दल त्याचें मन लालचत नाहीं, व कल्पित पारितोषिक त्याच्या अपमतलबी स्वभावास ओढीत नाहीं. बौद्धाच्या सर्व आशेचें आणि प्रयत्नांचें सर्व पर्यवसान **निर्वाण** ह्मणजे निष्पाप रहाणीची स्थिति प्राप्त होणें हें होय.

ही निर्वाण स्थिति मनुष्य मिळवूं शकला नाहीं तर त्यास पुनर्जन्म घ्यावा लागतो. बौद्ध लोक आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवीत नाहींत; परंतु जन्मांतराची जी हिंदु लोकांची कल्पना आहे ती ते खरी मानतात. त्यांची कल्पना अशी आहे कीं, मनुष्याचें कर्म ह्मणजे त्याची कृति, हिचा नाश होत नाहीं, परंतु दुसरे जन्मांत तिचा वास्तविक परिणाम घडून येतो. प्रत्येक धार्मिक बौद्ध असें मानितो कीं, मागील जन्मीं ज्याप्रमाणें आपली कृति असेल त्या मानानें प्रस्तुत जन्मांत

आपली स्थिति राहील. अशी त्यांची कल्पना आहे, परंतु मनुष्यास आत्मा नसेल तर जो मनुष्य मरण पावला तोच दुसरे जन्मीं अवतरला असें दाखविण्यास काय साधन आहे? ह्याचें उत्तर बौद्धधर्मी मनुष्य असें देतो कीं, "मनुष्याचे विचार आणि बोलणें ह्मणजे त्याचें कर्म ह्यांत जें कांहीं तो मरण पावल्यावर नाश पावत नाहीं व जें तत्वरूपानें रहातें तेंच साधन होय."

ह्याप्रमाणें बौद्ध धर्मांतील कित्येक मुख्य मुख्य मतें आहेत, परंतु अशा निव्वळ मतांकडेस मनुष्य जातीचें लक्ष वेधतें किंवा त्यांनीं राष्ट्रांचीं राष्ट्रें एकवटतात असें नाहीं. बौद्धधर्माचा मोहकपणा त्यांतील सर्व प्राधान्य पवित्रता, त्याची उत्कृष्ट नीति आणि सदाचरण ह्यांत आहे. हा धर्म नीति नियमांनीं प्रचुर व आज्ञा, महात्में, दृष्टांत आणि चारित्रें यांनीं मरपूर भरलेला असा आहे. सर्व धम्मपिटक हें अस्वार्थ दृष्टि, परोपकार, प्रीति आणि दया हे गुण मनांत बिंबवणाऱ्या अशा सदाचरणाच्या नियमांचा साठा आहे. त्यांतील कित्येक वचनें उदाहरणार्थ येथें देतों:—

५ "द्वेषानें द्वेष कधींही शमत नाहीं; प्रीतीनें तो शमतो हा त्याचा नैसर्गिक गुणच आहे."

५.१ "जो बोलल्या प्रमाणें वागत नाहीं त्याचे सुंदर आणि वायफळ शब्द सुवासरहीत रंगयुक्त सुंदर पुष्पाप्रमाणें होत."

५५ "चांगल्या कृत्यांचा सुवास चंदनाच्या अथवा तगरीच्या पुष्पाच्या वासापेक्षां आणि कमल अथवा वसिक फुलांच्या सुवासापेक्षां मधुर आहे."

१४१ "ज्या मनुष्यानें आपल्या वासना जिंकिल्या नाहींत त्यास, नग्नपणा धारण केल्यानें, जटाधारी बनल्यानें, दुर्गंधी अंगास लावी-ल्यानें, उपासानें अथवा जमीनीवर पडून राहिल्यानें, अंगास राख चोळल्यानें अथवा स्तब्ध बसल्यानें, पवित्रपणा येत नाहीं."

१८३ " पापाचरण न करणें, सत्कृत्य करणें, आणि आपलें मन निर्मल करणें हा बुद्धांचा उपदेश होय."

१९७ " आपला द्वेष करतात त्यांचा द्वेष न करितां आपण सुखानें राहूं या, जे लोक आपले द्वेष्टे आहेत त्यांच्यांत द्वेषरहीत आपण राहावें."

२२३ " मनुष्यानें प्रीतीनें रागाचें शमन करावें व चांगलें कृत्य करून वाईटास जिंकावें. लोभी मनुष्यास औदार्यानें आणि लुच्च्यास सत्य मार्गानें आपलें अंकीत करावें."

२५२ " दुसऱ्याचे दोष सहज नजरेस येतात परंतु स्वतःचे दोष समजणें कठीण आहे

मनुष्य आपल्या शेजाऱ्याचे दोष भूसा प्रमाणें पाखडून काढितो; परंतु फसव्या मनुष्य जुगार प्रीय मनुष्यापासून आपले फांसे जसे लपवीत असतो त्याप्रमाणें दरेक मनुष्य आपले दुर्गुण छपवीत असतो."

गौतमानें आपल्या अनुयायांच्या मनांत मानवी जातीविषयीं प्रीति आणि दया हजारो दृष्टांत देऊन बिंबविली, त्याबद्दल ह्या लहानशा पुस्तकांत लिहिणें मुष्कील आहे. एक उदाहरण दिलें असतां पुरें होईल ह्मणून आह्मी कौशलांचा राजपुत्र दिधावू याची गोष्ट येथें देतों.

काशीचा राजा ब्रह्मदत्त हा द्रव्यानें श्रीमंत होता, त्याजपाशीं सैन्य मोठें होतें, त्याचे रथ पुष्कळ होते व त्याचें राज्य विस्तीर्ण असे. कोशलांचा राजा दिघीती याजपाशीं द्रव्य थोडें होतें, त्याचें सैन्य लहान असे, रथ थोडे होते आणि त्याचें राज्य संकुचित होतें.

सर्व साधारण नियमाप्रमाणें प्रबल राजानें निर्बल राजाचा पराभव करून.त्याचा खजीना आणि राज्य हरण केलें. त्यामुळें पराजीत राजानें पळून जाऊन आपला बचाव केला. त्यास दिघावू ह्मणून एक मुलगा झाला तो कांहीं काळानें मोठा झाला.

हद्दपार झालेल्या राजाचा सुगावा लागल्यावर त्यास धरून त्याचा प्राण घेण्यांत आला. त्या राजानें

मरण समयीं आपल्या पुत्राकडेस पाहिलें आणि अमानुषि क्षमा मनांत आणून त्यास ह्मटलें "माझ्या प्रीय दिघावू, द्वेषानें द्वेष शमत नाहीं तो प्रीतीनेंच शमतो."

त्या मारलेल्या राजाचा तरुण राजपुत्र रानांत गेला आणि तेथें रडला. शेवटीं त्यानें आपल्या बापाच्या मृत्यूचा सूड उगवण्याचा मनांत निश्चय करून आपल्या बापास मारविणाऱ्या राजाच्या अश्वशाळेंत नोकरी पत्करिली.

पहाटेस लौकर उठून तो गाऊं लागला. त्याचा स्वर इतका मधूर होता कीं, राजानें त्यास बोलावून, तो कोण आहे हें न जाणतां,त्यास आपला खिजमतदार केला.

पुढें एकदां राजा शिकारीस गेला तेव्हां त्यानें दिघावूस बरोबर नेलें होतें. दिघावूनें सैन्य गेलें त्या रस्त्यानें राजाचा रथ न नेतां दुसऱ्या बाजूस नेला. शेवटीं राजा अगदीं थकून जाऊन त्यानें आपलें डोकें दिघावूच्या मांडीवर ठेवून तो झोपी गेला.

ह्याच प्रसंगाची वाट तो कपटवेशी राजपुत्र फार दिवस पहात होता आणि सूड उगविण्याबद्दल विचार त्याच्या मनांत येऊं लागले. त्यास वाटलें कीं, "ह्यानें आमचें राज्य, आमचा खजीना, आमची फौज आणि आमचे रथ हरण केले आहेत, आणि हा माझ्या बापाच्या आणि आईच्या प्राणांचा हर्ता आहे. माझ्या द्वेषाग्नीची शांती

करण्याचा हा समय आहे." असें ह्मणून त्यानें आपली तरवार म्यानांतून बाहेर काढिली.

परंतु बापाच्या आठवणी बरोबरच त्याच्या शेवटच्या शब्दांचें त्यास स्मरण झालें. "**माझ्या प्रीय दिघावू, द्वेषानें द्वेष शमत नाहीं, तो प्रीतीनेंच शमतो**" ही आपल्या बापाची शेवटची आज्ञा तिचें उल्लंघन त्याच्यानें करवेना आणि त्यानें आपली तरवार म्यानांत परत घातली.

राजास मयंकर स्वप्न पडून तो जागा झाला. तेव्हां त्या वेशधारी कोशल राजपुत्रानें झालेली सर्व हकीकत त्यास सांगितली. ती ऐकून व त्या राजपुत्राचें औदार्य पाहून त्या दुष्ट ब्रह्मदत्त राजाच्याही मनास चमत्कार वाटला आणि त्यानें त्या राजपुत्राच्या बापाचें राज्य, खजीना व फौज त्यास परत देऊन वर आपली मुलगी-ही दिली.

हा दृष्टांत पुरा केल्यावर **गौतम** ह्मणाला "अहो जोग्यांनों, राजे लोक, ज्यांच्या हातीं राजवेत्र आणि तरवार असते, ते जर इतकी क्षमा आणि शांती दाखवितात तर तुमच्यामध्यें तर ती पुष्कळपट अधीक असली पाहिजे. हे जोग्यांनों, तुमचें ज्ञान जगास अशा रीतीनें दाखवा कीं, चांगलीं मतें आणि योग्य अनुशासन यांनीं युक्त अशा धर्म मार्गाची दीक्षा तुह्मी घेतली असल्यामुळें तुमच्यांत दया आणि शांती ह्या वास करीत आहेत."

आह्मी आणखी एक गोष्ट सांगणार आहोंत ती सूनीत ह्मणून बौद्ध लोकांचा एक धर्माधिकारी होता त्याच्या संबंधानें खरोखर घडलेली आहे. तीपासून, ज्ञातीच्या पद्धतीमुळें, पादाक्रांत झालेल्या लोकांस बौद्धधर्म हा आपली मुक्ति करणाराच कसा वाटूं लागला, आणि त्या धर्माचे अनुयाची प्रथम हिंदुस्थानांतील आणि नंतर आशियाच्या दुसऱ्या बहुतेक देशांतील गरीब व नीच जातीचे कोट्यावधी लोक कसे झाले, ह्याची कल्पना येईल.

स्वतःविषयीं सूनीत ह्मणतो कीं, "मी गरीब कुटुंबांत जन्मलों होतों. मी फार गरीब आणि द्रव्यहीन होतों. मला काम करावें लागत असें तेंही फार हलकें ह्मणजे वाळलेलीं पुष्पें झाडण्याचें असे. मनुष्यांत मला फार नीच असा मानीत, माझा तिरस्कार करीत आणि मला कोणीही मान देत नसे. मी अतिशय नम्र मुद्रेनें हजारों लोकांस मान देत असे. एके दिवशीं मागध देशांतील एका मोठ्या शहरांतून जोगी लोकांच्या मेळ्यासहीत जातांना सर्वमान्य बुद्धास मीं पाहिलें, तेव्हां ओझें फेकून देऊन त्यास अति नम्रतेनें नमस्कार करण्यास मी धांवलों. तो मानवांत अति श्रेष्ठ मनुष्य माझेविषयीं मनांत दया आणून उभा राहिला. त्या माझ्या धन्याच्या पायाशीं मीं लोटांगण घातलें, उठून त्याच्या जवळ गेलों, आणि सर्व प्राण्यांत जो अति

श्रेष्ठ त्यास विनंती केली कीं, मला जोगी करावें. मग तो दयाळू धनी मला ह्मणाला कीं 'हे जोग्या इकडे ये.' हीच काय ती दीक्षा मला मिळाली."

आशियांतील राष्ट्रांस प्रीय वाटून त्यांत पसरलेला व मक्तीनें भरलेला जो धर्म त्याविषयीं कल्पना मोठ-मोठ्या ग्रंथापेक्षां अशा साध्या दृष्टांतांनीं आणि गोष्टींनीं जास्ती स्पष्ट मनांत येते.

चतुर्थ युग—बौद्धकाळ.

मागधांचें वर्चस्व.

ख्रि. श. पूर्वी ३२० पासून इ. स. नंतर ४०० पर्यंत.

खंड १ ले.

मागधीसाम्राज्य.

शिकंदर बादशहाचा समकालीन जो **चंद्रगुप्त** त्याच्या वेळेपासून हिंदुस्थानच्या इतिहासास नवीन स्वरूप आलें होतें. आह्मीं मागें सांगितल्याप्रमणें **चंद्रगुप्त** हा **आलेक्झ्यांडर**च्या गोटांत कांहीं वेळ होता, व तो विजयी **मासिडोनीयन** परत फिरल्या नंतर **चंद्रगुप्त मागध** देशाच्या गादीवर बसला. त्यानें **पंजाब** व वायव्येकडील प्रांत हे बहार प्रांतास जोडले, **ग्रीक** लोकांनीं काबीज केले होते त्यां-पैकीं पुष्कळ प्रांत **सेल्युकस** याजपासून परत जिंकिले आणि **सिंधुनदा**पासून **बहार** प्रांतापर्यंतचा उत्तर हिं-दुस्थानचा सर्व मुलूख एका प्रबल छत्राखालीं आणिला. ही गोष्ट भरतखंडाच्या इतिहासांत प्रथमच घडली. त्यानें **सेल्युकस**ाबरोबर तह केला, त्याच्या

ग्रीसीयन मुलीशीं लग्न लाविलें आणि त्या ग्रीसीयन राजाच्या मेगास्थनीस या वकीलास आपले दरबारीं सहूं दिलें.

मेगास्थनीस हा ख्रि. श. पूर्वी ३१७ पासून ३१२ पर्यंत ५ पांच वर्षें भरतखंडांत होता, आणि त्याच्या ग्रंथांचे जे तुटक भाग हल्लीं उपलब्ध आहेत, त्यावरून चंद्रगुप्ताची शक्ति किती होती आणि त्याच्या राज्य-कारभाराची पद्धत कशी होती, त्याविषयीं कांहींशीं कल्पना करितां येते. शहरचा राज्यकारभार पाहण्या-करितां सहा प्रकारचे अधिकारी राजाधिराज जो चंद्रगुप्त याजकडून नेमण्यांत येत असत. एक अधिकारी औद्योगिक शिल्पकलांवर नजर ठेवीत असे. ह्या शास्त्रांतील प्रविणतेविषयीं हा देश अति प्राचीनकाळा-पासून प्रसिद्ध आहे. दुसरे वर्गांतिल अधिकारी परकीय देशांतील लोकांची सरभरा करीत असत, ह्मणजे त्यांस रहाण्यास जागा नेमून देत आणि त्यांच्या रहाणीवर नजर ठेवीत. तिसऱ्या वर्गांतील कामदार कर घेण्या-करितां जन्ममृत्यूची नोंध ठेवीत असत. चौथे वर्गांतील कामदार व्यापारधंद्यावर नजर ठेवीत, मापें आणि वजनें तपाशीत आणि प्रत्येक मोसमेंत उत्पन्न झालेल्या पदार्थांच्या विक्रीची व्यवस्था लावीत असत. पांचवे अधिकारी त्याचप्रमाणें देशांत तयार केलेल्या पदार्थां-च्या विक्रीची व्यवस्था लावीत आणि सहावा वर्ग जे

सर्व पदार्थ विकले जात त्याच्या विक्रीवरील कर गोळा करीत.

अशाच प्रकारचे अंमलदार ग्राम्य प्रदेश व खेड्यापाड्यांकरितां नेमीत असत. ते नद्यावर देखरेख ठेवीत, जमिनी मोजीत, मुख्य कालव्यांतून लहान लहान पाटांत शेतकीकरितां पाणी सोडण्याचे जे बंधारे असत त्यांजवर तपास ठेवीत, आणि पारधी लोकांस पारितोषिकें देत. सरकारचा सारा वसूल करणें, जंगल तोडणारे, सुतार, लोहार, खाणींत काम करणारे ह्या लोकांच्या कामावर नजर ठेवणें, आणि सार्वजनीक रस्ते करणें हीं कामेंही ते करीत असत.

फौजेचे सहा भाग असत. त्याचप्रमाणें लष्करी अमलदारांचे सहा वर्ग होते. पहिला भाग आरमार हा असे, दुसरा भाग लढाईचीं यंत्रें व मोदीखान्याचे जिन्नस वाहून नेणाऱ्या बैलांच्या रांगा, तिसरा पायदळ, चौथा घोडेस्वार, पांचवा लढाईचे रथ आणि सहावा भाग हत्तीखाना हा होता.

एरियनानें आर्य लोकांच्या सैन्याची हकीकत जास्ती खुलासेवार दिली आहे. प्रत्येक पादातीजवळ मनुष्याच्या लांबीचें धनुष्य असे. तें तो जमिनीवर उभे करी, डाव्या पायानें दाबून धरी, आणि तीन पावलांपेक्षां किंचित् कमी लांब असे बाण त्यांतून सोडी. ह्या बाणांच्या पुढें ढाल, उरःस्त्राण अथवा दुसरें कोणतेंही

बचाव करणारें अस्त्र असलें तरी त्याचा टिकाव लागत नसे. ह्या शिपायांपाशीं बैलांच्या कातड्यांच्या साध्या ढालीही असत, त्यांची लांबी मनुष्या इतकी असे. कित्येकांपाशीं धनुष्याच्या ऐवजीं भाले व तरवारी असत. ह्या तरवारीची लांबी तीन हातांपेक्षां जास्ती नसे, व तिचा तडाखा मोठ्या झपाट्यानें लागावा ह्मणून दोन हातांत धरून ती मारीत असत. प्रत्येक घोडेस्वारा-जवळ दोन भाले आणि एक ढाल असे व त्यांच्या घोड्यांस ते लोखंडाची लगाम न लावितां, घोड्याच्या तोंडावर वाटोळ्या वादीनें बांधून त्यास हांकीत असत.

युद्धसंबंधीं नियम भूतदयायुक्त असत व शांतीनें रहाणाऱ्या मनुष्यास त्रास देण्यांत येत नसत. **मेगास्थ-नीसनें** लिहिलें आहे कीं, " दुसऱ्या राष्ट्रांमध्यें लढाई चालत असतां शत्रूंच्या देशाच्या शेतांची धुळधाण करून त्यांचा ओसाड प्रदेश करण्याची चाल आहे, परंतु **भरतखंडांतील आर्यांमध्यें** शेतकरी लोकांस पवित्र आणि अपकारायोग्य मानीत असत, व ह्मणूनच शेजारीं लढाई चालत असली तथापि आपल्यास कांहीं अपकार होईल अशी भीति देखील शेतकऱ्यांच्या मनांत येत नसे; लढाईंत गुंतलेले वीर एकमेकांचा अतिशय नाश करीत; परंतु शेतकीमध्यें गुंतलेल्या लोकांकडेस ते बिलकूल पहात नसत. शिवाय ते आपल्या शत्रूंच्या जमिनी कधीं जाळीत नसत व तींतील झाडें तोडीत नसत."

लोकांच्या साधारण रीतिरिवाजा बद्दल **मेगास्थनीस** ह्याचप्रमाणें प्रशंसा करितो. "त्यांच्या रीति साध्या असून ते काटकसरीनें रहात असल्यामुळें सुखी आहेत. होमाशिवाय दुसऱ्या कोणत्याही वेळीं ते मद्य पीत नाहींत. त्यांचें पेय सातुपासून काढलेलें नसतां तांदुळाचें काढलेलें मद्य असतें आणि त्यांचें अन्न मुख्यत्वें करून तांदुळांचा भात हा होय. त्यांच्यामध्यें फिर्यादी क्वचित् होतात, ह्या गोष्टीवरून त्यांच्या कायद्याचा आणि करारशास्त्राचा साधेपणा किती आहे तें समजतें. तारणांच्या अथवा ठेवींच्या फिर्यादी त्यांच्या मध्यें मुळींच नाहींत, शिक्क्याची अथवा साक्षींची त्यांस मुळींच गरज लागत नाहीं आणि तें एकमेकांवर विश्वास ठेवतात व तशाच ठेवीही ठेवतात. त्यांचीं घरें व त्यांची मालमत्ता ह्यांजवर ते पहारा ठेवीत नाहींत. ह्या गोष्टींवरून हे लोक मोठे समजूं आहेत असें सिद्ध होत आहे....सत्य आणि सद्गुण ह्यांस ते सारखा मान देतात."

चंद्रगुप्त हा ख्रि. श. पूर्वीं २९० वे वर्षीं मरण पावला. त्याचे मागें त्याचा मुलगा **बिंदुसार** हा [illegible]दीवर बसला. त्यानें सुमारें तीस वर्षें राज्य केलें; परंतु त्याचा वृत्तांत मिळत नाहीं. **बिंदुसाराचा** मुलगा **अशोक** हा आपल्या बापाच्या हयातींत उज्जयनी येथे व दुसऱ्या ठिकाणीं सुभा होता आणि तो मोठा योद्धा आहे अशी

त्याची ख्याति असे. तो मागध्यांच्या ह्मणजे उत्तर हिंदुस्थानच्या गादीवर सुमारें ख्रि. स. पूर्वी २६० ह्या वर्षी बसला.

त्याच्या आजानें स्थापिलेलें भव्य साम्राज्य त्याच्या हातीं आलें, त्यास त्यानें बंगाल आणि ओरिसा, ज्यास त्या वेळीं कलिंग देश ह्मणत असत, ते प्रांत जोडिले. हे प्रांत जिंकल्यामुळें उत्तर हिंदुस्थानची सुधारणा आणि धर्म ह्यांच्या सपाट्यांत पूर्वेकडील समुद्रकांठचा प्रदेश आला. दुसरें कित्येक देश अशोकानें जिंकिले नव्हते तथापि ते त्याचें साम्राज्यत्व कबूल करीत असत. त्याच्या शिलालेखांवरून ब्याकट्रिया, काबूल कंदाहार आणि कृष्णानदीपर्यंत दक्षिण देश हे ह्या प्रकारचे होते असें समजतें.

अशोकाच्या साम्राज्याच्या महत्वामुळेंच त्याचें नांव गाजलें होतें असें नाहीं. परंतु त्याचें धर्मौत्सुक्य, ज्यामुळें त्यानें बौद्ध धर्माचा अंगिकार केला होता, आणि त्याच्या राज्यकारभाराची नीतिमत्ता व लोककल्याण तत्परता ह्या गुणांमुळ त्याची कीर्ति भरतखंडांतच काय परंतु सर्व एशिया खंडभर पसरली होती; व "महान्" ही पदवी खरोखर त्यास योग्य मिळाली होती. उत्तर हिंदुस्थान चंद्रगुप्तानें जिंकिलें ही गोष्ट व रोमन लोकांनीं युरोप व एशिया खंडांतील उत्तम प्रांत जिंकून आपलें राज्यांत सामील केले ही गोष्ट, ह्या दोहो-

मध्यें साम्य आहे. ह्या दोन्ही गोष्टींत लांबलांबचे देश व राष्ट्रें एकछत्राखालीं आलीं व एकच सुधारणाच्या शक्तीच्या सपाट्यांत सांपडली. ह्या राष्ट्रांच्या एकिकरणानें एक नव्या धर्माच्या प्रसारास साधन झालें. महान **अशोकानें बौद्ध** धर्माची दीक्षा घेऊन तो धर्म **भरतखंडां**तील राजाश्रीतधर्म केला ही गोष्ट **कान्स्टन्टाईन** बादशहानें ख्रिस्तिधर्म स्वीकारून तो सर्व **रोमन** साम्राज्याच्या धर्म केला ह्या सारखीच घडली.

अशोकानें आपल्या साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत १४ चौदा आज्ञा खडकांवर कोरविल्या होत्या. ह्या आज्ञा त्यावेळीं उत्तर हिंदुस्थानच्या लोकांत चालू असलेली जी पाली भाषा तींत लिहिलेल्या आहेत. ह्यापैकीं पांच शिलालेख सांपडलें आहेत. एक **सिंधु**-**नदा**च्या किनाऱ्यावर, दुसरा **यमुना** नदीच्या कांठीं, तिसरा **गुजराथेंत** आणि दोन **ओरिसा** प्रांतांत. ह्या आज्ञांत खालीं लिहिल्याप्रमाणें मजकूर आहे.

१ मध्यें, जनावराची हिंसा करण्याचा प्रतिबंध केला आहे.

२ त, मनुष्याकरितां व जनावराकरितां औषधोपचाराची योजना केली आहे.

३ त, पंच वार्षिक धर्मोत्सव करण्याविषयीं सांगितलें आहे.

४ त, धर्मानुग्रहाविषयीं प्रसिद्ध केलें आहे.

५ त, धर्माधिकारी व धर्मप्रसारार्थ लोक नेमण्या-
विषयीं योजना केली आहे.

६ त, लोकांच्या वर्तणुकीवर नजर ठेवण्यास नीति
शिक्षक नेमिले आहेत.

७ त, सर्वांस धर्माची मोकळीक दिली आहे.

८ त, विषयसुखांपेक्षां धार्मिक सुखें भोगणें चांगलें
असें सांगितलें आहे.

९ त, धर्मशिक्षण देणें व नीतियुक्त सल्ला देणें
ह्याविषयीं प्रशंसा केली आहे.

१० त, खरा धर्मप्रसार करण्यामध्यें खरें शौर्य
आणि खरें वैभव आहें असें सांगितलें आहे.

११ त, धर्मशिक्षण देणें हा सर्व परोपकारापेक्षां
उत्तम मार्ग होय असें सांगितलें आहे.

१२ त, परधर्मी लोकांस धर्माची मोकळीक देऊन
आणि आपला धर्म फार चांगला आहे अशी
त्यांची समजूत करून त्यांस आपल्या धर्मांत
आणावें अशी त्यानें आपली इच्छा प्रदर्शीत
केली आहे.

१३ त, कलिंग देश काबिज केला ही गोष्ट
लिहिली आहे व त्याच्या वेळचे पांच ग्रीक
राजे व दुसऱ्या देशांत त्यानें बौद्ध धर्माच्या
प्रसारार्थ लोक पाठविले होते त्या देशांच्या
राजांचीं नांवें दिलीं आहेत.

१४ त, वरील आज्ञांचें एकिकरण करून असे लेख कोरण्याविषयीं थोडेसें निरुपण केलें आहे. इतिहास दृष्ट्या १३ वी आज्ञा विशेष महत्वाची आहे, कारण त्यांत अशोकाच्या वेळच्या ग्रीक राजांची नांवें दिलेलीं आहेत. ह्यांत **सिरिया**चा राजा **आन्टिऑक**, इजिप्तचा **टॉलेमि**, **म्यासिडन**चा **आन्टिगोनस**, **सिरिनिचा मागस**, आणि **एपिरस**चा **आलेक्झ्यांडर** ह्यांचीं नांवें देऊन मोठ्या आनंदानें तो लिहितो कीं, "जेथें जेथें देवांच्या *ताईताचे धर्म प्रसारक गेले होते, तेथील लोकांनीं ह्या प्रसारकांनीं जीं धर्म कर्तव्यें सांगितलीं तीं ऐकून घेतलीं व त्या धर्मास अनुसरून त्यांच्या शिक्षणाप्रमाणें ते लोक चालत आहेत व पुढें चालतील." ह्याप्रमाणें भरत खंडाच्या सार्वभौमाच्या धर्मौत्सुकतेमुळें खिस्तापूर्वी तिसऱ्या शतकांत दूरच्या देशांत **ग्रीस**, **इजिप्त** आणि **सिरिया**च्या किनाऱ्यावर बौद्ध धर्माचा उपदेश करण्यांत आला होता. त्यामुळें निरनिराळे धर्मसंबंधीं व जोगी लोकांचे धर्मपंथ उत्पन्न झाले, व प्रेम, अस्वार्थ दृष्टी, आणि इहलोकांविषयीं वैराग्य ह्या कल्पनांचा लोकांत प्रसार होऊन त्याचें फळ कांहीं काळानंतर आलें. प्रोफेसर **महाफि** ह्मणतो कीं, " बौद्ध धर्माचे प्रसारक

---

* ह्या शिलालेखखांत **अशोक** आपल्यास " देवांचा ताईत" ह्मणून घेत आहे. परंतु हें वाक्य त्याच्या किताबाचा भाग असावा.

ह्यांच्या आणि ख्रिस्ताच्या शिकवण्यामध्यें पुष्कळ गोष्टींचें साम्य आहे, त्यांचा धर्मोपदेश दोनशें वर्षें ख्रिस्तापूर्वी उत्तर पालेस्टाईनमध्यें लोक ऐकत असत. ह्याप्रमाणें इतिहासांतील प्रत्येक मोठ्या घडामोडीस घडवून आणणाऱ्या कांहीं गोष्टीं प्रथम झाल्या असतात."

खडकांवर कोरलेल्या आज्ञांशिवाय खांबावर खोदलेले अशोकाचे लेख आहेत; हे त्याच्या कारकिर्दीच्या उत्तरकाळीं प्रसिद्ध केले होते. दोन दिल्लींत, एक अलाहाबाद (प्रयाग) येथें, दोन उत्तर बहार प्रांतांत आणि एक मध्यप्रांतांत असे ६ सहा स्तंभ सांपडले आहेत. ह्या खांबांवर सहा आज्ञा कोरल्या आहेत. फक्त दिल्लींच्या एका खांबावर दोन आज्ञा जास्ती आहेत. ह्या आठ आज्ञांत तो धार्मिक सार्वभौम खालीं लिहिल्याप्रमाणें लिहीत आहे:—

(१) मध्यें, त्यानें आपल्या धर्माधिकाऱ्यांस आपलें काम उत्सुकतेनें आणि भक्तिपुरःसर काळजानें करण्याविषयीं आज्ञा केली आहे. (२) त, धर्म ह्मणजे दया, दान, सत्य आणि पवित्रता हीं होय असें स्पष्ट करून सांगितलें आहे. (३) त, ज्यानें त्यानें आपल्या स्वतःसच प्रश्न विचारावें व पापापासून दूर रहावें अशा विषयीं लिहिलें आहे. (४) त, लोकांचें धर्मशिक्षण राजानें नेमलेल्या अधिकाऱ्यांकडेस सोपलें आहे. (५) त, निरनिराळ्या जनावरांची हिंसा बंद केली आहे. (६) त,

आपल्या रयतेच्या कल्याणाविषयीं आपली इच्छा दर्शवून दुसऱ्या पंथांचे लोक आपल्या धर्मास अनुसरतील अशी आशा केली आहे. (७) त, त्याच्या आज्ञा व उपदेश हीं मनुष्यास योग्य रस्त्यानें जाण्यास उद्युक्त करतील अशी आशा दाखविली आहे आणि (८) त, त्यानें लोकोपयोगीं कामें केलीं तीं सांगून लोकांचें धर्मांतर त्यांची चांगली समजूत घालून करवावें असें सांगितलें आहे.

शेवटच्या आज्ञेंतील एका वाक्यावरून समजेल कीं, **अशोक** हा आपलें राज्य भरतखंडात पश्चिमेपासून पूर्वेच्या समुद्रापर्यंत वाढविण्यांत, व बौद्ध धर्माचा प्रसार लोकांचीं मनें वळवून सुखासमाधानानें करण्याकरितां त्यावेळीं त्यास जें कांहीं जग माहीत होतें त्या जगभर धर्मप्रसारक पाठविण्यांत गुंतला असतां, त्यानें लोकांचें सुख व त्यांचें खरें कल्याण यांजकडेस दुर्लक्ष केलें नव्हतें. त्यानें म्हटलें आहे कीं, "मनुष्यांस व जनावरांस छाया मिळावी म्हणून मीं राजमार्गावर न्यग्रोधाचीं झाडें लाविलीं आहेत. मीं बागांतून आम्रवृक्षांची लागवड करविली आहे; प्रत्येक अर्धकोंसावर मीं विहीर खणविली आहे व ठिकठिकाणीं मनुष्यांच्या व जनावरांच्या विश्रांतीकरितां विश्रांतीगृहें बांधिलीं आहेत." हा परोपकारी व धार्मिक चक्रवर्ती ख्रिस्तापूर्वी २२२ वें वर्षीं मरण पावला. म्हणजे **गौतम बुद्धानें** आपला धर्म **काशी** शहरांत प्रसिद्ध केल्यानंतर

बरोबर तीनशें वर्षांनीं ही गोष्ट घडली. ह्या तीन शतकांत, ज्या भिक्षेकऱ्यानें काशीमध्यें व राजगृह येथें आपलें अन्न दारोदार फिरून मिळविलें होतें, त्याचा धर्म देशाच्या सार्वभौमानें अंगिकारिला होता व तो भरतखंडांतील राजधर्म होऊन बसला होता.

चंद्रगुप्ताच्या राजघराण्याचा, ज्यास हिंदुलोकांत चंद्रगुप्ताची आई मुरा हिच्या नांवावरून मौर्य या संज्ञेनें ओळखिलें जातें, त्याचा अशोकाच्या मरणानंतर चाळीस वर्षांनीं अंत झाला. ख्रि. पू. १८३ ह्या वर्षीं पुष्पमित्र यानें नवीन राजघराण्याची स्थापना केली. त्यानें सिंधूनदावर ब्याक्ट्रियाच्या ग्रीकांशीं लढाया मारल्या होत्या. त्याचा मुलगा अग्निमित्र यावर भरतखंडांतील अति प्रसिद्ध नाटककार जो कालिदास, त्यानें एक नाटक लिहिलें आहे. पुष्पमित्राच्या राजघराण्यानें मगध देशांत शंभर वर्षांपेक्षां जास्ती राज्य केलें, आणि त्या नंतर ख्रि. पू. ७१ पासून २६ पर्यंत एक तुटमुदती राजघराणें होऊन गेलें.

ह्यावेळीं मागधांच्या साम्राज्यास नवीन राज्यकर्त्यांचें स्वागत करावयाचें होतें. उत्तर हिंदुस्थानचीं राजघराणीं हळुहळु निर्बळ होत गेलीं आणि ज्या साम्राज्यानें सर्व हिंदुस्थानावर आपला अम्मल चालविला होता त्यास आतां विशेष जोमदार स्वामीची जरूर होती. अशा प्रकारचे राज्यकर्ते दक्षिणेकडून आले. आंध्रांच्या

राष्ट्रानें दक्षिण देशांत कित्येक शतकें पूर्वीच कीर्ति आणि शक्ति संपादिली होती; ते विजयी लोक आतां **मगध** देशांत आले आणि त्यांनीं तेथें ख्रिस्तापूर्वी २६ पासून इ. स. ४३० पर्यंत ह्मणजे साडेचारशें वर्षें राज्य करून हिंदुस्थानच्या उत्तर भागांवर अम्मल चालविला. ह्या काळांत दूरदूरच्या प्रांतांवर त्यांची सत्ता होती. गुजराथप्रांत त्यांच्या हातून इ. स. च्या पहिले शतकांत गेला होता, परंतु तो त्यांनीं सुमारें तिसरे शतकांत परत घेतला असावा. इ. स. च्या पांचव्या शतकांत **आंध्र** लोकांच्या ऱ्हासाबरोबरच **मगध**, जो **गौतम बुद्धाचे** वेळेपासून अथवा त्या पूर्वीपासून एक हजार वर्षेपर्यंत भरतखंडांत पुढारी प्रांत होता, त्याच्या उन्नत स्थितीचा नाश झाला.

शिकंदर बादशहाच्या वेळेपासून भरतखंडाच्या पश्चिम सरहद्दीवर परकीय लोक वारंवार स्वाऱ्या करूं लागले. **शिकंदर** परत गेल्यानंतर **ब्याक्ट्रिया** देशांतील **ग्रीक** लोकांचें आणि हिंदु लोकांचें दळणवळण **सिंधुनदा**वरून होत असे, व **ब्याक्ट्रिया**च्या राजांनीं त्या नदाच्या पूर्वेकडील कित्येक प्रांतही कित्येक वेळां जिंकून घेतले होते. **ब्याक्ट्रिया**चा राजा **मिन्यान्डर** यानें तर **गंगानदी**पर्यंत पश्चिम हिंदुस्थानचा सर्व मुलूख काबीज केला होता. **बौद्ध** लोकांच्या ग्रंथावरून असें समजतें कीं तो राजा **बौद्ध** लोकांचा साधु व

तत्वज्ञानी जो **नागार्जून** त्याच्याशीं वादविवाद करण्यांत मोठा आनंद मानीत असे. ख्रिस्तापूर्वी १२६ वे वर्षीं **यु-चि** नांवाच्या तुराणी लोकांच्या जातीनें **ब्याक्ट्रियावर** स्वारी करून तें लहानसें राज्य अकालीं विलयास नेलें. पराजीत पावलेले **ग्रीक** लोक हिंदुस्थानांत शिरले, व त्यांस निरानिराळ्या प्रांतांत आश्रा मिळून तेथें ज्याच्या त्याच्या नशीबाप्रमाणें ज्यास त्यास कमीजास्ती सुख मिळालें.

सरते शेवटीं **यु-चि**लोक स्वतःच भरतखंडांत शिरले. **हविष्क** यानें इ. स. नंतरच्या पहिल्या शतकांत काश्मीर काबीज केलें; आणि त्याचा वंशज महान् **कणिष्क** त्या प्रांतीं राज्य करीत असतां, त्यानें संवत् सुरू केला, त्यास हिंदुलोकांत शक असें म्हणतात. हा शक इ. स. ७८ पासून सुरू झाला आहे. **कणिष्क** हा मोठा विजयी होता व त्यानें **काबूल**पासून गुजराथ आणि आग्र्यापर्यंत मुलूख सर करून आपलें राज्य वाढाविलें होतें. तो उत्तरेकडील **बौद्धां**च्या पंथांतला होता व त्या लोकांची एक मोठी सभा त्यानें भरविली होती, ह्यावेळीं जें धर्मशास्त्र ह्या सभेनें नक्की केलें तें त्याचवेळीं लिहून ठेविलें असतें तर दक्षिणेकडील बौद्ध लोकांप्रमाणें उत्तरेकडील **बौद्धां**चीं खरीं आणि विश्वास ठेवण्याजोगीं धर्मपुस्तकें हल्लीं मिळालीं असतीं; परंतु **कणिष्का**च्या सभेचें त्रीपिटकांवरील तीन टीकेशिवाय दुसरें कांहीं राहिलेलें नाहीं. **कणिष्का**च्या मरणानंतर

त्याच्या मोठ्या राज्याचे तुकडे झाले आणि काश्मीर देश पुर्ववत् अप्रसिद्ध स्थितीस पोंहचला.

गुजराथ देश कणिष्कानें जिंकिला होता. परंतु त्याच्या मरणानंतर तो देश शहा नांवाच्या परकीय राजांच्या ताब्यांत जाऊन स्वतंत्र झाला. नहापाण यानें हें घराणें कणिष्काच्या मरणानंतर लौकरच स्थापिलें असावें. त्या राजाचा एक शिलालेख नाशीक येथील गुहेंत आहे. त्यावरून लोकहिताचीं कामें करण्यास त्यास फार आनंद वाटत होता असें समजतें. ह्याच घराण्यांतील दुसरा एक राजा रुद्रदमण ह्मणून होता त्याचा एक मनोरंजक शिलालेख उपलब्ध आहे. त्यांत तो लिहितो कीं, मौर्य कुळांतील चंद्रगुप्तानें जो प्रथम बांधिला व जो पुढें भरतखंडाचा राजाधिराज अशोक ह्याचा मांडलीक ग्रीक राजा तुषाष्प यानें दुरस्त केला होता तो पूल त्यानें दुरस्त केला. हे गुजराथचे शहाराजे आणि मगध व दक्षिण देशाचे आंध्रराजे ह्यांच्यामध्यें वारंवार तंटे होत ही गोष्ट साहजिकच आहे. आंध्रांचा राजा सातकर्णी याजवर आपण वारंवार जय मिळविले आहेत अशी फुशारकी रुद्रदमण मारितो. अलीकडील एक शिलालेख आहे त्यावरून असें समजतें कीं, पुढें नशिबाचा ओघ फिरला आणि गौतमी पुत्र नामक आंध्रराजानें शहांपासून गुजराथ

प्रांत जिंकून घेतला. शहाराजांच्या घराण्याचा लय आंध्रांच्या बरोबरच झाला ह्मणजे ख्रिस्तानंतर पांचवे शतकाचे आरंभीं तें घराणें नाश पावलें.

इतक्यांत, स्वारी करणाऱ्यांचें मोठें राष्ट्र जें श्वेत-हन्स लोक, ह्यांची धाड एशिया व युरोप खंडावर इ. स. च्या चौथ्या आणि पांचव्या शतकांत वावटळी-प्रमाणें पडली. परंतु त्यांच्याविषयीं व भरतखंडांतील त्यांच्या इतिहासाबद्दल आह्मी पुढें लिहूं.

खंड २ रें.

शिल्पशास्त्र आणि कला.

हिंदुशिल्पकलेचे अति प्राचीन नमुने, जे हल्लीं विद्यमान आहेत ते ज्या बौद्धकाळाबद्दल आह्मी हल्लीं लिहीत आहोंत, त्यावेळचे आहेत. बौद्ध युगाच्यापूर्वीचीं जीं दगडी बांधकामें आहेत तीं बहुतकरून शहरच्या भिंती, दरवाजे, पूल आणि बंधारे हीं होत. राजवाडे व सार्वजनिक कामाचीं गृहें कधीं काळीं जर दगडांचीं बांधलीं असलीं तर त्यांचे नमुने हल्लीं राहिलेले नाहींत. देवांचीं दगडी मंदिरें बौद्धयुगाचे पूर्वीं मुळींच नव्हतीं असें ह्मणण्यास बिलकूल संशय नाहीं, कारण त्यावेळच्या हिंदूंना देवळें आणि मूर्ती हीं मुळींच माहीत नव्हतीं.

बौद्ध धर्माच्या प्रसारानें शिल्पकलेच्या वाढीस विशेष व एकदम उत्तेजन मिळालें. मठाश्रमाच्या अथवा विहाराच्या पद्धतीमुळें बौद्धधर्माधिकाऱ्यांस योगी आणि योगिणी यांस एक ठिकाणीं रहाण्यास मोठमोठीं गृहें बांधण्याची जरूर लागे, व जसजसें ह्या धर्माधिकाऱ्यांचें प्राबल्य जास्ती वाढलें व त्यांची संपत्ति वृद्धिंगत पावली, तसतशीं हीं गृहें ते दगडांचीं बांधूं लागले.

धर्माधिकारी व इतर गृहस्थाश्रमी लोकही प्रार्थनेकरितां एक ठिकाणीं जमत असत, आणि त्यामुळें देवळेंही दगडाचीं बांधण्याचा प्रघात पडला. पुण्यक्षेत्रीं यात्रेस जाणें ही एक बौद्ध धर्माप्रमाणें अवश्य गोष्ट असे. ह्या पुण्यक्षेत्रांच्या ठिकाणीं उंचउंच दगडी शिखरबंद डेरे बांधीत व त्यांच्या सभोंवार दगडी कंठडा करून त्यांवर उत्तम नक्षी काम करीत असत. भरतखंडांत बौद्ध धर्माचें राष्ट्रीय धर्मत्व कधींच नष्ट पावलें होतें; परंतु ख्रिस्तापूर्वी तिसऱ्या शतकापासून तों इ. स. नंतर चौथ्या शतकापर्यंतच्या काळांतही बौद्धांचे डेरे व कठडे, देवळें व मठ वगैरे जीं कामें बांधण्यांत आलीं तींच भरतखंडांतील शिल्पकलेचे अति उत्तम नमुने म्हणून हल्लीं विद्यमान आहेत.

डेरे व कठडे:—अति प्राचीन डेरे आणि कठडे ज्यांचे अवशेष हल्लीं राहिले आहेत त्यांपैकीं उत्तम म्हटले म्हणजे **भरहुत** (**प्रयाग** आणि **जबलपुर** ह्यांच्या-मध्यें एक ठिकाण) येथील होय. हे ख्रिस्तापूर्वी तिसऱ्या शतकांत बांधिलेले आहेत. मधला डेरा अगदीं नष्ट झाला आहे, परंतु भोंवतालच्या कठड्याचा अर्धा भाग कायम आहे; हा प्रथम २७५ फुट लांब होता व त्यास चार दरवाजे होते. हत्ती, सिंह, सुसरी यांच्या रांगा व बौद्धलोकांच्या धर्म गोष्टींतील कित्येक देखाव्यांचीं चित्रेंहीं तुळयांवर काढलेलीं आहेत. हीं चित्रें हिंदुस्था-

नांतिल शिल्पकलेचा अति प्राचीन नमुना असल्यामुळें त्यांविषयीं डा. **फरग्युसन**, ज्याचे लेख **हिंदुस्थान**च्या शिल्पकलेवर अतिशय वजनदार मानले जात आहेत, त्यानें जें कांहीं लिहिलें आहे त्यांतून कांहीं वेंचे येथें दिले असतां अप्रासंगीक होणार नाहीं.

"**बुद्धगया** आणि **भरहुत** येथील ख्रिस्तापूर्वीं २००–२५० वर्षांवरचीं कठड्यावरचीं हिंदु लोकांचीं अगदीं प्रथमचीं जीं कोरींव कामें आपल्या दृष्टीस पडतात, तीं खरीं अस्सल आहेत. त्यांत परकीय शिल्पकलेची मेळ बिलकूल नाहीं. ह्या चित्रांत त्यांच्या कर्त्यांच्या मनांतील विचार दृग्गोचर होत आहेत व त्यांतील गोष्ट तीं इतक्या स्पष्ट रीतीनें सांगत आहेत कीं, त्यापेक्षां जास्ती स्पष्ट, निदान **हिंदुस्थान**ांतील दुसरीं शिल्पकामें, सांगत नाहींत. कित्येक जनावरें हत्ती, हरीणें, माकडें ह्यांचीं चित्रें तर जगांतील कोणत्याहीं भागांत इतकीं हुबेहुब नाहींत; त्याचप्रमाणें कित्येक झाडांची गोष्ट आहे. शिल्पकलेसंबंधीं बारिकसारिक बाबती इतक्या सफाईनें व टापटिपीनें कोरल्या आहेत कीं, त्यांविषयीं आश्चर्य वाटतें. मनुष्यांच्या आकृति आमच्या सौंदर्याच्या आणि लावण्याच्या कल्पनेपेक्षां जरी निराळ्या आहेत, तथापि त्यांत नैसर्गिक खरेपणा जास्ती आहे; आणि जेथें त्यांचा जमाव काढिला आहे तेथें जी कृति दाखविण्याचा हेतु असतो, ती क्रिया तो जमाव अप्रतीम

सुगमतेनें दर्शवितो. ह्या कामाच्यापेक्षां विशेष स्वरा हेतु निर्दिष्ट करणारी, आणि ऱ्याफेलच्या पूर्वीच्या प्रकारची शिल्पकला दुसरे कोठें नजरेस पडेल असें वाटत नाहीं."

ह्या नंतर **सांचि** येथील मोठ्या डेऱ्याकेडस आपण वळूं. मध्य हिंदुस्थानांत भोपाळचे लहानसें संस्थान आहे. त्यांत पूर्व पश्चिम दहा मैल आणि उत्तर दक्षिण सहा मैल अशा लहानशा टापूंत पांच सहा डेऱ्यांचे जथ्थे आहेत व त्यामध्यें पंचवीस अथवा तीस निरनिराळे नमुने आहेत. ह्यांतील अति प्रसिध्द झटला झणजे ज्यांस सांचीचा मोठा डेरा झणतात तो होय. ह्याचा पाया १४ फुट व त्याचा घुमट ४२ फूट उंच आहे. ह्या घुमटाचा व्यास अगदीं पायावर १०६ फूट आहे; ह्याचा मध्यभाग विटा व चिखलाचा भरीव आहे; परंतु बाहेरची बाजू घडीव दगडांची आहे. ह्याच्या सभोंवतीं जो कठडा आहे तो वर्तुलाकृति आहे. त्याचा व्यास १४० फूट लांब आहे, मध्यें दगडी खांब उभे केलेले असून त्यांच्यामध्यें दगडी कठडा आहे. ह्या कठड्यावर खोदींव काम केलेलें आहे. ह्या कठड्यांत डेऱ्याकडे जाण्याचीं चार प्रवेशद्वारें आहेत; त्यावर जें नक्षीचें काम केलेलें आहे तें हिंदुस्थानांत असल्या कामापैकीं अति उत्तम आहे. ह्या कामाविषयीं डाक्टर **फरग्युसन**नें जें लिहिलें आहे त्यांपैकीं एक वेंचा देतों.

"ह्या चारी द्वारांवर अथवा ह्या तोरणांवर, जेथें जेथें त्यांचा भाग कठड्याशीं लागून दृष्टिआड झाला नव्हता, त्यां सर्वांवर पुढें व मागें अति उत्तम कोरींव काम केलेलें आहे. बुद्धाच्या आयुष्यांतील निरनिराळे देखावे ह्या कोरींव कामांत दाखविलेले आहेत. ह्याशिवाय बौद्ध धर्मांतील पूर्ण स्थिति प्राप्त होण्यापूर्वीं **सांख्यमुनीस** पुनीत होण्यास पांचशें जन्म घ्यावे लागले, त्याविषयींच्या गोष्टी **जातकांत** सांगितल्या आहेत, त्यांतील कांहीं देखावेही ह्या कोरींव कामांत काढलेले आहेत. पैकीं वेशांतर अथवा भिक्षाजातकांतील देखाव्यांनीं उत्तरेकडच्या दरवाजाचे खालील बहाल सर्व भरलेलें आहे. ह्या विलक्षण दंतकथेंतील गोष्टी **सिलोन** येथील पुस्तकांत जशा लिहिल्या आहेत तशाच्यातशा सर्व ह्या तुळईवर कोरलेल्या आहेत. .... दुसऱ्या कोरींव कामांत वेढे, लढाया आणि त्या नंतरचे विजय प्रदर्शक उत्साह यांचीं चित्रें कोरलेलीं आहेत. ह्या लढाया व वेढे बहुतेक धर्मसंबंधीं पवित्र वस्तु मिळविण्याकरितां अथवा दुसऱ्या धार्मिक विषयासंबंधीं झालेल्या होत्या. कित्येक ठिकाणीं पुरुष व स्त्रिया खात, पीत व एकमेकांस प्रीति दाखवीत आहेत असें दाखविलें आहे."

हा भव्य डेरा बहुतकरून राजाधिराज अशोक ह्यांचे कारकीर्दीत बांधिला असावा; सभोंवतालचे कठडे

हे वेळोवेळीं त्यास जोडले असावेत व ते निरनिराळ्या मनुष्यांच्या देणग्या आहेत असें त्या वरील लेखांवरून समजतें. दरवाजे इ. स. च्या पहिल्या शकांतील आहेत.

सरते शेवटीं आपण **अमरावती**चे डेऱ्याकडेस वळू. **अमरावती** हें ठिकाण **कृष्णा**नदीच्या मुखाजवळ असून तें दक्षिणेच्या **आंध्रां**ची पुष्कळ वर्षें राजधानी होतें. हा डेरा इ. स. च्या चवथ्या शतकांतील आहे. ह्यांतील मध्य इमारत हल्लीं अस्तित्वांत नाहीं, परंतु सभोंवतालचा कठडा विद्यमान आहे. त्यावर नक्षी फार आहे. बाहेरच्या कठड्याचा व्यास १९५ फूट आणि आंतील कठड्याचा १६५ फूट आहे व त्या दोन कठड्यांमध्यें छबिना फिरण्यास जागा असे. बाह्य कठड्याचें जोतें जनावरें आणि मुलें यांच्या झालरीनें सुशोभीत केलें आहे. त्याच्या आंतले बाजूवर फारच नक्षीचें काम आहे. ह्या धक्क्यावर जो कठडा आहे तो ६०० फूट लांब असून तो सर्व उठावाच्या नक्षीच्या कामांनीं भरलेला आहे. आंतल्या कठड्यावर ह्यांहीपेक्षां जास्ती नक्षीचें काम केलेलें आहे व त्यांत **बुद्धा**च्या चरित्रापैकीं अथवा बौद्ध धर्मांतील दंतकथांपैकीं कांहीं गोष्टींचीं चित्रें कोरलेलीं आहेत.

हिंदुस्थानांत ह्या शिवाय आणखी पुष्कळ डेरे, कठडे ह्यांचे अवशेष विद्यमान आहेत, परंतु भरहुत,

सांची आणि अमरावती येथील बौद्धयुगांतील तीन निरनिराळ्या काळच्या डेऱ्यांची हकीकत ध्यानांत घेतली ह्मणजे अशा प्रकारच्या शिल्पकामाची बरीच चांगली कल्पना आपल्या मनांत येईल.

प्रार्थना मंदिरें:—बौद्ध लोकांच्या प्रार्थना मंदिरांत मोठा भेद हा आहे कीं तीं दगडांनीं बांधिलेलीं नाहींत. परंतु मोठमोठ्या खडकांत कोरलेल्या गुहा होत. युरोपांतील प्रार्थना मंदिरांचा बाह्य देखावा हेंच त्यांचें न्यूनाधिक्य व भव्य स्वरूप होय. परंतु बौद्धलोकांचीं प्रार्थना मंदिरें खडकांत कोरलेलीं असल्यामुळें दर्शनीबाजूशिवाय त्यास बाह्यशोभा मुळींच नसते. ह्मणून प्रेक्षकांस पाहण्यासारखें बाहेर कांहीं नसतें, परंतु आंत गेल्यावर तेथील नक्षी व एकंदर व्यवस्था पाहून त्यांस आश्चर्य वाटतें.

हल्लीं विद्यमान आहेत त्यापैकीं $\frac{1}{10}$ बौद्ध लोकांचीं मंदिरें मुंबई इलाख्यांत आहेत, कारण कोरींव काम करण्यास पाहिजेत असे खडक त्या इलाख्यांत आहेत.

पांच सहा कोरीवलेणीं पश्चिम घाटांत आहेत, व तीं सर्व ख्रिस्ती शकापूर्वीं कोरलेलीं आहेत. ह्या गुहांत दगडांचीं कामें हलूहलूं लांकडी कामाच्या धर्तीवर गेलेलीं पाहण्यांत येतात. वरील इमारतीस बळकटी यावी ह्मणून लांकडीं खांबास आंतले बाजूस सरे देतात त्याप्रमाणें भज येथील कोरींव लेण्यांत, जीं ख्रिस्तापूर्वीं तिसऱ्या

शतकांतील आहेत, दगडी खांब आंतले बाजूस तिराकृती होत गेलेले आहेत. आणि एखाद्या झोंपड्याप्रमाणें ह्या गुहेस लांकडी वांसे आहेत.

ख्रिस्तापूर्वीं पहिले शतकांत कोरलेल्या मुंबई आणि पुणें यांच्या मधील कार्ल्याच्या लेण्याकडेस आपण वळलें असतां, अशा पद्धतीचीं कामें पूर्ण स्थितींत आपल्या पहाण्यांत येतात.

डाक्टर फरग्युसन साहेब ह्मणतात कीं " येथील इमारतींतिल अंतर्व्यवस्था प्राथमिक काळच्या ख्रिस्ती लोकांच्या देवळाप्रमाणें आहे. ह्यांत एक मध्यें सभामंडप असून बाजूंस दालनें आहेत. शेवटच्या टोकाचा भाग अर्धवर्तुळाकृति असून त्याच्या सभोंवती दालनाचा भाग वाढविलेला आहे. आंतील बाजूस दारापासून मागील भिंतीपर्यंतची लांबी १२६ फूट ब रुंदी ४५ फूट ७ इंच आहे..... बाजूंचीं दालनें आणि सभामंडप यांमध्यें प्रत्येक बाजूस १५ खांबांची एक एक रांग आहे. खांबाची बैठक उंच असून मधील दांडा अष्टकोनी आहे. शिरोभागीं फार नक्षी केलेली असून त्यावर दोन दोन हत्ती गुढघे टेकीत आहेत असे दाखविले आहेत. ह्या प्रत्येक हत्तीवर दोन दोन मनुष्यांच्या आकृती, बहुतकरून एक पुरुष व एक स्त्री व कधीं कधीं दोन्ही स्त्रिया, बसविल्या आहेत. अशीं कामें दुसऱ्या ठिकाणीं आहेत त्यांपेक्षां हें काम फार सुबक केलेलें आहे. यांचेवर

छप्पर आहे तें बहुतेक अर्धवर्तुलाकृति असून पाख्यांकडेस कांहींसें ढाळ आहे.... आंतील भागाविषयीं आपल्यास चांगल्या रीतीनें अनुमान करतां येतें, व तो भाग खरोखर जसा पूर्ण असावा तसा गंभीर व भव्य आहे. आंत उजेड पडावा ह्मणून जी योजना केली आहे ती अत्युत्तम आहे. डोक्यावरच अगदीं योग्य ठिकाणीं एक छिद्र ठेविलेलें आहे; तेथून उजेडाची एकसारखी जोत आंतील भागांतील स्थंडीलावर अगर मुख्य ठिकाणीं अबाधित पडून तें ठिकाण चांगलें प्रकाशीत केलेलें आहे व बाकीचे भागांत किंचित् अंधःकार आहे. शिवाय तिन्ही बाजूंच्या दालनांमध्यें जवळजवळ आणि जाड खांब आहेत त्यामुळें त्या देखाव्यास विशेष शोभा आली आहे."

बौद्ध लोकांची मंदिर बांधणी डेच्या आणि कठड्याप्रमाणेंच ख्रिस्ती शकाच्या सुरवातीस अतिशय उन्नत स्थितीस पोचली होती. त्या नंतरच्या शतकांत त्यांत कांहींच सुधारणा झाली नाहीं परंतु फक्त नकशी ज्यास्ती वाढली. अर्वाचीन काळच्या बौद्धांच्या मंदिरांत जो बौद्धधर्म नजरेस पडतो तो सहाव्या शतकांतील आणि त्या नंतरच्या काळच्या हिंदुधर्माशीं मिळता आहे.

मठ (विहार):—बौद्ध लोकांच्या मंदिराप्रमाणें बौद्धांच्या गुहा दगडांच्या बांधिलेल्या नाहींत, परंतु त्या खडकांत कोरलेल्या आहेत. अति प्राचीन गुहा फार लहान आहेत. त्यांत एखादा योगी आपला वेळ मनन

आणि निजध्यास ह्यांत घालवावा ह्मणून सायासानें शिरूं शकतो. परंतु कांहीं काळानें मोठमोठे मठ कोरण्यांत आले; त्यांत योगी व योगीणी यांजकरितां निरनिराळ्या खोल्या व मध्य भागीं सर्वांस जमण्याकरितां सभामंडप ह्या प्रमाणें तजवीज केलेली असे.

व्याघ्रगुहेसारख्या लहान गुहांचे नमुने ओरिसा प्रांतांत आहेत. ह्या गुहांस **व्याघ्रगुहा** ह्मणतात, त्याचें कारण असें आहे कीं, त्यांचें प्रवेशद्वार वाघाच्या उघड्या तोंडासारखें दिसतें. नंतरच्या मोठमोठ्या गुहा ज्यांत नक्षीचीं कामें केलेलीं आहेत, त्या देखील ह्या प्रांतांत आढळतात. ह्या सर्व गुहा **उदयागिरी** आणि **खंडगिरी** ह्या नांवांच्या पर्वतांच्या दोन रांगा आहेत त्यांत आहेत व त्या ख्रि. श. पूर्वीच्या लगतच्या शतकांतील आहेत.

मुंबई इलाख्यांतील पवित्र व भरभराटींत असणारें **नाशीक** शहर येथें मुख्य मठ तीन आहेत, त्यांचीं नांवें **नाहपान, गौतमपुत्र** आणि **यदुयास्त्री**. पहिल्या मठांत शिलालेख आहे त्यावरून असें समजतें कीं, तो मठ गुजराथच्या **शहा** नामक राजघराण्याचा स्थापक **नाहपण** राजा ह्याच्या जावयानें इ. स. च्या पहिल्या शतकाच्या अखेरीस कोरविला होता, ह्यांत एक सभामंडप आहे, तो चौरस असून त्याची प्रत्येक बाजू ४० फूट लांब आहे. त्याच्या तीन बाजूंस योगी लोकांकरितां लहान लहान १६ खोल्या आहेत. व चौथे बाजूस ६ खांबांची

ओसरी आहे. दुसरा ह्मणजे **गौतमपुत्र** नांवाचा मठ त्याच नांवाच्या **आंध्र** घराण्यांतील राजानें इ. स. च्या तिसऱ्या शतकांत बांधविला. हा **नाहपान** मठाच्या नमुन्यावर बांधिलेला आहे. तिसरा **यदुयास्त्री** मठ हाही इ. स. चे पांचव्या शतकांत बांधला. त्यांतील सभा-मंडपाची लांबी ६० फूट व रुंदी ४५ फूट आहे व योगी लोकांच्याकरितां २१ खोल्या त्यांत आहेत. ह्यांतील गाभाऱ्यास फार नक्षीचे खांब दोन आहेत व त्यांत बुद्धाची भली मोठी मूर्ति असून त्याच्यां जवळ अनेक सेवकजनांचे पुतळे आहेत.

बौद्ध लोकांच्या हिंदुस्थानांतील मठांपैकीं **अजिंटा** येथील गुहा ह्या फारच मनोहर आहेत. त्या पांचवे शतकांतील आहेत. ह्यां विशेष महत्वाच्या आहेत कारण येथील रंगाचें चितारकाम इतकें रेखून काढलेलें आहे कीं तसें **हिंदुस्थानांतील** कोणत्याही मठांत नाहीं.

ह्या मठांपैकीं अनुक्रम १६ चा ह्मणून जो मठ आहे तो ६५ फूट चौरस आहे आणि त्यास २० खांब आहेत. त्यांत मध्यभागीं एक सभामंडप, दोन्ही बाजूंस योगी लोकांकरितां १६ खोल्या, पुढील बाजूस ओसरी आणि मागील बाजूस गाभारा अशीं आहेत. सर्व भिंती बुद्धाच्या चरित्रांपैकीं अथवा साधुलोकांच्या दंत-कथांपैकीं देखाव्यांच्या चित्रांनीं भरलेल्या आहेत. छप्परास व खांबास फार नक्षी आहे. पुतळ्यांची आकृति

नैसर्गिक दिसते. मनुष्यांचे चेहरे सुबक व इष्ट मनोवृत्ति दर्शक आहेत, व स्त्रियांच्या पुतळ्यांत हिंदुस्थानांतील स्त्रियांचे विशेष गुण, मार्दव आणिरु चिरलावण्य, हे दृग्गोचर होत आहेत.

ह्या चित्रांची नकल वरोवर करितां यावी ह्मणून त्यांचे रंग जास्ती खुलविण्याचे जे प्रयत्न अलीकडेस करण्यांत येत आहेत त्यामुळें व "ब्रिटिश प्रवाशांच्या मनाच्या अनिष्ट कलांमुळें" ह्या प्राचीन हिंदु चित्रांचे जे हे अप्रतिम नमुने आहेत त्यांचा विघाड दुर्दैवेंकरून वराच झाला आहे.

शिल्पकला, कोरींवकाम व चित्रकला ह्या गोष्टी हल्लीं हिंदुस्थानांतील लोक बहुतेक विसरले आहेत. हिंदु लोकांच्या अति भरभराटीच्या वेळींही त्यांनीं ह्या कलांत ग्रीक लोकांची बरोवरी केली नव्हती. हिंदुस्थानांतील जातिसंस्थेमुळें ज्ञान आणि वुद्धि ह्यांचा हस्तक्रियेपासून वेगळेपणा झाला, आणि ह्या संस्थेंत फक्त नीच जातीचे लोकांसच हस्तक्रियेचीं कामें करण्याची मोकळीक असे. हिंदुलोकांनीं ह्या कलांत कल्पनाशक्ति व उद्योग आणि सफाई व सौंदर्य हे गुण दाखविले आहेत, परंतु ग्रीक कलेचे कृत्रिमाकृत्रिम-पदार्थ-सौंदर्य-विज्ञानांतील वरिष्ठ गुणांची हिंदु कलेंत उणीव आहे. शिल्प व कोरीव कामें फक्त नीच जातींच्या लोकांच्याच हातीं असल्यामुळें फीडियास अथवा प्रागझाइटलीस ह्या सारखें तत्कलानिपूण हिंदु लोकांत निघणें मुष्कलीचें होतें.

खंड ३ रें.

रीतिरिवाज आणि कायदे.

हिंदूंनीं आपल्या सामाजिक रहाणीचे निबंध **धर्मसूत्र** नामक पुस्तकांत ज्ञानयुगांतच एक ठिकाणीं केले होते हें मागील खंडांत सांगितलेंच आहे. तोच रिवाज पुढील काळांत चालू होता. फक्त सूत्रांचें रूप सोडून मनोरंजक कवितेचें स्वरूप त्यांस देण्यांत आलें आणि त्या पुस्तकास **धर्मशास्त्र** असें म्हणू लागले. **मनु** ह्या कल्पीत नांवानें प्राचीन काळापासून एक नियमांचा समुच्चय चालत आला होता, व बौध्द काळामध्यें त्यास कवितेचें रूप देण्यांत येऊन त्या वेळेस अनुसरून त्यांत कमी जास्ती फेरफार करण्यांत आले. हा ग्रंथ **मनुचे** कायदे अथवा **मनुचें धर्मशास्त्र** या नांवानें प्रसिद्ध असून हिंदुलोकांत तो आजमितीपर्यंत कायदे व नियम या संबंधानें सर्वमान्य ग्रंथ आहे.

दुसऱ्या जातीचे लोक जसजसे हिंदूंच्या आटोक्यांत येऊन हिंदु झाले तसतशी वर्णसंख्या वृद्धिंगत होत गेली, आणि त्यांच्या उत्पत्तीचा थांग लावण्यास दुसऱ्या विद्वानांप्रमाणें **मनू**सही पंचाईत पडली. सर्व मानवी प्राणी चार वर्णांत येतात ही उपपत्ति मान्य करून,

सूत्रकारांप्रमाणें, नव्या जाती मूळच्या जातींच्या भेळीनें झाल्या आहेत असें मनूनें प्रतिपादन केलें. चांडाल, कैवर्त व अशाच दुसऱ्या मूळच्या जाती, ज्यांची संख्या कोट्यावधी असून ज्या अद्याप विद्यमान आहेत व ज्या हिंदु झाल्या, त्या ह्या मन:कल्पित उपपत्तिप्रमाणें मुख्य जातींच्या भेळीपासून उत्पन्न झाल्या आहेत असें होत आहे. परकीय राष्ट्रें जसजशीं हिंदु ग्रंथकारांच्या अवलोकनांत आलीं तसतशीं ही लवचिक कल्पना उघडपणें निर्भयतेनें त्यांस लागूं करण्यांत आली आणि ह्मणूनच मनूनें दक्षिण हिंदुस्थानचे द्राविड, काबुली जाती, ब्याकट्रिया देशांतील ग्रीकलोक, तुराणि व पार्शीलोक आणि चिनीलोक ह्यांस पतित क्षत्रीय असें ह्मटलें आहे !

ह्याप्रमाणें जातींची उपपत्ति वस्तु स्थितीच्या विरुद्ध वृद्धिंगत होत गेल्यामुळें ह्या प्राचीन संस्थेचे खरे परिणाम ज्ञान आणि कला ह्यांच्या अर्वाचीन वृद्धीस जास्तीं जास्ती घातक होत गेले. निरनिराळे औद्योदिक धंदे अद्याप वैश्य आणि शूद्र ह्या वर्णांकडेसच राहिले होते व जसजसे ह्या धंद्यांत गुंतलेले वर्ण अधिक नीचत्वास पावत गेले तसतसे त्या धंद्यांची वृद्धि व विकास होणें मोठें अवघड झालें. अशीच अडचण मध्यकाळांत यूरोपामध्यें आली होती, परंतु युरोपांतील कारागीर आणि शेतकरी यांनीं शेकडों वर्षें दु:ख सोसून सरदार

आणि धर्माधिकारी यांचें जूं फेकून दिलें. हिंदुस्थानांत वर्णनियमामुळें ह्या अडचणी कायम झाल्या.

देशांत राजव्यवस्था कशी होती त्याविषयीं मनूनें जें वर्णन केलें आहे तें जास्ती अल्हादकारक आहे. राजाचें मुख्य उत्पन्न राजाचें स्वामित्व ज्या जमिनीवर असेल त्यापासून होत असे, व त्याची पुरवणी करांनीं करीत असत. ढोरांची वाढ व सुवर्णाचें उत्पन्न जें होई त्यावर दर शेंकडा दोन टक्केप्रमाणें कर घेत असत. जमिनीच्या उत्पन्नाचा सहावा, आठवा अथवा बारावा हिस्सा जमिनीचा सारा म्हणून द्यावा लागत असे. ह्या शिवाय खाणी, कारखाने, वखारी यांजपासूनही कर घेत असत. मेगास्थिनीस ह्यानेंही असेंच लिहिलें आहे कीं, शहरांतील आणि गांवांतील राजाचे कामगार असे कर वसूल करीत असत, व शेतकी, शिल्प आणि व्यापार हीं वाढवीत. मनु आणखी असें लिहितो कीं एक गांवाचा, दहा गांवांचा, वीस गांवांचा, शंभर गांवांचा अथवा हजार गांवांचा असे उमराव, राजा नेमीत असे; व ह्या उमरावांचीं कामें गुन्हे बंद करणें व लोकांचें संरक्षण करणें हीं असत. परंतु गांवपंचांची संस्था हिंदु लोकांइतकीच जुनी आहे. हे पंच खेडेगांवांतील लोकांचे आपआपसांतिल तंट्यांचा निकाल लावीत व गांवची अंतर्व्यवस्था करीत; व शेंकडों लढाया आणि राज्यकर्ते व त्यांचीं घराणीं ह्यांच्या हजारों क-

डामोडी झाल्या तथापि ही खेडेगांवांतील पंचांची संस्था, अलीकडे थोडे दिवसापूर्वीपर्यंत, विद्यमान होती. ही अतिउत्तम संस्था इंग्रेजांचे राज्यांत, एतद्देशीय संस्थांस मान्य करण्याचा अभाव असल्यामुळें, दिवसेंदिवस लयास जात आहे.

प्राचीन हिंदु राज्यव्यवस्थेंत शेतकी आणि शिल्प-कला यांचा उत्कर्ष कसा झाला तें ग्रीक ग्रंथकारांचीं जीं वर्णनें अद्याप विद्यमान आहेत त्यांवरून आपणांस कळतें. **मेगास्थिनीस** लिहितो कीं, "पुष्कळ विस्तृत व कमीजास्ती सुंदर परंतु फार सुपीक अशा सर्व मैदानांत पुष्कळ नद्या वाहत आहेत. बहुतेक जमिनींत बागायत आहे आणि म्हणून एक वर्षांत त्यांत दोन पिकें होतात..... साधारण खाण्याच्या धान्याशिवाय सर्व हिंदुस्थानांत, जीस नदीचें पाणी भरपूर देण्यांत येते अशी ज्वार व बाजरी, निरनिराळ्या जातींच्या डाळी व तांदूळ आणि **बोसपोरम** ह्या नांवाचें धान्य, तसेंच खाण्याच्या उपयोगांत येणाऱ्या व बहुतेक अनायासानें उगणाऱ्या अशा वनस्पती उत्पन्न होतात. ह्याशिवाय प्राण्यांच्या निर्वाहास उपयोगी पडणारे व खाण्यास योग्य असे पदार्थ जमिनीपासून कमी उत्पन्न होतात असें नाहीं, परंतु त्यावदल लिहिणें मोठें त्रासदायक होईल. असें म्हणतात कीं, हिंदुस्थानांत दुष्काळ कधीं पडला नाहीं, व पौष्टिक अन्नाच्या पुरवठ्याची कमताई कधींही पडत नाहीं."

ह्याच बुध्दिमान ग्रंथकारानें लोकांच्या आचार व व्यवहाराविषयीं वरेंच लिहिलें आहे. त्यांच्या सात जाती होत्या ह्मणून त्यानें लिहिलें आहे; परंतु त्या हिंदूंच्या चार जातींशीं मिळवितां येतात. त्याच्या **तत्वज्ञानी** आणि **सल्ला देणारे** ह्या दोन जाती ब्राह्मण जातीचे दोन पोटभेद होत; ह्मणजे ज्यांनीं धर्माध्ययन पत्करिलें ते आणि ज्यांनीं सरकारी नोकरी पत्करिली ते. त्याचे **शेतकरी, धनगर** आणि **शिल्पकार** ह्मटलें ह्मणजे **वैश्य** आणि **शूद्र** ह्या वर्णांतील लोक, जे जमिनीची लागवड करणें, गुरें चारणें व हस्त कौशल्यांचे जिन्नस तयार करणें ह्यांत गुंतलेले असत. त्याचे **शिपाई** ह्मणजे **क्षत्रीय** आणि त्याचे **तपासणीस** हे राजाचे विशेष नोकर होत.

हिंदु लोकांत विद्यार्जनाची रीति कशी होती तिचें वर्णन वर एका खंडांत दिलेंच आहे. मुलगे आपल्या आईबापांस सोडून गुरूंच्या व नामांकित ऋषींच्या घरीं जाऊन रहात, व तेथें विद्याभ्यास पुरा झाला ह्मणजे घरीं परत येऊन लग्न करून गृहस्थाश्रम करीत. **मेगास्थिनीस**ही त्याचप्रमाणें वर्णन करितो. "मुलें एका मागून दुसऱ्या पुरुषांच्या ताब्यांत असतात, व जसजशीं तीं मोठीं होत जातात तसतसा त्यांचा गुरुही एकाहून दुसरा जास्ती विद्वान् असतो....ह्याप्रमाणें ३७ वर्षें काढल्यानंतर प्रत्येक पुरुष आपल्या घरीं

येतो, व तेथें बाकीचें आयुष्य सुखानें आणि निर्भयतेनें घालवितो. नंतर ते आंगावर मलमलीचे कपडे व हातांतील बोटांवर सोन्याच्या आंगठ्या आणि कानांत चौकडे घालतात. ते मांस खातात परंतु जीं जनावरें कामास लाविताते त्यांचें मांस खात नाहींत. फार उष्ण आणि मसालेदार अन्न ते खात नाहींत व पुष्कळ मुलें व्हावी ह्मणून मनास वाटतील तितक्या बायका ते करतात."

हाच ग्रंथकार दुसरे एका ठिकाणीं हिंदु लोकांची छानदार पोषाख पेहरणें व आंगावर दागिने घालण्याच्या हौसेबद्दल लिहितो. "त्यांच्या नेहमीच्या साध्या रहाणीविरुद्ध छानदार पोषाख व दागिने घालणें त्यांस फार आवडतें. त्यांचे झगे भरजरीचे असून त्यांस मौल्यवान हिरे लाविलेले असतात. अत्युत्तम मलमलीचीं वस्त्रें ते पेहरतात," हिंदु लोकांच्या भपकेदार धर्म उत्सवांविषयीं स्ट्राबोचें एक वाक्य आहे त्यावरून त्यांचे रीतिरिवाज समजतात व कलाकौशल्यामध्यें त्यांची त्यावेळीं किती गती झाली होती तें कळतें. " त्यांच्या उत्सवांत छबिना काढतात तेव्हां सोन्यारुप्याचे अलंकार घातलेले पुष्कळ हत्ती रांगेनें चालतात, व त्यांत चार चार घोडे व अनेक जोड्या जुंपलेले पुष्कळ रथ असतात. त्यांच्या मागें, मोठे झगे घातलेले व बहुतेकांस मौल्यवान

हिरे, पांच, पन्ना आणि हिंदुस्थानांतील माणिक बसविलेलीं सुवर्णपात्रें, मोठमोठीं तपेलीं व प्याले, मेजें, सिंहासनें, पाणी पिण्याचीं भांडीं आणि एतद्देशीय तांब्याचीं गंगाळें हे जिन्नस हातांत घेतलेले सेवक जनांचे थवे चालतात. आणि सोन्याची फित लाविलेले अथवा किनखापाचे पोषाख, रानटी टोणगे व चित्ते, पाळलेले सिंह असे पशु, आणि भिन्न रंगाच्या पिसाऱ्याचे व सुंदर गाणारे पक्षांचे थवेच्या थवे त्यांत असतात."

बौद्ध लोकांनीं उदाहरण दाखवून देईपर्यंत असे भपकेदार छबिने हिंदु लोकांत नसत. हिंदु लोकांत ज्याच्या त्याच्या घरीं अग्निहोत्र असे व त्यांचे होम व गृहकर्म घरांतल्या घरांत स्वत:च्या स्थंडीलावर जो तो आपल्या अग्नींत करीत असे. ह्या विषयींची जी माहिती आह्मी मागील खंडांत सूत्रकारांच्या लिहिण्यावरून दिली आहे त्याच सारखें वर्णन मनूनें त्याबद्दल केलेलें आहे. फक्त फरक इतकाच कीं, मनूच्या कांहीं वाक्यांवरून त्यावेळीं फार जुन्या चालींत फेरफार होत होता आणि बौद्ध धर्माचें वजन पडत चाललें आहे असें भासूं लागलें होतें असें दिसून येतें. धर्मशास्त्राचा लिहिणारा हा जुन्या वैदिक मताचा मनुष्य होता व त्यानें बौद्धधर्म हा नैश्वर प्रतिपादन करणारा असें त्यास मोठें दूषण दिलें आहे,

व मूर्तींची पूजा व देवळांतून धर्मोत्सव करणें ह्या ज्या गोष्टी **बौद्धधर्मांतून** हिंदु लोक घेत होते त्या गैरशिस्त आहेत असें ह्मटलें आहे. ज्याच्या त्याच्या घरीं स्थंडीलावर वैदिक होम करीत असत, तोच रिवाज चांगला असें ह्या जुने मताच्या ग्रंथकारानें लिहिलें आहे व त्यानें देवळांतील पुजाऱ्यांस पिढ्यांत दारु विकणारांची उपमा दिली आहे. **मनू**च्या ह्या दूषण देणारे लेखांचा कांहीं उपयोग झाला नाहीं, व **बौद्धधर्मांतील** लोकप्रिय पूजेचा प्रकार हिंदुधर्मानें घेतला. इ. स. चे पांचवे अथवा सहावे शतकांत वैदिक होम फार विरळा होऊं लागले, आणि छबिने, यात्रा, देवळांतील आनंददायक उत्साह आणि मूर्तीपूजा हे प्रकार अर्वाचीन हिंदुधर्माचे अगत्याचे अंग होऊन बसले. **इंद्र, अग्नि, वरुण**, व दुसरे प्राचीन वेदांतील देव यांची पूजा देखील दुर्मीळ झाली. **बौद्धधर्मी** लोक, **बुद्ध, धर्म** आणि **संघ** ह्या त्रयीमध्यें विश्वास ठेवीत व प्रत्येक नवशिक्याचा ह्या तिहींमध्यें विश्वास बसे तेव्हांच त्यास जोग्याची दिक्षा देत असत. अलीकडील हिंदु धर्मानें ह्या सारखीच **ब्रह्मा, विष्णु** आणि **शिव** ह्या तिघांची त्रयी करून तीस हिंदु देवमंडलांत मुख्य स्थान दिलें.

लौकीक धर्मांतील ह्या फेरफारांविषयीं आह्मीं पुढील काळच्या वर्णनांत लिहूं व तेथें पूर्वीच्या वैदिक धर्मापासून अर्वाचीन हिंदुधर्म निराळा होऊन त्याचा

प्रसार कसा होत गेला तें सांगूं. परंतु बौद्धधर्माचें वजन जुन्या हिंदुधर्मावर हलुहलूं कसें पडत होतें व मनूची स्थिति काय होती तें दाखविण्याकरितां त्या गोष्टी सारांश रूपानें येथें सांगणें जरूर आहे. मनू हा वैदिक हिंदुधर्म, वेदांतील देव व होम ह्यांचा शेवटचा पाठिराखा होता. त्यास अलीकडच्या हिंदुधर्मांतील देवत्रयी कबूल नव्हती व मूर्तिपूजा त्यास पसंत नसे. परंतु मनूच्या पुढील काळच्या लोकांकडस आपण पाहतों तेव्हां ते हिंदुदेवत्रयीं व मूर्तिपूजा मानीत आहेत असें नजरेस पडतें.

लग्नाचे प्रकार सूत्रामध्यें आहेत तेच मनूनें सांगितले आहेत व सूत्रकाराप्रमाणें तो हलके प्रकार नापसंत करतो. विधवांच्या लग्नाविरुद्ध लोकमत प्रबल होत चाललें होतें, व त्या रिवाजाची अगदीं मनाई जरी त्यानें केलेली नाहीं तथापि त्याविषयीं आपली नापसंती त्यानें दाखविलेली आहे, आणि त्याच्या ग्रंथांतील कांहीं वाक्यांवरून तो रिवाज त्यावेळीं बराच प्रचलीत होता असें वाटतें. त्याचप्रमाणें मनूनें लहान मुलींचीं लग्नें करणें पसंत केलें आहे, तथापि त्यावेळची आपणास जी कांहीं माहिती आहे त्यावरून स्त्रीया वयांत आल्या ह्मणजे नंतर लागल्याच लग्न करीत असत अशी साधारण चाल होती असें दिसतें. ह्याकाळीं परकीय लोक वारंवार स्वाऱ्या करीत असत व साधारण भयग्रद

स्थिति असल्यामुळें मुलींच्या बाळलग्नाच्या घातक चालीस उत्तेजन मिळालें; व हिंदुलोकांचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यानंतर तीच चाल एक धर्मकर्तव्य होऊन बसली. विधवांस त्यांच्या पतीच्या चितेवर जळूं देण्याची जी ह्यापेक्षां जास्ती दुष्ट चाल तिचा **मनू**च्या ग्रंथांत कोठें उल्लेख नाहीं.

मनूच्या ग्रंथाची बारा पुस्तकें असून त्यांत २६८५ श्लोक आहेत. सर्वांत मोठीं दोन पुस्तकें ७५६ श्लोकांचीं, त्यांत खऱ्या कायद्याचा विषय आहे. हा भाग अद्याप फार महत्वाचा मानितात व हिंदूमधील दिवाणी कामाच्या तंट्यांत त्यांतील कांहीं भाग हिंदुस्थानांतील कोर्ट तो कायदा ह्मणून कबूल करतात. **मनु** कायद्याचे अठरा विभाग करितो ते खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

१ कर्ज; २ ठेवी; ३ स्वामित्वाशिवाय विक्री; ४ भागीदारी; ५ देणगी परत घेणें; ६ रोजमुरा न देणें; ७ करार अमलांत न आणणें; ८ विक्री व खरेदी रद्द करणें; ९ धनी व नोकर; १० शिवेचे तंटे; ११ अपक्रिया; १२ बद नकशी; १३ चोरी; १४ लूट; १५ व्यभिचार; १६ पति आणि पत्नी; १७ वारसा; १८ जुगार व पैज.

ह्या हिंदु कायद्याच्या निरनिराळ्या पोट विषयांवर लांबलचक टिका करण्याची आह्मास अवश्यकता वाटत नाहीं. आमचा उद्देश इतकाच आहे कीं, लोकांचे री-

तिरिवाज कसे होते ते दाखविणाऱ्या कित्येक गोष्टींचा उल्लेख संक्षिप्त रूपानें येथें करावा. कर्जाचें प्रकरणांत असें सांगितलें आहे कीं, तारण असलें तर दरसाल दर शेंकडा १५ टक्के व्याज घेणें वाजवी होईल, परंतु तारणाशिवायचे कर्जास व्याजाचा जास्ती दर ठेवल्यास चालेल; आपणास असेंहीं समजतें कीं दुसऱ्या जिनगीप्रमाणें गुलाम स्त्रीस कर्ज काढणारा तारण ठेऊं शकत असे. धनी आणि चाकर ह्यांच्या संबंधानें ज्या कित्येक तजविजी केल्या आहेत त्यावरून असें समजतें कीं यूरोपाप्रमाणें हिंदुस्थानांतही दरेक गांवाचे अथवा शहराचे सभोंवती सार्वजनिक कुरण ह्मणून जमीन राखून ठेवीत असत, त्यांत लोकांस आपलीं गुरें चारण्यास मोकळीक असे. हा नियम फारच हितकारक असे. परंतु जमीनदारांच्या लोभामुळें व जमिनीची किंमत चढल्या कारणानें अशा सार्वजनिक जमिनी समूळ नाहींशा झाल्या.

गांवांच्या शिवेवर कांहीं प्रसिद्ध वृक्ष लावीत, तळीं खोदीत, विहीरी आणि झरे बांधीत. अशा ठिकाणीं दगड, हडें आणि गारगोट्याही पुरीत असत; आणि असें लिहिलें आहे कीं दोन भांडणाऱ्या गांवांची हद्द कोणती हें राजा नक्की करूं शकत नसेल तर ज्या पक्षकाराचें नुकसान होत असेल त्यास तें बनेल तोपर्यंत, राजानें राजभागाच्या जमिनींतून भरून द्यावें.

अपकृत्यांसंबंधीं नियमांत आणि बहुतेक फौजदारी कामांत जाती भेदावर रचलेले असम कायदे आपल्या पाहण्यांत येतात.

पति आणि पत्नीचा जो कायदा आहे त्यांत विधवेचें लग्न करणें साधारण रीतीनें नापसंत केलेलें आहे, तोपण बालविधवेच्या लग्नास परवानगी दिलेली आह. परंतु **बौद्ध युगांत** विधवेचीं लग्नें सर्व साधारण होत असत, व **मनूनें** सांगितलें आहे कीं, कोणा स्त्रीचा पति तीस सोडून देशत्याग करून गेला तर अमुक वर्षं वाट पाहून तितक्यांत त्याचा कांहींच पत्ता लागला नाहीं तर तिनें पुनर्विवाह करावा.

मनूच्या कायद्यापैकीं वारसा अथवा दायभाग हें फारच महत्वाचें खंड आहे. सर्व भाऊ एकत्र कुटुंबांत रहात अथवा आपल्या बापाची जी जिनगी असेल ती सर्वजण वाटून घेत. औरस मुलगा नसेल तर मुलीचा मुलगा दत्तक घेऊन तो स्वत:चाच मुलगा आहे असें त्यास म्हणतां येत असे. बारा प्रकारचे वारस ज्यांस मुलाप्रमाणें मानिता येतें त्यांचा उल्लेख **सूत्रकाराप्रमाणें मनूनेंही** केला आहे, परंतु त्यांपैकीं लग्नाचे बायकोपासून झालेला पुत्रच खरा मुलगा होय आणि बाकीचे खऱ्या मुलाचे गर्ह्य प्रतिनिधि होत असें तो म्हणतो. लग्नाच्या बायकोपासून झालेला पुत्र अथवा दत्तकपुत्र ह्याशिवाय तिसरे प्रकारचा पुत्र हिंदुरिवाज व हिंदु कायद्याप्रमाणें हल्लीं कायदेशीर मानिला जात नाहीं.

प्रायश्चित्ताविषयीं मनूनें निराळेंच खंड लिहिलें आहे. ब्राह्मणास ठार मारणें, दारु पिणें, ब्राह्मणाच्या सुवर्णाची चोरी करणें, गुरुपत्नीचें मन कुमार्गाकडेस वळविणें, आणि हीं कृत्यें करणारांची संगत राखणें हे महदापराध गणले आहेत. हलके अपराधांत "खाणीं व कारखान्यावर देखरेख राखणें व हस्त क्रियेची मोठमोठीं कामें करणें" हीं कृत्यें गणलीं आहेत. हें पाहून अर्वाचीन वाचकांस मोठें आश्चर्य वाटेल व त्यावरून *मनूच्या मतें शिल्प कर्मनुद्यम किती नीच आहे तें समजतें.

---

* ह्या खंडांत "**मनु**" चा जेथें जेथें उल्लेख आला आहे तेथें तेथें पूर्वी फार प्राचीनकाळीं चालत असलेल्या व ह्लीं अनुपलब्ध झालेल्या नियमांवरून ज्या अज्ञात लेखकानें हे कायदे एकत्र केले व ज्यास **मनु** ह्या पौराणिक नांवानें आपण ओळखितो तो होय असें येथें सांगण्याची जरूर आहे असें वाटत नाहीं.

खंड ४ थें.

शास्त्रांचें प्रगमन.

मागील खंडांत आह्मीं लिहिलें आहे कीं, **पराशर** व **गर्ग** हे अति प्राचीन ज्योतीषांपैकीं होत व ह्यांच्यापैकीं पहिला शौर्यकाळांत होता असें ह्मणतात; परंतु ज्यांत **पराशरा**चीं मतें आहेत व ज्याचें नांव **पराशरतंत्र** असें आहे तो ग्रंथ ज्या बौद्ध काळाविषयीं आह्मी हल्लीं लिहीत आहोंत त्यावेळचा निःसंशय आहे. तो बहुतेक गद्य आहे परंतु थोडासा भाग छंदोबद्ध आहे. त्यांत **हिंदुस्थान** देशाचा भूगोल आहे आणि त्यांत **यवन** ह्मणजे **ब्याक्ट्रियां**तील **ग्रीक** लोक पश्चिम **हिंदुस्थानां**त होते असें लिहिलें आहे. ह्यामुळें ह्या ग्रंथाचा काळ इ. स. चें दुसरें शतक असावें असें वाटतें.

गर्गाविषयीं आपणास जास्ती हकीकत मिळते. इ. स. चे दुसऱ्या शतकांत **ब्याक्ट्रियन ग्रीक** लोकांनीं **हिंदुस्थाना**वर जी स्वारी केली तिजबद्दल त्याचे ग्रंथांत थोडेसें लिहिलेलें आहे व ही हकीकत दुसरे ग्रंथांत फार विरळा मिळते. **ग्रीक** लोकांत जे विद्वान् होते त्यांविषयीं त्यास आदर वाटत असे, व या

संबंधांत त्याचे ग्रंथांतील पुढील वाक्यांचा वारंवार उतारा घेण्यांत येतोः—" **यवन** (**ग्रीक**) हे **म्लेंछ** (**अहिंदु**) आहेत, परंतु त्यांच्यामध्यें हें (**ज्योतिष**) शास्त्र फार माहीत आहे व त्यामुळें त्यांस ऋषी सारखा मान मिळतो तर जे ब्राह्मण ज्योतिषी असतील त्यांस किती मिळावा"?

त्याच्या ग्रंथाचा ऐतिहासिक जो भाग आहे त्यांत **गर्गानें मागधांच्या शिशुनाग** घराण्याविषयीं व नंतरच्या **मौर्य** घराण्याबद्दल लिहिलेलें आहे. महान् **अशोक** ह्याच्या नंतरचा चौथा राजा जो **सालिशुक** ह्याविषयीं लिहीत असतां तो असें ह्मणतो कीं, "**सांकेत**, (**अयोध्याप्रांत**) **पंचाळ** आणि **मथुरा** घेतल्यानंतर ते दुष्ट पराक्रमी **ग्रीक कुसुमध्वज** (**पाटणा**) शहरीं जातील व ते **पुष्पपूर** (**पाटणा**) घेतल्यानंतर सर्व राज्यांत अंधाधुंदी मातेल."

गर्ग आणखी पुढें असें लिहीत आहे कीं, "ते अजिंक्य **ग्रीक** मध्यदेशांत राहणार नाहींत, त्यांच्यामध्यें आपआपसांत एक भयंकर लढाई होईल व त्या **ग्रीकां**चा नाश झाल्यावर **औध** (अयोध्या) देशांत सात प्रबळ राजे ह्या युगाचे अखेरीस राज्य करतील." ह्या नंतर त्यानें असें लिहिलें आहे कीं, **ग्रीकां**नंतर अति लोभी **शक** लोक प्रबळ झाले. हे **शक** लोक ज्या तुराणी जातीनें ख्रि. श. पूर्वी १२६ व्या वर्षांच्या सुमारास

ब्याक्ट्रियांतील लोकांच्या राज्याचा नाश केला व त्यानंतर हिंदुस्थानांत ज्यांच्या झुंडीच्या झुंडी आल्या ते होत, असें समजण्यास फारसें दुष्कर नाहीं.

आपल्या देशावर परकीयांनीं स्वारी केली असतां देखील त्या परकीयांविषयीं हिंदुग्रंथकार आपले ग्रंथांत फारच विरळा लिहितात. त्यामुळें ग्रीक व तुराणी लोकांविषयीं वर दर्शविलेलें गर्गाचें लिहिणें संस्कृत ग्रंथांतील अपूर्व आणि लक्ष्यांत ठेवण्यासारखीं वाक्यें आहेत असें मानिलें जातें. ह्या लिहिण्यामुळें गर्गाचा अथवा आपले पुढें आहे त्या ग्रंथाचा काळ आपणास नक्की करितां येतो व तो काळ ख्रिस्तापूर्वीचें पहिलें शतक हा असावा.

बौद्धकाळांत जोतिषावर दुसरे ग्रंथ रचण्यांत आले होते; परंतु हल्लीं ते उपलब्ध नाहींत. हिंदुग्रंथकार अठरापर्यंत सिद्धांतांचा ह्मणजे ग्रंथांचा उल्लेख करितात. त्यांचीं नांवें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

१ पराशर, २ गर्ग, ३ ब्रह्म, ४ सूर्य, ५ व्यास, ६ वसिष्ट, ७ अत्रि, ८ कश्यप, ९ नारद, १० मरिची, ११ मनु, १२ अंगिरस, १३ रोमक, १४ पुलिष, १५ च्यवन, १६ यवन, १७ भृगु, १८ सौनक अथवा सोम.

ह्यांपैकीं बहुतेक ग्रंथ नष्ट झाले आहेत, अथवा विशेष अर्वाचीन काळीं ते पुन्हां लिहून काढलेले आहेत. ब्रह्म, सूर्य, वसिष्ट, रोमक, आणि पुलिष हे पांच तर

इ. स. च्या ६ व्या शतकांत **वराहमिहर** यानें सुधारून आपलें प्रसिद्ध ग्रंथांत त्यांचा संग्रह केला आहे. ह्या **वराहमिहरा**च्या ग्रंथाविषयीं पुढील खंडांत आम्ही लिहिणार आहोंत ह्मणून ह्या पांच सिध्दांतांचें येथें थोडेसें दिग्दर्शन केलें असतां पुरें होईल.

ब्रह्मसिद्धांत:—ह्या सिध्दांताचा **वराहमिहरा**नें आपल्या व्यापक ग्रंथांत समावेश केला होता इतकेंच नाहीं, परंतु दुसऱ्या एका **ब्रह्मगुप्त** नांवाच्या ज्योतिषशास्त्रज्ञानें त्याची सुधारणा करून तो ग्रंथ इ. स. च्या ७ व्या शतकांत पुन्हा लिहून काढिला; आणि बौध्द युगांतील जो अस्सल ग्रंथ तो जाऊन त्याची जागा **ब्रह्मगुप्ता**च्या ग्रंथानें पटकाविली आहे.

सूर्य सिद्धांत:—हा ग्रंथ हिंदु ज्योतिषशास्त्राच्या ग्रंथमालेंतील अति प्रसिद्ध ग्रंथ होय. बौद्धकाळच्या अस्सल ग्रंथाचा **वराहमिहरा**नें आपल्या ग्रंथांत प्रथम समावेश केला व नंतर अर्वाचीन ज्योतिष्यांनीं तो अनेक वेळां लिहून काढला. तथापि हल्लीं जो ग्रंथ उपलब्ध आहे तो अस्सल ग्रंथाचा, डाक्टर कर्नच्या ह्मणण्या प्रमाणें, "परंपरागत व यथायोग्य वंशज आहे." हल्लींच्या ग्रंथांत १४ प्रकरणें आहेत व त्यांत ग्रहांचीं मध्यम (अंतर्गत) व खरीं स्थलें, वेळेविषयीं प्रश्न, चंद्र व सूर्य यांची ग्रहणें, ग्रहांचे व नक्षत्रांचे संयोग, सूर्याचा उदय व ग्रहांचे व नक्षत्रांचे

अस्त, चंद्राची क्षयवृध्दि, अर्धचंद्राग्रांची स्थिति, सूर्य व चंद्राच्या क्रांति, विश्ववर्णन खगोलविद्याविषयक यंत्रांची रचना, आणि वेळ मोजण्याच्या निरानिराळ्या रीति हे विषय आहेत.

वासिष्ट सिद्धांत:—ह्या ग्रंथाचें अलीकडील ग्रंथकार **विष्णुचंद्र** यानें संशोधन केलें होतें. वासिष्ट सिद्धांत नांवाचा एक नामधारी ग्रंथ फारच अर्वाचीन काळीं झाला असून तो अद्यापपर्यंत विद्यमान आहे.

रोमक सिद्धांत:—हा ग्रंथ ब्रह्मगुप्ताच्या ह्मणण्याप्रमाणें श्रीसेन यानें केलेला आहे. ह्याच नांवाचा एक दुसरा खोटा ग्रंथ हल्लीं विद्यमान आहे, त्यांत येशु खिस्ताचा जन्मयोग (जन्मकुंडली) आणि मोगल बादशहा **बाबर** आणि **अकबर** ह्यांच्याविषयीं कांहीं हकीकत लिहिलेली आहे.

पुलिश सिद्धांत:—हा ग्रंथ पॉलस **अलेक्झांड्रिनस** याच्या ज्योतिषशास्त्रावरील **इस्यागोजे** ह्या ग्रंथाचें संस्कृत भाषांतर असावें असें प्रोफेसर वेबर ह्यांस वाटतें. **पुलिश** ह्मणजे **पॉलस** अशी एक रूपता करणें हें संशययुक्त आहे असें डाक्टर **कर्न** यांचें मत आहे, परंतु **पुलिश** हें कोणी तरी **ग्रीक** ज्योतिष्याच्या नांवाचें दर्शक असावें ह्याविषयीं त्यास संशय नाहीं.

बौद्ध युगांतील ज्योतिषांच्या पद्धतीपैकीं ह्या पांच

पद्धती **पराशर** आणि **गर्ग** यांच्या खालोखाल होत. त्यांचा काल स्थूलमानानें इ. स. च्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या शतकांत असावा असें वाटतें.

वैद्यशास्त्रांत हिंदु लोकांनीं, **ग्रीक** लोक ख्रि. श. पूर्वीं चौथे शतकांत हिंदुस्थानांत आले होते तेव्हांच, बरेंच प्रगमन केलें होतें. **नीरकस** (ज्याचा **एरियननें** उतारा घेतला आहे) आपणास कळवितो कीं "सर्पाच्या विषावर **ग्रीक** लोकांजवळ औषध नव्हतें, परंतु ज्या लोकांवर हा दुर्धर प्रसंग पडे त्यांस हिंदु लोक बरे करीत असत." **एरियन** स्वतः ह्मणतो कीं " **ग्रीक** लोक आजारी होत तेव्हां ते **तार्किक** (ब्राह्मण) लोकांकडेस जात असत व ते लोक विस्मयकारक किंवहुना अमानुषी कृतीनें जें जें कांहीं बरें होण्यासारखें असें तें बरे करीत असत."

एकंदर वैद्यशास्त्रास आयुर्वेद हें नांव आहे, परंतु ख्रिस्ती शका पूर्वीच्या काळचा एखादाही ग्रंथ हल्लीं खात्रीपूर्वक उपलब्ध नाहीं. अति प्राचीन ग्रंथ ह्मटले ह्मणजे **चरक** आणि **सुश्रूत** ह्यांचे होत; परंतु हे ग्रंथ बहुत करून बौद्धयुगांत रचले गेले असावेत, ह्मणजे त्यांचा काळ फार झालें तर ख्रिस्ताच्या पूर्वीच्या अगदीं नजीकच्या शतकांत असावा.

चरकाचा ग्रंथ बहुतेक औषधावर आहे, आणि सुश्रूतांत शस्त्रविद्या आहे. ह्या ग्रंथांचा पुष्कळ भाग

मन:कल्पीत आहे व अलीकडील शस्त्रवैद्यास तो अयुक्तिक असा वाटेल, परंतु ह्या ग्रंथांची व्यापकता व शरीरविद्या, शस्त्रविद्या, औषधी व रसायन सिद्धि यांजविषयीं जी विपूल माहिती ह्या ग्रंथांत आहे तिज-विषयीं, ह्या ग्रंथांत काळ ध्यानांत घेतां, आश्चय वाटतें.

चरकांत आठ प्रकरणें आहेत. त्यांत औषधी, रोग, सांतीचे रोग, प्राणाची प्रकृती व धर्म, इंद्रियें व त्यांचीं कर्में, शरीर व त्यांतील निरानिराळे रोग, आणि शेवटीं वांतीचीं, रेचकाचीं, आणि विषप्रतिकारक औषधें, निरानि-राळ्या प्रकारच्या बस्त्या वगैरे लिहिलेलें आहे.

सुश्रूतांत सहा भाग केलेले आहेत. त्यांत शस्त्र-क्रिया, निरानिराळ्या रोगांचीं लक्षणें, शरीररचना, यौव-नदशा, गर्भ व त्याची वाढ, जखम, पूयव्रण, हस्तिभंग, सूतिकाशास्त्र, विषप्रतिकार औषधें, आणि विशिष्ट रोगांवर प्रतिपादन हे विषय आहेत.

डाक्टर रॉयले यानें असें दाखविलें आहे कीं, धातूचा उपयोग औषधांकडेस कसा करावा तें हिंदु लोकांस फार माहीत होतें. त्यांस ताम्र (Oxcide of Copper), गेरु (Oxcide of Iron), वंग (Oxcide of Tin), जस्तमचें फूल (Oxcide of Zinc), मुडदाड शिंग (Oxcide of Lead), सलफ्युरेट ऑफ आयर्न (Sulphuret of Iron), सलफ्युरेट ऑफ कॉपर (Sulphuret of Copper)), सुरमा (Sulphuret of

Antimany), रसशेंदूर (Sulphuret of arsenic), मोरतुत (Sulphate of copper), सफेत तुतिया (Sulphate of zinc), हिराकस (Sulphate of iron), जंगाल (Diacetate of copper), कारबोनेट ऑफ लेड आणि कारबोनेट ऑफ आयर्न (Carbonates of lead and of iron), हीं औषधें माहीत होतीं. डाक्टर रॉयले आणखी असें ह्मणतो कीं, प्राचीन ग्रीक आणि रोमन लोक पुष्कळ धातूंचा उपयोग औषधां-कडेस वर अंगास लावण्यांत करीत असत; तथापि त्या पोटांत घेण्यास प्रथमतः आरब लोकांनीं प्रारंभ केला अशी सर्वसाधारण समजूत आहे....परंतु चरक आणि सुश्रुत जे ग्रंथ अति प्राचीन आरबाच्या पहाण्यांत होतें त्यांत अनेक धातूंचीं रसायनें पोटांत घेण्यास सांगितलेलीं आहेत."

हिंदुस्थानांत वनस्पतींचा पुरवठा अमर्याद आहे, व त्यांवद्दल वर दर्शविलेल्या ग्रंथांत जी माहिती दिली आहे तीही त्याचप्रमाणें फार विस्तृत आहे. त्यांतील औषधें ह्या देशांतील हवेस अनुरूप व लोकांच्या शांत प्रकृतीस योग्य अशी शांतिप्रद व शोधन करणारीं आहेत. हिंदु लोकांस औषधांचें जें ज्ञान होतें त्यापेक्षां त्यांचें शस्त्रविद्येचें ज्ञान मोठें आश्चर्य उत्पन्न करण्या-सारखें होतें व डाक्टर रॉयले ह्मणतो कीं, "ते प्राचीन शस्त्रवैद्य ज्या क्रिया करीत असत त्यांत मुतखड्याचें

छेदन आणि गर्भाशयांतून गर्भ बाहेर काढणें ह्या होत्या, व त्यांच्या ग्रंथांत १२७ पेक्षां कमी नाहींत इतकीं शस्त्रें सांगितलीं आहेत, ह्या गोष्टी ऐकून आपणास विस्मय वाटल्यावांचून खास राहणार नाहीं."

हिंदु लोकाचे औषधीसंबंधीं ग्रंथ फार प्राचीन-काळीं अरब लोकांस मिळाले होते. **सिऱ्यापिआँन ऱ्हाजेस** आणि **आव्हिसेना** हे ग्रंथकार चरकांतील उतारे देत आहेत; आणि इ. स. च्या आठवे शतकांत **हरुण-अल-रशिद** यानें दोन हिंदु वैद्य आपले नोकर ठेविले होते. अरब लोकांच्या ग्रंथांत ते **मंक** आणि **साले** ह्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत.

पंचम युग—पौराणिक काळ.

कनोज आणि उज्जयनीचें वर्चस्व.

इ. स. ४०० पासून ८०० पर्यंत.

खंड १ लें.

कनोज आणि उज्जयनी.

शौर्यकाळांत **गंगा** नदीच्या वरच्या फाट्यावरील **कुरु** आणि **पांचाळ** यांचे देश हे सुधारणेंत आग्रगणी होते. **मागधांचें** वर्चस्व झाल्या नंतर जरी राजकीय सत्ता व महत्व ह्या संबंधानें त्यांचा ऱ्हास झाला होता, तथापि ते देश शुद्ध आर्यांची जन्मभूमि असल्यानें ती विशेष पुण्य व पवित्र भूमि अशी नेहमी मानली जात असे. **मागधांच्या** ऱ्हासा नंतर ह्या भूमीस पूर्वीचें महत्व पुन्हा आलें आणि **कनोजचे गुप्त,** जे उत्तर हिंदुस्थानचे सार्वभौम राजे झाले होते, त्यांच्या बरोबरच इतिहासास एक प्रकारचें महत्व आहे.

ह्या प्रबल राजघराण्याचे राज्य इ. स. च्या ४ शतकांत सुरू झालें व त्यांतील तिसरा राजा **कनोजचा** पहिला **चंद्रगुप्त** ह्यानें **विक्रमादित्य** हा किताब धारण केला.

ह्या किताब नंतर पुष्कळ राज्यांनीं घेतला होता. **चंद्रगुप्ताचा** मुलगा **समुद्रगुप्त** हा प्रबल राजा होऊन गेला. **प्रयाग** (अलाहाबाद) येथील एका स्तंभावरील लेखावरून असें समजतें कीं, त्यानें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व राजांस जिंकिलें होतें. व **बंगाल, नेपाळ** आणि **आसाम** ह्या शेजारच्या प्रांतांतील राजे त्यास करभार देत असत, आणि पश्चिमेकडील शहाराजे व लंकेचे राजे त्यास नजराणे पाठवीत असत.

समुद्रगुप्तानंतर दुसरा **चंद्रगुप्त** हा गादीवर बसला. त्याचें राज्य पांचवे शतकाच्या सुरुवातीस होतें, आणि आपल्या आजाप्रमाणें त्यानें **विक्रमादित्य** हें उपपद धारण केलें होतें. त्याच्या मागाहून **कुमारगुप्त** हा गादीवर आला. ह्याच्या वेळचा एक शिलालेख अलीकडेस शोधून* काढिला आहे. त्यांत एक मंदिर माळव्याचा शक ४३९ ह्या वर्षीं बांधण्यांत आलें असें लिहिलें आहे. हा माळव्याचा शक इ. स. पूर्वी ५६ वें वर्षीं सुरू झाला असावा व तो हल्लीं हिंदुस्थानांत **विक्रमाचें** संवत् ह्या नांवानें जो शक प्रसिद्ध आहे तेंच असावा असें मानण्यास पुष्कळ सबळ कारणें आहेत.

कुमारगुप्तानंतर स्कंदगुप्त राजा झाला, तोही मोठा प्रबळ होता. त्याच्या वेळचा शिलालेख आहे त्यांत

* मिस्तर फ्लीट साहेबानें.

लिहिलें आहे कीं, त्याचें राज्य समुद्रापर्यंत पसरलेलें होतें, आणि म्लेंछ अथवा परकीय लोकही त्याच्या नांवास मान देत असत. त्याची कारकीर्द सुमारें इ. स. ४६० पासून ४८० पर्यंत होती व तो आपल्या घराण्याचा शेवटला प्रबल राजा होता. त्याच्या मागाहून **बुद्धगुप्त** आणि **भानुगुप्त** हे गादीवर बसले होते परंतु त्यानंतर त्यांच्या घराण्याचा शेवट झाला.

ह्या घराण्याच्या नाशाचीं कारणें निरनिराळीं कल्पिलीं आहेत, परंतु पांचव्या शतकांत **श्वेतहून्स** लोकांच्या स्वाऱ्यांनीं त्याचा नाश झाला असावा हें विशेष संभवनीय आहे. **हून्स** लोकांनीं मध्य हिंदुस्थानापर्यंत देश काबीज केला होता, ह्याविषयीं संशय नाहीं. **कॉस्मा-इंडिको-प्ल्युसटिस** ह्यानें दहावें शतकांत लिहिलें आहे कीं, त्याच्या वेळीं **हून्स** लोकांचें मोठें प्रबळ राष्ट्र होतें व त्यांची राजसत्ता पंजाब प्रांतांत होती.

गुप्तांचें राज्य **कनोज** व उत्तर हिंदुस्थानांत असतां **फा-हियन** नांवाचा एक प्रसिद्ध चिनी प्रवाशी ह्या देशांत फिरून गेला. पांचवें शतकांत हिंदुस्थानाची स्थिति कशी होती तें पाहण्यास त्यानें जी खरी हकीकत लिहिली आहे तिकडे आपण घटकाभर वळून पाहूं या. **यमुने**च्या कांठीं **मथुरा** येथें **बौद्ध धर्मा**चा मोठा उत्कर्ष त्याच्या पाहण्यांत आला. त्यावेळीं त्या शहरांत २० मठ आणि तीन हजार पुरोहित होते. मथुरेच्या

दक्षणेस मध्यदेश अथवा हिंदुस्थानचा मध्यभाग पसरला आहे.

"हा प्रदेशाची हवा समशीतोष्ण आहे व तेथें हिम अथवा बर्फ नाहीं. लोक संपन्न आहेत, त्यांच्यावर दर माणसीं कर नाहीं अथवा त्यांस अधिकाऱ्यांचा त्रास नाहीं; फक्त जे लोक राजाच्या जमिनीची लागवड करितात तेच तिजपासून होणाऱ्या नफ्यापैकीं कांहीं भाग राजास देतात. त्यांस वाटेल तेव्हां ते लोक जातात अथवा रहातात. राजे लोक शरीरशासन केल्याशिवाय आपला अधिकार चालवितात, अपराधांच्या प्रमाणानें कैदी लोकांस कमीजास्ती दंड करितात. पुन्हा पुन्हा बंड करणारांचाही उजवा हात तोडून सोडून देतात. राजाचे डावे आणि उजवे बाजूस जे त्याचें शरीर-रक्षक असतात त्यांस नक्की ठरविलेला पगार देतात. सर्व देशांत चंडाळाशिवाय कोणीही हिंसा करीत नाहीं, मद्य पीत नाहीं व लसूण अथवा कांदा खात नाहीं."

नंतर **फा-हियन** हा **कनोज** येथें गेला होता, परंतु ह्या **गुप्तांच्या** राजधानीविषयीं तो विशेष लिहीत नाहीं, फक्त तेथें दोन मठ होते ह्मणून सांगतो. तो स्वतः **बौद्ध** यात्रेकरू असल्यामुळें **गौतमाशीं** कोशल व मगध देशांतील ज्या ज्या स्थलांचा संबंध होता तेथें तेथें तो गेला. **पाटणा** येथील राजवाड्याच्या शिल्पकामाची

भव्यता व कोरींव सौंदर्य पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें. **गया, राजगृह,** आणि **चंपा** हीं ठिकाणें पाहिल्यावर तो शेवटीं बंगाल्यांत गेला आणि **ताम्रलिपी**, ह्या समुद्र किनाऱ्या वरील नगरांत, बौद्ध धर्म पुस्तकांच्या नकला करीत राहिला.

ताम्रलिपीहून हिंदूंच्या जहाजांत बसून तो लंकेस गेला व तेथून दुसऱ्या एका हिंदूंच्या जहाजांतून **जावा**-बेटास जाऊन पोहोंचला. हिंदु लोक आपल्या स्वत:च्या जहाजांत बसून पांचव्या शतकांत ह्या समुद्रांतून जल प्रवास करीत असत व त्यांनीं आपला हिंदुधर्म **जावा**-बेटांत चालू केला होता, ह्या गोष्टीं ह्या प्रवाशाच्या हकीकतीवरून आपणांस समजतात व त्याविषयीं मोठें आश्चर्य वाटतें, **जावा** बेटांतून हा धार्मिक प्रवासी शेवटीं **चिन** देशांतील आपल्या स्वदेशभूमीस परत गेला.

ह्या विषयांतरापासून पुन्हां आपल्या कथानिरुपणा-कडेस वळूं. गुप्तांच्या ऱ्हासानंतर हिंदुस्थानच्या इति-हासांत प्रख्यात राजा उज्जयनीचा **विक्रमादित्य** हा झाला. त्यानें एका राष्ट्रीय महायुद्धांत जय मिळविला होता. तो अर्वाचीन संस्कृत भाषेंत जे जे कांहीं उत्तम आणि सुंदर होतें त्याचा पुरस्कर्ता आणि तो असंख्य दंतकथांचा विषय होऊन राहिला होता, ह्याप्रमाणें **फ्रेंचास** जसा **शार्लमेन**, इंग्रजास **आलफ्रेड्**, **बौद्धांस** **अशोक**, मुसलमानांस **हरुण-अल्ल-राशिद**, तसा हिंदूंस हा

उज्जयनीचा विक्रमादित्य होता. हिंदुस्थानांतील सर्व भाषांतून ह्या राष्ट्रीय वीराविषयीं असंख्य दंतकथा लिहिलेल्या आहेत, व अद्यापपर्यंत हिंदुस्थानच्या सर्व भागांत विस्तृत छायेच्या पिंपळाच्या झाडांखालीं खेडेगांवांतील लोक जमा होऊन अक्षय औत्सुक्यानें ह्या महावीराच्या कधींही न संपणाऱ्या दंतकथा ऐकत बसतात. उज्जयनीच्या विक्रमादित्याविषयीं जितक्या आख्यायिका आहेत तितक्या रोलंड अथवा आरथर-च्याही नसतील.

ह्या गोष्टींत अथवा कल्पित कथाप्राचुर्यांत त्याच्या खऱ्या इतिहासाचा लोप झाला आहे! त्याचा काल व तो स्वतः कोणता ह्याविषयीं इतिहासकार व प्राक्कालीन-विषय-पंडित यांमध्यें मोठा वादविवाद चालला होता. इ. स. पूर्वी ५६ व्या वर्षापासून जो शक चालू झाला आहे त्यास त्याचें नांव आहे, आणि कांहीं दिवस पंडितांची अशी समजूत होती कीं विक्रमादित्य हा इ. पूर्वी पहिल्या शतकांत होऊन गेला. कित्येक पंडितांस तर इ. स. च्या चवथें व पांचवे शतकांत गुप्तांच्या घराण्यांतील ज्या एका राज्यानें विक्रमादित्य ही पदवी धारण केली होती त्याच्या शिवाय उज्जयनीचा विक्रमादित्य झाला होता कीं काय ही शंका आहे.

ह्या वादांत आम्ही पडत नाहीं. इ. स. च्या सहाव्या शतकांत उज्जयनीस एक विक्रमादित्य होऊन गेला,

त्याच्या वेळेस जे कवी व ग्रंथकार उर्जीत देशेस आले होते त्यांनीं आपले ग्रंथ मागें ठेविले आहेत, ते ग्रंथ आजमितीस हिंदुस्थानांतील लोक वाचतात व त्याविषयीं मोठें आश्चर्य प्रदर्शित करतात, ह्या गोष्टीं विषयीं वाजवी शंका घेण्यास जागा नाहीं. हें मत खालील कारणांवरून कायम केलें आहे.

(१) **कणिष्क** व **उज्जयनीचा विक्रमादित्य** ह्यांच्या मध्यें तीस राजे होऊन गेले, असें काश्मीरचा हिंदु इतिहासकार लिहितो. **कणिष्क** ह्यानें इ. सन ७८ पासून राज्य केलें. तेव्हां उज्जयनीच्या **विक्रमादित्याचा** काळ सहावे शतकांत येतो.

(२) **चिनी** प्रवासी **हु-एन-संग** जो हिंदुस्थानांत सातवे शतकांत आला होता, तो पहिला **शिलादित्य** हा इ. स. ९८० च्या सुमारास राज्य करीत होता व त्यानंतर लागलाच **विक्रमादित्य** झाला असें लिहितो.

(३) **वराहमिहर** जो ज्योतिषी होता आणि जो **विक्रमादित्या**च्या दरबारांतील नवरत्नांपैकीं एक रत्न होता त्यानें आपले ग्रंथाचा काळ कोणता तें लिहिलें आहे व तो इ. स. ५०५ पासून ५८७ दरम्यान होता.

(४) कवि **कालिदास** हा **विक्रमादित्या**च्या दरबारांतील दुसरें एक रत्न होता, त्याचे ग्रंथ सहावे शतकांतीलच निःसंशय आहेत, कारण त्यांतील मतलब,

व भाषासरणी वरून ते इ. स. पूर्वी पहिल्या शतकांतलि असतील असें मानितां येत नाहीं.

ह्या विक्रमादित्याच्या इतिहासासंबंधीं इतकीच हकीकत आपणास मिळते कीं, हिंदुस्थानावर परकीय लोकांनी स्वारी केली होती त्यांस त्यानें पाठीमागें हटविलें व त्यांच्या राजास मुलतानाजवळ कोरूर येथें ठार मारिलें. ह्यामुळें परकीय स्वाऱ्या होण्याच्या बंद होऊन देशास शांती मिळाली व त्याच्या ज्ञानी आणि प्रबल छत्राखालीं सर्व उत्तर हिंदुस्थान एकवटलें होतें. शांततेच्या कलांचा उत्कर्ष झाला, शास्त्रें व विद्या यांस नवीन उत्तेजन मिळालें आणि काव्य व नाट्यकला ह्यांनीं मोहून टाकणारा आपला दीप प्रज्वलीत करून ह्या हिंदुस्थानच्या इतिहासाच्या आगस्तन काळावर प्रभा फेकिली. धर्मासही जीव येऊन तकवा आला, आणि ह्या राजाच्या पितृवत् आश्रयाखालीं अर्वाचीन हिंदु धर्म उत्कर्ष पावला.

ह्या नंतर उत्तर हिंदुस्थानचा राजा पहिला शिलादित्य झाला. हु-एन-संगाचे लिहिण्यावरून कळतें कीं, ज्याप्रमाणें विक्रमादित्याचें हिंदु धर्माकडेस अंग होतें त्याप्रमाणेंच शिलादित्याचें बौद्ध धर्माकडेस लक्ष होतें. परंतु दोन्ही धर्मांच्या लोकांमध्यें निकरावर येणारें असें वैमनस्य हिंदुस्थानांत अनेक शतकेंपर्यंत नव्हतें. राजे लोक आलटूनपालटून एका किंवा दुसऱ्या धर्मावर

कृपादृष्टी ठेवीत, परंतु दोन्ही धर्मांच्या साधूंस देणग्या देत; आणि पुष्कळ वेळां तर असें घडून येई कीं, बाप एक धर्मांत तर मुलगा दुसऱ्या धर्मांत व दोन्ही भाऊ निरनिराळ्या मतांचें असत. ह्याप्रमाणें अशोकानंतर एक हजार वर्षेपर्यंत उत्तर हिंदुस्थानांत दोन्ही धर्मांचे अनुयायी निकरावर न येतां एकमेकांच्या अगदीं शेजारी रहात असत. हें धर्माप्रतिबंधाचें अद्भुत उदाहरण होय व बहुतेक जगाच्या इतिहासांत तें दुसरें मिळणें दुर्मिळ आहे.

पहिल्या **शिलादित्या**नंतर **प्रभाकरवर्धन**, आणि त्याचे नंतर **राज्यवर्धन** हे राजे झाले. हा दुसरा राजा बंगाल्याशीं लढाई करीत असतां युद्धांत मारला गेला. त्याच्या मागून **हर्षवर्धन** हा गादीवर आला, त्यानें दुसरा **शिलादित्य** हें नांव धारण केलें व इ. स. ६१० पासून ६५० पर्यंत चाळीस वर्षें राज्य केलें.

ह्या चक्रवर्ती राजानें पुन्हा एकदां सर्व उत्तर हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणिलें; परंतु दक्षिणेकडील मराठ्यांस जिंकण्याचा त्याचा प्रयत्न निर्फळ झाला. हा राजा धर्मानें बौद्ध होता, तो बौद्ध लोकांचा पंचवार्षिक उत्साह मोठ्या थाटानें करीत असे, व त्या वेळीं येण्यास उत्तर हिंदुस्थानांतील सर्व राजांस आमंत्रणें करीत असे. **कनोज** हें शहर हिंदुस्थानची राजधानी

पुन्हा झालें. येथें एक पंचवार्षिक उत्साह चालला असतां चिनी प्रवासी हु-यन-संग आला होता, व त्यावेळीं उत्तर हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून वीस राजे त्या उत्साहाकरितां आले होते. येथें क्षणभर आपला कथौघ थांबवून सातव्या शतकांतील हिंदुस्थानाविषयींची उत्तम हकीकत जी ह्या चिनी प्रवाशानें लिहून ठेविली आहे तिचें सिंहावलोकन करूं.

कणिष्काच्या कीर्तीनें काश्मीर देश अद्याप दुमदुमलेला होता व त्यानें जी बौद्ध लोकांची सभा भरविली होती तिजविषयीं चिनी फिरस्त्यानें लिहिलें आहे. मथुरा शहर भरभराटींत असून तेथें बौद्धांचे अनेक मठ होते. तेथें जे बौद्ध लोकांचे उत्साह होत त्या विषयींची हकीकत त्यानें मन:पूर्वक लिहिली आहे. " ते रत्नखचीत पताका फडफडवीत. मौल्यवान छत्रें इतकीं पसरीत कीं त्यांचें जसें काय जाळेंच दिसें, धूपाच्या धूरांचे ढगच आहेत असे वाटे. पावसाप्रमाणें पुष्पें जिकडे तिकडे फेकीत, आणि त्यामुळें सूर्य व चंद्र ढगांप्रमाणें अच्छादिले जात."

गंगानदीच्या उगमाजवळचे ठिकाण, हरीद्वार हें हल्लींप्रमाणें त्यावेळींही हिंदूंच्या यात्रेचें पवित्रस्थान होतें. मथुरा हें मोठे भरभराटीच्या राजधानीचें शहर होतें, त्याची लांबी चार मैल होती, त्यास सभोंवती खंदक होता, आणि एकमेकांचे समोर मजबूत

व उंच बुरूज असत. तेथील हवा सुखप्रद, लोक सुखी व तृप्त, प्रामाणिक आणि निष्कपटी होते, व त्यांच्यांत विद्येला मान असे. बौद्धांची व हिंदूंची लोकसंख्या सारखी असून ते लोक शांततेनें रहात असत; तेथें बौद्धांचे मठ १०० होते आणि हिंदूंचीं देवळें २०० होतीं.

ह्या शहरीं चक्रवर्तीनें राजे व परराष्ट्रांचे लोक जमवून बौद्धांच्या सणाचा मोठ्या थाटानें उत्सव केला. एक उंच **गोपूर** बांधून त्याचे जवळ बुद्धाची सोन्याची मूर्ति स्थापन केली होती. ह्या गोपुरापासून राजवाड्यापर्यंत सर्व जागा मंडपानीं व गायनवादन करणाऱ्या मंडळीकरितां तयार केलेल्या ठिकाणांनीं शृंगारलेली होती. उत्तम शृंगारलेल्या हत्तीवर बसवून बुद्धाची एक लहान मूर्ति मिरवीत असत, तिच्या उजवे बाजूस **शिलादित्य** ५०० हत्ती घेऊन चाले व डावे हाताला आसाम देशाचा राजा, ज्यास मुद्दाम बोलावून आणिला होता तो, तितकेच हत्ती घेऊन असे. मोतीं व दुसऱ्या मौल्यवान जिनसा आणि सोन्यारुप्याचीं फुलें सर्व बाजूंस उधळीत. मूर्तीस स्नान घातल्यावर शिलादित्यानें तीस आपल्या खांद्यावर घेऊन नेलें, बौद्ध व ब्राह्मण ह्या दोघांसही मेजवान्या दिल्या. प्रत्येक दिवसाच्या शेवटीं गहन विषयांवर वादविवाद होत असे.

ह्या हकीकतीवरून असें दिसतें कीं, ह्यावेळीं बौद्ध-धर्म हा मूर्तिपूजा, भपकेदार उत्साह आणि थाटमाट ह्यांनीं परिप्लुत झाला होता. हे गुण अर्वाचीन हिंदु धर्मानें बौद्ध धर्मापासून घेतले आहेत.

प्रयाग किंवा ज्यास हल्लीं अलाहाबाद ह्मणतात हें हिंदूचें एक पवित्र स्थान असे. येथें **गंगा** व **यमुनेचा** संगम झाला असल्यामुळें त्याठिकाणीं मरण आलें तर आपण पापमुक्त होऊं व आपणास स्वर्ग मिळेल अशा समजूतीनें शेंकडो हिंदु तेथें मरण्यास येत असत. या ठिकाणीं **बौद्ध** धर्मास कांहीं मान नसे. **बनारस** (काशी) हें हिंदूंचें दुसरें एक पवित्र ठिकाण होतें, तेथें शिवाचीं शंभर देवळें होतीं, परंतु **बौद्धांचे** मठ फक्त तीसच होते.

मगध देशास उतरती कळा लागली होती. मुख्य शहरांत वस्ती कमी झाली होती, परंतु प्रांतांतील मोठ मोठ्या गांवांतून अद्याप बरीच लोकवस्ती होती. **पाटलीपुत्र** अथवा **पाटणा**, जें शहर **गौतम** बुद्धाच्या वेळीं **अजातशत्रूनें** स्थापिलें व **चंद्रगुप्ता**च्या वेळे पासून सर्व हिंदुस्थानची राजधानी होती, तें ओसाड झालें होतें. त्याचप्रमाणें राजगृहाची स्थिति मोडकळीस आलेली होती.

नालंद येथें बौद्धांचा अति मोठा मठ असे व पुष्कळ शतकेंपर्यंत तेथें **हिंदुस्थानचे** विश्वविद्यालय

असे. ह्या ठिकाणची बौद्ध प्रवाशानें फारच प्रशंसा केली आहे. " गहन विषयांवर प्रश्न विचारण्यास व त्यांचीं उत्तरें देण्यास दिवस पुरत नाहीं. सकाळपासून रात्रीपर्यंत ते वादविवादांत गढलेले असतात. वृद्ध व तरुण एकमेकांत मदत करितात. ज्यांस त्रिपिटकांतील प्रश्नांवर वादविवाद करिता येत नाहीं, त्यांस मान मिळत नाहीं व शरमेनें त्यांस आपल्यास लपवून घेणें भाग पडतें. ह्या कारणांमुळें निराळ्या शहरच्या ज्या पंडितांस आपण वादविवादांत निष्णात आहोंत अशी कीर्ति मिळविण्याची उत्कट इच्छा असे, त्यांच्या झुंडीच्याझुंडी आपले संशय फेडून घेण्यास येथें येतात, व येथून त्यांच्या शहाणपणाचा ओघ लांब रुंद पसरतो " डाक्टर **फरग्युसन**नें म्हटलें आहे कीं, क्लनी आणि क्लेअरव्हो हीं ठिकाणें मध्यकाळांत जशी फ्रान्सांत होतीं तसें **नालंद** हें हिंदुस्थानास होय. तें खऱ्या विद्येचें आगर होतें व त्या केंद्रापासून ती दुसऱ्या देशांत पसरली.

बंगाल देशाचे तुकडे होऊन पांच राज्यें झालीं होतीं असें ह्या प्रवाशास आढळून आलें. हीं राज्यें:— **पुंड्र** अथवा उत्तर **बंगाला**, २ **कामरुक** अथवा **आसाम**, ३ **समतात** अथवा पूर्व **बंगाला**, ४ **सुवर्ण** अथवा पश्चिम **बंगाला** आणि ५ **ताम्रलिप्ति** अथवा दक्षिणेकडील **समुद्रकिनारा**. बंगाल्यांतून तो प्रवाशी **ओरिसा**

प्रांतांत गेला. तेथील लोक कमी सुधारलेले व उत्तर हिंदुस्थानांतील संस्कृत भाषेपेक्षां निराळी भाषा बोलणारे होते असें त्याच्या आढळण्यांत आलें.

नंतर त्या प्रवाशानें **कलिंग** व दक्षिणेंतील **अंध्र** लोक. जे चार शतकेंपर्यंत हिंदुस्थानांत महाबलाढ्य राष्ट्र होतें, त्यांच्या देशांतून प्रवास केला. येथें त्यानें **अमरावती**चा प्रसिद्ध डेरा पाहिला. ह्यापेक्षां दक्षिण दिशेस जाऊन सुप्रसिद्ध **कांचीनगरी**, हल्लीं जिस **कांजी-वेरम** ह्मणतात व जी द्रविडांच्या प्रबल राजांची राजधानी होती, ती पाहिली.

उत्तरेकडेस वळून तो शूर मराठ्यांच्या देशांतून गेला. ह्या लोकांच्या स्वभावाची त्यानें फारच प्रशंसा केली आहे. "त्यांच्यावर उपकार करणारांशीं ते कृतज्ञतेनें वागतात. परंतु आपल्या शत्रूंशीं ते पाषाण-हृदय असे असतात. त्यांचा जर कोणी अपमान केला तर त्याविषयीं सूड उगविण्याकरितां ते आपला जीव देखील धोक्यांत घालतात. त्यांस मदत करण्यास कोणी बोलाविलें तर मदत करण्याच्या धांदलींत, त्यास स्वत:चें देखील भान रहात नाहीं."

ह्या देशाच्या पूर्व सरहद्दीवर त्या यात्रेकऱ्यानें **अजिंठ्या**च्या गुहा पाहिल्या. नंतर तो **विक्रमादित्या**चा देश जो **माळवा** त्यांत गेला. ह्या देशांतील लोकांची **मागधां**प्रमाणेंच विद्वत्तेविषयीं फारच कीर्ति होती.

ह्यांच्या पाश्चिमेस गुजराथेंतील **वल्लभीपूर**वासीजन होते. त्यांची समुद्रावरील व्यापारांत मोठी चळचळ होती, व त्यांच्या संपत्तीची सुप्रासिद्धी होती. ह्या **वल्लभीपूर**-करांनीं गुजराथेंत **भट्टारक** यांच्या सत्तेखालीं **कनोज**च्या गुप्तांचा ऱ्हास होत असतां राज्य स्थापन केलें. ह्या **भट्टारकां**च्या घराण्यानें गुजराथेंत तीनशें वर्षें राज्य केलें. शेवटीं इ. स. ७८० मध्यें **रजपूत** लोकांनीं दक्षिणेकडून येऊन गुजराथ प्रांत जिंकला आणि उत्तरहिंदुस्थानचीं राज्यें एका मागून एक घेतलीं, त्याविषयींची हकीकत पुढें येईल. **हु-एन-संग** हा हिंदुस्थानांत आला तेव्हां **रजपूत** लोक प्रबल झालेले नव्हते परंतु **वल्लभी**पूरचे लोक गुजराथेंत भरभराटींत आहेत असें त्यानें पाहिलें. नंतर कांहीं लहानसहान स्थळें पाहून त्या प्रख्यात प्रवाशानें हिंदुस्थान देश सोडिला. ह्याच्या लेखांवरून ह्यावेळच्या हिंदूंच्या कला, आचार आणि सुधारणा ह्याविषयीं जी माहिती मिळते त्यामुळें हिंदुस्थानचा इतिहासकार ह्या प्रवाशाचा फार ऋणी आहे.

दुसरा **शिलादित्य**, ज्याच्या राज्यांत **चिनी** यात्रेकरू **हिंदुस्थानां**त आला होता, हा ज्ञानवान आणि विद्येचा मोठा पुरस्कर्ता असा राजा होता. त्याच्या दरबारांत रचलेल्या ग्रंथांपैकीं जे चांगले होते ते अद्यापपर्यंत हिंदु लोक वाचतात व त्याविषयीं आश्चर्य प्रदर्शीत करितात. हा राजा इ. स. ६५० वें वर्षीं मरण पावला आणि

तेव्हां पासून उत्तर हिंदुस्थानचा इतिहास अंधःकारमय झाला आहे. ह्या नंतर ज्या राजाचें नांव आपल्या वाचण्यांत येतें तो कनोजचा **यशोवर्मा** हा होय. त्यानें सुमारें इ. स. ७०० पासून ७३० पर्यंत राज्य केलें. दोनशें वर्षांपूर्वी **उज्जयनी**नें जो ज्ञानदीप प्रज्वलीत केला होता तो अद्यापपर्यंत **हिंदुस्थानां**त प्रकाशीत होता आणि **हिंदुस्थान**च्या कवीरत्नांतील एक रत्न जो **भवभूति** हा **यशोवर्म्या**च्या दरबारांत होता. ह्या राजाचा पराभव **काश्मीरचा** राजा **ललितादित्य** यानें केला, व त्या जेत्त्यानें आपल्या दरबारास शोभा आणण्याकरितां **भवभूतीस कनोजहून** आपल्या देशीं नेलें.

ह्या युगांत जें तेजस्वी **हिंदु** कविमंडल होऊन गेलें त्यांतील **भवभूति** हा शेवटला तारा होता आणि उत्तर **हिंदुस्थान**च्या प्रसिद्ध राजांमध्यें **यशोवर्मा** याचें नांव शेवटचेंच आपण ऐकतों. आठवें शतकावरोबर **हिंदुस्थान**च्या प्राचीन इतिहासाचा लय होतो व त्यानंतर जीं दोन शतकें गेलीं त्यांस वाजवी रीतीनें **हिंदुस्थान**चा **तमोकाल** झटलें आहे.

कारण नवव्या व दहाव्या शतकांत **हिंदुस्थान**चा इतिहास कोरा आहे. त्या अवधींत कोणतेंही राजघराणें उदयास आलें नाहीं, कोणताही पंडित प्रसिद्धिस पावला नाहीं आणि कोणतीही शिल्पकलायुक्त इमारत

बांधण्यांत आली नाहीं. ह्या तमोकाळाविषयीं इतिहास मुग्ध आहे.

परंतु त्यावेळीं काय चाललें होतें त्याची सूचक चिन्हें आपल्यास दृष्टिगोचर होतात. हा काळ आणि **युरोपांत रोमन** बादशाही नष्ट झाल्यापासून सरदार-प्राधान्य-संस्था सुरू होईपर्यंत जो काळ **अंधःकारयुग** ह्मणून गेला तो, हे एकमेकांशीं मिळते आहेत. ह्या काळांत **हिंदस्थानांत** प्राचीन आणि व्युत्पन्न परंतु निःसत्व जातींचें प्राबल्य नाहींसें झालें होतें, व पुन्हां जेव्हां इतिहासाचा भाग प्रकाशांत येऊं लागला त्या-वेळीं **हिंदुस्थानचें** धनीपण **हिंदूंच्या** नव्या जातीकडे आलेलें आपल्या दृष्टोत्पतीस येतें; हे लोक अर्वाचीन रजपूत हे होत. दहावे शतकाच्या अखेरीस **रजपूत** हे **उज्जयनींत, कनोजमध्यें, दिल्लींत, गुजराथेंत** आणि **पंजाबांत** स्वामी झालेले होते व **हिंदुस्थानावर** मुसलमा-नांनीं स्वाऱ्या केल्या त्यास तोंड देण्यास ते तयार होते.

रजपूतांच्या उत्पत्तीविषयीं पुष्कळ वादविवाद झाला आहे. पुष्कळ प्रख्यात मान्य-पंडितांचें असें ह्मणणें आहे कीं, शक व दुसरे परकीय लोक, ज्यांच्या झुंडीच्या झुंडी कित्येक शतकेंपर्यंत **हिंदुस्थानांत** येत होत्या व जे पश्चिम व दक्षिण **हिंदुस्थानांत** वसाहत करून राहिले, त्यांचे वंशज रजपुत हे आहेत.ह्या लोकांस पाठीमागें हटविण्याकरितां **हिंदु** राजांनीं जे प्रयत्न केले

त्यांची, रानटी लोकांचा प्रचंड ओघ देश काबीज करण्याच्या हेतूनें रोमच्या राज्यावर धाडी घालूं लागला तेव्हां त्यास मागें हटविण्याकरितां रोमच्या बादशहांनीं व सैन्यांनीं जे प्रयत्न केले त्यांच्याशीं तुलना केली असतां ती अगदीं योग्य होईल. प्रथम कांहीं वेळपर्यंत हिंदु व रोमन लोक यांस यश आलें, परंतु स्वाऱ्यांच्या लाटांत हिंदुस्थानांतील व इतालींतील जुन्या साम्राज्यांचा लय झाला व त्यांच्या इतिहासांचा शतकेच्या शतकेंपर्यंत लोप झाला! अंःधकार जाऊन प्रकाश पडूं लागला तेव्हां युरोपच्या जेत्यानीं ख्रिस्ती धर्म स्वीकारून ते त्या धर्माचे अति प्रबल पाठीराखे बनले होते. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत रजपूत हे हिंदु झाले होते व त्यांस नवीन क्षत्रीयांची जातच आहे असें म्हणत. त्यांनीं नवीन परधर्मावलंबी मनुष्याप्रमाणें हिंदुधर्मास अत्युत्कंठेनें आश्रय दिला आणि बौद्ध धर्माचा नाश केला.

धर्मछळाची सुरुवात हिंदुस्थानांत तमोकालांत झाली. मठाश्रम पाडिले, जोग्यांस हद्दपार केलें, पुस्तकें जाळिलीं, आणि जेथें जेथें रजपूत लोक राजे झाले तेथें तेथें बौद्ध लोकांच्या इमारती खालीं आल्या आणि त्यांच्या जागीं हिंदूंचीं देवळें उभारलीं. दहावें शतकाचे अखेरीपर्यंत बौद्धधर्म बहुत करून हिंदुस्थानांत नाहींसाच झाला होता; व उच्छेदाचें कांहीं जें काम बाकी राहिलें

होतें तें **मुसलमान** लोक, ज्यांच्या हातीं **रजपूतांच्या** मागें हिंदुस्थानचें स्वामित्व गेलें, त्यांनीं पुरें केलें. हें उपसंहाराचें काम इतकें परिपूर्ण झालें आहे कीं, अर्वाचीन प्राक्कालीन-विषय-पंडितांस **लंका** आणि **ब्रह्मदेश**, **नेपाळ** आणि **तिबेट**, **चीन** आणि **जपान**, आणि **एशिया** खंडाच्या सर्व भागांत **बौद्ध** लोकांचीं धर्मपुस्तकें मिळालीं, परंतु **हिंदुस्थान** देश त्या धर्माचें मूलस्थान असतां व येथें एक हजार वर्षांपेक्षां जास्ती दिवस हिंदुधर्मा बरोबर त्या धर्माचा एकसारखा उत्कर्ष होत गेला असें असूनही ह्या देशांत ह्मणण्यासारखें महत्वाचें एकही त्या धर्माचें धर्मपुस्तक मिळूं शकलें नाहीं.

अर्वाचीन **युरोपां**तील सरदार लोक आणि अर्वाचीन हिंदुस्थानांतील **रजपूत** राजे ह्यांचें मधील सादृश्य इतक्यानें पुरें होत नाहीं. **युरोपा**चे व हिंदुस्थानचे जे नवे अधिपति झाले त्यांस एकाच प्रकारच्या शत्रूंबरोबर ह्मणजे मुसलमानांबरोबर लढाई करावी लागली. **स्पेन** देशांतील सरदार त्या देशांत **मुसलमानां**शीं सामना करीत होते, त्याच सुमारास **दहीर** आणि दुसरे **रजपूत** राजे **सिंध** प्रदेशांत **मुसलमानां**शीं लढत होते. **फिलिप आगस्टस** आणि सिंहहृदयी **रिचर्ड** हे **प्यालेस्टाईन** प्रांतांत लढाया करीत होते त्याचवेळीं **पृथुराज** हा दिल्लीच्या दरवाजाजवळ **मुसलमानां**शीं युद्ध करीत होता. **युरोपा**मध्यें ख्रिस्ती सरदारांनीं आपल्या स्वातं-

त्याचें रक्षण केलें आणि शेवटीं मुसलमानांस स्पेन आणि आस्त्रिया देशांतून हांकलून दिलें. हिंदुस्थानांत रजपूत लोक लढाई करून त्यांत पडले आणि बाराव्या शतकापासून हिंदूंचा अर्वाचीन इतिहास नाहींसा झाला.

प्राचीन काळापासून अनुक्रमानें निरनिराळ्या युगांतील युरोपचा आणि हिंदुस्थानचा इतिहास यांची एकमेकांशीं तुलना केली असतां हिंदुस्थानांत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांचें मर्म आपणांस चांगलें समजतें. दोन्हींमधील सादृश्य फारच वर्णनीय आहे आणि त्यामुळें जगांतील निरनिराळ्या भागांत ज्या गोष्टी घडून येतात त्यांच्या प्रगतीचा अति प्रसृत परंतु अदृश्य अशा एकच प्रकारच्या कारणांचा आणि शक्तींचा प्रभाव कसा चालतो तें समजतें. परंतु हें सादृश्य अकरावें शतकावरोवरच संपतें. त्या नंतर युरोपचा इतिहास म्हटला म्हणजे स्वातंत्र्य, प्रगति आणि सुधारणा ह्या गोष्टी होत; व हिंदुस्थानचा इतिहास परकीय अमलाखालीं पादाक्रांत होणें आणि त्यापासून नष्टचर्य व नाश हीं होत.

खंड २ रें.

धर्म आणि रीतिरिवाज.

अनेक शतकेंपर्यंत **बौद्धधर्म** प्रचलित असतां हिंदु लोकांच्या धर्मांत हळुहळू फेरफार झाले, ते दुसरे ठिकाणीं आह्मीं दाखविले आहेतच. मूर्तिपूजा ही प्राचीन धर्मांत नव्हती परंतु अर्वाचीन **बौद्धधर्मा**चें अनुकरण करून ती हिंदुधर्मांत आली. देवळें हीं जुन्या हिंदूंना माहीत नव्हतीं, परंतु **बौद्ध** लोकांच्या आराधनेचीं मंदिरें पाहून **बौद्ध** लोकांवर वरचड करण्याकरितां हिंदु लोकांनीं शेंकडों देवळें बांधिलीं. **बौद्ध** लोकांचे छबिने आणि उत्सव ह्यांच्यापेक्षां हिंदूंचे उत्सव जास्ती डामडौलानें होऊं लागले. यात्रा करणें, ही जी महान् अशोकाचे वेळेपासून **बौद्धधर्मा**चीच विशेष चाल होती, ती अर्वाचीन हिंदुधर्मांत इतकी मिसळून गेली कीं, सर्व देशभर अनेक स्थळें हिंदूंचीं पवित्र क्षेत्रें ह्मणून गणूं लागले, आणि तेथें दरसाल लाखों भक्तिमान् पुरुष आणि बायका यात्रेस जाऊं लागल्या. शेवटीं प्रत्येक **बौद्ध** त्रयीवर विश्वास ठेवीत असे ह्मणून अलीकडच्या हिंदूंनीं एक देवत्रयी कल्पिलीं आणि त्यांनीं ब्रह्मा, विष्णु आणि शिव ह्यांस हिंदूंचे प्रमुख देव मानून त्यांची पूजा करूं लागले.

ह्याप्रमाणें धर्माच्या निदान बाह्यांगामध्यें इतकें मोठें रूपांतर झालें कीं अर्वाचीन हिंदूंचा धर्म आणि विधि व बौद्धकाळाच्या पूर्वीच्या त्यांच्या पूर्वजांचा धर्म आणि विधि ह्यांच्यामध्यें मिळतें कांहींच राहिलें नाहीं. हिंदुधर्माविषयीं लिहितांना प्राचीन म्हणजे वैदिक आणि अर्वाचीन म्हणजे पौराणिक असे दोन हिंदुधर्माचे भाग केले पाहिजेत. अशी स्थिति होती तथापि हिंदु लोकांनीं जुन्यास अगदीं सोडिलें नव्हतें. प्रत्येक पंडितास माहीत आहे कीं, मुख्य तत्वांविषयीं ह्या धर्माच्या दोन्ही पोटभेदांत फरक नाहीं.

वैदिकधर्म व पौराणिकधर्म हे दोन्हीही सर्वव्यापी वायु ज्यास उपनिषदांत सर्वांतरगामी आत्मा म्हटलें आहे त्यास एक मोठा देव मानितात. जगत् हें त्यापासून उत्पन्न झालें आहे आणि शेवटीं पुनः त्याच्यांतच मिळून जाणार आहे असें दोन्हींतही सांगितलें आहे. ह्या जन्मांत जशीं कृत्यें करावींत तशीं पुढील जन्मांत चांगलीं किंवा वाईट फळें मिळतात हें दोघांसही मान्य आहे, आणि आपला आत्मा शेवटीं परमेश्वराशीं लीन होऊन जातो असें दोघेही प्रतिपादन करितात. ह्या प्रमूख तत्वांमध्यें कांहींही फरक किंवा अपकर्ष झाला नाहीं.

परंतु हीं मतें फक्त विद्वान् लोक समजतात आणि जनसमूह धर्माच्या बाह्य स्वरूपावर विश्वास ठेवून सांगितलेले विधि पाळतात. त्यामुळें त्यांतच धर्माच्या

पोटभेदांतील अंतर स्पष्ट दिसून येतें. वैदिक हिंदु सृष्टीच्या प्रादुर्भावांस देव समजून इंद्र अथवा वरुण, अग्नि अथवा सूर्य यांस पूजीत आणि पौराणिक हिंदु त्याच देवाच्या उत्पन्न करणारी, रक्षण करणारी आणि नाश करणारी अशा तीन शक्तींस ब्रह्मा, विष्णु आणि शिव हीं नांवें देऊन, ईश्वर मानितात आणि त्याची आराधना करितात त्याशिवाय अनेक लहान देव व देवी ज्यांच्या कथांनीं त्यांचीं पुराणें भरलीं आहेत व त्यांच्या कल्पनाशक्तीचें रंजन होतें त्यांस ते भजतात. वैदिक हिंदु आपल्या घरच्याच अग्नींत होम करून देवाची आराधना करीत असत; आणि पौराणिक हिंदु मूर्तींची पूजा देवळांत व देव्हाऱ्यांत करितात अथवा पुण्यगांठीं पडण्याकरितां यात्रेस जातात.

अशा रीतीनें फेरफार व बौद्धधर्माचीं अनुकरणें करून आणि जनसमाजाचीं मनें व मनोवृत्तीप्रमाणें चालून हिंदुधर्मानें बौद्धधर्मास हिंदुस्थानांतून हांकून त्याचें स्थान आपण पटकाविलें. बौद्ध लोकांचे धर्मोत्सव, त्यांच्या यात्रा आणि त्यांच्या आराधनेची रीति या सारखेच मनोरम उत्सव, यात्रा आणि देवळांतील पूजा, हीं सुरूं करून लाखों लोकांच्या साधारण जनसमहास धर्माधिकारी व राजे लोकांनीं सवडी दिल्या नसत्या, तर ह्या जनौघास बौद्ध धर्मापासून हिंदुधर्माकडे वळवितां आलें नसतें. ह्या गोष्टी जाणूनबुजून करण्यांत

आल्या असें नाहीं; परंतु लोकांच्या मनाची प्रवृत्ति आणि लाखों लोकांचे आचार व रीति ह्यांनीं अर्वाचीन हिंदुधर्मास नवें रूप दिलें आणि शेवटीं डामडौल व संस्कार, सार्वजनिक विधि आणि आनंददायक उत्सव ह्यांविषयीं लोकांची जी उत्कट इच्छा तीस अनुसरूनच हिंदुधर्म हिंदुस्थानांत राहूं शकला.

ह्याप्रमाणें बौद्धधर्मानें हिंदु लोकांच्या धर्मांत आणि रीतीरिवाजांत मोठे फेरफार केले. बौद्धधर्माच्या पूर्वीच्या हिंदूंची संख्या फारच लहान होती व त्यांच्या सभोंवतीं लाखों शूद्र व मूळचे लोक असत. त्यामुळें साहाजिकच, जे याज्ञिक विधि त्यांनीं आपले बरोबर आणिले होते व ज्यांस ते विशेष महत्व देत असत, त्यांस ते चिकटून राहिले. मागधांचा उत्कर्ष होण्यापूर्वी गंगानदीवर वसाहत करणाऱ्यांच्या कित्येक जाती हेच काय ते हिंदु होते, ह्मणूनच त्यांच्या आवडत्या व प्राचीन विधींत फेरफार करण्याचें त्यांनीं अभिमानपूर्वक नाकारिलें. परंतु मागधांच्या उत्कर्षामुळें अगदीं शुद्ध आर्य नाहीं अशा राष्ट्राच्या सत्तेखालीं सर्व उत्तर हिंदुस्थान आलें, हीच गोष्ट प्राचीन आर्यांच्या धर्मास पहिला धक्का होय आणि त्यामुळें बौद्धधर्माचा फैलावा होणें शक्य झालें. खुद्द बुद्ध गौतमास, आर्य लोकांच्या वस्तीचें ठिकाण जें काशीचा प्रदेश, त्यापेक्षां अनार्यांचा देश जो मगध त्यांत

जास्ती अनुयायी मिळाले, आणि नंतरच्या शेकडों वर्षेपर्यंत बौद्धधर्म गंगथडीपेक्षां मगध देशांतून बंगाल, ओरिसा आणि दुसरे अनार्य प्रदेश ह्यांत जास्ती फैलावला. बौद्ध धर्माचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर झाल्यामुळें आर्य आणि अनार्य ह्यांचे मधील पृथकत्व नाहींसें झालें; त्यांच्या मधील हरकती होत्या त्या दूर झाल्या, भेद सपाट झाला आणि निरनिराळ्या जाती व कुलें ह्यांचें एकीकरण करून एक मोठें हिंदुराष्ट्र बनविण्यास तो धर्म कारणीभूत झाला. ह्या लोकांस सर्व साधारण एक धर्म पुढें करण्यांत आला होता, आणि कालावधीनें त्याच धर्मांत जनसमूहाच्या गरजा व अवश्यकता यांस अनुरूप असें रूपांतर झालें व त्यांत सार्वजनिक उत्सव, यात्रा आणि मूर्तिपूजा ह्या गोष्टी शिरल्या. हिंदुधर्म जो ह्या धर्माच्या शेजारीच उत्कर्ष पावत होता, त्यांतही त्याचप्रमाणें परिवर्तन झालें, आणि सरते शेवटीं त्यानें बौद्ध धर्माची जागा पटकाविली तेव्हां तर त्याचें रूपांतर पूर्ण झालें होतें आणि तो जनसमुहाचाच धर्म होऊन बसला होता ह्मणजे धर्मसंबंधीं उत्सव आणि मूर्तिपूजा हेंच कायतें त्या धर्माचें स्वरूप होतें.

ह्या परिवर्तनांची हकीकत आह्मी विशेष विस्तारानें लिहिली आहे, ह्याचें कारण असें आहे कीं, वैदिक हिंदुधर्म, बौद्धांचा धर्म आणि पौराणिक हिंदुधर्म ह्यांचा

परस्परांशीं संबंध लोकांस चांगल्या प्रकारें समजेल अशा रीतीनें कोणीही दाखविलेला नाहीं, असें आह्मांस जी कांहीं माहिती मिळते त्यावरून वाटतें; तसेंच धर्मांत जे फेरफार झाले आहेत ते दाखविण्यांत आले आहेत परंतु त्यांचीं कारणें सांगितलेलीं नाहींत. कोणत्याही राष्ट्राची मानसिक उन्नति कोणकोणत्या प्रकारें झाली त्याविषयीं आपण लक्षपूर्वक काळजीनें अवलोकन केलें तर त्या राष्ट्राच्या इतिहासांत दुर्बोध असें कांहींही रहात नाहीं.

ज्या ग्रंथांत हा नवीन हिंदुधर्म सांगितला आहे व ज्यांच्यावरून ह्या कालास व धर्मासही नांव मिळालें ते ग्रंथ अठरा पुराणें ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

पुराणें अथवा इतिहास ह्मणून एक प्रकारचे ग्रंथ लिहिण्याची चाल शौर्ययुगापासून चालत आली होती. ह्या ग्रंथांत प्राचीन दंतकथा व ऐतिहासिक वृत्त लिहिलेलें असे व ह्या ग्रंथांचा उल्लेख त्यावेळच्या दुसऱ्या ग्रंथांत आहे. परंतु हे प्राचीन ग्रंथ जाऊन त्यांची जागा अलीकडील ग्रंथांनीं इतकी व्यापून टाकिली आहे कीं, जुन्या ग्रंथांचा मागमूसही लागत नाहीं. हल्लीं उपलब्ध आहेत तीं पुराणें **विक्रमादित्य** आणि **शिलादित्य** ह्यांच्या वेळीं रचलीं होतीं, परंतु त्यानंतर त्यांत पुष्कळ फेरफार झाले आहेत व बरीच भरही पडली आहे. कित्येक पुराणें तर **हिंदुस्थान**देश मुसलमान लोकांनीं जिंकिल्या नंतरही झालीं आहेत. ह्यामुळें ह्या ग्रंथांत

विक्रमादित्याच्या वेळच्या धर्माच्या मुख्य लक्षणांचें दिग्दर्शन होऊन, त्यानंतर कृष्ण अथवा शिव ह्यासारखी एखादी देवता देवांचें प्राधान्यपद पटकावून लाखो हिंदूंस आपले भक्त बनवीत असे, तेव्हां जे निरानिराळ्या पंथांच्या लोकांत वाद होत त्यांचें स्वरूपही विशेष स्पष्ट रीतीनें दृग्गोचर होत आहे. प्रत्येक पंथ अर्वाचीन हिंदुदेवकोटीच्या विस्तृत भांडारांतील आपणास योग्य वाटेल ती देवता पसंत करी, व तिचेंच सर्व देवांपेक्षां प्राधान्य आहे असें प्रतिपादन करी. त्यामुळें ह्या वादांनीं हीं पुराणें पूर्ण भरलेलीं आहेत. परंतु विक्रमादित्याच्या काळच्या धर्माची आणि रीतिरिवाजाची हकीकत ह्यांत पाहणें असेल तर मात्र जरा विचाराची गोष्ट आहे. खरें पाहिलें तर मुसलमानांनीं हिंदुस्थान जिंकिल्या नंतरचा हिंदूंचा धर्म आणि रीतिरिवाज काय होते तें ह्या ग्रंथांवरून समजतें व त्यांत जीं कित्येक देवळें फक्त शंभर दोनशें वर्षांवर हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत बांधण्यांत आलीं आहेत त्यांचीही हकीकत आहे.

हेंच विवेचन अर्वाचीन धर्मशास्त्रांस विशेष जोरानें लागूं पडतें. मनूचा प्रसिद्ध ग्रंथ शेंकडों वर्षें सर्व हिंदु लोकांस प्रमाणभूत आणि शासनीय ग्रंथ होता, परंतु हिंदुधर्माचें बाह्यस्वरूप बदललें, व वैदिक होमहवनांचा प्रघात बंद पडून मूर्तिपूजा सुरूं झाली, त्यामुळें

नवीन धर्मशास्त्र रचण्याची अवश्यकता उत्पन्न झाली. * **याज्ञवल्क्या**चा ग्रंथ इ. स. च्या चवथ्या किंवा पांचव्या शतकांत रचला गेला, व तो **विक्रमादित्या**च्या काळचा आहे असें खात्रीनें ह्या एकाच ग्रंथाविषयीं आपणास सांगता येतें. ह्या शिवायचे दुसरे अलीकडील धर्मशास्त्राचे ग्रंथ, **व्यास** आणि † **पराशरा**च्या ग्रंथाप्रमाणें, मुसलमानांच्या विजयानंतर रचिले गेले अथवा त्यांत फेरफार झाले. ह्यांत **विक्रमादित्या**च्या काळच्या हिंदूंच्या रीतिरिवाजांचें चित्र नसून मुसलमान लोकांच्या अमलांत हिंदूंचे आचार कसे होते त्याचें वर्णन आहे.

मुसलमानांच्या विजयानंतर जीं पुराणें व धर्मशास्त्रें रचिलीं गेलीं अथवा दुरुस्त झालीं तीं **विक्रमादित्य** आणि **शिलादित्या**च्या वेळचा इतिहास लिहिण्यास आधार घेतां येत नाहींत असें आह्मीं ह्मटलें आहे, ह्याशिवाय तंत्रें ह्मणून धर्मसंबंधीं ग्रंथ आहेत ते शिव-

---

* विदेहाच्या **जनक** राजाचा पुरोहित जो शौर्ययुगांत होऊन गेला तो हा असें समजूं नये.

† वेद एकत्र करणारा जो **व्यास** व जोतिषी जो **पराशर** ते हे नव्हत. आपल्या ग्रंथास पुराणत्व व महत्व देण्याकरितां प्राचीन नांवें घेऊन अर्वाचीन **हिंदु** ग्रंथकार लिहीत असत. ह्यामुळें वेदाचा कर्ता जो **व्यास** त्यानें सर्व अठरा पुराणें रचिलीं असें ह्मणतात.

पत्नीच्या ह्मणजे देवीच्या पूजकांचा एक मार्ग आहे, त्यांतील लोकांनीं रचलेले आहेत. ह्यांत अमानुष शक्ति संपादन करण्याकरितां निंद्य व कधीं कधीं दुष्ट क्रिया सांगितल्या आहेत; हे ग्रंथ हिंदु लोकांची स्वतंत्रता नष्ट झाल्यावर रचिले आहेत हे उघड आहे. अज्ञानी लोक भोळसर असतात, व कमकुवतांस आपले हातांत शक्ति यावी अशी फार इच्छा असते. आणि अर्वाचीन काळच्या पुरुषांनीं, त्यांच्या पूर्वजांनीं आपल्या बुद्धीचा अवद्ध व सुखकर रीतीनें उपयोग करून जें सामर्थ्य मिळविलें होतें तें, गुप्त, निंद्य व अपवित्र उपायांनीं प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला.

हीं धर्मशास्त्रें, पुराणें आणि तंत्रें ह्यांस सोडून **विक्रमादित्य** आणि **शिलादित्य** यांचे वेळीं जे बुद्धिप्रभावाचे ग्रंथ कवी, नाट्यकार आणि कादंबरीकार यांनीं रचिले व ज्यांत तत्कालीन धर्म व रीतिरिवाज ह्यांचे खरें चित्र आहे त्यांकडेस आह्मी वळतों. हें चित्र रमणीय व आनंददायकही आहे.

देवाची आराधना, त्याच्या उत्पादक, रक्षक आणि नाशक अशा तीन ज्या शक्ति त्या तीन रूपांत करीत असत. उत्पन्न कर्ता ह्मणून **ब्रह्मा** ह्या प्राचीन नांवानें त्याची पूजा करीत. वेदांत ह्या देवाची प्रार्थना आहे. वाणीची दवता जी **सरस्वती** ती ह्या ब्रम्ह्याची स्त्री योग्यच कल्पिली. **विष्णु** ही ऋग्वेदांतील सूर्य दे-

वता होय. व त्यास रक्षण करणारी देवता व त्याची पत्नी जी लक्ष्मी ती पीकाची व संपत्तीची देवता असें समजत हेंही अगदीं बरोबर केलें. शेवटीं, ऋग्वेदांत वादळांची देवता रुद्र हा आहे ह्मणून संहार करणारास तें नांव दिलें हेही ठीकच झालें. त्याचीं दुसरीं नांवें शिव, महेश्वर हीं आहेत. ह्या भयंकर संहारकाची सुंदर स्त्री, हिमालयाची मुलगी उमा ही होय व दुर्गा, काली, शक्ति वगैरे अनेक नांवांनीं तिची पूजा करीत असत.

ऋग्वेदांतील दुसरे प्राचीन देव, इंद्र, अग्नि, वरुण, सूर्य, वायु, मरुत वगैरे इंद्रलोकीं रहाणाऱ्या विलासासक्त उपदेवता आहेत व त्या स्वर्गींचें राज्य सुरक्षीत ठेवण्या करितां असुरांशीं लढतात असें समजत. हे उपदेव त्यांचा असुरांनीं पराभव केला असतां कधीं कधीं ह्या विष्णु अथवा शिव ह्या मुख्य देवांचें साह्य मागत असत. ह्यांत मुख्य कल्पना ही आहे कीं, उपदेव यांस देवतारूप आलें आहे तें त्यांच्या उग्र तपाचें फळ होय व तें सुख त्यांस कांहीं नियमित वळपर्यंत मिळणारें आहे. त्याचप्रमाणें मानवी प्राणी हा त्याच साधनांनीं नियमित काळपर्यंत त्या देवतांच्या पदास पोचूं शकेल. आपल्या कर्माचें पारितोषिक अथवा शासन ह्याप्रमाणें दुसऱ्या जन्मांत मिळतें व परब्रह्म स्वरूप जें ब्रह्मा, विष्णु आणि शिव, ज्याच्यांत सर्व जग शे-

वटीं लय पावेल, त्याच्या शिवाय दुसरें कांहींही शाश्वत नाहीं. ह्याप्रमाणें उपनिषदांतील एकेश्वर व आत्म्यास जन्मांतर आहे हीं जीं प्राचीन मतें त्यांचा अलीकडील बहुदेवमताशीं मेळ घालून दिला आहे.

विक्रमादित्याच्या काळच्या अति उत्तम ग्रंथांपैकीं **शिवा**च्या लग्नाचें वर्णन ज्यांत आहे असें कालिदासानें रचलेलें काव्य हें होय. असुरांशीं लढत असतां उपदेवांचा पराजय झाला आहे व त्यांच्या सुखदायक स्थलांपासून त्यांस हाकून दिलें आहे. ते नम्र व उद्विग्न होऊन भगवान् ब्रह्मदेवाजवळ त्याची सर्व शक्तिमान मदत मागण्याकरितां आले. तो देव एका जातीच्या प्राण्यांविरुद्ध दुसऱ्या जातीच्या प्राण्यांस मदत करी ना, परंतु त्यानें देवांस त्यांचा स्वर्ग लोक कसा परत मिळेल तो रस्ता दाखवून दिला. देवांस सेनापति पाहिजे होता वें ब्रह्मदेवानें त्यांस समजावून सांगितलें कीं, **शिवा**चा पुत्र फक्त त्यांस जय मिळवून देईल. त्यावेळीं **शिवदेव** हिमालयाच्या जंगलांत आणि गुहांत समाधींत निमग्न झाला होता. त्याची सेवा हिमालयाची मुलगी **उमा** करूं लागली. देवांनीं विचार करून महान् शक्तिमान **शिवा**च्या हृदयांत पर्वताच्या मुलीविषयीं कामवासना उत्पन्न करण्याकरितां कुसुमायुधास पाठविलें. हें कृत्य फार अविचाराचें झालें. कारण **शिवा**च्या मनास कामाचा चटका बसला; परंतु ती मनोवृत्ति त्यानें दाबिली

आणि त्यास क्रोध येऊन त्यानें कुसुमायुधास जाळून त्याची राख केली !

त्या नंतर उमा ही निर्जन वनांत जाऊन तपश्चर्या करू लागली. ह्याप्रमाणें कित्येक महिने उग्रतप केल्यानंतर एक तरुण योगी तिला भेटला. त्यानें तिच्या वयास व स्त्री जातीस अयोग्य अशा तपश्चर्येपासून तिचें मन वळविण्याचा प्रयत्न केला व ज्या शिवाकरितां ती इतके कष्ट सोशीत होती त्याचा उपहास केला. हें ऐकून उमेस राग आला आणि ती त्या योग्यापासून जाऊं लागली. परंतु त्यानें तिला हळूंच धरिलें; तेव्हां त्या लज्जीत कुमारिकेस शिव त्या योग्याचें सोंग घेऊन आला आहे असें समजलें. त्या नंतर त्या दोघांचें लग्न झालें, आणि त्यांचा पुत्र कार्तिकेय यानें देवास जय मिळवून देऊन त्यांचा स्वर्ग त्यांस परत दिला. अशा प्रकारच्या गोष्टींपासून त्यावेळच्या लोकांची धर्मश्रद्धा आणि समजूती कशा होत्या त्याची विशेष स्पष्ट आणि खरी जी कल्पना आपल्या मनांत येते ती धर्मशास्त्र म्हटलीं जाणाऱ्या पुस्तकांच्या थोकड्यांनींही कधीं येणार नाहीं.

या काळच्या कवींच्या दुसऱ्या ग्रंथांवरून तत्कालीन लोकांचे रीतिरिवाज कसे होते त्याचें ज्ञान आपल्यास होत आहे. ह्या वेळींही प्रथमच्या चार जाती ब्राह्मण' क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र ह्या होत्या, परंतु आतां त्याशिवाय निरानिराळ्या प्रकारचे मूळचे लोक हिंदु झाल्या-

मुळें नवीन अथवा मिश्र जाती उत्पन्न झालेल्या होत्या, त्याविषयीं विवेचन वर आलेंच आहे. याज्ञवल्क्यानें अशा तेरा जातींचीं नांवें दिलीं आहेत. परंतु धंदे करणारांच्या अर्वाचीन जाती जसे कोष्टी, कुंभार, लोहार, सोनार, शस्त्रवैद्य, आणि कारकून ह्यांचीं नांवें त्या यादींत नाहींत. हिंदु लोकांच्या स्वातंत्र्याच्या वेळीं निरनिराळे धंदे करणारांच्या निरनिराळ्या जाती स्पष्ट रीतीनें पडल्या नव्हत्या; हा विभक्तपणा व फुटाफुटीचा प्रकार हिंदु लोक परतंत्र झाल्या नंतर घडून आला. स्त्रियांस देखील कांहीं स्वतंत्रता होती, परंतु ती हिंदु-लोकांची स्थिति परतंत्र झाल्यापासून गेली. नाटकें, काव्यें आणि कादंबऱ्या यांतील नायका तरुण अवस्था प्राप्त झाली तत्राप अविवाहित रहात, पडदा अथवा बुरखा न घेतां देवळांत जात, परकीय गृहस्थ घरीं आला असतां न पळतां त्याचें शिष्टाचारानें स्वागत करीत, व ज्या समाजांत त्या रहात व वागत त्यांवर आपलें योग्य वजन पाडीत. विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या स्नेह्यांचें आगतस्वागत करीत व त्यांच्यांशीं बोलण्यास त्यांस कोणताही प्रतिबंध नसे, आणि पुष्कळ वेळां तर घरीं पुरुष नसला तर त्या पाहुण्यास पाहुणचार करीत. हल्लींच्या युरोपांतलि रीतिरिवाजाप्रमाणें पुरुषांशीं वागण्यांत स्त्रियांस जितकें स्वातंत्र्य आहे तितकें स्वातंत्र्य पूर्वेकडील देशांतील स्त्रियांस

कोणत्याही वेळीं नव्हतें, परंतु मुसलमानांच्या विजया नंतर स्त्रियांस पूर्ण व अहितकर पडदपोशींत ठेवण्याची जी चाल हिंदुस्थानांत पडली, तीप्रमाणें पूर्वी स्थिति असल्याचें एकही हिंदु स्त्रीचें उदाहरण पौराणिक काळच्या विस्तीर्ण ग्रंथसंग्रहांत मिळत नाहीं.

मुली वाचण्यास व लिहिण्यास शिकत असत. गायनास शिकणें विशेष गुण समजत आणि चित्रकला व वादन हें बहुतकरून शिकवीत असत. लग्न जुळविण्याचें काम दोन्ही बाजूंचे आईबाप करीत व लग्नविधि प्राचीन काळापासून चालत आला आहे तसा अद्यापही पाळण्यांत येई. ह्या वेळीं विधवांस पुन्हां लग्न करण्याची मोकळीक होती, मात्र तसें करणें गौण मानीत असत. सती जाण्याच्या ह्मणजे नवऱ्याच्या चितेवर आपणास जाळून घेण्याच्या दुष्ट चालीविषयीं संमत्ती प्राचीन संस्कृत ग्रंथांत अथवा **याज्ञवल्क्य**चा ग्रंथ जो इ. स. च्या चवथ्या अथवा पांचव्या शतकांत झाला त्यांतही नाहीं.

घरगुती चाकराचा गुलामाप्रमाणें क्रयविक्रय हिंदुस्थानांत करीत असत व ही चाल सर्व प्राचीन देशांत होती. त्या काळीं बहुतकरून घरगुती नोकर गुलामासारखेच असत. परंतु गुलामास आपलें स्वतंत्र्य ठरलेली रक्कम देऊन विकत घेतां येत असे.

ह्या काळीं एक गोष्ट खरोखर घडून आली तीवर एक नाटक रचण्यांत आलें आहे, त्यांत उज्जयनी शहर अति-

शय भरभराटींत असतां त्या शहराच्या स्थितीचें वर्णन सांपडतें. ब्राह्मण न्यायाधीश, एका सरकारी अधिकाऱ्याची व कारकुनाची मदत घेऊन हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें न्याय करीत, व नगररक्षक शहरचा बंदोबस्त रात्रीं व दिवसास ठेवीत असत. द्युतशाला व मद्यपानगृहें प्रत्येक शहरांत पाहण्यांत येत. ह्याप्रमाणें अर्वाचीन काळच्या सुधारणेचीं व्यसनें प्राचीन काळीं अज्ञात होतीं असें नाहीं.

पूर्व काळीं उंची वस्त्रें व मौल्यवान् रत्नें ह्यांविषयीं हिंदुस्थानाची फार प्रसिद्ध होती, व वर दर्शित केलेल्या नाटकांत एक श्रीमानाच्या घराविषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन केलेलें आहे. " जेथें निपूण जव्हेरी मोतीं, पुष्कराज, इंद्रनीलमणि, पाच, माणकें, वैडुर्यमणि, पोंवळीं, आणि दुसरीं रत्नें पारखीत आहेत, कित्येक सुवर्णांत माणिकें बसवीत आहेत, कित्येक रंगविलेल्या दोऱ्यांत सुवर्णाचे दागिने गाठीत आहेत, कित्येक दोऱ्यांत मोतीं ओवीत आहेत, कित्येक वैडुर्यमण्यांचे पीठ करीत आहेत, कित्येक शिंप्यांस भोकें पाडीत आहेत, आणि कित्येक पोंवळीं कापीत आहेत. गांधी केशरांचीं पोतीं सुकवीत आहेत, कस्तुरीच्या पिशव्या झाडीत आहेत, चंदनाचें तेल काढीत आहेत व अर्काचें मिश्रण करीत आहेत. "

चिनी प्रवाशी हु-एन-संग ह्याच्या लेखांवरून

हिंदूंचीं ह्या वेळचीं नगरें व हिंदु लोक ह्या विषयीं कांहीं माहिती आपणास मिळते. नगरांस बहुत करून कोट व दरवाजे असत; परंतु रस्ते व गल्या वांकड्यातिकड्या असत. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस दुकानें लावि-लेलीं असून त्यांवर ज्यांचीं त्यांचीं योग्य चिन्हें असत, परंतु खाटकी, कोळीं, नाचे, मांग व भंगीं ह्यांचीं गृहें नगराचे बाहेर असत. शहराचे कोट विटा व कौलांचे बांधीत व साधारण लोकांच्या घरांवर घांस, सुक्या फांद्या, अथवा कौलें किंवा तक्ते हे घालीत.

साधारण लोकांचें खाद्य तांदूळ आणि गहु हें असे. धान्याच्या पोळ्या आणि दुधाचे निरनिराळे पदार्थ करण्याचा रिवाज बहुतेक असे. मासे, सागुति, हरीण हेही खात असत. सोनें, चांदी, तांबें, यशब् आणि मोतीं हीं ह्या देशांतच उत्पन्न होत व रत्नें आणि हिरे हेही पुष्कळ असत. **हु-एन-संग** लिहितो कीं, क्रयविक्रय जिनसांच्या मोबदल्यानें चालत असे. सोन्याचीं व चांदीचीं नाणीं पैशाच्या रुपानें साधारण वापरीत नसत. सरते शेवटीं जनसमुहाच्या संबंधानें **हु-एन-संगानें** ह्मटलें आहे कीं, " ते जरी क्षुद्र मनाचें आहेत तथापि नेकीचे व अब्रुदार आहेत. पैशाच्या संबंधांत त्यांच्यांत लुच्चेगीरीचा कावा नाहीं, आणि न्यायाच्या कामीं ते फार विचारी आहेत. ते पुढील जन्मीं शिक्षा मिळण्याची भीति बाळगितात, व इह लोकाच्या गोष्टींचे महत्व कमी समजतात. त्यां-

ची वर्तणुक फसवाफसवीची अथवा विश्वासघातकी नसते आणि आपण घेतलेल्या शपथा व दिलेलीं वचनें पाळण्याविषयीं ते इमानी आहेत. "

खंड ३ रें.

शिल्पशास्त्र आणि कला.

सार्वजनिक देवालयांत आणि धर्मसंबंधीं इमारतींत आराधना करणें ही गोष्ट, बौद्ध धर्माच्या प्रसारापूर्वी, हिंदु-धर्माचें अंग नसल्यामुळें हिंदूंचीं अति जुनी देवळें अ-र्वाचीन हिंदु धर्माच्या उत्पत्ति नंतरचीं आहेत. **ओ-रिसा** प्रांत हा इ. स. च्या १६ व्या शतकापर्यंत मुसल-मान लोकांनीं जिंकिला नव्हता, त्यामुळें तेथील देवळेंही **उत्तर हिंदुस्थानीय** पद्धतीचे शुद्ध नमुने आहेत. ह्या देवळांची इमारत ह्मटली ह्मणजे एक उंच शिखर-युक्त गाभारा आणि त्याच्या पुढें दुसरी एक द्वारमंडपाची इमारत हीं होत. हा गाभारा चौकोनी पायावर बांधिलेला असतो व तो वक्रेरेघाकृतिमय दि-सतो. त्यांत मजला, साधे अथवा चौकोनी खांब हे भाग पाडलेले नसतात. ही इमारत भारी व मोठी भव्य असते. द्वारमंडपाचा वरील भाग निमुळता असून त्यांत एकावर एक अशा कंगोऱ्यांची मालिका केलेली असते.

ह्या प्रकारचीं ओरिसामधील **भूवनेश्वर** येथील अतिप्रसिद्ध देवालयें आहेत. तीं इ. स. च्या सहावे व

सातवे शतकांत बांधिलेलीं आहेत. **ओरिसा** ह्या प्रांतांच्या भव्य राजधानींत शेंकडों दगडांचीं देवळें बांधण्यांत आलीं होतीं, व त्यांचे अनेक नमुने आज तागाईत अस्तित्वांत आहेत. ह्या पैकीं **महादेवालय** ह्मणून जें आहे तें सर्वांत उत्तम आहे. त्याचें शिखर ७० फूट चौरस ओट्यावर बांधिलेलें असून १८० फूट उंचीपर्यंत गेलेलें आहे, आणि त्याच्या बाहेरच्या सर्वभागावर काढलेल्या व घडलेल्या नक्षीचें काम फारच केलेलें आहे; ह्या नकशीस खुद्द देवाच्या इमारतीपेक्षां तीप्पट खर्च झालेला आहे. **फरगुसन** साहेबाचें असें ह्मणणें आहे कीं, अशा इमारतीपेक्षां चौपट मोठीइमारत ह्यापेक्षां जास्ती भव्य दिसली असती व त्यायोगानें लोकांच्या मनावर विशेष ठसा उमटला असता. परंतु ह्याबाबतींत हिंदु लोकांचे विचार अशा तऱ्हेचे नव्हते. प्रत्येक अंतर्बाबतीवर अपार श्रम केले तरच आंत रहाणाऱ्या देवास शोभेल असें देऊळ तयार होईल असें प्रत्येक हिंदूस वाटे. ही समजूत खरी असो अगर खोटी असो, तिचा परिणाम असा झाला कीं, ही हिंदूंचीं देवळें अत्यंत सुंदर झालीं.

शिव आराधनेचा आणि भूवनेश्वर राजधानीचा जसजसा **ओरीसा** प्रांतांत ऱ्हास होत गेला, तसतसी विष्णूची अथवा त्याचाच अवतार जो **कृष्ण** त्याची पूजा तेथें सुरू झाली, आणि १२ वे शतकांत जगन्ना-

थाचें एक देऊळ पुरी येथें बांधण्यांत आलें. हें देऊळ १९२ फूट उंच आहे व आजपर्यंत तें हिंदुस्थानांतील अति पवित्र स्थानांपैकीं एक स्थान मानण्यांत येत आहे; तो पण त्यावर **भुवनेश्वर** येथील पूर्वीच्या काळच्या देवळां सारखें शिल्प सौंदर्य कांहीं नाहीं. **कनरक** येथील प्रसिद्ध "कृष्ण देवालय" हें **ओरिसा** प्रांताचें दुसरें एक भूषण आहे. हें देऊळ समुद्र किनाऱ्यावर असून साधारण समजूत अशी आहे कीं, तें इ. स. च्या १३ व्या शतकांत बांधिलें असावें, परंतु डाक्टर **फरग्युसनचें** मत असें आहे कीं, त्या पूर्वीच्या काळीं तें बांधिलें आहे. ह्याचा द्वारमंडपच काय तो हल्लीं विद्यमान आहे, आणि तो ४० फूट चौरस ओट्यावर उभारलेला आहे. छप्पर आंतले बाजूस निमुळतें होत जाऊन शेवटीं २० फूट लहान झालें आहे आणि तेथें त्यांस शिक्कई लोखंडाच्या तुळयांवर एक सपाट दगडाचें छत बसविलें आहे. ह्या तुळयांची लांबी २१ अथवा २३ फूट आहे व त्या वरून, हल्लीं हिंदु लोक विसरले आहेत तें लोखंडाच्या जिनसा बनविण्याचें ज्ञान, त्यांच्यांत होतें असें समजतें. ह्या देवळाच्या बाहेरच्या बाजूंस चारा अग्रभागांच्या ठिकाणीं अत्युत्तम सुंदर आणि निरनिराळ्या प्रकारचें कोरीव काम केलेलें आहे.

ओरिसा प्रांताच्या पश्चिमेस जसजसें जावें तसतसें हिंदुस्थानच्या दुसऱ्या प्रांतांत उत्तर हिंदुस्थानीय

पद्धतीचीं देवळें आपल्या पाहण्यांत येतात बुंदेलखंडांत फार काळपर्यंत हिंदूंचें स्वतंत्र राज्य होतें, त्यामुळें तेथें देवालये पुष्कळ आहेत. ह्या पैकीं तीसांपेक्षां जास्तीं देवळें फक्त एक खजूराहो ह्या गांवींच आहेत. हीं देवळें इ. स. च्या १० आणि ११ व्या शतकांत बांधलेलीं आहेत. मुख्य देवळाच्या उंच शिखराच्या सभोंवतीं लहान लहान घुमट आहेत. जोतें उंच आहे व त्यावर कोरलेल्या आकृतींच्या तीन रांगा आहेत. येथें जनरल कनिंगह्याम यानें ८७२ पर्यंत पुतळे मोजले व त्यांच्या भोंवतीं पुष्कळ वनस्पतींच्या आकृती असून त्याशिवाय जन रुढीस मान्य अशा कारागिरीच्या किरकोळ बाबतींवरही लक्ष्य दिलेलें आहे.

आपलें स्वातंत्र्य राखण्याकरितां मुसलमानांच्या विरुद्ध जास्ती वेळपर्यंत जेथें प्रयत्न झाला अशा माळवा प्रांतांतील भोपाळ येथें अकराव्या शतकांतील हिंदूंच्या देवालयांचा पूर्ण नमुना आहे. त्यापेक्षां आणखी दक्षिणेस मराठ्यांच्या देशांत प्राचीन देवळांचे नमुने आहेत, त्यांत उत्तर व दक्षिण हिंदुस्थानच्या शिल्प पद्धतींचें मिश्रण पाहण्यांत येतें, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

ह्या प्रमाणें इ. स. च्या सहाव्या शतका पासून बाराव्या शतकापर्यंतच्या काळच्या हिंदूंच्या शिल्प

पद्धतींच्या देवालयांचे नमुने ओरिसा, बुंदेलखंड, भोपाळ, आणि महाराष्ट्र ह्या प्रांतांत दृष्टीस पडतात; परंतु ही आश्चर्याची गोष्ट आहें कीं, हिंदु-आर्यांच्या घरांतच ह्मणजे सिंधु आणि ब्रह्मपुत्रानद ह्यांच्या मधील उत्तर हिंदुस्थानच्या प्रांतांत ते मिळत नाहींत. ह्याचें कारण अगदीं उघड आहे. हा विस्तृत प्रदेश मुसलमान लोकांनीं इ. स. च्या बाराव्या शतकाच्या अखेरीस जिंकिला, व तो त्यांच्या ताब्यांत सुमारें सहा शतकें होता. ह्या विजयी लोकांनीं उतर हिंदुस्थानांतील हिंदूंच्या प्राचीन देवळांचा नाश केला व त्यांचे दगड घेऊन मशिदी व मनोरे बांधिलें. हें संहाराचें काम इतकें पूर्ण झालें आहे कीं, हिंदूंचें एकहि प्राचीन देऊळ ह्या सपाट्यांतून ह्या प्रदेशांत राहूं शकलें नाहीं ! काशी, मथुरा, वृंदावन, अमृतसर व उत्तर हिंदुस्थानांतील दुसऱ्या कित्येक ठिकाणीं हल्लीं जीं देवालयें आहेत तीं अलीकडील थोड्या शतकांतील होत.

दक्षिणेस आपण वळलों असतां उत्तर हिंदुस्थानीय पद्धतीपेक्षां अगदीं भिन्न अशी दक्षिण हिंदुस्थानीय पद्धत आपल्या दृष्टीस पडते. व तींतील उत्तम नमुने पाहिले असतां ती बौद्ध लोकांची गुहा कोरण्याची जी रीति होती तिजपासून उत्पन्न झालेली आहे असें दिसतें. ह्मणून दक्षिणेकडील अति प्राचीन कामें आहेत तीं बांधलेलीं नसून कोरलेलीं आहेत, आणि अगदीं अलीकडील कामांत देखील मूळांतील चिन्हें दृष्टीस पडतात.

एलोरा येथील कोरीव लेणीं इ. स. च्या आठव्या अगर नवव्या शतकांतील आहेत व तीं जगांतील एक विस्मयकारक कृत्य आहे असें मानतात. एका भक्कम सबंद खडकांत एक विस्तृत विवर २७० फूट लांब व १५० फूट रुंद खोदण्यांत आलेलें आहे. हें समकोण असून त्याच्या मध्यभागीं देवालय आहे, त्याचें शिखर ८० पासून ९० फूट उंच आहे. एक मोठा द्वारमंडप १६ स्तंभांवर उभा आहे, व त्यापासून निराळा एक द्वारपथ असून त्या दोघांमध्यें एक पूल व दरवाजा आहे. ह्याप्रमाणें हें देऊळ खडकांत कोरलेलें आहे तथापि तें वर बांधिलेल्या इमारतीचा संपूर्ण नमुना आहे. ह्या विशाळ इमारती एका मजबूत दगडांतून कोरलेल्या असल्यामुळें त्या भक्कम, वळकट आणि भव्य अशा दिसतात. ह्यांत बौद्ध मठाचें अनुकरण करून बाजूस ज्या सात खोल्या केल्या आहेत, त्यांत एक एक हिंदु देवता बसविली आहे.

दक्षिण हिंदुस्थानांत **कावेरी** नदीच्या मुखाजवळ **चिलमबरम्** येथें एक देवालय आहे, तें अतिपूज्य स्थान आहे. हें प्रथम इ. स. च्या १० अथवा ११ शतकांत तयार केलेलें आहे; परंतु त्यांतील अति विस्मयकारक इमारती अलीकडील शतकांत उभारलेल्या आहेत. येथील मोठा द्वारपथ आणि हजार स्तंभांचा सभा मंडप हे थोड्याच शतकांवर तयार करण्यांत आलेले

आहेत, कारण दक्षिणेकडील हिंदूंची स्वतंत्रता गेले शतकापर्यंत कायम होती. पुढले आंगाला रांगेनें २४ स्तंभ असून आंतले बाजूस त्यांच्या ४१ रांगा आहेत. प्रत्येक स्तंभ एक सगळ्या दगडाचा असून प्रत्येकावर कमी जास्ती नक्षी कोरलेली आहे. ह्या दगडी स्तंभारण्याचा एक प्रकारचा मनावर विलक्षण ठसा उमटतो. ह्या शिवाय **कांजिव्हेरम** (कांची), **तंजावर** आणिं **मदुरा** येथील देवालयें अलीकडील आहेत.

उत्तर अथवा दक्षिण हिंदुस्थानच्या शिल्प पद्धतींपेक्षां भिन्न अशी जी दक्षिण महाराष्ट्रीय पद्धत तिजविषयीं अद्याप लिहावयाचें आहे. ह्यांत आकृतिविशेष असा आहे कीं, ह्या देवालयांचा पाया बहुकोनी असून त्यांच्या भिंती कांहीं उंचीपर्यंत सरळ वर बांधित नेलेल्या असतात व नंतर त्यांचें छप्पर वर मनोऱ्या सारखें टोकास निमुळतें होत जातें.

बल्लाळ रजपूत, ज्यांचा अम्मल करनाटकांत इ. स. च्या आकराव्या शतकापासून तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत होता, त्यांनीं अशा प्रकारच्या देवालयांचे नमुने तीन जथ्यांनीं आपणांस ठेविले आहेत. पहिला **सोमनाथपुर** येथें अकराव्या शतकांतील, दुसरा **बैलूरास** बाराव्या शतकांतील आणि तिसरा **हलाबिड** येथें, असे आहेत. शेवटची इमारत तेराव्या शतकांत **बल्लाळ** घराण्याचा मुसलमान लोकांनीं नाश केला तेव्हां तर पुरीहि झालेली नव्हती.

ह्या **हलाबिड** येथील देवळाची **ग्रीस** देशांतील **पार्थेनन** देवळाशीं तुलना केल्या नंतर डाक्टर **फरग्युसन** यानें कित्येक विचारयुक्त टीका केलेली आहे, आणि ज्या अर्थीं त्या टीकेवरून हिंदुकलेचा सर्वव्यापी व चालू-कल कसा आहे तें समजतें त्याअर्थीं आह्मी, हें देऊळ पौराणिक काळानंतर झालेलें आहे तथापि, तींतील कांहीं अवतरणें खालीं देत आहोंत.

" शिल्प शास्त्राच्या कामाचा नमुना तयार करतांना ज्यांत निव्वळ बुद्धि कौशल्य खर्च केलें आहे असें उत्कृष्ट उदाहरण ह्मटलें ह्मणजे **पार्थेनन**चें मंदिर हें होय. प्रत्येक भाग व प्रत्येक स्वरूप याचा अदमास गणित शास्त्राच्या नेमकेपणाप्रमाणें केला आहे व तें काम करण्यांत शिल्पकारांची टापटीप इतकी आहे कीं तशी दुसऱ्या ठिकाणीं मिळणें कठीण. .... बांधकाम सर्वोत्कृष्ट दिसावें अशा रीतीनें नक्षी-च्या कामाची योजना केली आहे ती अत्युत्तम आहे. हें कोरींव काम उग्र व दिव्य असून त्यांत मनुष्यांच्या हलक्या मनोविकाराचा संपर्क दिसत नाहीं.

"ह्याच्या उलट **हालाबिड** मंदिर आहे तें यथा शास्त्र बांधलेलें आहे, परंतु त्याच्या एकंदर बाह्य स्वरू-पांत मुद्दाम वैचित्र्य आणिलें आहे, व आंतील तपशी-लांत तर अधिकच नानाविधपणा आहे. **पार्थेनन**च्या देवालयांतील सर्व खांब एकसारखे आहेत, परंतु ह्या

हिंदु देवालयांत एक पैलू दुसऱ्या पैलूशीं मिळता नाहीं; व प्रत्येक वेलवुट्टीची प्रत्येक मुरड निरनिराळी आहे. एकंदर इमारतींत एक छत दुसऱ्या छतासारखें नसून प्रत्येक भागांत यंत्रशास्त्र नियमास जणू काय झुगारीतच आहे अशा कल्पनाशक्तीचें आल्हादकारक प्राचुर्य दिसतें. मानवश्रद्धेंत जें जें कांहीं वेडेवांकडें आहे व मानवी मनोविकारांत जें जें कांहीं उत्साहदायक आहे तें तें सर्व ह्या भिंतीवर चितारलेलें दिसतें. परंतु बुद्धिकौशल्याच्यासंबंधानें पाहतां जितकें मानवी मनोविकार **पार्थेनन**मध्यें नजरेस पडतात तितकेंच बुद्धिकौशल्य ह्या देवालयांत दृष्टीगोचर होत आहे.

"हिंदुस्थानांतील ह्या नमुन्यांच्या परिशीलनाचा मोठा फायदा झटला झणजे शिल्पशास्त्रांतील गुणदोष काढण्यास आपणास जास्ती जागा मिळते. आजपर्यंत ज्या आकारांची माहिती आपणास आहे त्यांपेक्षां अगदीं भिन्नतर आकारांची माहिती करून घेतल्यानें एकाच नमुन्यांत व एकाच प्रचलित तत्त्वेंत समाधान मानणारी आपली दृष्टि किती आकुंचित आहे तें आपणास कळतें. ह्याप्रमाणें आपला टप्पा मोठा झाल्यानें आपणास कळून येईल कीं जसे मनुष्याचे स्वभाव भिन्न आहेत तसेंच शिल्पशास्त्र हेंही बहुस्वरूपी आहे, व शिल्पकलेनें प्रदर्शित करतां येणार नाहीत अशा मनुष्याच्या हृदयांतील मनोवृत्ती अथवा कल्पनाशक्तीचे विचारतरंग विरळा आहेत."

खंड ४ थें.

शास्त्रें आणि ग्रंथ.

विक्रमादित्याच्याकाळीं जे ग्रंथ रचण्यांत आले, ज्यांचा अभ्यास हिंदु लोक अद्यापही मोठ्या उत्कंठेनें आणि साश्चर्यानें करितात आणि ज्यांच्या-योगानें अर्वाचीन हिंदूंच्या कल्पना, मतें आणि मनोवृत्ती ह्यांचा त्यांच्या पूर्वजांच्या कल्पना, मतें आणि मनोवृत्तींशीं संबंध दाखविला जातो, त्या ग्रंथसंग्रहाचें वर्णन ह्या प्राचीन हिंदुस्थानच्या संक्षिप्त इतिहासाच्या शेवटच्या खंडांत दिलें असतां तें योग्य होईल असें वाटल्यावरून तें आह्मीं येथें करीत आहोंत.

ज्योतिःशास्त्राची प्रगति बौद्ध युगांत बरीच झाली होती व त्याविषयीं पूर्वीचें खंडांत आह्मीं लिहिलेलें आहेच; परंतु पौराणिक काळांत त्या शास्त्रास आणखी नवीन स्फुर्ति मिळाली. महा विद्वान् **आर्यभट्ट** हा इ. स. ४७६ मध्यें **मागधां**ची प्राचीन राजधानी जी **पाटलीपुत्र** नगरी तेथें जन्मला, आणि त्यानें आपल्या नांवावरून नांव दिलेला **आर्यभट्ट** नामक ग्रंथ सहाव्या शतकाचे आरंभीं लिहिला. पृथ्वी आपल्या आंसावर फिरत आहे, ह्या उपपत्तीचें त्यानें आपल्या ग्रंथांत प्रति-

पादन केलें आहे. त्यानें असें ह्मटलें आहे कीं, "चालत्या गलबतांत बसून मनुष्य पुढें जात असतां स्थीर पदार्थ मागें जात आहेत असें त्यास दिसतें, त्याप्रमाणें तारे स्थीर असून दररोज फिरतात असें दिसतात." आर्यभट्टानें सूर्य व चंद्र ग्रहाणांचीं व आकाशांतील दुसऱ्या अद्भुत चमत्कारांचीं खरीं कारणें दिलीं आहेत, व पृथ्वीच्या परिघाच्या संबंधानें त्यानें केलेल्या अटकळींत व खऱ्या अजमासांत फारसा फरक नाहीं.

त्याच्या नंतरचा ज्योतिषी **वराहमिहिर** हा सुमार इ. स. ५०५ ह्या वर्षाच्या सुमारास उज्जयनी शहरांत जन्मला. हा **विक्रमादित्या**च्या दरबारच्या नव रत्नांपैकीं एक रत्न होता असें लोक मोठ्या प्रेमानें अद्याप स्मरतात. पूर्वी आह्मीं सांगितलेंच आहे कीं, ह्यानें आपल्या **पंचसिद्धांत** ह्या नांवाच्या ग्रंथांत पांच सिद्धांत अथवा पद्धती एकत्र केलेल्या आहेत. ह्यानेंच बृहत्संहिता हा ग्रंथ लिहिला. ह्यांत माहिती फार आहे. सूर्य, चंद्र, पृथ्वी आणि तारे, आकाशांतील व हवेसंबंधाचे अद्भुत चमत्कार ह्या गोष्टींविषयींच लिहिलें आहे असें नाहीं, परंतु त्यांत अणखी मूर्ति, देवालयें, शिल्पशास्त्र, जनावरें, रत्नें, वनस्पति व हस्तकौशल्य निर्मित्त पदार्थ वगैरे विषयांचा समावेश केलेला आहे.

वराहमिहिरानंतर **ब्रह्मगुप्त** झाला. त्यानें ब्रह्मगुप्तसिद्धांत ह्या नांवानें जुन्यापैकीं एका सिद्धांताचें पुनरुज्जीवन

केलें. हा ग्रंथ इ. स. ६२८ सांत लिहिला. ह्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत अज्ञानांध:कार काळ सुरू झाला, त्यामुळें इ. स. च्या बाराव्या शतकांत ह्मणजे रजपूत लोकांच्या चलतींत **भास्कराचार्य** उत्पन्न होईंपर्यंत ज्योतिष्यांमध्यें नांव घेण्यासारखा कोणी झाला नाहीं.

हिंदु ज्योतिषी आपल्या ग्रंथांत बीजगणित व अंकगणित याविषयीं लिहीत असत, आणि हिंदु बीज गणिताच्या प्रगतीबद्दल नामांकित विद्वान् जो **कोल-ब्रुक** यानें जें कांहीं लिहिलें आहे त्याचा उतारा येथें देणें योग्य आहे. तो ह्मणतो कीं, "फार प्राचीनकाळीं ह्मणजे **ग्रीक** लोक ह्या शास्त्राचीं फक्त मूलतत्वेंच शिकवीत असत त्या काळास पुढें लागून असणाऱ्या शतकांत हिंदु लोकांनीं ह्या विषयांत नांवाजण्यासारखें गमन केलें होतें. हिंदु लोकांस चांगल्या अंकविद्येचें साहाय्य असें, व ग्रीकांची अंकविद्या वाईट होती ही एक गोष्ट त्यांस प्रतिकूल होती. अंकगणिताचा बीजगणिताशीं अति निकट संबंध असल्यामुळें, ज्या लोकांत अंकगणिताचें ज्ञान फार उपयोगी पडेल अशा रीतीनें योजिलें असेल, त्या लोकांतच बीजगणिताच्या **चिन्हांकांची** उत्पत्ति सहज आणि स्वाभाविक रित्यां होण्याचा संभव होता. हिंदूची व **डिओफंटाईनची** ह्या दोन्ही रीति भिन्न आहेत व त्यामुळें एकीवरून दुसरी निघाली असेल असें मानण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

त्या दोन्हीही रीति इतक्या भिन्न आहेत कीं, दोन्ही स्वतंत्र रीतीनें निघाल्या असतील असें मानणें वाजवी होईल."

आरब लोकांनीं हिंदूंच्या बीजगणिताच्या ग्रंथांचीं भाषांतरें इ. स. च्या आठव्या शतकांत केलीं, व **पिसा** येथील **लिओनार्ड** ह्यानें तें शास्त्र **आरब** लोकांपासून शिकून अर्वाचीन यूरोपांत प्रसिद्ध केलें. अंक-गणितांतील दशांश प्रकार **आरब** लोकांनीं हिंदूंपासून घेतला व नंतर त्याचा प्रसार यूरोपांत केला. ही रीत हल्लीं सर्व जगभर चालू आहे.

विक्रमादित्याच्या काळाचें अर्वाचीन हिंदूंस जें मोठें भूषण वाटतें तें ह्या गणित व दुसऱ्या शास्त्रांत त्यावेळीं प्रगति झाली ह्मणून नव्हे. कवितेनें आपलें तेज त्या काळावर पाडिलेलें आहे आणि कल्पना देवीच्या अविनाशी तरंगांनीं ह्या काळास संस्कृताच्या **आगस्तन काळाचें** स्वरुप दिलें आहे.

ह्या काळाचा आरंभ **शारदादेवीचा** प्रासादिक पुत्र जो **कालिदास** त्यानें केला. हा **विक्रमादित्याच्या** दरबारांत अति नामांकित कवि होता. त्याच्या अति उत्तम **शांकुतल** नाटकाचें भाषांतर इंग्रजी भाषेंत सर वुईलियम **जोन्स** यानें शंभर वर्षांवर केलें, त्यामुळें संस्कृत भाषेचें सौंदर्य आणि उपयुक्तता यांज-कडेस यूरोपियन पंडितांचें लक्ष प्रथमतःच वेधलें. ह्या

ग्रंथाचें गुणानुवाद हल्लींच्या काळच्या अति बुद्धिमान् **गोयेथ** नामक पंडितानें सुंदर कवितेमध्यें गाईलें आहेत. ह्या कवितेचे मूळ भाषेंत व भाषांतराच्या रूपानें उतारे नेहमीं होत आहेत.

" तूं, जी तारुण्यावस्थेंतील स्फुटित कुसुम व वृद्धावस्थेंतिल फल आहेस, जीच्या योगानें आत्मा मुदित होतो, जी त्यास परमानंदित करिते, जी जिवाचें पारणें फेडितें, आणि जी आत्म्याचें पोषण होय; तूं, जिच्या एका मधुर नांवामध्यें पृथ्वी आणि स्वर्ग लोकही ह्या दोहोंचा समावेश होतो. अशी जी तूं शकुंतला, तिचें एक नांव घेतलें कीं, त्यांत सर्व कांहीं येतें.*

इंग्रजी वाचकांस **शाकुंतल** चांगलें प्रकारें माहीत आहे ह्मणून **कालिदासाचीं** दुसरीं जीं दोन नाटकें आपणांस उपलब्ध आहेत त्यांतील एकाचें त्रोटक वर्णन दिलें असतां विशेष मनोहर होईल.

विक्रमोर्वशी ह्या नाटकांत नायक **पुरुरवा** आहे. त्याच्या व स्वर्गांतील अप्सरा जी **उर्वशी** तिच्या एकमेकांवरील प्रितीचें वर्णन ह्यां नाटकांत आहे. ही गोष्ट ऋग्वेदा इतकी पुरातन आहे. मूळची कल्पना अशी आहे कीं, सूर्य (पुरुरवा=तेजस्वी किरणांचा) हा उषःकाळ (उर्व-

---

* गमे तारुण्याचें कुसुम अससी जें विकसलें ॥
तसें वार्धिक्याचें फल मधुरही तूं गवसलें ॥
तुझ्यानामीं पृथ्वी गगन सुखये सर्व अससी ॥
तवाख्या अन्वर्था ह्मणुनिमज शं-कुंच-तलसि ॥

शी=अति विस्तृत होणारी) ह्या देवीचा पाठलाग करीत आहे. हा मूळचा अर्थ हिंदु लोक कधींच विसरले आहेत. पुराणांतील **पुरुरवा** हा कोणी मानवी राजा होता व त्यानें स्वर्गांतील **उर्वशी** ह्या नांवाच्या अप्सरेस दैत्यापासून सोडविली आणि त्या दोघांच्या मनांत एकमेकांविषयीं प्रीतिभाव उत्पन्न झाला. मानवी राजाच्या सौंदर्यानें त्या अप्सरेचें मन इतकें वेधून घेतलें होतें कीं, इंद्राच्या कचेरींत नाटकांतील जो भाग तीस करावयाचा होता तो ती विसरली आणि ज्याच्यावर तिचें मन बसलें होतें त्याचें नांव घेतल्यामुळें तिच्या मनांतील गुह्य बाहेर पडलें.

"**उर्वशी**कडेस **लक्ष्मी**चा व **मेनिके**कडेस **वारुणी**चा भाग खेळून दाखविण्याचें होतें.

वारुणी:—हे **लक्ष्मी**, सर्व लोकांवर ज्यांचा अंमल चालतो ते शक्तिमान सर्व अधिपती येथें जमा झालेले आहेत. त्यांत नवयौवनयुक्त **केशव** हा प्रमुख आहे, तरी हे **लक्ष्मी** तुझें मन कोणाकडेस आहे तें सांग?"

ह्या प्रश्नाचें उत्तर "**पुरषोत्तमा**कडेस" असें तिनें दिलें पाहिजे होतें, परंतु त्याप्रमाणें न देतां "**पुरुरव्या**कडेस" असें तिच्या तोंडांतून चटकन निघून गेलें.*

* लक्ष्मीभूमिकायां वर्तमाना उर्वशी वारुणीभूमिकायां वर्तमानया मेनकाया पृष्टा, समागतास्त्रिलोक पुरुषाः सकेशवालोकपालाः कस्मिंस्ते हृदयाभिनिवेश इति। तस्याःपुरुषोत्तम इति भणितव्ये पुरूरवसी ति निर्गता वाणी।

ह्या चुकीबद्दल त्या सुकुमार अप्सरेस शाप मिळाला. परंतु इंद्रानें विचार करून तो शापच तीस आशिर्वादसा केला आणि तिचा प्रिय जो मानवी राजा त्याच्याकडेस जाऊन एक मूल होईपर्यंत त्याच्याजवळ राहण्यास त्यानें तीस आज्ञा केली.

ही जी नवीन प्रीति पुरुरव्याच्या मनांत उत्पन्न झाली ती आपल्या राणीपासून लपवून ठेवण्याचा त्यानें प्रयत्न केला, परंतु तो निष्फळ झाला. त्यानें राणीचे पाय धरून आपणास पश्चात्ताप झाला आहे असें खोटेंच दाखविलें. परंतु राणीनें भीड न राखतां उत्तर दिलें कीं:—

"माझे स्वामी, अशा रीतीनें पश्चात्ताप दाखवून आपण मला अडचणींत टाकितां, मी आपल्यावर भरंवसा ठेवूं शकत नाहीं."*

असें बोलून ती राणी राजास सोडून गेली. तेव्हां राजाच्या अंत:करणांत शहाणपणाचा विचार खालीं लिहिल्याप्रमाणें आला.

"हा मनस्ताप मी आपणावरून टाळूं शकलों असतों. स्त्रीजन फार बुद्धिमान् असतो, फक्त शब्दांस तो भुलत नाहीं. शब्दांस अनुरागवृत्तीचें पाठबळ दिलें पाहिजे. खरा जव्हेरी खोट्या रत्नावर उदासीनपणानें नजर फेकितो."†

---

* क्षितव ! लघुहृदया खल्वहम्, अनुनयं न गृह्णामि;
क्षिन्तु दक्षिणस्य ते कृतपश्चात्तापस्य बिभेमि ।

† प्रियवचनकृतोऽपि योषितां दयितजनानुनयो रसाद्दते ।
प्रविशति हृदयं न तद्विदां मणिरिव कृत्रिमराग योजित: ॥ १ ॥

परंतु लौकरच राणीच्या लक्षांत आलें कीं, तिच्या पतीच्या मनांत जी प्रीति उत्पन्न झाली आहे, ती अनियंत्रित आहे व तिचा क्रोध निष्फळ आहे. प्रथम राजाशीं आपण जें वर्तन केलें त्याचा निस्तार, आपणास कांहीं व्रत करावयाचें आहे अशा निमित्तानें, करण्याचा विचार तिनें केला. ही गोष्ट हिंदु पतिव्रता स्त्रियांत जो इंद्रियनिग्रह असतो त्यास अनुसरूनच होती. शुभ्र वस्त्र नेसून व फक्त पुष्पालंकार घालून ती आपला पति जो राजा त्याची आराधना करण्याकरितां त्याजकडेस गेली. असा तिचा वेष पाहून तिच्याविषयीं अति प्रेमबुद्धि त्याच्या मनांत पुनः उत्पन्न झाली.

राजा ह्मणतोः—

श्लोक.

" नेसूनि सित वस्त्र जी तनुवरी मांगल्य भूषा धरी ॥
" दूर्वांकूर विचित्र शोभती जिच्या ह्या केशबंधावरी ॥
" टाकूनी दिधलें जिनें व्रतामिषें गर्वाशिं ऐशी प्रिया ॥
" या रूपें दिसते प्रसन्नदवना ही चक्षुते माझिया ॥"*

परंतु तिला माहीत होतें कीं, हें तिचें मनोहरत्व निरुपयोगीं आहे; तिनें राजाची पूजा केली, नमून

---

* सितांशुका मंगलमात्रभूषणा
विचित्र दूर्वांकुरलाञ्छितालका ।
अनोपदेशोज्झितगर्ववृत्तिना
मम प्रसन्ना वपुषैव लक्ष्यते ॥

त्याच्या पायाशीं नमस्कार घातला आणि पुनः उठून चंद्र व रोहिणी यांजकडेस पाहून ती ह्मणाली:—

" मी आपल्या पतीस जें वचन देत आहे तें तुह्मी ऐका, व त्यावद्दल साक्षी रहा. महाराजांचें मन ज्या अप्सरेवर वसलें आहे आणि जी स्त्री महाराजांवर प्रीति करिते तिला मी आजपासून आनंदानें आणि ममतेनें वागवीन."*

ह्या उदार आत्मसंयमनाविषयीं उर्वशीच्या सखी-सही विस्मय वाटला आणि ती ह्मणाली:—

" ही देवी अतिशय मोठ्या मनाची आहे, हिची कर्तव्यपरायणता अतिशय अनुकरणीय आहे." †

नंतर तो राजा आणि ती अप्सरा ह्यांची प्रीति व दैविक योगानें थोडे दिवस त्यांचा वियोग झाला होता तो, ह्यांचें वर्णन कालिदासाच्या लेखणींत जें कांहीं चातुर्य होतें तें सर्व खर्चून त्यानें केलेलें आहे.

हा वियोग झाला असतां तो राजा फार झुरणीस लागला होता, तो रानांत फिरत असे, व पशू, पक्षी व निर्जीव पदार्थांस अनुलक्षून बोलत असे.

---

* एषा देवतामिथुनं रोहिणी मृगलाञ्छनं साक्षीकृत्य आर्यपुत्रं प्रसादयामि; अद्यप्रभृति आर्यपुत्रो यां स्त्रियं कामयते, या च आर्यपुत्रसमागमप्रणयिनी, तया सह अप्रतिबन्धेन वर्तितव्यम् ।

† महानुभावया प्रतिव्रतया अभ्यनुज्ञातोऽनन्तरायस्ते प्रियसमागमो भविष्यतीति ।

" मी चकचकित पिसाऱ्याच्या पक्षांस, मंजूळ शब्द करणाऱ्या कोकिलेस, गजसंघपतीस, गुणगुण करणाऱ्या मधमाशीस, हंस पक्षास, गर्जना करणाऱ्या पाण्याच्या धबधब्यास, चक्रवाक पक्षांस, पापाणास, हरिणीस, ह्या सर्वांस मी अरण्यांत भटकत असतां प्रार्थना केली, परंतु कोणींही माझें दुःख कमी केलें नाहीं." *

अशा रीतीनें कांहीं वेळ अरण्यांत भटकल्या नंतर त्याची प्रिया त्यास प्राप्त झाली. परंतु तिचा वियोग पुन्हां होण्याचा समय आला होता, कारण त्याच्या पासून **उर्वशी**स जो मुलगा झाला होता व जो तिनें त्याच्यापासून लपवून ठेविला होता तो त्याच्या नजरेस पडला, व इंद्राची अशी आज्ञा होती कीं, **पुरुरव्या**नें तिचा मुलगा पाहिला कीं तिनें स्वर्गास परत यावें. परंतु **इंद्रा**नें आतां आपल्या आज्ञेंत फेरफार केला आणि तो फेरफार **पुरुरव्यास** सांगण्याकरितां **नारद** ऋषी स्वर्गांतून खालीं उतरले. **पुरुरव्यास** भेटून ते ह्मणाले:—

" **उर्वशी** ही सर्व आयुष्यभर तुझी बायको होऊन राहील." †

---

* मयूर-परभृत-हंस-रथाङ्गम
अलि-गज-पर्वत-सरित-कुरङ्गम ।
तव कारणाऽरण्ये भ्रमता
को न खलु पृष्टो मया रुदता ॥

† इयञ्च उर्वशी यावदायुषस्ते सहधर्म चारिणी भवतु ।

कालिदास हा कवि होता तसा नाटककारही होता. संस्कृतांतील उत्तम महाकाव्यांपैकीं दोन त्यानें लिहिलेलीं आहेत. एक काव्य **रघुवंश** हें होय. हें रामाच्या अक्षय रमणीय चरित्राविषयीं आहे. दुसरें काव्य **कुमारसंभव** ह्यांत **कालिदासानें** आपल्या कल्पना-तरंगांतून **शिवाविषयीं उमेचें** प्रेम व त्यांचें लग्न ह्याचें चित्र रेखिलें आहे. ह्या गोष्टीचा सारांश आह्मीं वर सांगितला आहे; परंतु ह्या काव्यांतलि कांहीं निवडक वेंचे येथें देण्याकरितां त्यांजकडेस पुन्हां वळतों.

उमा ही **हिमालय** पर्वताची मुलगी होती, तिच्या-पेक्षां मनोहर मूल ह्या जगांत जन्मास आलेलें नाहीं.

" **मेनाची** कन्या जन्मली तेव्हां सुवेळा होती, सर्व जग आनंदमय होतें, दैदिप्यमान आकाश गुलाबी रंगा-च्या तेजानें भरलें होतें, सुगंधयुक्त वाऱ्याची झुळुक मंदमंद वाहत होती, पर्वताच्या दरींतून मंजूळ नाद येत होता आणि देवांनीं मोठें हर्षयुक्त होऊन पुष्पवृष्टि केली होती." *

* प्रसन्न दिक् पांशुविविक्त वात
शङ्खस्वनानन्तर पुष्प वृष्टि ।
शरीरिणां स्थावरजङ्गमानां
सुखाय तज्जन्मदिनं बभूव ॥ २३ ॥
तया दुहित्रा सुतरां सवित्री
स्फुरत्प्रभामण्डलया चकाशे ।
विदूर भूमिर्नवमेघ शब्दा
दुद्भिभिन्नया रत्नशलाकयेव ॥ २४ ॥ कु. सं. सर्ग १.

ह्या सुकुमार कुमारिकेच्या बालपणाचें वर्णन अति चातुर्यानें आणि आल्हाद देणारें असें केलेलें आहे. पुढें तिचें नशिब फार मोठें होतें. सर्व शक्तिमान जो शिव त्याची पत्नी तिनें व्हावें अशी सर्व देवांची इच्छा होती, कारण त्या दोघांचा पुत्र त्यांचा सेनापति होऊन त्यांस असुरांवर जय मिळवून देणार होता. परंतु शिव हा ह्यावेळीं हिमालय पर्वतावर समाधी लावून ध्यानस्थ होता; म्हणून तारुण्यावस्थेंत आलेल्या उमेनें त्या महादेवापाशीं राहून दासीचें काम करावें अशी व्यवस्था केली.

उमेनें निर्मल वस्त्रें परिधान केलीं आहेत, पुष्पालंकार धारण केले आहेत, ती महादेवाच्या सेवेंत तत्पर आहे व त्याकरितां पुष्पें गोळा करून आणून त्यास नमस्कार करीत आहे, अशी जी उमेची मूर्ति तिच्यापेक्षां जास्ती सुंदर आणि अभिनव अशी कल्पना सृष्टींत कांहीं नाहीं. ती नमस्कार करीत असतां इतकी खालीं नमली कीं,

"जें पुष्प मध्यान्ह रात्रीं तारे प्रकाशतात त्याप्रमाणें तिच्या केशांत चमकत होतें तें खालीं पडलें."*

शिवानें तिची नम्रता पाहून तो खुष झाला आणि त्यानें तीस आशिर्वाद दिला कीं,

---

* उमापि नीलालकमध्य शोभि
विस्रंयन्ती नवकर्णिकारम् ।
चकार कर्णच्युत पल्लवेन
मुर्ध्ना प्रणामं वृषभध्वजाय ॥ ६२ ॥ सर्ग ३.

"तुझ्यावरच प्रीति करणारा असा पति तुला मिळेल."*

घातकी कामदेव मध्यें आला नसतां तर सर्व गोष्टी नीट झाल्या असत्या; परंतु कामदेवानें शिवाच्या मनाची दुर्बलता पाहून आपलें अचुक शरसंधान करून बाण सोडिला.

"तोंडल्या सारखे लाल ओष्ट असणाऱ्या उमेच्या मुखावर दृष्टि फेंकिली असतां, शिवाचें धैर्य चंद्राच्या योगें सात समुद्रावर लहर येते त्याप्रमाणें जरा ढळलें. कदंबाची कळी फुलूं लागली असतां जशी फुगते तशी हिमालयाच्या मुलीची छाती वरखालीं होऊं लागली व प्रत्येक अवयव थरथर कांपू लागला; परंतु दृष्टि जमिनीवर फेंकून आपलें सुंदर मुख खालीं करून ती उभी राहिली. त्रिनेत्र शिवानें प्रयत्नानें मनोविकार दाबून आपल्या मन:स्वास्थ्यास बिघडविणारा कोण आहे तें पाहण्याकरितां आजूबाजूस दृष्टि फेंकिली तों उजव्या डोळ्याच्या आणीजवळ मुष्टि नेली आहे, व खांदा नमलेला आहे, डावा पाय जरा वांकडा केला आहे, चिमुकलें धनुष्य वांकविलें आहे असा बाण मारण्यास तयार झालेला स्वत: सिद्ध मदन यास पाहिलें. तेव्हां आपल्या तपास अडथळा आणल्यामुळें रागानें भिवया चढलेल्या मुखाकडेस पाहण्यास

---

* अनन्यभाजं पतिमाप्नुहीति
सा तथ्यमेवाभिहिता भवेन ।

कठीण अशा शिवाच्या तृतीय नेत्रांतून अग्नीची ज्वाळा निघाली. प्रभो, क्रोधास आवरा, आवरा, अशी आकाशांत देववाणी होत होती तोंच शिवाच्या नेत्रापासून जन्मलेल्या अग्नीनें मदनाची राखरांगोळी केली."*

कामाची स्त्री आपल्या पतीच्या मरणाबद्दल फार दुःख करीत. उमासुद्धां मनांत खजील व दुःखी हो-

---

* हरस्तु किञ्चित् परिलुप्तधैर्य
श्चंद्रोदयारम्भ इवाम्बुराशिः ।
उमामुखे बिम्बफलाधरोष्ठे
व्यापारयामास विलोचनानि ॥ ६७ ॥
विवृण्वती शैलसुतापि भाव-
मङ्गैःस्फुरद् बालकदम्बकल्पैः
साचीकृता चारुतरेण तस्थौ
मुखेन पर्यस्तविलोचनेन ॥ ६८ ॥
अथेन्द्रियक्षोभमयुग्म नेत्रः
पुनर्वाशित्वाद्चलवन्निगृह्य ।
हेतुं स्वचेतोविकृतेर्विदक्षु-
र्दिशा मुपान्तेषु ससर्ज दृष्टिम् ॥ ६९ ॥
स दक्षिणापाङ्ग निविष्टमुष्टिं
नतांसमाकुञ्चितसव्यपादम्
ददर्श चक्रीकृतचारुचापं
प्रहर्तुमभ्युद्यतमात्मयोनिम् ॥ ७० ॥
तपःपरामर्शविवृद्धमन्यो
र्भ्रूभंङ्गदुष्प्रेक्षमुखस्य तस्य ।
स्फुरन्नुदर्चिः सहसा तृतीया
दक्ष्णः कृशानुः किल निष्पपात ॥ ७१ ॥
क्रोधं प्रभो संहर संहरेति
यावद्गिरः खे मरुतां चरन्ति ।
तावत् स वन्हिर्भवनेत्र जन्मा
भस्मावशेषं मदनं चकार ॥ ७२ ॥ सर्ग ३.

ऊन अरण्यांत तपश्चर्या करण्याकरितां जाते. ह्या कोमलांगी मुलीनें तिच्या शरीरावयवांस अयोग्य असा जो कडक देहदंड सोशिला त्याविषयीं वर्णनांत कवि निमग्न झाला आहे. तिनें अतिप्रखर अग्नि आपल्या आजूबाजूंस ठेवून सर्व उन्हाळा घालविला, पावसाळ्यांत सर्व पाऊस तिनें आंगावर घेतला, आणि हिवाळ्यांतील प्रभंजनांनींही तिचा निश्चय ढळला नाहीं.

ह्या कोमलांगी आणि तरुण मुलीनें हें जें उग्रतप चालविले होतें, त्याचा उद्देश काय आहे अशी चवकशी करीत एक तरुण योगी तेथें येतो. उमेच्या दासीनें त्यास खरें कारण सांगितलें, परंतु इतकी सुकुमार स्त्री शिवा सारखा वेडावाकडा देव जो अंगांस राख फासून स्मशानांत हिंडतो त्यावर प्रीति करीते ही गोष्ट त्या योग्यास खरी वाटेना.

"हें त्याचें भाषण उमेनें अधीर होऊन ऐकिलें तेव्हां रागानें तिचें रक्त मस्तकीं चढलें."*

ती त्या अशिष्ट रीतीनें वागणाऱ्या योग्यास मोठ्या उत्कंठीत वाक्चातुर्यानें त्या अज्ञात आणि अगम्य महादेवाचा महिमा सांगते व त्या योग्यापासून रागानें आणि तिरस्कारानें उठून जात आहे तों:—

---

* इति द्विजातौ प्रतिकूलवादिनि
प्रवेपमानाधरलक्षकोपया।
विकुञ्चितभ्रूलतमाहिते तया
विलोचने तिर्यगुपान्त लोहिते ॥ ७४ ॥ सर्ग ५.

"येथून मी दुसरीकडेस जातें असें ह्मणणारी ती वाला पार्वती स्तनावरून वस्त्र सरलें आहे अशी चालू लागते. तेव्हां आश्चर्यानें चकित झालेल्या तिच्या डोळ्यापुढें आपलें रूप बदलून तो योगी उभा राहिला.

तो शिव स्वत: आपलें स्वरूप पूर्ण प्रगट करून तिच्यापुढें उभा होता."*

होय तो शिव स्वत:च आलेला आहे. कामदेवाच्या संधानानें प्रीतिपाशांत गुंतण्याचें त्यानें नाकारिलें होतें, परंतु उमेच्या तपानें संतुष्ट होऊन तो प्रसंन्न झाला आहे, आणि त्या पर्वताच्या कन्येस आपली प्रीति मान्य कर अशी मोठ्या नम्रतेनें विनवणी करीत आहे.

कालिदासाच्या छोटेखानी काव्यांत **मेघदूत** हें काव्य उत्तम असून अति मधूर आहे. ह्यांतील कथानक सावें आहे. एक **यक्ष** आपल्या स्त्रीवर अति प्रेमामुळें आपल्या कर्तव्यांत चुकतो, आणि त्या अपराधाकरितां त्याच्या घरांतून त्यास राजाज्ञेनें काढून लाविलें आहे. भटकत फिरत असतां तो पावसाळ्यांतील काळ्या ढगांकडेस पाहत आहे, व घरीं असलेल्या आपल्या प्रीयेस निरोप नेण्यास मेघास सांगत आहे. कोणकोणत्या रस्त्यानें जावें हें तो यक्ष सांगत

---

* इतो गमिष्यामि वयं वादिनि
चंचालबाला स्तनभिन्नवल्कला ।
स्वरूपमास्थाय च तां कृतस्मितः
समावलंबे वृषराजकेतनः ॥ ८४ ॥ कु. स. सर्ग ५.

असतां विंध्याद्रिपासून हिमालय पर्वतापर्यंतचे हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांचें कवितावद्ध वर्णन करण्याची संधि कवीनें साधिली आहे. हें वर्णन कल्पनातरंगांनीं इतकें परिप्लुत आहे आणि त्याचें यमक इतके मंजूळ आहे कीं, त्यापेक्षां ह्या गुणांनीं चांगलें काव्य जगांतील कोणत्याही भाषेंत नाहीं.

"विश्रांति घेतल्यावर अरण्यांतील नद्यांच्या कांठच्या बागांत आपोआप उत्पन्न झालेल्या मोगऱ्यांच्या कळ्यांवर आपल्या नवीन उदकांच्या तुषारांनीं सिंचन करीत होत्साता, व गालांवरील घाम पुसण्याच्या व्यथेनें ज्यांच्या कर्णांतील कमलें कोमेंजून गेलीं आहेत अशा माळ्यांच्या तरुण स्त्रियांच्या मुखांवर छाया करून त्यांच्याशीं क्षणमात्र परिचित होत्साता गमन कर."*

"उत्तर दिशेस जातानां उज्जयिनीचा मार्ग जरी वांकडा आहे, तथापि त्या नगरींतील उंच उंच राजमंदिरें पाहण्याविषयीं परांङ्मुख होऊं नकोस. तसेंच विद्युल्लतेच्या स्फुरणानें भयभीत झालेल्या नागरिक स्त्रियांच्या चंचल नेत्रकटाक्षांनीं मोहित होऊन तूं जेथें

---

* विश्रान्तः सन् व्रज वननदीतीरजातानि सिंचन्नुद्यानानां नवजलकणैर्यूथिकाजालकानि ॥
गण्डस्वेदापनयनरुजाक्रान्तकर्णोत्पलानाम्
छायादानात् क्षणपरिचितः पुष्पलावी मुखानाम् ॥ २७ ॥

रिझशील अशा त्या ठिकाणीं तूं जाणार नाहींस तर तूं फसला जाशील, अर्थात तुझें जन्म विफल होईल."*

कालिदास हा बहुतकरून सहाव्या शतकाच्या सुरुवातीस झाला असावा, व कित्येक पंडितांच्या मतानें तर तो राजसभासद **मात्रिगुप्त** ज्यास **काश्मिरचें** राज्य मिळविण्यास **विक्रमादित्यानें** मदत केली तो असावा असें आहे ह्याच शतकांत कांहीं काळानंतर दुसरा एक कवि **भारवि** नांवाचा होऊन गेला. त्यानें एक काव्य रचिलें आहे त्याचें नांव **किरातार्जुनीयम्** असें आहे. ह्या काव्यांत **अर्जुनानें** तपश्चर्या करून **कुरुपांडवांच्या** युद्धांत आपल्या शत्रूंस जिंकण्याची शक्ति मिळविली, त्याचें वर्णन आहे. मानसिक सृष्टींतून विचारतरंग उत्पन्न करण्यांत अथवा खऱ्या कवितेंत, व करुणारसांत आणि यमकाच्या माधुर्यांतही **कालिदासाची** बरोबरी **भारवि** करीत नाहीं. परंतु विचारांचा प्रोत्साह आणि ते विचार प्रदर्शित करण्यांत जोरदार व प्रगल्भ वाक्चातुर्य, ह्या गुणांनीं त्याचे ग्रंथ अमर झाले आहेत.

ह्याच्या पुढील शतकास प्रारंभ झाला तेव्हां दुसरा **शिलादित्य**, ज्यास उत्तर हिंदुस्थानांतील **कनोजच्या**

---

* वक्रःपंथा यदपि भवतःप्रस्थितस्योत्तराशाम्
सौधोत्संगप्रणयविमुखो मास्म भूरुज्जयिन्याः
विद्युद्दाम स्फुरितचकितैस्तत्र पौरांगनानाम्
लोलापांगैर्यदि न रमसे लोचनैर्वंचितोऽसि ॥ २८ ॥

गादीवर हु-एन-संग ह्यानें पाहिलें होते, त्याची दैदिप्यमान कारकीर्द होती. शिलादित्य हा स्वतः ग्रंथकर्ता होता व त्यानें **रत्नावली** नामक ग्रंथ आपणास ठेविला आहे. हा ग्रंथ रसाळ असून प्रशंसार्ह आहे. ह्यापेक्षांही अपूर्व **नागानंद** नामक नाटक शिलादित्यानेंच रचिलें आहे असें ह्मणतात; परंतु तें **रत्नावली**प्रमाणें त्याच्या दरबारांतील एखाद्या कवीनें केलेलें असावें. ह्यास आह्मीं अपूर्व ह्मटलें आहे, कारण बौद्धिक नाटक असें हें एकच आपणास उपलब्ध आहे. ह्यांत हिंदूंचे देव आणि देवी ह्यांची बौद्धांच्या पूज्य वस्तूंबरोबर सांगड लाविलेली आहे. ह्या गुणविशेषामुळें ह्या ग्रंथास विशेष महत्व येत आहे.

विद्याधरांचा राजपुत्र **जीमूतवहान** हा सिद्धांच्या राजाची कन्या **मलयावती** हीस गौरीची पूजा करतांना पाहतो आणि तिजविषयीं त्याच्या मनांत प्रेमभाव उत्पन्न होतो. ज्याप्रमाणें **दुष्यंत शकुंतले**कडेस गेला त्याप्रमाणें तो **मलयावती**कडेस जातो आणि तिचें मनही त्याजकडेस आकर्षून जातें. कामविकाराचीं नेहमीचीं लक्षणें **शकुंतले**प्रमाणें **मलयावती**वर दिसूं लागतात; तिला ज्वर येतो, चंदनाचा लेप करितात व केळीच्या पानानें तीस वारा घालतात.

ज्या युवतीनें त्याचें चित्त हरवून नेलें होतें तिचें चित्र **जीमूतवहान** काढूं लागतो. तो आपल्या मित्रा-

पाशीं चित्र काढण्यास तांबडा हिंगुळ मागतो, व त्याचा मित्र जमिनीवरून मातीचीं कांहीं ढेपें उचलून आणून त्यास देतो व त्यांपासून जांवळा, पिंवळा, लाल, तपकिरी, आणि कर्बुरी हे पांच रंग निघतात. ह्यावरून जुन्या पॉम्पी शहरांतील रंगाऱ्यांप्रमाणें प्राचीन हिंदु लोक रंग देण्याच्या कामीं रंगीत माती व खनिज पदार्थ ह्यांचा उपयोग करीत असत असें दिसतें.

हा राजपुत्र चित्र काढीत असतां **मलयावती** त्याजकडेस लक्ष लावून पाहते व हें चित्र, दुसऱ्या एखाद्या कुमारिकेवर त्याचें मन बसलें असून तिचें असावें असें तीस वाटून, तिच्या मनांत मत्सरभाव उत्पन्न होतो व त्यामुळें तिला मूर्छना येते. इकडे **मलयावती**चा बाप आपली मुलगी मी तुह्मास देण्यास तयार आहे असा निरोप **जीमूतवहानास** पाठवितो. परंतु जी युवती त्यानें पाहिली होती तीच ही राजकन्या आहे असें **जीमूतवहानास** माहीत नव्हतें, व जिच्यावर त्याचें मन बसलें होतें, तिलाच वरण्याचा त्याचा निश्चय असल्यामुळें **मलयावती**च्या बापाचें बोलणें तो नाकबूल करितो.

परंतु दोघांचाही भ्रम लौकरच दूर होतो. **जीमूतवाहनास** कळतें कीं, ज्या कुमारिकेविषयीं आपणाकडेस बोलणें आलें होतें तीच त्याचें मन बसलेली युवती होय व **मलयावती**स कळतें कीं, तो राजपुत्र

जें चित्र काढीत होता तें आपलें होतें. ह्या नंतर त्यांचा विवाह मोठ्या थाटामाटानें संस्कारयुक्त होतो.

येथें राजाच्या दरबारांतिल **शेखरक** नामक पराव्रपुष्ट विटाचें विनोददायक वर्णन आहे. लग्नोत्सव चालला असतां ह्या शेखरकानें यथेच्छ मद्य सेवन केल्यामुळें त्याच्या हातून कांहीं हस्यास्पद प्रमाद घडतात. तो ह्मणतो कीं **बलदेव** व **काम** हे दोनच देव त्यास माहीत आहेत. पहिला **बलदेव** हा हिंदुदेव मद्यसेवनांत अतिशय प्रवणि आणि दुसराही हिंदूंची कामदेवता आहे. नंतर ह्या शूरवीर पुरुषाची स्वारी एक दासी त्याचें प्रीयपात्र होतें तिस भेटण्यास निघते. रस्त्यांत त्यास राजपुत्राचा एक ब्राह्मण सेवती भेटतो. त्यानें कीटक बसूं नये ह्मणून तोंडावर वस्त्र घेतलें होतें, आणि त्यामुळें तो बुरखा घेतलेल्या स्त्री सारखा दिसत होता. **शेखरक** त्या ब्राह्मणास न ओळखून त्यास तो आपली प्रिया आहे असें समजून आलिंगन देतो. ब्राह्मणास त्याचा किळस वाटतो, व तो दारूच्या घाणीमुळें आपलें नाक दाबून धरितो. इतक्यांत दासी तेथें आल्यामुळें तर सर्वच घोटाळा होतो. **शेखरकावर** तूं दुसऱ्या युवतीची मनधारणा करीत आहेस असा आरोप दासी घेते, आणि ब्राह्मणास 'कद्रु मर्कटा,' अशीं विशेषणें मिळतात व त्याचें जानवें तोडलें जाऊन शेवटीं ह्या ब्रह्मघोटाळ्यांतून सुटका व्हावी ह्मणून तो

ब्राह्मण त्या दासीच्या पाया पडतो. सरते शेवटीं खरा प्रकार उघडकीस येऊन सर्वांचें समाधान होतें.

नंतर त्या दंपत्याचीं प्रेमयुक्त आनंददायक कृत्यें आपणास दाखविलीं आहेत. पति मोठ्या नम्रतेनें एक * साखरेचा आपल्या पत्नीजवळ खालीं लिहिल्याप्रमाणें मागतो.

"हे सुंदरि, गुलाबाच्या फुलावर सूर्य किरण पडून त्याचा जो रंग दिसतो त्यासारखी तुझ्या मुखावरील गुलाबी रंगाची छाट व तुझ्या दंतांच्या तेजानें दिसणारी तुझ्या मुखावरील लव, ह्यांसहीत तर तुझें मुख खरोखर कमल आहे. तर त्यांतील मधु भ्रमर कां पीत नाहीं ?"*

ह्यावेळीं नायकास त्याच्या राज्याची वाईट खबर मिळाल्यामुळें त्यास एकदम जावें लागतें.

येथपर्यंत हें विधानक दुसऱ्या हिंदु नाटकांतलि विधानकासारखेंच आहे. परंतु शेवटील दोन अंक निवळ बौद्ध धर्मानुसारी आहेत. व त्यांत परहिताकरितां स्वहिताचा त्याग करणें ह्यांत खरें पुण्य आहे हें असाधारण रीतीनें प्रतिपादिलें आहे.

जीमूतवहान प्रश्चिम घाटावर जातो, आणि तेथून पक्षांचा राजा गरुड यानें मारलेल्या नागांच्या अस्तींचा ढीग समुद्र किनाऱ्यावर त्याच्या नजरेस पडतो. नाग हे सर्प

---

* दिनकरकैरर्मृष्टं विभ्रत द्युतिं परिपाटलां
दशनकिरणैः संसर्पद्भिः स्फुटीकृतकेसरम्।
यदिमुखमिदं मुग्धेः सत्यं समं कमलेन ते
मधुमधुलिहःकिन्नैं तस्मिन् प्रविभाव्यते ॥ ४४ ॥

होत, परंतु हिंदु आणि बौद्ध कवींनीं आपल्या कल्पनातरंगांत त्यांस मनुष्याचा आकार दिला आहे. फक्त त्यास खवळे असून पाठीमागून डोक्याकडेस फणीचा आकार असतो. नागांनीं गरुडावरोबर करार केला होता कीं, दररोज एक नाग तुला भक्षण्यास पाठवीत जाऊं. ह्याप्रमाणें एका सर्पाची जाण्याची पाळी आली होती. तो रडत असलेल्या आईची मिठी सोडवून जाण्याची तयारी करीत आहे, असें **जीमूतवाहन** पाहतो तेव्हां त्याचा कंठ भरून येतो. त्या नागाच्या ऐवजीं गरुडाच्या भक्षस्थानीं आपण जाण्यास **जीमूतवहान** तयार होतो व त्यास चोंचीत धरून गरुड उडून जातो.

जीमूतवाहनाच्या घरीं जाऊन त्यानें आपणास ह्याप्रमाणें बळी दिलें असें नागानें सांगितल्यावर तें सर्व कुटुंब शोकसागरांत पडतें. त्याचीं वृद्ध मातापितरें आणि नुकतीच विवाह झालेली स्त्री हीं गरुड त्याचें मांस खात बसला होता त्या ठिकाणीं जातात, त्यावेळीं तो बहुतेक मेल्यासारखाच झाला होता. नागही तेथें धांवत जातो व त्या निरापराधी राजपुत्राची सुटका करण्याकरितां आपला जीव देण्यास तयार होतो.

गरुडास आपली झालेली चूक समजल्यावर तो भयभीत होतो. तो ह्मणतो:—

"हर, हर! माझ्या खादाडपणाच्या सपाट्यांत पड-

णाऱ्या नागाची दया येऊन त्याच्या ऐवजीं आपण होऊन आपलें शरीर माझ्या भक्ष्यास ह्या उदारधीनें दिलें. माझ्या हातून किती मोठें पाप घडलें आहे! सारांश ह्या **बोधिसत्वासच** मीं मारिलें. "*

ह्या पापाचें क्षालन करण्यास खालीं लिहिल्याप्रमाणें गरुडास **जीमूतवहान** उपदेश करितो.

"आजपासून कधींही जीवाचा नाश करणार नाहीं असा निश्चय कर, पूर्वीच्या कृत्यांचा पश्चात्ताप पाव, एक सारखें अखंड चांगलीं कृत्यें करून सर्व प्राणीमात्रांच्या मनांत आपल्याविषयीं विश्वास उत्पन्न करण्याचा प्रयत्न कर."†

ह्याप्रमाणें उपदेश करून तो वीरराजपुत्र प्राण सोडतो. कारण त्याचें बहुतेक शरीर गरुडानें खालेंच होतें. नंतर त्याचीं मातापितरें ह्या जगांतून आपली सुटका व्हावी ह्मणून आपल्या पुत्राच्या चिंतेंत उडी टाकण्यास तयार होतात व शोकाग्नींत पडलेली त्याची युवती लग्नाचे पूर्वीं ज्या गौरीचें पूजन तिनें केलें होतें तिचा धांवा करिते.

---

* गरुड ॥ अये। करुणार्द्रचेतसा अनेन महात्मना अस्मद्ग्रासगोचरपतितस्यास्य फणिनः प्राणान् रक्षितं स्वदेह आहारार्थमुपनीतः। तन्महदकृत्य मेतन्मया कृतम् । किं बहुना बोधिसत्व एवायं व्यापादितः।

† नायकः॥ नियं प्राणाभिघातात् प्रतिविरम कुरु प्राक्कृतस्यानुतापं
यत्नात् पुण्यप्रवाहं समुपचिनु दिशन् सर्वसत्वेष्वभीतिम्।
मम्रं येनात्र नैनः फलति परिणतं प्राणिहिंसा समुत्थं
येनैत द्वारिपूरे लवणकणमिव क्षिप्रमन्तर्हितस्य ॥ १०१ ॥

ह्या सर्वांचा शेवट अति गोड होतो. गौरी राजपुत्रास उठविते आणि गरुड इंद्राची प्रार्थना करून आपण ज्या नागांस मारिलें होतें त्यांस पुन्हां जीव देवावितो. "कोणत्याही जीवास दुखवूं नकोस" हें तत्व ह्या बौद्ध नाटकाचें आहे.

ह्या शिलादित्याच्या कारकिर्दींत कित्येक नामांकित कल्पित गोष्टी लिहिणारेही झाले होते. प्राचीन राष्ट्रांत हिंदुस्थानची कीर्ति शास्त्र आणि कवितेविषयीं होती त्यापेक्षां कल्पित गोष्टी आणि कादंवऱ्यांविषयीं जास्ती होती. ह्या आर्यांच्या अति जुन्या गोष्टी पाहणें असल्यास त्या बौद्ध लोकांच्या जातकांत लिहिलेल्या आहेत व त्या ख्रिस्ती शकाच्या पूर्वी कित्येक शतकांपासून चालत आलेल्या आहेत. डाक्टर ह्रीस डेव्हिड्स यानें असें सिद्ध केलें आहे कीं, ह्यांपैकीं कित्येक यूरोप खंडांत जाऊन निरनिराळ्या रूपानें तेथें चालूं आहेत.

पंचतंत्रांतील गोष्टी एकत्र करून त्या नांवाच्या ग्रंथांत गोवण्यापूर्वी कित्येक शतकें चालूं होत्या. एकिकरणाचें काम मात्र सहाव्या शतकापूर्वी झालेलें होतें कारण ह्या ग्रंथाचा तरजुमा पारशीभाषेंत त्या शतकांत झालेला आहे. त्या नंतर त्या ग्रंथाचीं भाषांतरें अरबी, ग्रीक आणि हिब्रु ह्या भाषांत झालीं. स्पेनच्या भाषेंतील तरजुमा तेरावे आणि जरमन भाषेंतील पंधराव्या शतकांत झाला. ह्या नंतर ह्या गोष्टींचीं भाषांतरें

" पिलपे अथवा विदपैच्या गोष्टी " ह्या नांवानें युरोपांतील सर्व भाषांत झालेलीं आहेत.

पंचतंत्रांतील गोष्टी सोप्या संस्कृत गद्यांत लिहिलेल्या आहेत. त्याच्याशीं **शिलादित्या**च्या कारकीर्दींतील कादंवरीकारांची कष्टसिद्ध व कृत्रिम भाषाशैली मिळविली असतां सातवे शतकापर्यंत संस्कृतगद्यपद्धतींत काय फेरफार झाला तें आपणास सहज समजतें. ह्या शतकांत **दंडिन**-कवीनें **दशकुमार** चरित्र अथवा दहा राजपुत्रांची हकीकत हा ग्रंथ लिहिला आहे. ह्याची भाषा कृत्रिम आणि आलंकारयुक्त आहे. **शिलादित्या**च्या दरबारांतील एक **बाण-भट्ट** या नांवाच्या सभासदानें लिहिलेल्या **कादंबरी** नामक ग्रंथांत त्यावेळेच्या भाषाशैलीचे गुण अथवा अवगुण विशेष स्पष्ट रीतीनें आपल्या नजरेस पडतात. ह्यांतील कथानक अयुक्तिक व भलतेंच आहे. एकच दंपत्य एकापेक्षां जास्ती जन्म घेतें तोंपण एकमेकांविषयीं अनिवार्य प्रेम त्यांच्या मनांत येतें. अपरंपार मनोविकार, दुःखातिशय, दुर्निवार प्रेमपाश, आणि जंगलांतील एकांतवासांतील उग्र तपें, ह्यांच्या देखाव्यांचीं वर्णनें चटकदार असून लिहिणारास भाषा पूर्ण अंकीत आहे अशा रीतीनें लिहिलेलीं आहेत. परंतु एकंदरींत ही भाषाशैली, त्यांत चटकदारपणा आहे तोंपण, कष्टसिद्ध व साधारण नियमांच्या बाहेर आहे. पुष्कळ ठिकाणीं शब्दजाल, विशेषणें, सामासिकशब्द आणि अनेक

आलंकार ह्यांनीं युक्त असे लांबलचक एकच वाक्य कित्येक पानेंच्या पानें चाललें आहे. ह्यापेक्षां लहानशी कल्पित गोष्ट ह्याच कारकीर्दीत **सुबंधु** यानें लिहिलेली आहे, त्या ग्रंथाचें नांव **वासवदत्ता** असें आहे.

शिलादित्याच्या कारकिर्दीतील नाटकें आणि कल्पित कादंबऱ्यांविषयीं आम्हीं वर लिहिलें आहे, परंतु ह्याच काळीं रचलेले पद्यग्रंथ हल्लीं आपणास उपलब्ध आहेत. **भर्तृहरी**चीं शतकें हीं हिंदूंच्या काव्यांतील अति सफाईबंद, चटकदार कविता आहेत अशी प्रसिद्धी आहे. ह्या शतकांवरून **भर्तृहरी** हा हिंदु होता असें दिसतें, परंतु त्याच्यावेळीं बौद्ध धर्माचा जो उल्हास होता त्याची झांक ह्या ग्रथांत दिसते. ह्याचा कांहीं भागाचें भापांतर प्रोफेसर **टॉनेनें** सुरेख आणि चटकदार इंग्रेजी भाषेंत केलें आहे. त्यांतील कांहीं उत्तारे येथें दिले असतां ह्या ग्रंथाविषयीं कांहींशी कल्पना वाचकांस येईल.

" सत्य व दया यांस न सोडणें, जीव रक्षणाकरितां ही वाईट काम न करणें, गरीबांपासून अथवा ज्यांची दुष्कीर्ति आहे अशा लोकांपासून नजर अथवा कोणतीही जिन्नस न घेणें, व उन्नत धर्म विचार आणि सविनय संतोपवृति, ह्या तरवारीच्या धारेसारख्या अरुंद

स्वकर्तव्य मार्गावर व गरगर फिरणाऱ्या नशीबाच्या कडेवर कोण निश्चयानें चालणार आहे?"*

" रक्तपात व परस्त्रीविषयीं भाषणांपासून दूर रहाणें, सत्य बोलणें आणि सढळ उदारता दाखविणें, साधु जनांविषयीं प्रीति ठेवणें, इच्छा व लोभ यांपासून अलिप्त रहाणें, अशा प्रकारचें वर्तन हाच सुखाचा मार्ग आहे. हा मार्ग कोणत्याही धर्माचा मनुष्य असो त्यास चालतां येतो, व साधा मनुष्य तर तो कधींही चुकत नाहीं."†

" विश्वासघात हा सर्व अपरावांत अतिशय वाईट अपराध आहे,

लोभ हा दुर्गुणांचें घर आहे,

सत्य हें प्रायश्चितापेक्षां फार श्रेष्ट आहे, व त्याच-प्रमाणें निर्मलता ही यज्ञयागापेक्षां श्रेयस्कर आहे.

परोपकार हा सर्व गुणांत श्रेष्ट होय,

प्रौढी हें मोठें भूषण होय,

---

* प्रिया न्याय्या वृत्तिर्मलिनमसुभङ्गेऽप्यसुकरं
असन्तो नाभ्यर्थ्याः सुहृदपि न याच्यः कृशधनः ।
विपद्युच्चैः स्थेयं पदमनुविधेयं च महतां
सतां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम् ॥ ६१ ॥

† प्राणाघातान्निवृत्तिः परधनहरणे संयमः सत्यवाक्य
काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथामूकभावः परेषाम् ।
तृष्णास्रोतोविभंगो गुरुषु च विनयः सर्वभूतानुकंपा
सामान्यः सर्वशास्त्रेष्वनुपहतविधिः श्रेयसामेषपंथाः ॥

नितिशतकं

ज्ञानास कोणाची ही मदत नसतां तें जय पावतें,
लोकापवादास प्राप्त होण्यापेक्षां मरण वरें." *
"तुम्ही विस्तृत जमिनीचे मालक आहांत,
परंतु आम्ही कवीतेचे धनी आहोंत,
तुम्ही जोरदार मनुष्यास जेर करीत असाल तर आम्ही चतुर मनुष्यास जिंकितों.
आपल्यापैकीं श्रीमान बोलत आहेत,
परंतु शहाण्यांचा माझ्यावर विश्वास आहे,
तुम्हास माझा कंटाळा आला असेल तर मी कशास राहूं ? आपली रजा घेतो." †

"वेदांपासून अथवा कायद्यांच्या ज्ञानांनीं भरलेल्या पुस्तकांपासून काय नफा आहे ? अथवा त्या लांबलचक आणि पुनः पुनः वर्णन केलेल्या दंतकथांपासून काय हित आहे ?

आपल्या पुण्यापासून आपणास काय मिळतें ?

---

* लोभश्चास्ति गुणेन किं पिशुनता यद्यस्ति किं पातकैः
सत्यं चेत्तपसा च किं शुचि मनो यद्यस्ति तीर्थेन किम् ।
सौजन्यं यदि किं जनैः स्वमहिमा यद्यस्ति किं मण्डनैः
सद्विद्या यदि किं धनैरपयशो यद्यस्ति किं मृत्युना ॥ ४५ ॥
नीतिशतकं

† अर्थानामीशिषे त्वं वयमपि च गिरामीश्महे यावदर्थं
शूरस्त्वं वादिदर्पज्वरशमनविधावक्षयं पाटवं नः ।
सेवन्ते त्वां धनाढ्या मतिमलहतये मामपि श्रोतुकामा
मय्यप्यास्था न ते चेत्त्वयि मम नितरामिव राजन् गतासीत् ॥५३॥
वैराग्यशतकं

स्वर्गवास. परंतु शहाणे लोक ह्यास भिकार स्थान मानून त्याचा धिःकार करतात.

हे सर्व प्रकार तुटपुंजे आहेत,
तो परिपूर्ण मार्ग मात्र मला द्या,
जो आपणास स्वतःच्या कृतीनें मिळूं शकतो, व जेथें दुःख वास करीत नाहीं."*

ह्या ग्रंथ कर्त्याला **भट्टी** असेंही ह्मणतात व **भट्टी-काव्य** ह्मणून एक त्याचा ग्रंथ आहे. ह्यांत रामायणाची कथा असून क्रियापदार्चीं रुपें निरनिराळ्या गणांत कशीं होतात तें दाखविलें आहे. सारांश कविता रूपानें व्याकरण शिकविण्याकरितां हें काव्य रचिलें असून तें बरेंच चागलें वठलें आहे.

दिलादित्या नंतर एक शतक गेल्यावर एक महा-कवि उत्पन्न झाला. हा गुण व किर्तीमध्यें कालिदा-साचा प्रतिस्पर्धि होता. **भवभुति** हा वऱ्हाड प्रांतांत जन्मला होता परंतु लौकरच तो कनोजच्या दरबारीं रहावयास गेला. ह्या वेळीं तें शहर विद्येसंबंधांत व राजकीय बाबतींत हिंदुस्थानची राजधानी होती. त्यानें **मालतीमाधव** हा ग्रंथ रचिला. ह्यांत त्यानें आपल्या

---

* किं वेदैः स्मृतिभिः पुराणपठनैः शास्त्रैर्महाविस्तरैः
स्वर्गग्रामकुटीनिवासफलदैः कर्मक्रियाविभ्रमैः ।
मुक्त्वैकं भवदुःखभाररचनाविध्वंसकालानलं
स्वात्मानन्दपदप्रवेशकलनं शेषा वणिग्वृत्तयः ॥७२॥
वैराग्यशतकं

स्वदेशांतील ह्मणजे वऱ्हाडांतील एका धैर्यवान राजपुत्रानें उज्जयनींतील एका राजकन्येस विलक्षण कृत्यें केल्या नंतर आपलीशी केली असें कथानक रचिलें आहे. ह्यांतील साहसी गोष्टींचें वर्णन फार जोरदार केलेलें आहे. त्याच्या **महावीरचरित्र** नामक ग्रंथांत रामाची कथा, त्याच्या जन्मापासून तों लंकेंतील लढाई आणि त्यानंतर सीतेस घेऊन तो परत अयोध्येस येईपर्यंतची, आहे, व त्याच्या **उत्तररामचरित्र** नामक नाटकांत सीतेचा त्याग आणि पुन्हा तिचा अंगीकार हा विषय आहे. हें संस्कृत भाषेंत अतिशय चटकदार व हृदयंगम करुणरसपर नाटक आहे. सुकुमार सतिचें प्रेम आणि आत्मनिग्रह, तिचा त्याग केला हा रामाच्या मनाचा कोतेपणा, व त्या नंतरचा पश्चात्ताप ह्यांचें वर्णन इतक्या जोराचें आहे कीं त्यामुळें **शेक्सपियर** कवीच्या उत्तम काव्यांचीं वाचकास आठवण होते.

ह्यापैकीं **मालतीमाधव** अथवा माधवाची व मालतीची प्रीति ह्या ग्रंथांतील कथानक अपूर्व कल्पनासामर्थ्य खर्च करून रचलेलें आहे.

माधव हा ग्रंथकर्त्याचा देश ह्मणजे विदर्भ (वऱ्हाड) चा प्रधान जो देवराज त्याचा मुलगा होता. तो आपला विद्याभ्यास पुरा करण्याकरितां उज्जयनीस गेला होता. तेथें तो रस्त्यानें चालला असतां तेथील प्रधानाची मुलगी जी **मालती** "तिनें त्यास आ-

पल्या गवाक्षांतून पाहिलें, तिस तो कामासारखा सुंदर दिसला. तीही रतिसारखी सुंदर होती."*

कामदेवाच्या वार्षिक उत्सवाच्या दिवशीं देवळांत त्याच्या दर्शनास लोक जातात. मालती देखील हत्तीवर बसून तेथें गेली असतां माधवाची आणि तिची गांठ पडते आणि तीं दोघें एकमेकांकडेस टक लावून पाहतात आणि एकमेकांच्या प्रीतिपाशांत सांपडतात.

खऱ्या प्रीतीचा मार्ग सुलभ नसतो. पद्मावतीच्या राजानें आपल्या मर्जीतला नंदन ह्मणून एक गृहस्थ होता त्यास मालती देऊं केली होती आणि राजाच्या या वचनाविरुद्ध वागण्याची प्रधानाची हिम्मत नव्हती. ही बातमी मालतीस समजते तेव्हां आपल्यावर मोठा डोंगरच कोसळला असें तीस वाटतें. कामंदकी ह्मणून एक बौद्ध योगिणी होती, तिच्या मनांत दया येऊन ती ह्मणते:—

"ह्या मुलीस मी काय मदत करूं ! मुलीनें आपल्या नशीबावर अवलंबून राहिलें पाहिजे व तिनें आपल्या बापाची आज्ञा पाळली पाहिजे. हें खरें आहे

---

* भूयो भूयः सविधनगरीरथ्यया पर्यटन्तं
दृष्ट्वा दृष्ट्वा भवनवलभीतुंगवातायनस्था ।
साक्षात्कामं नवमिव रतिर्मालती माधवं य-
द्गाढोत्कण्ठा लुलितललितैरङ्गकैस्ताम्यतीति ॥

कीं, कौशिकांच्या कुलीन घराण्यांतील **शकुंतलेनें** आपल्यास पसंत आला तो **दुष्यंत** पति केला, स्वर्गांतील एका सुंदर आप्सरेनें ह्या मृत्यु लोकांतील **पुरुरवा** राजावरोवर लग्न लाविलें आणि राजकुमारी **विश्वदत्तेनें** तिच्या वापानें पसंत केलेला पति नापसंत करून आपल्या मनानें पसंत केलेला जो राजपुत्र **उदयन** त्याजवरोवर ती पळून गेली. ह्या गोष्टी कवी सांगतात परंतु हीं कृत्यें साहासीं आहेत."*

हें उघड आहे कीं, येथें हा कवि आपला कविपूर्वज जो कालिदास त्याच्या दोन ग्रंथांस व **विश्वदत्ते**च्या गोष्टीस अनुलक्षून लिहीत आहे. ही **विश्वदत्ते**ची गोष्ट दुसऱ्या शिलादित्याच्या दरवारांत कादंवरी व नाटकाचें लोकप्रिय कथानक होतें.

बौद्ध योगिणीनें **मालती** व **माधव** यांस साहाय्य करण्याचा दृढनिश्चय केला होता. त्या दोघांची गांठ योगिणीच्या घरांत होते, परंतु तेथून राणीच्या आज्ञेनें **मालती**स धरून ओढून नेतात. नंतर आपला इष्ट हेतु सिद्ध होण्याकरितां **माधव** गूढ विधींचें अवलंबन करितो, आणि

---

* कामंदकी–अयि सरले किमत्र मया भगवत्या शक्यम् । प्रभवति प्रायः कुमारीणां जनयिता वैवं च । यच्च किल कौशिकी शकुंतला दुष्यंतमप्सराः पुरूरवसं चक्रम इत्याख्यानविद आचक्षते वासवदत्ता च संजयाय राज्ञे पित्रा दत्तमात्मानमुदयनाय प्रायच्छदित्यादि तदपि साहसाभासमित्यनुपदेष्टव्य एवायमर्थः !

त्यामुळें तांत्रिकपूजेच्या भयंकर देखाव्याचें वर्णन येतें. दैदिप्यमान अथवा भययुक्त प्रसंगाचें वर्णन करण्यांत भवभूतीची बुद्धिमता जितकी प्रज्वलीत दिसून येते तितकी दुसऱ्या प्रसंगीं येत नाहीं.

भयंकर चामुंडा देवीचें देऊळ स्मशानांत होतें. तेथें त्या देवीची दुष्ट भक्तीण **कपालकुंडला** आपल्या नांवाप्रमाणें मुंडांची माळ गळ्यांत घालून पूजा करीत होती. आपला इष्ट हेतु साधण्यास भूतांची मदत मिळावी म्हणून अपक्व मांसाचा बलि घेऊन **माधव** ह्या देवळांत जातो, व भूतपिशाच्चांस बलि देऊन तो ओरडतो:—

"ह्या भयाण जागेचा देखावा मोठा भयंकर दिसत आहे. हें स्थान दुष्ट भूतांनीं भरलेलें आहे, चितेवर मांसाचे लोचेच्या लोचे असल्यामुळें त्यांच्या आजूबाजूस जो भयंकर अंध:कार आहे तो घालविण्यापुरताही तिच्या ज्वालांचा प्रकाश पडत नाहीं. नानाप्रकारच्या क्रीडा करण्यामध्यें अगदीं गढून गेलेले, किलकिल शब्दांनीं गोंगाट करून उन्मत्त झालेले, मोठे व उंच अशा प्रकारचे पिशाच्च ध्वनि प्रतिध्वनि करीत आहेत.

"बरें, मला त्यांना शोधून काढून त्यांच्याशीं बोललें पाहिजे.

"हे दुष्ट भूतांनों, हे शरीररहित प्राण्यांनों; जे

तुम्हीं ह्या जागेंत रहातां, त्या तुम्हांस विकत देण्याकरितां मीं मांस आणिलें आहे. हें नरमांस आहे, ह्यास शस्त्रांचा स्पर्श झालेला नाहीं, आणि तें तुम्ही मान्य करून घेण्यासारखें आहे.

(पुनः पडद्यांत मोठा गोंगाट होतो.)

"हा आवाज कसा आहे तो पहा! सर्व ठिकाणीं गोंगाट करणाऱ्या भूतांच्या उंच, कर्कश, अस्पष्ट, अशा शब्दांनीं हें भयप्रद स्मशान दुमदुमून गेलें आहे! आकाशांत कोल्ह्या सारख्या चमत्कारिक आकृती फिरत आहेत! त्यांच्या खपाटें वसलेल्या शरीरांच्या तांबड्या केसांपासून उल्कापाताच्या ठिणग्या निघत आहेत, अथवा त्यांचीं तोंडें जीं एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत पसरलेलीं आहेत व जीं मोठमोठ्या सुळ्या दातांनीं भरलेलीं आहेत, त्यांपासून व डोळ्यांतून, दाढींतून आणि त्यांच्या भिवयांतून अग्नीच्या ज्वाला चालल्या आहेत. आणि आतां, मी तीं भूतें पहात आहें.

"तीं माझ्याकडेस पहात आहेत, त्यांनीं अर्धवट चावलेले घांस त्यांच्या तोडांतून खालीं पडून ते केंकावणारे लांडगे घेत आहेत. पहा तीं आतां पळत आहेत.

(उभा राहतो आणि आजूबाजूंस पाहून)

"अहह! ही धांवपळ फार उग्र आहे! आतां तर

पूर्ण अंध:कार झाला. येथें माझ्या समोर नदी वाहत आहे. ही ह्या भयाण स्मशानभूमीची सीमा असून तिचा ओघ मातीस मिळणाऱ्या अस्थींमधून प्रतिबंधित चालला आहे. हा ओघ पुढें जातां जातां स्वैर होत गेला आहे व तो आपल्या तटांस कोसळून पाडीत आहे. रडणारें घुबड त्याच्या घेरदार झाडींतून घु घु शब्द करीत आहे आणि त्या शब्दास मोठ्यानें व पुष्कळ रडणारा व कण्हणारा कोल्हा आपल्या केंकावण्यानें उत्तर देत आहे."*

---

* माधवं--अहो संप्रति प्रगल्भमान कौणपनिकायस्य महती स्मशानवाटस्य रौद्रता । अस्मिन्हि
पर्यन्तप्रतिरोधिमेदुरचयस्त्यानं चिताज्योतिषा-
मौज्ज्वल्यं परमागतः प्रगटयत्याभोगभीमं तमः ।
संसक्ताकुलकेलयः किलकिलाकोलाहलैःसंमदा-
दुत्तालाः कटपूतनाप्रभृतयः सांराविणं कुर्वते ॥

भवत्वाघोषयामि तावत् । उच्चैः । भो भोः स्मशाननिकेतनाः कटपूतनाः ।

अशस्त्रपूतं निर्व्याजं पुरुषाङ्गोपकल्पितम् ।
विक्रीयते महामांसं गृह्यतां गृह्यतामिदम् ॥

पूनर्नेपथ्ये कलकलः ।

माधव—कथमाघोषणानन्तरमेव सर्वतः समुच्चलदुत्ताल वेताल-मुक्ततुमुलाव्यक्तकलकलाकुलः प्रचलित इवाविर्भवद्भूतसंकटः स्मशानवाटः । आश्चर्यम् ।

कर्णाभ्यर्णविदीर्णसृक्कविकटव्यादानदीप्ताग्निभि-
र्दंष्ट्राकोटिविसंकटैरित इतो धावद्भिराकीर्यते ।
विद्युत्पुञ्जनिकाशकेशनयनभ्रूश्मश्रुजालैर्नभो
लक्ष्यालक्ष्यविशुष्करीर्घवपुषामुल्कामुखानां मुखैः ॥

आकस्मात् **माधवा**च्या कानावर दुःखपिडीत तरुण स्त्रीचा मंजूळ आणि भयभीत स्वर ऐकूं येतोः—

"हे निर्दय तात ! जीस राजाच्या अनुग्रहास तूं बलि देणार होतास ती सर्वांनीं सोडून दिलेली अशी अरण्यांत मरण पावत आहे."*

हा स्वर **माधवास** अनोळखीचा नव्हता. तो देवळांत घुसून आंत जातो आणि पाहतो तों चामुंडेचा दृष्ट भक्त पूजारी आघोरनाथ हा **मालतीस** बलीचा वेष घालून बली देण्यास तयार आहे. कित्येक तांत्रिक विधींत कुमारिकेचा बली द्यावा लागतो, त्याप्रमाणें पद्मावती शहरांतील अति मनोहर आणि निष्कलंक कुमारीकेस शोधून तीस उडवून ह्या बलिप्रदानाकरितां आणिली होती. तीस कसें चोरून आणिलें तें **माल**तीसही माहीत नव्हतें. ती म्हणतेः—

अपि च। एतत्पूतनचक्रमक्रमकृतग्रासार्धमुक्तैर्बृका-
नुत्पुष्णत्परितो नृमांसविघसैराघर्घरं क्रन्दतः।
परिक्रम्य दृष्ट्वा सनिर्वेदम्! विचितश्चैष समन्ताच्छ्मशानवाटः
तथा हि खल्वियं पुरत एव।

गुञ्जत्कुञ्जकुटीरकौशिकघटाघूत्कारसंवल्गित-
क्रन्दत्फेरवचण्डडात्कृतिभृतप्राग्भारभीमैस्तटैः।
अन्तःशीर्णकरङ्ककर्करतरत्संरोधिकूलंकष-
स्रोतोनिर्गमघोरघर्घररवा पारेऽमशानं सरित्॥

* हा तात निष्करुण एष इदानीं ते नरेंद्रचित्ताराधनोपकरणं जनो विपद्यते।

"मी संध्याकाळीं गच्चीवर निजलें परंतु जागी झालें तेव्हां पाहिलें तों मी वंदीवान होतें."*

माधव त्या दृष्ट अघोऱ्यास ठार मारून आपल्या प्रियेस सोडवितो, परंतु त्या अघोऱ्यापेक्षांही अधिक दुष्ट जी कपालकुंडला ती त्याचा सूड उगविण्याची शपथ वाहते.

ह्या नंतर कित्येक वारीक सारीक गोष्टी होऊन गेल्यावर **माधवा**चा मित्र **मकरंद**, ज्याची प्रीति नंदनाच्या बहीणीवर बसली होती, तो **मालती**चा वेष घेऊन राजाचा कृपापात्र जो **नंदन** त्यावरोबर लग्न लाविती. आपल्या नवीन पत्नीची विनवणी करण्यास **नंदन** जातो, परंतु युवतीस अयोग्य असें दांडगाईचें वर्तन ती करिते.

नंतर **नंदना**ची बहीण आपल्या भावजयीस शिष्टाचार शिकविण्यास जाते, तेव्हां आपला प्रिय **मकरंद** हा भावजयीच्या रूपानें आहे असें तीस समजतें. दोघेही पळून जातात. तेव्हां राजा आपले स्वार त्यांस पकडण्यास पाठविती, परंतु **माधव** आणि **मकरंद** हे दोघे त्या स्वारांचा पराभव करतात, तेव्हां राजा त्यांचें तें शौर्य पाहून त्या दोघांसही क्षमा करितो.

येथें राजाच्या परवानगीनें दोन्हीं दंपत्यांचीं लग्नें

---

* मालति–महाभाग अहं न किमपि जानामि। एतावत्पुनर्जानाम्युपर्यलिन्दकं प्रसुप्तेह प्रबुद्धास्मि। यूयं पुनः क्व।

लावून ह्या नाटकाचा शेवट करतां आला असतां, परंतु सृष्टीचीं व मानवीमनोवृतींचीं कित्येक जोरदार वर्णनें आणण्याकरितां **भवभूती**नें हें कथानक लांबविलें आहे. ह्या पुढील भागांतील प्रसंग व गोष्टी नेहमीं-प्रमाणें अघटीत आहेत परंतु त्यांचीं वर्णनें अप्रतिम चटकदार आहेत. दुष्ट पापी भक्तीण **कपालकुंडला** पुनः एकदां **मालती**स चोरून नेते, आणि तिच्या शोधास विंध्याद्रिपर्वतांत **माधव** जातो. **सौदामिनी** ही पूर्वी बौद्धयोगिणी होती परंतु योगाचें साधन केल्या-मुळें तिच्यांत दैविक शक्ति आली होती, ती **माधवास** मदत करण्याचा निश्चय करिते. तिच्या तोंडांतून खालीं लिहिल्याप्रमाणें फार चटकदार स्थलवर्णन आपणांस मिळतें:—

" काय विस्तृत देखावा हा ! पर्वत आणि खडक, शहरें, खेडीं, रानें व चकचकणारे ओढे पहा. तीं **पारा** आणि **सिंधु** ह्या नद्यांचीं वळणें. तेथें पद्मावती नगरींतील गोपुरें आणि देवळें, शिखरें व कळस, ह्यांचीं प्रतिबिंबें— जसें काय तें शहर स्वर्गांतून खालीं पडलें आहे—खालींल स्वच्छ उदकांत उलटीं दिसत आहेत. तो लवण नदीचा जलौघ खेळत खेळत वाहत आहे. त्याच्या काठांवरील अंबराई लौकर झालेल्या पावसानें टवटवीत झालेल्या आहेत. तेथें पद्मावती येथील तरुण पुरुष व युवती यांस फिरण्यास चांगली जागा झाली आहे व तेथेंच

जिची कांस दुधानें पूर्ण भरलेली आहे अशी गाई आनंदानें चरत आहे. पहा पहा, जिचें पात्र रुंद आहे अशा सिंधु नदीच्या कडा कशा पडत आहेत त्या ! जो प्रवाह त्यांस मूळांतूनच खोदीत आहे त्यांत त्या कडकड शब्द करीत पडत आहेत. हा शब्द ढगांत मेघगर्जना होते त्याप्रमाणें मोठा होत जात आहे, व हेडंबाची गर्जना दरीमधील पोकळींत शिरून तिचा प्रतिध्वनि होतो, तसा हा आवाज पर्वताच्या भोंवती घुमत आहे. ह्या पर्वतावर जागजागीं असणाऱ्या सुवासिक चंदनाची व जुनाट मालूरवृक्षांची झाडी पाहून दक्षिणेकडील उंच पर्वतांची, जेथें गोदावरी त्यांच्या भरगच्च छायेखालीं सोसाट्यानें वाहत आहे व जेथें तिच्या त्या घोघावणाऱ्या आवाजाचा प्रतिध्वनि आजूबाजूच्या अरण्यांत होतो, अशा त्या पर्वतांची आठवण होते."*

---

* सौदामिनी—भोस्तथाहमुत्पतिता यथा सकल एव गिरिनगरग्रामसरिदरण्यव्यतिकरश्चक्षुषा परिक्षिप्यते। पश्चात् विलोक्य। साधु साधु।

पद्मावतीविमलवारिविशालसिन्धु
पारासरित्परिकरच्छलतो बिभर्ति।
उत्तुंगसौधसुरमन्दिर गोपुरावृ
संग्रहपाटितविमुक्तमिवान्तरिक्षम् ॥

अपिच। सैषा विभाति लवणा ललितोर्मिपङ्क्ति-
रभ्रंगमें जनपदप्रमदाय यस्याः।
गोगर्भिणीप्रियनवोलपमालभारि-
सेव्योपकण्ठविपिनावलयो भवन्ति ॥

सौदामिनी आपल्या जादुनें **मालती**ची सुटका करिते आणि ती व नंदनाची वहीण ह्यांचीं लग्नें **माधव** व **मकरंद** यांजबरोबर अनुक्रमें लागतात.

विक्रमादित्याच्या वेळच्या कवितारामंडळांत **कालि-दास** जसा आद्य कवि होऊन गेला तसा **भवभूती** हा शे-वटचा कवि होय. तो प्रथम कनोजचा राजा **यशोवर्मा** ह्याच्या दरबारीं रहात असे. परंतु काश्मीरचा राजा **ललितादित्य** ह्यानें त्या राजाचा पराभव केल्यावर तो विजयी राजाबरोबर काश्मीरास गेला व बहुत करून तेथेंच त्याचा अंत आठवे शतकाच्या मध्य सुमारास झाला.

ह्या नंतर **अंधःकार** युग बसलें आणि तीन शतकें-पर्यंत विद्येंत व शास्त्रांत नांव घेण्यासारखा मनुष्य हिंदुस्थानांत उत्पन्न झाला नाहीं! अकरावे शतकाच्या

अन्यतोवलोक्य। अथमसौ भगवत्याः सिन्धोर्दारितरसातल-स्खलद प्रपातः।

यत्रत्य एष तुमुलो ध्वनिरम्बुगर्भ
गम्भीरनूतनघनस्तनितप्रचण्डः।
पर्यन्तभूधरनिकुञ्जविजृम्भमाणो
हेरम्बकण्ठरसितप्रतिमानमेति॥

एताश्च चंदनार्ध्वकर्णकेसरपाटलाप्रायतरुगहना परिणतमाल्लूरसु-रभयोरण्यगिरिभूमयः स्मारयन्ति खलु तरुणकदम्बजम्बूवनावनद्धा-न्धकारगुरुनिकुञ्जगम्भीरगव्हरोद्गारगोदावरीमुखरितस्निग्धविशाल-मेखलाभुवो दक्षिणारण्यभूधरान्।

अखेरीस अर्वाचीन रजपूत हे हिंदुस्थानचे स्वामी झाले. ह्या रजपूतांच्या पुनरुज्जीवनाबरोबर हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासाचा अंत आणि अर्वाचीन इतिहासाचा प्रारंभ होतो.